श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३२
श्रीदासराममहाराजलिखित
**लघु चरित्रे**
LAGHU CHARITRE

**प्रकाशिका** : **सौ.रोहिणी चंद्रशेखर केळकर**
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन,
श्रीबापूरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०११

**प्रकाशन दिन** : शुक्रवार दि. १५-७-२०११
आषाढ पौर्णिमा, शके १९३३ (श्रीगुरुपौर्णिमा)

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य** : रु. १००/-

---

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३२

श्रीदासराममहाराजलिखित

# लघु चरित्रे

ॐ

◆ संपादक ◆

**प्रा.डॉ.के.वा.आपटे**

◆ प्रकाशिका ◆

**सौ.रोहिणी चंद्रशेखर केळकर**

आवृत्ति पहिली　　सांगली　　इ.स. २०११

## संपादकीय

सद्‌गुरू तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या आशिर्वादानुसार श्रीदासराममहाराज हे वयाच्या पाचव्या वर्षांपासून साधनास बसू लागले आणि हरिकीर्तन करू लागले. त्यांना वयाच्या सातव्या वर्षी 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली आणि त्यांचे पारमार्थिक लेखन सुरू झाले. त्यांचे पहिले पद असे होतेः- गुरूचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ।।१।। गुरूकृपेचे असावे छत्र श्रीराम हालवितो सूत्र ।।२।। रामनामे रंगलिये वाणी । हीच लावण्याची खाणी।।३।। राम म्हणे नका धरू शंका । एक हलवा गुरु पंखा ।।४।। आणि त्यांचा पहिला प्रकरण ग्रंथ होता 'रामदासबोध' या नावाचा. आणि त्यांचे पहिले प्रकाशित पुस्तक होते सानंद टीकेसह श्रीज्ञानदेव तेहत्तिशी.

दासरामांचे आध्यात्मिक लेखन अमाप होते. त्यांच्या लेखनाचा आढावा श्रीदासराम गौरव ग्रंथ या पुस्तकात श्रीदादांचे वाङ्मय या शीर्षकाखाली पृ.१-६ वर आला आहे.हा ग्रंथ श्रीदासरामांच्या षष्ट्यब्दपूर्ति निमित्त प्रकाशित झाला होता.त्यानंतर श्रीदासराममहाराजांच्या लेखनाचा विस्तृत आढावा श्रीदासराममहाराज चरितामृत या त्यांच्या चरित्र ग्रंथात पृ. २७८-२८८ वर आलेला होता. एकादा विशिष्ट दृष्टिकोन पुढे न ठेवता, दासराममहाराजांच्या काही लेखनांचा संग्रह हा ज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघु ग्रंथ, परमार्थसार आणि अन्य ग्रंथ, तसेच चांगदेवपासष्टी व इतर ग्रंथ या पुस्तकांत प्रकाशित झाला होता.

आता मात्र विशिष्ट दृष्टिकोन पत्करून, श्रीदासराममहाराजांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथांचा आढावा यापुढे घेतलेला आहे.

**अ)** अन्य ग्रंथावर टीका टिप्पणी, त्यांचा अर्थ व विवरण, इत्यादि. या वर्गात त्यांचे पुढील ग्रंथ येतात :-

१) ज्ञानेश्वरांचे ग्रंथ :- ज्ञानदेव तेहत्तिशी, मुद्राप्रकाश, दत्तस्तुति, नमन स्तोत्र, ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र, अमृतानुभव-मंगलाचरण, अमृतानुभव सम-ओवी-टीका, चांगदेव पासष्टी, उत्तरगीतेवरील ज्ञानेश्वरांच्या ओवीबद्ध



टीकेचा अर्थ. हे सर्व प्रकाशित झालेले आहेत.

असे दिसते की ज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंग गाथ्याचा अर्थ दासरामांना लिहावयाचा होता. त्या दृष्टीने त्यांनी आरंभही केलेला दिसतो. मात्र हे काम कोणत्यातरी कारणाने अपूर्ण राहिले. तेव्हा त्यांनी लिहिलेल्या अभंगांचा जो अर्थ आज उपलब्ध आहे, तो लौकरच प्रकाशित केला जाईल.

२) एकनाथमहाराजांचे ग्रंथ :- एकनाथी भागवताशी संबंधित, आणि प्रकाशदीपिका (प्रकाशित)

३) तुकाराममहाराजांचे नित्यपाठाचे बारा अभंग : यांचे स्पष्टीकरण करणारी श्रीदासरामहाराजांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

४) समर्थ रामदास स्वामींचे ग्रंथ :- आत्माराम व सोलीव सुख यांचा अर्थ प्रकाशित झाला आहे.

५) ऋग्वेदातील नासदीय सूक्ताचे सविस्तर स्पष्टीकरण मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहे.

६) मामामहाराज केळकरांच्या रामपाठ व नित्यपाठ या ग्रंथांचे श्रीदासराममहाराजांनी केलेले सविस्तर स्पष्टीकरण प्रकाशित झालेले आहे.

**आ) दासराममहाराजांना झालेला बोध :-** दासराममहाराजांना काही संतांनी तसेच त्यांचे गुरु कोटणीसमहाराज यांनी त्यांच्या हृदयात काही बोध प्रगट केला. तो दासराममहाराजांनी आपल्या अभंगात लेखनबद्ध केला. हा बोध 'सद्‌बोधदशक' आणि 'गुरुराजकथित ज्ञान आणि बोध' या शीर्षकाखाली उपलब्ध आहे.

**इ) दासराममहाराजांचे अभंग/पदे** :- दासराममहाराजांना स्फुरलेला अभंग-पदांचा गाथा व त्या गाथ्याची पुरवणी हे दोन्हीही प्रकाशित झाले आहेत.

**ई) दासराममहाराजांचे प्रकरण ग्रंथ :-** दासराममहाराजांचे काही छोटे छोटे प्रकरण ग्रंथ आहेत. उदा. गुरुमहिमा, रामदासबोध, वायुलहरी, गुरुपाठ,

संजीवनपाठ,सांप्रदायबोध,दासरामविंशिका, दासराम पंचविशी, आत्मबोधप्रत्ययामृत हे प्रकाशित झाले आहेत. उत्तरोक्त तीन ग्रंथ हे विवरणासह 'ग्रंथत्रयी' मध्ये आढळतात.

**उ) दासराममहाराजांचे गद्यलेखन :–** श्रीदासराममहाराजांचे बहुतेक लेखन पद्यात आहे. तथापि कारणपरत्वे त्यांनी गद्यामध्ये काही स्फुटलेख लिहिले होते. उदा. आत्मविज्ञान, सोहंसाधना, इत्यादि.यांतील काही लेख मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. दासरामांचे सर्व गद्य लेख 'लेखसंग्रह' या शीर्षकाखाली लौकरच प्रकाशित होतील.

**ऊ) विशिष्ट विषय :–** विशिष्ट विषयाला धरून असणारे आरती संग्रह, आत्मचरित्र, भजनतरंग आणि श्लोकबद्ध रचना हे प्रकाशित झाले आहेत.

**ए) स्फुरलेले विचार** :– दासराममहाराजांना काही स्फुट विचार स्फुरले. तसेच त्यांना संतांची काही वचने आवडली. यांचा संग्रह त्यांनी 'आत्मलहरी' या शीर्षकाखाली करून ठेवला आहे. तो लौकरच मुद्रित होईल.

**ऐ)** मामामहाराज विद्यमान असताना आणि त्यांचे निर्वाणानंतर काही दिवस दासराममहाराजांची प्रवचने झाली. तसेच त्यांची आपल्या भक्तांशीही संभाषणे झाली. त्यांना अनुसरून 'दासराम वचनामृत,परमार्थ प्रश्नोत्तरी, दासराममहाराज वचनसंग्रह आणि हरिपाठ संकीर्तन' हे ग्रंथ प्रकाशित झाले. मामामहाराजांच्या निर्वाणानंतर झालेल्या दासराममहाराजांच्या प्रवचनांची काही टिप्पणे उपलब्ध आहेत. ती लौकरच 'दासराममहाराज कृत प्रवचने' या शीर्षकाखाली प्रसिद्ध होणार आहेत.

**ओ) संतचरित्रे :–** दासराममहाराजांनी काही संतसज्जनांची चरित्रे गद्यात तसेच पद्यात लिहिली होती. त्यापैकी तात्यासाहेब कोटणीसमहाराज, बाबासाहेब मुजुमदार, गंगाधर दीक्षित(सांगली महात्म्य) ही चरित्रे प्रकाशित झालेली आहेत. याखेरीज दासराममहाराजांनी काही संतसज्जनांची लघु चरित्रे गद्य व पद्य यांत लिहिली होती. ती येथे 'लघु चरित्रे' या शीर्षकाखाली प्रकाशित होत



आहेत आणि ती गद्य व पद्य अशा दोन विभागांत प्रस्तुत केलेली आहेत.गद्यामध्ये ११ चरित्रे आहेत आणि पद्यात ११ चरित्रे आहेत.

या लघु चरित्रांत श्रीदादांच्या चिमड संप्रदायातील काही सिद्ध साधूंची चरित्रे आहेत. उदा. रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, गुरुलिंगजंगम स्वामी, इत्यादि. श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे बद्दल थोडे सांगणे आवश्यक आहे : येथे त्यांची चरित्रवजा तीन टिपणे आहेत त्यातील पहिले मुख्य मानून इतर दोहोंना क्रमांक (अ) व (ब) असे क्रमांक दिले आहेत. रेवणसिद्धांची दोन चरित्रे (१) व (२) असे अंक घालून दाखविली आहेत. त्यांचे जोडीने अन्य संप्रदायातील काही साधुसंतांची चरित्रे त्यांनी लेखनबद्ध केली होती. उदा. चांगदेव,राधाक्का, रामानंदमहाराज खटावकर, चांदवलेकरमहाराज, पांडुरंगमहाराज ताम्हनकर, गणपतरावमहाराज कन्नुर, इत्यादि. ही सर्व तादृश संक्षिप्त आहेत. म्हणून ती या ग्रंथात लघु चरित्रे या शीर्षकाखाली प्रकाशित केली आहेत. या प्रकाशनाचे कामी श्रीदासरामहाराजांचे नातू श्री.दीपकराव यांचा पुढाकार आहे, हे येथे नमूद करावयास हवे.

**के.वा.आपटे**

## आशीर्वाद

।। श्रीराम ।।

माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांनी अनेक संत महात्म्यांची गद्य व पद्य स्वरूपात चरित्रे लिहीली आहेत. ती सगळी एकत्र करण्याचे काम श्री.दीपक केळकर व प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी केले आहे. श्रीदासराममहाराज लिखित लघु-चरित्रे या नावे ते हे पुस्तक प्रकाशित करीत आहेत अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

आमच्या श्रीदादांनी अनेक संतांची ही लघुचरित्रे लिहिली, अत्यंत आश्चर्यकारक वाटते. पण संतमहात्म्यांना काही अशक्य असत नाही. कारण जगद्‌गुरु श्रीतुकाराममहाराज म्हणतात "पाहिले पुराणे । धांडोळली दरुशने ।।" वाचली म्हणलेले नाही. पाहिली म्हटले आहे. त्यांनी प्रत्यक्ष पाहिली त्यास वाचायला कशाला लागते. श्रीशुकाचार्यांना श्रीजनकराजांनी जी समाधि लावली त्यावेळी मी तेथे हजर होतो असे तुकाराममहाराज म्हणतात. 'तेथे नेवोनिया लाविली समाधि । तुका म्हणे तेथे होतो आम्ही ।।'

तसे आमच्या ती.प.पू.श्रीदादांनी अनेक महात्म्यांची चरित्रे प्रत्यक्ष पाहिली व ती लिहिली. 'थोर महात्मे होऊनी गेले चरित्र त्यांचे पहा । आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा ।।' असे सत्पुरुष म्हणतात आणि आपण त्यांच्या समान व्हावे हे केव्हा घडते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'हृदयाहृदय एक झाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले । द्वैत न मोडता केले । आपणा ऐसे अर्जुना ।।' हे त्यातले वर्म आहे.

अनेक महात्म्यांचे एक आदर्श चरित्र आपल्या ती.प.पू.श्रीदादांनी या लिखाणानी आपले समोर उभे केले. आपण त्यांच्या समान होणे माझ्या दृष्टीने तरी अशक्य आहे. त्यांच्या जवळ जाता येईल, त्यांना पाहता येईल, त्यातले काही आपल्या मध्ये उतरविण्याचा प्रयत्न करता येईल, तशी साधना वा प्रयत्न आपल्या हातून घडावा अशी भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे चरणी शतशः प्रार्थना आहे.



भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांचे अनंत वाङ्मय आहे. ते प्रकाशात आणणेचे कामी आमचा श्री.दीपक केळकर, प्रा.नारायण केशव आपटे व स्वतः प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी खूप परिश्रम घेतले आहेत व हे सारे आम्हाला सहज उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे त्यांचे ऋण मानावे तेवढे थोडे आहे. या सगळ्या त्यांच्या कार्यास भगवान् श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे आशीर्वाद प्राप्त व्हावेत अशी भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.मामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतशः प्रार्थना करतो.

शेवटी हे पुस्तक ज्यांनी प्रकाशित आणले अशा आमच्या सौ.रोहिणी चंद्रशेखर केळकर व ज्यांनी हा ग्रंथ साकार केला असे आमचे श्री. बाळासाहेब लोखंडे यांना धन्यवाद देऊन त्यांचे ऋण मानतो.

**।। राजाधिराज श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।**

सांगली,
योगिनी एकादशी,
दि. २७-०६-२०११

श्रीदादांचा कृपाभिलाषी
*चंद्रशेखर*
(चंद्रशेखर रामराय केळकर)

## गौरव

।। श्रीराम ।।

माझे आजोबा ती.प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांनी चिमड संप्रदायातील तसेच अन्य संप्रदायांतील एकूण २२ अधिकारी संत-महात्म्यांची संक्षिप्त चरित्रवजा माहिती वेगवेगळ्या लेखन वहीत लिहिलेली होती. या लेखन वह्यांची छाननी करता ही सर्व चरित्रवजा माहिती माझ्या दृष्टोत्पत्तीस आली. यावेळी माझ्या मनात विचार आला की ही सर्व चरित्रे वेगवेगळी छापण्यापेक्षा एकत्रितरीत्या 'लघुचरित्रे' या शीर्षकाखाली छापली तर वाचण्यास सोपे जाईल. यादृष्टीने मी याबाबत श्रीकेशवकाका आपटे यांचेशी बोललो. त्यांनाही ही योजना फार आवडली. त्यांनी लगेच होकार देऊन ही सर्व चरित्रे असणाऱ्या वह्या एकत्रित करून त्यांचेकडे आणून देण्यास सांगितले. यानुसार श्रीकेशवकाका यांनी सर्व वह्या वाचून व परीक्षण करून या लघुचरित्रे या पुस्तकाला सुरेख अशी प्रस्तावना लिहून दिली व चरित्रांचा क्रम ठरवून दिला. या सर्व कामाबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत.

या जगी संत बहूत झाले । परी ते दृष्टीस नच आले ।। या प.पू. श्रीसाईबाबा यांच्या उक्तीनुसार आपल्या भारत देशात अनेक संत-महात्मे, सिद्धपुरुष होऊन गेले. परंतु ते प्रसिद्धिपराङ्मुख असलेने ते जनतेच्या डोळ्यासमोर आले नाहीत. परंतु आमच्या आजोबांनी ही २२ लघुचरित्रे लिहून या ग्रंथात असणाऱ्या प्रत्येक चरित्रनायकाचे कार्य व अधिकार जनतेपुढे आणणेचे मोठे काम केले आहे आणि याला तोडच नाही असे माझे मत आहे. ।। सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।। या संतश्रेष्ठ शांतीब्रह्म श्रीएकनाथमहाराजांचे उक्तीनुसार आमचे आजोबांनी जी चरित्रे वर्णन (लिहीली) केली आहेत ती वाचली असता प्रत्येक चरित्रनायकाचे सगुणरूपातील चरित्र आपल्या डोळ्यापुढे उभे राहिल्याशिवाय रहाणार नाही असा माझा विश्वास आहे. याच्या प्रचितीचा एक अनुभव म्हणजे प.पू. श्रीराधाबाईअक्का यांचे



चरित्र मी वाचले असता मी हरिपूरला केव्हा जातो व त्यांच्या समाधीचे दर्शन केव्हा घेतो असे मला झाले व त्याप्रमाणे मी दर्शन घेऊन समाधान पावलो.

वर नमूद केलेप्रमाणे प.पू.श्रीदासराममहाराजांनी एकूण २२ लघुचरित्रे लिहिलेली आहेत. त्यातील २० लघुचरित्रे आमचेजवळ उपलब्ध होती. उर्वरीत २ चरित्रे म्हणजे प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर व प.पू. श्रीगणपतरावमहाराज कन्नूर यांची चरित्रे आमचेजवळ उपलब्ध नव्हती. परंतु योगायोग म्हणा अथवा आमच्या आजोबांची इच्छा म्हणा, ही दोन चरित्रे ज्या पुस्तकात आहेत ती पुस्तके या काळात माझ्या वाचनात आली व ही दोन चरित्रे या ग्रंथात समाविष्ट करणेत आली आहेत.

प.पू.श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात या लघु चरित्रे या ग्रंथाची महती सांगून माझे हे चार शब्द भगवान सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, प.पू.श्रीमामामहाराज केळकर व प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अर्पण करून येथेच थांबतो.

*तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें ।*
*जे भक्त चरित्रातें । प्रशंसिती ।। ज्ञा.१२-२२७।।*

(भगवान म्हणतात, जे माझ्या भक्तांचे चरित्र ऐकतात व जे माझ्या भक्तांच्याच चरित्राची प्रशंसा करतात, ते मला खरेच माझ्या प्राणापेक्षा जास्त प्रिय आहेत.)

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

सांगली,
ज्येष्ठ शु. १०, शके १९३३
प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर जयंती
दि. ११/०६/२०११

**दीपक चंद्रशेखर केळकर**

(१)

## प.पू.श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी (निंबरगीकर)

इ.स.१८९१मध्ये श्रीनागाप्पाण्णामहाराज यांचा जन्म झाला. हे भगवान् श्रीसद्गुरू श्रीनारायणराव भाऊसाहेब ऊर्फ श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर यांचे नातू. श्रीनागाप्पाण्णांचे वडिलांचे नांव भीमाण्णा व आईचे नाव सौ.सिदव्वा असे होते. हे लहानपणी देवाची पूजा करणे, आरती करणे, भजन करणे यांतच रममाण होत. त्यांचे शाळेतील शिक्षण जरुरीपुरते झाले. यांना श्रीभाऊसाहेब उमदीकरमहाराज यांचा अनुग्रह होता.

श्रीनागाप्पाण्णामहाराज यांना रोज सकाळी खाणेची सवय होती. हे भाऊसाहेबमहाराज हे सांप्रदायाच्या प्रचाराकरिता निघाले की त्यांचेबरोबरच नेहमी जात. एकदा सकाळी त्यांना खाणेस देणेची व्यवस्था करणेचे राहिले. त्या दिवशी जेवणांनतर श्रीनागाप्पांना उलटी झाली व अंगावर पित्त उठले. तेव्हापासून प्रवासात श्रीभाऊसाहेबमहाराज त्यांना सकाळी मुगाचे लाडू देवू लागले व सकाळी त्यांचे खाणेपिणेची व्यवस्था करू लागले.

श्रीनागाप्पाण्णा हे वाद्य-गायनात निष्णात होते. एखादी चीज ऐकली तरी ते आत्मसात करीत. तीच चीज जर कोणी मागू लागला तर ते देत नसत. पुढे लिहून पाठवितो म्हणूनच त्याची बोळवण करीत. वाद्य-गायनात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. म्हणून पंचसमासीत त्याना गंधर्व म्हटले आहे.

श्रीनागाप्पाण्णांना मूळव्याध होती. प्रो. गजेंद्रगडकर यांनी त्यांना शीर्षासन घालणेस सांगितले. त्याप्रमाणे ते शीर्षासन घालूनच पहाटे तीन ते सहा-सात वाजेपर्यंत नेम करू लागले व त्यांची मूळव्याध औषधावाचून थांबली.

महालिंगपूरला एक जाडे पंडित श्रीनागाप्पाण्णांचे बरोबर वाद करणेस आले. पण श्रीनागाप्पाण्णांनी शब्दज्ञान हे अगदी फोल आहे, हे सप्रमाण त्यांना

पटवून दिले व पंडित शरण आले.

एका गृहस्थास वेड लागले. सर्वप्रकारचे औषधोपचार झाले पण त्याला गुण येईना. त्याचे आईबाप टेकीस येऊन श्रीनागाप्पांना काकुलती आले. त्यांना निंबरगीस पाठवून द्या म्हणून सांगितले व त्यास चार दिवस नेमास बसविले. आपण स्वतःही त्यांचे बरोबर बसत. ओरडलास तर बडवीन म्हणून त्यास सांगितले व एक बडगा घेऊनच बसले. चार सहा दिवसांत नेमाने त्याचे वेड घालविले. नंतर तो गृहस्थ श्रीनागाप्पाण्णांची परवानगी घेऊन आपले घरी गेला.

श्रीनागाप्पांचेकडे निंबरगीस एक योगी पुरुष आला होता. त्याला आपण श्रेष्ठ असे वाटत होते. पण हे खरे योगसाधन नव्हे, तटस्थ होणे म्हणजे का समाधी, हे दाखवावे म्हणून श्रीनागाप्पांनी आपले आसन एक हातभर उंच करून दाखविले. हे पाहून त्या योग्याने त्यांचे पाय धरले.

सोलापूरचे भजन दहा बारा मंडळी करीत. त्यात श्रीनागाप्पाच मुख्य असत. ते भजन केले की अंग दुखावयास लागावयाचे. तेव्हा भाऊसाहेब महाराजांनी नागाप्पांची दृष्ट काढा म्हणून सांगितले व तसे करताच अंग दुखणे राहिलेच. पुढेपुढे तर भजन झाले की दृष्ट काढाच असे महाराजांनी सांगितले व तो प्रघातच पडला. त्यानंतर मात्र भजन झाल्यावर श्रीनागाप्पांचे अंग केव्हाही दुखले नाही. भजनात जो विषय आला असेल तशी कृती त्या ठिकाणी करून श्रीनागाप्पाण्णा त्या विषयासी समरस होऊन भजन करीत. त्यावेळी त्यांना देहभान रहावयाचे नाही. तसेच वेळेचे भानही असावयाचे नाही. त्यामुळे त्यांचे अंग दुखावयाचे व दृष्ट लागणे सारखेच त्यांचे भजन व्हावयाचे.

श्रीगुरुदेव रामभाऊ रानडे श्रीनागाप्पाण्णांना फार मानत. अलाहाबादेहून निंबाळला यावयाचे ठरले की आधी निंबरगीस श्रीनागाप्पांना पत्र पाठवीत. “मी अलाहाबादेहून अमुक दिवशी निघून निंबाळला अमुक दिवशी येणार आहे. त्या दिवशीच तुम्ही या” असे प्रत्येक खेपेस कळवीत व आपला मुक्काम असेपर्यंत ते श्रीनागाप्पाण्णांना सोडत नसत.

श्रीनागाप्पा नेमाने त्रिकाल साधन व त्रिकाल भजन करीत. त्यांचे



प्रपंचात लक्षच नव्हते.

इंचगेरीचा व चिमडचा सप्ताह श्रीनागाप्पा आल्याशिवाय सुरू होत नसे. दोन्ही ठिकाणांहून त्यांना बोलाविणेसाठी गाडी पाठविली जात असे. इंचगेरीस कोणतीही गोष्ट त्यांना विचारल्याशिवाय होत नसे. चिमडला श्रीनागाप्पाण्णा हे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे वटवृक्षापाशी येऊन थांबले की त्यांना चिमडपीठस्थ श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे त्यांना वाजंत्री लावून मिरवणुकीने थाटाने आणीत. श्रीगुरुद्वादशीपासून पांडवपंचमीपर्यंत श्रीसाधुमहाराज यांचे रथोत्सवाचा सोहळा फार मोठ्या प्रमाणावर होत असे. या उत्सवात श्रीनारायणमहाराज हे अनुग्रह देत नसत. कोणी आले तर श्रीनागाप्पाण्णांचेकडे पाठवीत व तेच अनुग्रह देत. आमचे ती.प.पू.कै.मामांनी, कै.वासुदेवराव अभ्यंकर, मामा लिमये वगैरे मंडळींना अनुग्रह घेण्याकरिता चिमडास पाठविले असता श्रीनारायणमहाराजांनी श्रीनागाप्पाण्णांचेकडून त्यांना अनुग्रह देवविला व बायकामंडळींना श्रीनारायणमहाराज यांच्या परमाधिकारसंपन्न मातोश्री श्रीमाईसाहेब यांनी अनुग्रह दिला.

चिमडास श्रीनागाप्पाण्णा व गोपाळकाका कोटणीस यांची तासन्तास पारमार्थिक चर्चा चाले.

गु. बाबूरावजी कोटणीसमहाराज यांचेकडे श्रीनागाप्पांचे झालेले प्रवचन ‘आता स्तवू हा परमार्थ’ या ओवीवरचे अजूनी आठवते. श्रीगुरुसिद्दप्पा त्यावेळी लहान असूनही त्यानी सुंदरच पदे म्हटली. श्रीनागाप्पांचे सांगणे फार मार्मिक असे.

श्रीसिद्धगिरीचे महाराज यांनी श्रीसिद्धरामेश्वर यांचेकडून अनुग्रह घेतला. श्रीसिद्धगिरीचे महाराज हे धर्मगुरु या दृष्टीने मिरवणूक काढणेची ठरली. तेव्हा श्रीसिद्धरामेश्वरांनी “श्रीनागाप्पाण्णामहाराज यांना बोलवा. ते आल्यावर मगच मिरवणूक काढणेची” असे सांगितले. त्यांना आणणेस गाडी पाठविली व ते आल्यावर मगच थाटाने मिरवणूक निघाली. विजापूरास तो सोहळा अपूर्वच झाला. लिंगायत लोक धर्मगुरूची मिरवणूक म्हणून त्यात

बहुसंख्येने सामील झाले.

सप्ताहाचे वेळी श्रीनागाप्पा हे पोथी वाचू लागले तर इंचगिरी गावात ऐकू जात असे असा त्यांचा भला मोठा आवाज होता.

गायनवादनात चूक झाली तर श्रीनागाप्पाण्णांना खपत नसे. श्रीगुरुसिद्प्पा हे भजन करताना कांही चुकले तर नागाप्पा त्यांचे डोक्यात डग्गाच घालणार येवढ्यात नागाप्पांचे पट्टशिष्य पराप्पा यांनी एकदम उठून तो वरच्यावरच हाती घेतला. हे पाहून सर्वांनाच हसू आले. असा तो मोठा गमतीशीर प्रसंग झाला.

श्रीनागाप्पांना सतत जागरणे होत. एक दिवस ते नेमाला हजर नव्हते. भाऊसाहेब म्हणाले "त्यांना वाजंत्री लावून बोलावून घेऊन या. त्यांचे नावाचा जयजयकार करा." तसे करताच हे काय असे त्याना वाटले. मग खुलासा झाला. तो ते इतके ओशाळले की पुनः असा नेम चुकण्याचा प्रसंग त्यांचे आयुष्यात आला नाही.

कांही निवडक साधक बसले असताना श्रीभाऊसाहेबमहाराज हे गुरुदेव रानडे यांचेकडे बोट करून श्रीनागाप्पांना म्हणाले, 'हा तुझ्या आजोबांची कीर्ति साता समुद्राच्या पलीकडे पोचवील.' आणि तसेच झाले.

आपल्या आजेगुरूंचे नातू या दृष्टीने भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज हे श्रीनागाप्पाण्णा यांना फार मान देत. ते सांगलीस आलेवेळी पाच चार दिवस त्यांना आग्रहाने ठेऊन घेऊन त्यांचा प्रेमाने आदर सत्कार करून बहुमानपूर्वक निरोप दिला.

श्रीतात्यासाहेब निंबरगीस गेलेवेळी श्रीनागाप्पांचे घरी गेले होते. तेथे महाराजांच्या गोष्टी निघाल्या. दोघांचेही नेत्रातून प्रेमाश्रु वाहु लागले. दोघांनाही राहवले नाही. श्रीनागाप्पांना आहेर वगैरे करून श्रीतात्यासाहेब परतले.

चिमड-सप्ताह झाला म्हणजे श्रीनागाप्पा फिरतीस जात. त्यावेळी सय्यद अल्ली हे बरोबर असत. सय्यद अल्ली त्यांना फार मानत. श्रीनागाप्पांचा मान राखणेचे दृष्टीने ते लांब बसत. पण नागाप्पा त्यांना जवळ बोलावीत.



श्रीसय्यद अल्लींना श्रीभाऊसाहेबमहाराज 'कबीर' या नावाने संबोधीत. हे कट्टर साधनी होते. यांनी साधन करतानाच आपला देह चिमड येथे ठेविला.

श्रीनिंबरगीचे महाराजांनी देह ठेवल्यानंतर त्यांची ओढ्याकाठी समाधी होण्यापूर्वी रोजचा नेम व त्रिकाळ भजन श्रीनागाप्पाण्णा यांचे घरीच होत असे. सर्व मंडळी नेमाला बसली म्हणजे श्रीगुरुसिद्‌द्प्पा हे त्यांचे चार वर्षाचे चिरंजीवही डोळे मिटून अगदी ताठ बसत. सर्वांनाच त्याचे मोठे कौतुक वाटे. श्रीभाऊसाहेबमहाराज यांचे एक शिष्य भीमराव कुलकर्णी यांनी या मुलाला प्रश्न केला, 'अरे आम्ही बसलो की तूही डोळे मिटून बसतोस. मग तुला काय दिसते?' त्या मुलाने उत्तर दिले 'मला प्रकाश दिसतो, चक् चक् होते.' मग भीमराव म्हणाले, 'अरे आम्ही सारा जन्म यात घालविला. आम्हाला काहीसुद्‌धा दिसत नाही आणि तुला प्रकाश दिसतो.'! श्रीनागाप्पाण्णा म्हणाले, 'गवयाचे पोर रडले तरी सुरावर, पैकीच हे आहे.' श्रीनिंबरगीकरमहाराजांची ही काय कृपा आहे व श्रीगुरुसिद्‌द्प्पांचे काय भाग्य आहे हे यावरून दिसून येईल.

विजापूर येथे भाऊसाहेबमहाराज यांचे शिष्य श्रीपांडुरंगराव जोशी हे रहात असून ते मोठे कट्टर नेमनिष्ठ साधनी होते. भाऊसाहेबांची यांनी फार सेवा केली असून ते त्रिकाळ नेम व त्रिकाळ भजन आपले खोलीत नित्य नेमाने करीत असून श्रीभाऊसाहेबमहाराज, श्रीनागाप्पाण्णा, श्रीअंबुरावमहाराज व गुरुदेव रानडे हे विजापूरास आले की या जोश्यांकडे येत असत. व तेथे नेमाचे सप्ते थाटाने होत. श्रीभाऊसाहेबमहाराज हे प्रवचन करीत. श्रीभाऊसाहेबांचे आज्ञेने येथे त्यांचे शिष्य दत्तोपंत कुलकर्णी, व्यंकटराव अंजुटगी यांनी भक्ती वाढविली. दत्तोपंत किंवा व्यंकटराव हे त्रिकाळ नेम किंवा भजन याबरोबरच रोज दासबोधही सांगत. हे दोघेही जर आजारी असले अगर कोठे परगावी गेले तर हे काम श्रीपांडुरंगराव करीत.

सोलापूरचा एक गृहस्थ श्रीभाऊसाहेब यांचेकडे नाम घेणेस आला. त्याला भाऊसाहेबांनी पुढे येणेस सांगितले. पण तो येणेपूर्वीच भाऊसाहेबांनी देह ठेवल्याचे त्यास कळले व त्याचे जीवाला मोठी चुटपूट लागली. अन्नपाणी

गोड लागेना. भाऊसाहेबांनी स्वप्नांत जाऊन सांगितले, 'तू वाईट वाटून घेऊ नकोस. विजापूर येथे आमचे शिष्य पांडुरंगराव जोशी आहेत. त्यांचेकडून तू अनुग्रह घे म्हणजे तो मी दिल्याप्रमाणेच आहे.' इकडे पांडुरंगराव यांनाही दृष्टांत दिला. "सोलापुराहून एक मुमुक्षु तुझ्याकडे मी सांगितल्यावरून येणार आहे. तो आला तर त्यास तू अनुग्रह दे" आणि याप्रमाणे तो गृहस्थ विजापूरला या भजनाचे खोलीत आला. पांडुरंगरावांनी विचारले, 'तुम्ही सोलापूरहून आला काय?' हा गृहस्थ चरकला व म्हणाला, 'महाराज, हे आपणास कसे कळले?' पांडुरंगराव म्हणाले आम्हाला "दृष्टांत झाला आहे की सोलापूराहून एक गृहस्थ येईल त्यास अनुग्रह दे." या गृहस्थाने सांगितले "मलाही आपलेकडूनच नाम घेणेबद्दल दृष्टांत झाला आहे. म्हणून मी आपणाकडे आलो आहे." मग श्रीपांडुरंगराव यांनी त्यास नाम देऊन कृतार्थ केले.

याच खोलीत श्रीदत्तोपंत, व्यंकटराव अंजुटगी व रामराव होर्ती हे प्रतिवर्षी श्रावणात नेमसप्ताह करीत. श्रीनागाप्पाण्णांचे चिरंजीव श्रीगुरुसिद्दप्पा विजापूरास शिकणेकरिता राहिले होते. ते याच खोलीत रहात होते. मग रात्रीचे वेळी सर्व मंडळी नेमाला बसली की हेही दहा बारा वर्षांचे होते पण डोळे मिटून सर्वांबरोबर बसत. पुढे यांना अगदीच राहवेना म्हणून यांनी श्रीदत्तोपंतांना विचारले "तुम्ही सर्वजण डोळे मिटून चार चार तास काय करता?" श्रीदत्तोपंत म्हणाले "हा नेम तुझे पणजोबापासून चालत आला आहे. तोच आम्ही श्रीभाऊसाहेबांचे कृपेने चालविला आहे. तुला पाहिजे असेल तर सांगतो. यात आमचे असे कांहीच नाही. जे आहे ते तुझे पणजोबांचेच आहे बाबा," मग श्रीगुरुसिद्दप्पांनी ते मला सांगाच असा हट्ट धरला. त्याबरोबर श्रीदत्तोपंतानी हा नेम कसा करावयाचा हे श्रीगुरुसिद्दप्पांना सांगितले. श्रीगुरुसिद्दप्पांना मोठा आनंद वाटला व मग ते रोज नेम करू लागले.

अशी ही श्रीनिंबरगीकरमहाराज यांची श्रीनागाप्पाण्णांनी चालविलेली परमार्थाची जागती परंपरा आजही या घराण्यात मोठी उज्ज्वल राहिली आहे.

श्रीनागाप्पाण्णा व ती प.पू.कै.श्रीमामा केळकर यांचे परस्परावर



अवर्णनीय प्रेम होते. श्रीमामांचा निरोप घेऊन टांग्यातून निघाले असता घोडे पुढे जाईना. तेव्हा 'बापूराव तुमचे प्रेम कसे आहे, घोडेसुद्धा पुढे जात नाही.' असे श्रीनागाप्पाण्णा श्रीमामांना म्हणाले. श्रीनागाप्पाण्णांचे वचनावरूनच दासरामास श्रीगुरुलिंगगीता प्रसाद मिळाला.

श्रीनागाप्पाण्णामहाराज यांनी बुधवार, श्रावण वद्य द्वितीया, शके १८७५ रोजी आपला देह श्रीक्षेत्र निंबरगी येथे ठेविला. त्यावेळी त्यांना आंघोळ घालून बसविणेत आले. व त्यांचे हातात शिवलिंग दिले. तर ते नेमालाच बसल्याप्रमाणे दिसत होते. त्यांची दृष्टी भ्रूमध्यावर होती. हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले.

महालिंगपूर, होतूर, बेळगली, जमखंडी व सांगली येथे त्यांचे शिष्यलोक आहेत. सुमारे दोनतीनशे लोकांना त्यांनी श्रीगुरुदेव रानडेसाहेब यांनी सांगितलेवरून शेवट अनुग्रह दिला. "ही अध्यात्म विद्या तुमचे घरची आहे. तुम्ही अनुग्रह देत चला" असे गुरुदेव रानडे त्यांना वरचेवर म्हणत असत.

श्रीनागाप्पाण्णा यांची समाधी त्यांचे शेतातच निंबरगी येथे श्रीगुरुसिद्दप्पांनी नुकतीच बांधली आहे. श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे समाधी मंदिरात प्रतिवर्षी श्रावणात नेम सप्ताह होत असतोच. त्या सप्ताहातच श्रीनागाप्पाण्णांची पुण्यतिथि श्रीगुरुसिद्दप्पा साजरी करतात. नेम करून फुले उधळावयाची अशी तेथे पद्धत आहे.

श्रीनागाप्पांच्या सौ.पत्नीही मोठ्या पति-भक्तिपरायण असून त्यांच्या परमार्थाला पूरकच झाल्या. त्यांची समाधीही श्रीनागाप्पाण्णांचे ज्येष्ट चिरंजीव श्रीगुरुसिद्दप्पा यांनी श्रीनागाप्पांचे शेजारीच केली आहे. त्यांचे बंधू सदाशिवराव हे कैलासवासी झाले. हल्ली काडसिद्ध व भीमाण्णा हे दोन बंधू त्यांना असून सौ.शिवलिंगव्वा, सौ.सुमित्रा व सौ.नीलाबाई व सौ.शांताबाई अशा त्यांना बहिणी आहेत. हे सारेच पुण्यवान् म्हणून या थोर घराण्यात त्यांचा जन्म झाला. श्रीगुरुसिद्दप्पा हे शांतवृत्तीचे नेमनिष्ठ आहेत. त्यांची कृपादृष्टि श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेप्रमाणे या सांप्रदायात सर्व अर्भकावर रहावी एवढीच प्रार्थना!

***

# (२)

## प.पू. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर

### काय या जाग्याचा महिमा

ज्या ठिकाणी भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे आज्ञेने आपली नोकरी सोडून श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर यांनी आपले सद्गुरु श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची समाधि स्थापना केली व जवळच पर्णकुटी बांधून महाराजांचे आज्ञेने चिमड येथे वास्तव्य करून उपासनापरंपरा फार मोठ्या प्रमाणावर चालू केली, श्रीनिंबरगीकरमहाराज हे स्थापनेचेवेळी जेथे उपस्थित राहिले व रथोत्सवाचा सोहळा सुरू केला, त्या स्थानाचे महत्त्व कोणी वर्णन करावे!

### श्रीनारायणमहाराज यांचा जन्म

श्रीनारायणमहाराज यांचा जन्म चैत्र वद्य चतुर्दशी, शके १८०७ रोजी श्रीक्षेत्र चिमड येथे झाला. श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर हे यांचे वडील. मातोश्रीचे नांव सौ. सीताबाई ऊर्फ माईसाहेब. यांचे वडीलबंधू श्रीदाजीसाहेबमहाराज फार मोठे अधिकारी सत्पुरुष होऊन गेले. यांना भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी आपली मुलगी कृष्णाताई ऊर्फ कल्लवा ही दिली होती. हा मंगल विवाह मोठ्या थाटाने झाला. श्रीदाजीसाहेबांनी लवकरच देह ठेवला. यामुळे फारच लवकर परमार्थाची जबाबदारी श्रीनारायणमहाराज यांचेवर आली. श्रीरामचंद्रावजीमहाराज यांचे कृपेने, श्रीलक्ष्मीबाई अक्का यांचे पूर्ण आशीर्वादाने यांनी ती उत्तम प्रकारे पार पाडली.

भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज हे सौ. माईसाहेब यांना स्वप्नांत दिसले व त्यानंतर हा महापुरुष जन्मास आल्याने यांचे नांव 'नारायण' असे ठेविले. आपल्या पारमार्थिक बलाने ते खरेच 'नारायण' झाले. यांना पाहिले की 'धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । झाले आहेत पुढे होणार। देणे ईश्वराचे ।' या समर्थांचे ओवीची आठवण होत असे. श्रीनारायणमहाराजांनी



आपली जन्मतिथीही कोणास कळू दिली नाही. ज्येष्ठ शु.१० ही तिथि श्रीरामचंद्रावजीमहाराज यांची जन्मतिथि. त्याचे महत्त्व वाढावे म्हणून तोच आपला जन्मदिवस असे नारायणरावजी म्हणत.

### कांही न करता कोणास काही मिळाले तर मिळू द्या.

श्रीचिमडचे श्रीनारायणमहाराज वरचेवर बजावयाचे की, काहीही न करता कोणास काही मिळत असेल तर मिळेना बापडं. आम्हाला त्याबद्दल काहीच म्हणावयाचे नाही. पण नेम करून करून माझ्या पायाला मात्र घट्टे पडले आहेत, तेव्हा थोडी प्राप्ती झाली. ज्या महापुरुषांनी हा सांप्रदाय निर्माण केला त्यानी ३६ वर्षे अविश्रांत साधन केले होते.

### 'तुका म्हणे तेथे नाही आनपरी'

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे रथोत्सवाचा सोहळा श्रीक्षेत्र चिमड येथे चालू होता. हा रथ श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी करून दिला होता. आसपासचे खेड्यातून थोडा बहुत समाज जमला होता. श्रीरामचंद्रावजीमहाराज, श्रीलक्ष्मीबाई अक्का व श्रीदाजीसाहेबमहाराज या त्रैमूर्तीच्या समाधीसमोर व श्रीसाधुमहाराज यांचे समाधीचे मागे पंगतीवर पंगती उठत होत्या. श्रीनारायणमहाराज हे पहिल्या पानावर नेहमीचे पद्धतीप्रमाणे भोजनास येऊन बसले. त्यांचे पानांत भुईमूगाचे दाण्याचे कूट घातलेला मिरच्याचा खर्डा व इतरांच्या पानांत नुसताच खर्डा होता. हे महाराजांचे दृष्टीस आले मात्र ते उठून आपले खोलीत गेले. ते म्हणाले, 'सर्वांचे पानांत तरी भुईमुगाचे दाण्याचे कूट असलेला खर्डा वाढा, नाहीतर माझे पानात तरी नुसत्या मिरच्याचा खर्डा वाढा त्याशिवाय मी जेवणास येणार नाही.' मग सर्वांचे पानात दाण्याचे कूट घातलेला खर्डा तयार करून घातला व महाराज भोजनास आले. मग अगदी हसत विनोद करीत सर्वांचे जेवण झाले. याचे सर्वांनाच आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही.

### पूज्यता डोळा न देखावी

एक गृहस्थ श्रीनारायणमहाराज यांचेकडे अनुग्रहाकरता आले होते.

महाराजांनी सांगितले "काही हरकत नाही. आपण देऊ अनुग्रह. त्याची काळजी नको." याप्रमाणे दिवस ठरला. या गृहस्थाची अनुग्रहाची पूर्व तयारी काही वेगळीच दिसू लागली. पंचामृती पूजेचे साहित्य, हारतुरे, धोतरजोडी, आणि अवांतर बरेचसे आणून ठेवले होते. महाराजांनी विचारले 'हे काय तुम्ही आरंभिले आहे?' त्या गृहस्थाने सांगितले 'महाराज, आपली पाद्यपूजा करावी अशी माझी इच्छा आहे व तेवढी आपण मोडू नये अशी विनंती आहे.' महाराज म्हणाले, "तुमची एक इच्छा मी मान्य केली. आता तुम्हीही एक माझी इच्छा मानली पाहिजे." गृहस्थाने विचारले, "आपली कोणती इच्छा आहे?" महाराज म्हणाले, "या सर्व साहित्याने श्रीसाधुमहाराजांची पूजा करा; बाकी जे जे काही जमवले आहे ते आपल्या ट्रंकेत ठेवा व नुसते एका नारळासह माझेकडे या म्हणजे तुमचा हेतू पुरा होईल." गृहस्थाने बरीच भीड घातली. तरी पण महाराज ऐकावयास तयार नाहीत. तेव्हा तो म्हणाला, "त्या शिवाय आपण अनुग्रहच घेणार नाही." महाराज म्हणाले, "अनुग्रह घ्यावयाचा की नाही हा जसा तुमचा प्रश्न आहे, तसा पाद्यपूजा घ्यावयाची किंवा नाही हा माझा प्रश्न आहे. तुम्हाला पाद्यपूजेने जेथे अनुग्रह मिळेल तेथे जावयास मोकळीक आहे." तो गृहस्थ मात्र अगदीच विरमला. व त्याने आपला रस्ता सुधारला. महाराज म्हणाले, हे जग अशाप्रकारे आहे. यांना खरे व खोटे जाणणेची पात्रताच नाही.

**शिष्याची जो न घे सेवा । मानी देवासारिखे ।।**

श्रीनारायणमहाराज यांनी शिष्यसज्जनांकडून कधीही सेवा घेतली नाही. नमस्कार करून घ्यावयाची जेथे पंचायती, तेथे पायाला हात कोण लावून देणार असा प्रश्न आहे. पुष्कळांच्या मनात पुष्कळ सेवा करावी असे असे. पण याबाबतीत महाराजांचा फारच कटाक्ष होता. ते म्हणावयाचे 'मी एक या साधुमहाराज यांचे मठातला सेवेकरी आहे. व आपण जे कोणी परमार्थासाठी येथे येता ती आपली सेवा मनापासून करावी येवढेच काम, अशी मला हौस आहे. आणि ते मी हौसेने करतो. आपणाला जे येथे काही मिळवायचे आहे ते आपण येथून घेऊन चला. आपले कोणते काम करू बोला. अगदी लवकर



बोला. वेळ लावू नका.' हे बोलणे ऐकून नाठाळांचीही मते विरघळून जात व सहजच मनात येई, काय हा महात्मा आणि ज्या श्रीरामचंद्रावजीमहाराज चिमड यांची परमार्थ-परंपरा यांचेकडून घरचीच अध्यात्मविद्या असल्याने आली, त्यांची ही केवढी लीनता!

**नको ते माझ्या वाटणीस आले आहे.**

श्रीनारायणमहाराज म्हणावयाचे, 'श्रीलक्ष्मीबाईअक्कांचे सांगणेवरून माझे चुलते श्री बळवंतराव यरगट्टीकर यांनी माझेवर अनुग्रह केला. त्यांनी जर येवढे श्रम घेतले नसते तर मला ही अवस्था प्राप्त झाली नसती.' सहा वर्षे मी त्यांचे जवळच होतो. उत्सवापुरताच चिमडास येत असे. मात्र खरे बोलायचे तर हे महाराजपण मला मनापासून नको होते. पण आमचे वडील बंधु श्रीदाजीसाहेब यांनी लवकरच देह ठेविल्याने नाही ती जबाबदारी माझे शिरावर आली आहे. नाहीतर मी सुखाने श्रीसाधुमहाराज यांचे तापनाशी तीर्थाचे सेवन करून नुसते साधन करीतच राहिलो असतो.

श्रीनारायणमहाराज म्हणावयाचे, "तुम्हाला येथे मंत्र्यांच्या मोटारी ओळीने लावून दाखवू काय? मला ती हिकमत करायची झाली तर करता येईल पण मला एक सद्‌गुरूनाथ तेवढेच हवे आहेत. बाकी मला काही नको आहे. म्हणून मला या गोष्टी करावयाच्या नाहीत. तुम्हाला जे हवे आहे ते माझ्याजवळ नाही व माझ्याजवळ आहे ते तुम्हाला नको आहे. मग आता याला काय करावे? माझ्याजवळ जादूटोणा, छाछू, अंगारा-धुपारा, जंतर मंतर काही नाही. फक्त ज्यांना आत्मसमाधान पाहिजे असेल तेवढे मात्र येथे निश्चित मिळेल. व त्याकरिता जे करणे आवश्यक आहे, त्याचे मार्गदर्शन येथे होईल. सद्‌गुरूनाथांनी आपणास निसर्गाने दिलेल्या शक्तीचा उपयोग करता आला पाहिजे. त्यातून वाटेल ती शक्ति निर्माण होईल व सुखाचा आस्वाद अखंडपणे घेता येईल. नुसते चमत्कार करून त्याचा प्रत्यक्ष उपयोग काय व त्यातून काय मिळते हे कळू दे तरी."

### दासा दैवत त्याविण नाही.

श्रीनारायणमहाराजांचे वैशिष्ट्य असे की ते चिमड सोडून कोठेही गेले नाहीत. नाही म्हणावयास ज्या महात्म्यामुळे हे चिमडक्षेत्र निर्माण झाले त्या महापुरुषाचे दर्शनास श्रीक्षेत्र निंबरगी येथे त्यांनी मोठी यात्राच काढली होती. भगवान् श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे समवेत मोठ्या थाटाने निंबरगीस जाऊन भगवान् श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे समाधीचे मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले होते. सांगलीस श्रीतात्यासाहेबमहाराजांचे समाधिस्थानात व त्यांचे घरी ते त्यांचे पुण्यतिथि महोत्सवास केव्हा केव्हा आले होते. शिवाय त्यांचे शिष्यांचे घरी सातारा, पुणे, वाई, कऱ्हाड, सांगली येथे ते गेले होते.

### महाराज कोठे आहेत?

एक मुंबईचे गृहस्थ श्रीनारायणमहाराज यांचा अनुग्रह घेणेसाठी मुद्दाम चिमडास आले होते. त्यांनी विचारले "महाराज कोठे आहेत?" मठातील लोकांनी सांगितले 'ते बाहेर गेले आहेत, थोड्या वेळांत येतील, जरा थांबा.' हे गृहस्थ बराच वेळ वाट पहात बसले होते. महाराजांचा भरजरी पोषाख असेल, ते मोटारीतून येतील अशी त्यांची काहीशी कल्पना होती. इतक्यात महाराज डोक्यावर एक भोपळा व दोन खाकेत दोन मोठे भोपळे घेऊन मठात दाखल झाले. त्यांना या गृहस्थांनी विचारले, 'महाराज कोठे आहेत?' महाराज म्हणाले, 'महाराज समोर तापनाशीत विराजमान झालेले आहेत.' पुनः गृहस्थांनी विचारले 'आपण कोण आहात?' महाराज म्हणाले, 'मी या मठातील सेवेकरी आहे.' नंतर मग कोणी सांगितले की ज्यांनी आपणास मी सेवेकरी आहे म्हणून सांगितले तेच महाराज आहेत. मग या गृहस्थास मोठे आश्चर्य वाटले व खरा परमार्थ हा बहिरंगावर काही अवलंबून नाही हे त्यास उमगले व त्याने महाराजांचे पाय धरले. महाराजांनी त्यास अनुग्रह दिला.

### नाही संतपण मिळत ते हाटी

श्रीनारायणमहाराज हे मोठे क्रियाशील होते. त्यांनी ते ज्ञान कृतीने संपादन केले होते. त्यांचे शास्त्र हे नुसते बोलघेवडे नव्हते. म्हणून त्यांना या सांप्रदायांत एक आगळे स्थान प्राप्त झाले. यातच त्याचे खरे महत्त्व आहे. ते सारखे आपले खोलीत ध्यानमग्न स्थितीतच असावयाचे. दिवसाकाठी एकादेवेळी मळ्यात जाऊन यावयाचे. त्यांची नेमनिष्ठाही कल्पनातीत होती. त्यांना बोलणे हे वावडेच होते. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' असे ते ठासून सांगत असत आणि इतके असूनहि वर्णाश्रमाप्रमाणे चाललेली स्नानसंध्या, सोवळे-ओवळे हे त्यांनी कधीही सोडले नाही. त्यामुळे त्यांचे ठिकाणी मोठा तेजस्वीपणा होता. लोकांना परमार्थबोध व्हावा या दृष्टीने रोज सायंकाळी एक तासभर पुराण सांगण्याचा त्यांनी प्रघात ठेवला होता. चिमडच्या महाराजांनी केलेली पंचपदी ते नित्यनेमाने भावपूर्ण म्हणत असत. ही पंचपदी म्हणजे या सांप्रदायाची संध्याच आहे, असे आमचे श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणावयाचे. पंचपदी नेमाने केली तर अभ्यास बिनचूक होतोच असे चिमडचे श्रीरामचंद्रावजीमहाराज म्हणायचे, असे गु.भ.प.नानबा फडणीस आम्हास सांगत असत. 'अक्षरे अनुभवावीण नसती । म्हणुनी सद्गुरूला श्रुती स्तविती' हेच खरे!



### गुरुघराण्याबद्दल परमावधीचा आदर

निंबरगीचे घराणे हे चिमडचे गुरुघराणे. श्रीचिमडचे महाराजांना भगवान् श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे मुखाने अनुग्रह दिला. श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांनी चिमड येथे देह ठेवला. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे आज्ञेने श्रीचिमडचे महाराजांनी तापनाशीतीर्थात श्रीसाधुमहाराजांचे देऊळ बांधले व जवळच एक पर्णकुटी उभी करून नोकरी सोडून चिमडास वास्तव्य केले व सांप्रदायाची जोपासना केली. शके १८०३ मध्ये मार्गशीर्ष वद्य सप्तमीस श्रीनिंबरगीकरमहाराज यांची पिंडी, श्रीकाडसिद्धांचा बाण व श्रीसाधुमहाराजांच्या पादुका अशा त्रयमूर्तींची स्थापना केली. निंबरगीचे महाराज म्हणाले, 'आम्ही जिवंत असतानाच आमची स्थापना करता काय? काय करणेचे ते करा पण आमचे सद्गुरू श्रीकाडसिद्ध यांना घेऊन काय करणेचे

ते करा.' मग याप्रकारे ही स्थापना श्रीरामचंद्रावजीमहाराज यांचे हस्ते झाली. चैत्रात श्रीसाधुमहाराज यांचे पुण्यतिथीस आराधना व गुरुद्वादशी ते पांडवपंचमी हा त्यांचाच उत्सव, असे दोन उत्सव सुरू झाले. पांडवपंचमीस श्रीसाधुमहाराजांचा रथोत्सव होत असे व त्यास थोडाबहुत लोकसमुदायही जमत असे. या रथोत्सवास श्रीनिंबरगीचे महाराज स्वतः येत. ते आले की गावाबाहेरील श्रीसाधुमहाराज यांचे दहनभूमीवरील वटवृक्षापाशी उतरत व तेथून त्यांना चिमडचे महाराज सामोरे जाऊन, वाजंत्री लावून, मोठ्या थाटाने मठाकडे आणीत. त्यांचेसमोर ते बसतही नसत व मोठ्या आदबीने वागत. तीच पद्धत श्रीनारायणमहाराज यांनी श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हे रथोत्सवास आले की तंतोतत ठेवली होती. श्रीनागाप्पाण्णामहाराज हे उत्सवास आल्यानंतर कोणी अनुग्रहाकरिता आले तर आपण अनुग्रह देत नसत. श्रीनागाप्पाण्णामहाराज यांचेकडून अनुग्रह देत असत. श्रीनारायणमहाराज यांचे कारकीर्दीत हा रथोत्सव फार मोठ्या थाटाने होत असे. त्याचे वर्णन शब्दाने होणे नाही.

### जन नोहे अवघाची जनार्दन

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे पांडवपंचमीचे महोत्सवात श्रीनारायणमहाराज यांचे गुरुद्वादशीपासून पांडवपंचमी अखेर कीर्तन होत असे. श्रीरामचंद्रावजीमहाराज असताना या महोत्सवात महाराजांचे अधिकारी शिष्य श्रीतात्यासाहेबमहाराज कीर्तन करीत. श्रीतात्यासाहेबांनी पौष वद्य षष्ठी, शके १८४५ मध्ये देह ठेवल्यावर हा हक्क श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव गु. श्रीबाबूरावजी यांचेकडे होता. पण ते दरवर्षीच जात, असे नसल्याने श्रीनारायणमहाराज हे रात्री कीर्तन करीत. श्रीनागाप्पाण्णामहाराज आल्याशिवाय कीर्तन सुरू होत नसे. त्यांना बसण्यासाठी स्वतंत्र आसन असे. ते मठात आले की मंडळी उठून उभी रहात. ते बसले की सर्व मंडळी बसत. श्रीनारायणमहाराज हे त्यांना वंदन करून व सर्वाचे अंगावर गुलाबपाणी शिंपडून प्रसन्न वातावरणात कीर्तन करीत. त्यानंतर गु.भ.प.मोहोळकर, आठले, बार्शीकर वैगेरे जण थोडेथोडे त्या कीर्तनास पोषक असे भाषण करीत. नंतर पंचपदी, शेजारती होऊन हा कार्यक्रम संपत असे.



### अभ्यासाची दक्षता

श्रीनारायणमहाराज हे साधकांच्या सर्व शंकांचे निरसन या महोत्सवात परोपरीने करीत व त्याचबरोबर पुढे अभ्यासही सांगत. इतकेच नव्हे तर अभ्यास करवून घेत; हे त्यात पुनःविशेष होते. या दृष्टीने परगावाहून पुष्कळ साधक मोठ्या निष्ठेने प्रतिवर्षी येत असत. या दृष्टीने सर्वांचा अभ्यास व्यवस्थित व्हावा म्हणून महाराज फार काळजी घेत व हा सर्व कार्यक्रम वक्तशीर होण्याची दक्षता घेत. कार्यक्रमात पुढे मागे झाले तर ते त्याना बिलकुल खपत नसे. रात्रभर जागरणे झाली तर पहाटे उठणे होणार नाही म्हणून जागरणाचे कार्यक्रम न ठेवता वेळेवर कार्यक्रम आवरण्याची ते दखल घेत. नाटक, करमणूकीचे कार्यक्रम यांना त्यांनी अगदी फाटाच दिला होता. येवढी काळजी कोण घेणार?

### श्री.बी.ई.कुलकर्णी यांना शांतिसमाधानाची युक्ति सांगितली.

संसार म्हटला की त्यात कटकटी आल्याच. त्यात टिकावयाचे कठिण. पण त्यातहि मनाचा समतोलपणा कसा राखावयाचा याची युक्ति महाराजांनी कुलकर्णीसाहेबांना सांगितली आणि आश्चर्य, कोणत्याही परिस्थितीत त्यांचा तोल खराच सुटला नाही, हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे. श्रीनारायणमहाराज यांचे विशेष प्रेमातील जी मंडळी त्यापैकी हे एक नामवंत साधक आहेत. यांनी प्रांतऑफिसरचे काम केले असून 'चिद्विलास' या नांवाचा एक सांगलीस बंगला आहे, तेथे ते राहतात.

### तुम्ही ज्याकरिता येता तेच करीत चला.

श्री.एरंडोलीकर मास्तर हे श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे शिष्य. पण पुढील अभ्यास समजाऊन घेण्याकरिता ते चिमडास श्रीनारायणमहाराज यांचेकडे जात. त्या स्थानाची आपल्या हातून काही सेवा घडावी म्हणून ते कित्येक वेळा घाणकामाकडेही पहात नसत. कोठे घाण पडली तर तीही काढावयाची अशी त्यांची निष्ठा! हे महाराजांनी एकदा पाहिले मात्र ते म्हणाले, 'मास्तर तुम्ही येथे येता कशाकरिता? हे काम काही येथे रहात नाही; ते कोणीही

करेल, पण तुम्ही ज्याकरता येता तेच करीत चला, म्हणजे मला खरा संतोष होईल.' मग मास्तरांनी नेमावरच भर दिला.

### चिमडचे नेमनिष्ठ वारकरी

गु.भ.प.गंगाधरराव दीक्षित व अनंतराव म्हसकर, हे चिमडचे नेमनिष्ठ वारकरी आहेत. चिमडमठ सोडायचा नाही ही श्रीतात्यासाहेबांची अखेरची आज्ञा त्यानी तंतोतंत पाळली आहे. हे प्रतिवर्षी श्रीसाधुमहाराज यांचे रथोत्सवास जातात. महाराजांनाही याचे कौतुक वाटले व त्यांनी तसे बोलूनही दाखविले. त्यांनी सांगितले, 'ही आम्हाला तात्यासाहेबांची आज्ञा आहे.' महाराजांना मोठा आनंद वाटला व 'दरवर्षी तुम्ही दासबोध वाचीत जा' म्हणून अनंतरावांना सांगितले. या उत्सवात दासबोधाचे पारायण करणेचा मान अनंतरावांना मिळाला व तो अजूनही चालू आहे.

### पथ्यपाण्याची दक्षता

गु.भ.प.अनंतराव म्हसकर याना मीठ वर्ज्य आहे. महाराजांनी घरी सर्वांना सांगितले, 'बिनमीठाचे पदार्थं यांना वाढत जा. यांचे वेगळे काढून ठेवत चला.' घरातील सर्वांनी ही दक्षता आजवर राखली आहे.

### हे चार आणे का मागितले!

श्री.महादेवराव बेळगली हे रामप्पा बेळगली वकील यांचे चिरंजीव. तेरदळास राहतात. ते श्रीनारायणमहाराज यांचे मेहुणे. त्यांचीच बहीण श्रीनारायणमहाराजांना दिली आहे. हे लहान असताना एक मजेशीर प्रसंग घडला. तेरदळास श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे शिष्य श्रीब्रह्मानंदमहाराज हे आले होते. रामनामाचा सप्ताह सुरू झाला होता. असंख्य जनसमुदाय त्यात सामील होत होता. हे महादेवराव श्रीब्रह्मानंदाचे दर्शनास गेले. त्यांनी त्यांना बोलाविले व 'बाळ मला चार आणे देशील का रे? मला फार जरूरी आहे' म्हणून विचारले. यांनी विचार केला, चार आणे म्हणजे काय मोठी बाब आहे? 'आत्ता आणून देतो' म्हणून सांगितले. आईकडे चार आणे मागितले. ती म्हणाली



कशाकरिता? त्यांनी सांगितले 'मग सांगतो पण दे तर.' आईने दुभत्याच्या कपाटात वगैरे बघितले पण तिला चार आणे मिळाले नाहीत. ती म्हणाली 'थांब, आत्ता वडील येतील त्यांचेजवळ माग.' वडिल आले. चार आणे मागितले. ते म्हणाले 'घे कोटातले.' कोटात पाहिले तर चार आणे नाहीत. मग कपाटात पाहिले पण पैसा नाही. वकील मनुष्य तरी असे झाले. शेजारी पाजारी दुकानातून सर्वत्र विचारले पण आश्चर्य कोठेही चार आणे त्या दिवशी मिळाले नाहीत. संध्याकाळ झाली. बेळगली श्री.ब्रह्मानंदाचेकडे आले. त्यानी विचारताच त्यांना रडू कोसळले. ते म्हणाले, 'अरे बाळ, काय झाले सांग तरी.' यांनी सांगितले, 'महाराज, मला कुठेही चार आणे मिळाले नाहीत. बाब ती काय पण आपल्याला तेवढेही मला देता आले नाहीत म्हणून वाईट वाटते. हे असे कां व्हावे हेच मला कळत नाही.' श्रीब्रह्मानंद म्हणाले, 'अरे बाळ, तुझे मेहुणे कोणी सत्पुरुष आहेत काय?' बेळगली म्हणाले, 'होय महाराज, आमची बहीण चिमडच्या श्रीनारायणमहाराजांना दिली आहे.' ब्रह्मानंद म्हणाले, 'मग त्यांना विचार ते सांगतील तुला,' लगेच बेळगलींनी सायकल घेतली व चिमडास आले. महाराज म्हणाले, 'का आत्ता आलास?' हे म्हणाले, 'महाराज, तुम्हाला काही महत्त्वाचा प्रश्न विचारावयाचा आहे. त्याकरिता आलो.' महाराज म्हणाले, 'आधी जेवण कर मग विचार.' जेवण झाल्यावर त्यांनी सर्व हकीगत महाराज यांना सांगितली. महाराज बोलले 'अरे वेड्या, तू अहंकाराने आणतो म्हणून सांगितलेस म्हणून तुला चार आणे मिळाले नाहीत. नाहीतर चार आणे म्हणजे काय बाब आहे. ब्रह्मानंदांना तुला हेच दाखवायचे होते. नाहीतर त्यांना तरी चार आणे काय करायचे होते.' मग बेळगलींना बोध झाला. महाराज म्हणाले, 'त्या महापुरुषाचे पाय धर जा आणि वर्षातून एकदा तरी त्यांचे दर्शन घेत जा.' पुढे ब्रह्मानंदांनी देह ठेवला तरी बेळगली, त्यांचे पुण्यतिथीस जाऊन महाराजांनी सांगितलेप्रमाणे दर्शन घेऊन येतात.

### नावलगीचा प्लेग हाटला

रामप्पा नावलगी या नावाचे एक गृहस्थ श्रीनारायणमहाराज यांचे

अनुगृहीत असून ते नावलगीस श्रीनारायणमहाराजांनी रामायण सांगावे या इच्छेने प्रेरित होऊन त्यांना विचारणे करिता चिमडास आले. तुझे इच्छेप्रमाणे येईन असे महाराज म्हणाले. पुढे त्या गावात प्लेगची साथ सुरू झाली. अशा दूषित हवेत महाराजांना कशाला न्यावयाचे म्हणून रामप्पा चिमडला आले व 'रामायणाचा सप्ताह पुढे करू' असे म्हणाले. महाराज म्हणाले, 'आता एकदा ठरल्यावर पुढे कशाकरिता?' रामाप्पांनी सर्व परिस्थिति सांगितली. महाराज म्हणाले, 'ठरल्याप्रमाणे मी येणार, आणि सप्ताह झालाच पाहिजे. रामाप्पा लक्षात ठेव, जे लोक आत्ता प्लेगने आजारी आहेत ते या योगाने बरेच झाले पाहिजेत व जे लोक आत्ता चांगले आहेत त्याना मग आजारपणाची भीतीच नाही.' आणि आश्चर्य, महाराजांनी त्या गावी जाऊन ठरल्याप्रमाणे सप्ताह करताच आजारी होते त्यातील कोणीही दगावले नाहीत व नवीन एकही लागण झाली नाही. मग सर्व गावाला आश्चर्य वाटले व तेथील गावकऱ्यांनी महाराजांचे पायावर मस्तक ठेवले.

## वांगीभात सर्वांना पुरला

आम्ही आपली एक कोणाकडून तरी ऐकलेली पण आम्हाला ज्या बद्दल संपूर्ण विश्वास आहे अशी एक गोष्ट येथे सांगणे सारखी आहे. श्रीसाधुमहाराज यांचे महोत्सवात एकदा वांगीभात केलेला होता. त्या दिवशी माणसे एकदम कल्पनेच्या बाहेर आली. वांगीभात सर्वांना पुरावा कसा? व बरे आता पुढे काय करावयाचे? हा प्रश्न उभा राहिला. श्रीनारायणमहाराज श्री.विमलाताई कोटणीस यांना म्हणाले, 'तुम्ही वाढू लागा. काळजी करू नका.' आणि आश्चर्य सर्वांना तो भात पुरून पुनः शिल्लकच राहिला. महाराजांचे विमलाताईंच्यावर पोटच्या मुलीपेक्षाही अधिक प्रेम होते. विमलाताईंचा कोणताही शब्द महाराजांनी ओलांडल्याचे आमचे पहाण्यात नाही. विमलाताईंची निष्ठाही पण तशीच आहे हे त्याबरोबरच आपण लक्षात ठेवले पाहिजे.

## श्रीमाईसाहेबांचा परमार्थ

श्रीमाईसाहेबांनी एकदा श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांना प्रश्न केला. आपण



सर्व जगाला परमार्थाचा उपदेश करता. मला काही तरी सांगाना! महाराज म्हणाले, 'सकळासी येथे आहे अधिकार' या श्रीतुकाराममहाराज यांचे उक्तीप्रमाणे येथे कोणालाही मज्जाव नाही. येथे आपलेकडे कोणीही व केव्हाही येणार. त्या सर्वांना तू हसतमुखाने पोटभर जेवू घाल. हाच तुझा परमार्थ. शेवटी माझ्या पायाजवळ मी तुला जागा देतो. परमार्थाला जे कोणी पोषक होतात तेही परमार्थच करतात हे लक्षात ठेव, आणि आश्चर्य श्रीमाईसाहेबांनीही आपले सद्‌गुरूंची आज्ञा आपले आयुष्यात अगदी कंबर कसून अगदी तंतोतंत पाळली. विश्रांति हा शब्द त्यांच्या कोशातच नव्हता. लहान मुलापासून सर्वांची अगदी घरच्यापेक्षाही जास्त त्या जातीने चौकशी करीत असत. हे दृश्य आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. धन्य ती माऊली! धन्य त्यांचा परमार्थ! आमचे त्यांना शतकोटी प्रणाम.

श्रीसाधुमहाराजांनी लहान चांदीच्या पादुका माईसाहेबांना दिल्या. त्यांची पूजा त्यांनी शेवटपर्यंत केली. त्या पादुका जाताना त्यांनी श्रीपंडितराव यांना दिल्या व त्यांनी दृष्टांताप्रमाणे गु. बाबुरावजी कोटणीस यांना दिल्या. सध्या त्या श्रीबाबूरावजींचेकडे आहेत. माईसाहेबांनी देह ठेवला तेव्हा श्रीसाधुमहाराज यांच्या मंदिरातील पादुका उचकटल्या. साधुमहाराजांनी त्यांना आपले पायाशी जागा दिली. श्रीनारायणमहाराजांनी पुनः या पादुका स्थापित केल्या.

## श्रीउद्‌धवरावजीमहाराज

श्रीउद्‌धवरावजीमहाराज हे चिमडचे महाराजांनी देह ठेवला तेव्हा अवघे दीड वर्षाचेच होते. जन्मतःच त्यांचे कानाला भोके होती. श्रीलक्ष्मीबाई अक्का त्यांना कानफाट्या म्हणत. घरचीच ब्रह्मविद्या असल्याने व अनेक जन्म ते परमार्थच करीत आले असल्याने ही विद्या त्यांना आत्मसात् करणेस वेळ लागला नाही. यांचेवर श्रीनारायणमहाराज यांची पूर्ण कृपा होतीच. हे सर्वकाळ साधनच करीत. हे अजिबात बोलत नसत. कोणावर हे जर अगदीच प्रसन्न झाले तर किंचित् गालातल्या गालात हसत. यांना पूर्ण शांतिसागर म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. अखेरपर्यंत यांनी नेम केला.

यांनी देह ठेवल्यावर यांची समाधीही मठातच त्रयमूर्तींच्या पिछाडीस केली आहे. यांचे चिरंजीव श्रीपांडुरंगराव यांनाही श्रीनारायणमहाराजांचा अनुग्रह असून ते मनःपूर्वक नेम करतात. यांना पोस्टात नोकरी असून ते शांत वृत्तीचे आहेत. यांना पाहून समाधान वाटते.

### श्रीगोविंदपंत घोसरवाडकर आणि श्रीनारायणमहाराज

श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचे अंगात श्रीरेवणसिद्धांचा संचार होत असे. संचारावस्थेत श्रीदत्तोपंत कुंभोजकर यांना बरोबर घेऊन चिमडास जाऊन अनुग्रह घेणेचा आदेश गोविंदपंतांना मिळाला. त्याप्रमाणे गोविंदपंत त्याचे चुलतबंधूचे चिरंजीव मल्हारपंत कुलकर्णी हे दत्तोपंतांचे बरोबर चिमडास गेले. यांनी विचार केला. आपणास जसा श्रीरेवणसिद्धांचा आदेश झाला आहे, याप्रमाणे हा आदेश श्रीनारायणमहाराजांनाही झालेला असणारच. पण आपण विचारा कशाला? आश्चर्य श्रीनारायणमहाराजांनीच विचारले,'अरे तुम्ही आदेशाप्रमाणे नाम घेणेकरिता आला आहात ना? मग मला विचारले कसे नाही.' श्रीगोविंदपंत म्हणाले, 'आपणाला हे समजलेले असणारच म्हणून आम्ही स्वस्थ होतो. आम्ही आदेशाप्रमाणेच येथे आलो आहोत. आम्हावर अनुग्रह करावा.' मग महाराजांनी यांचेवर अनुग्रह केला. ज्या दत्तोपंतांचेबरोबर ही मंडळी चिमडास आली ते श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांचे परमशिष्य असून ते रोज नऊ तास नेम करीत. दुपारी ४ नंतर जेवण करीत असत. रात्री जेवण नाही. सकाळी ६ ते दुपारी ३ पर्यंत नेम चाले. 'दृष्ट्वा दृश्यं व्योमं पीतं शुभ्रं ताम्रं नीलं धवलं शामं' इथपर्यंत महाराजांनी मला नेले आहे असे ते म्हणत असत. त्यांनी तर नेम करता करताच आश्विन शुद्ध एकादशीस सकाळी आपला देह ठेवला.

### मी गेला की लगेच ब्राह्मी स्थिती देतो

गणेशवाडीचे बाबा कानेटकर हे श्रीनारायणमहाराज यांचे शिष्य. त्यांनी आपणास ब्राह्मी स्थिती द्यावी म्हणून महाराजांची प्रार्थना केली. महाराज म्हणाले, 'तुम्ही खोलीत नेमास बसा व तुमचा 'मी' गेला की बाहेर या लगेच



तुम्हाला ब्राह्मी स्थिती देतो,' बाबा खोलीत बसले. व थोड्याच वेळात 'मी' गेला म्हणून बाहेर आले. महाराज म्हणाले, 'अहो तुमचा 'मी' गेल्यावर तुम्ही बाहेर आला कसे? व तुमचा मी गेला हे तुम्हाला कळले कसे? जर तुमचा 'मी' गेला असता तर तुम्ही बाहेरही आला नसता व मी गेला हे तुम्हास कळलेही नसते. आणि असे झाले असते तर तुम्हाला ब्राह्मी स्थिती तिथेच प्राप्त झाली असती.' मग बाबांना कळले की 'मी' नाहीसा होणे हीच ब्राह्मी स्थिती! त्यांनी महाराजांचे पाय धरले. व कृपा असावी अशी प्रार्थना केली. महाराज हसले.

### श्रीनागाप्पाण्णामहाराज व श्रीगोपाळकाका कोटणीस यांची चिमड येथील प्रवचने

श्रीसाधुमहाराज यांचे महोत्सवात श्रीनागाप्पाण्णामहाराज व श्रीगोपाळकाका यांची रसाळ प्रवचने होत असत आणि त्यामुळे मोठी मौज येई.

### कापसाचा गोळा हा लोण्याचा गोळा समजून केवळ आशेवर मांजर जगले.

मागे एकदा १९३८ साली प्रस्तुत लेखकाचे कीर्तन श्रीनारायणमहाराजांनी श्रीमाईसाहेबांचे सांगणेवरून ठेवले. श्रीमाईसाहेब, श्रीनारायणमहाराज, श्रीनागाप्पाण्णामहाराज, श्रीगोपाळकाका हे कीर्तनास बसले होते. महाराजांना हे कीर्तन फारच आवडले, व त्यांनी आपले कीर्तनात रात्री प्रस्तुत कीर्तनातील वर उद्धृत केलेला विषयच रंगवून सांगितला. 'परगुण परमाणु पर्वतीकृत्यनित्य' या उक्तीप्रमाणे कवतुक करून 'कापसाचे गोळ्यावर जसे मांजर टपले होते, तसे आमचे तबलजी चिमडला आलेल्या लोकाच्या फराळाचे डब्यावर टपलेले असतात त्यावरच त्यांचे लक्ष असते.' असा विनोदही केला. श्रोत्यांना मोठी गंमत वाटली.

### नवसाधक मंडळींची गंमत

नवसाधक मंडळी नेमाला बसली व महाराजांनी सर्वांना डोळे मिटून बसण्यास सांगितले. आणि गंमत अशी की प्रत्येकजण दुसऱ्याने डोळे मिटले आहेत की नाही हे बघत होता. त्यामुळे महाराज जो यांचा नेम कसा काय

चालला आहे म्हणून पाहाणेस आले तो सर्वांचे डोळे उघडे होते. महाराज म्हणाले, ‘तुम्ही दुसऱ्याने डोळे मिटलेत की नाही हेच जर बघत बसला तर मग असेच होणार.’ मग सर्वांना हसू आले. व आपले कोठे चुकले हेही समजून आले.

### श्रीनारायणमहाराज यांचा एकसष्टी समारंभ

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आदेशाप्रमाणे माझे तीर्थरूप परमपूज्य वडील श्रीगोविंद अनंत ऊर्फ श्रीबापूरावजी केळकर (श्रीमामा) यांना चिमडचे श्रीनारायणमहाराज यांचा प्रथम भेटीतच तत्काळ अनुग्रह झाला असून हीच साधना श्रीमामांनी आपल्या आयुष्यात शेवटपर्यंत केली. श्रीतात्यासाहेबांचे आज्ञेनेने श्रीमामा आपले घरी रोज हरि-कीर्तन करीत. श्रीनारायणमहाराज हे श्रीमामांनी सुरू केलेल्या नित्य कीर्तनाचे रौप्य महोत्सवास आले होते. त्यावेळी त्यांनी श्रीमामांना आशीर्वाद दिला. श्रीनारायणमहाराजांचे छायाचित्र घ्यावे, असे मनात आले व ते ती.विमलाताई कोटणीस यांनी मनावर घेतल्याने घडलेही. मोठ्यांचे सर्वच मोठे. महाराज म्हणाले, ‘मी नुसता बसणार नाही. बापूराव तुम्ही या.’ श्रीमामा म्हणाले, ‘आम्हाला आपला फोटो पाहिजे आहे, आपण बसावे.’ पण महाराजांनी फार आग्रह केल्यावर श्रीमामा त्यांचे शेजारी उभे राहिले. व उभयतांचा फोटो घेणेत आला. श्रीनारायणमहाराज यांचे एकसष्टी समारंभास श्रीमामा चिमडास गेले होते. श्रीनारायणमहाराज यांनी श्रीमामांचे सायंकाळी कीर्तन ठेवले होते. श्री.दामले पेटीवर, गु. गोपाळकाका कोटणीस हे तबल्यावर बसले. गु.भ.प.बाबूभटजी बापट यांनी हाती झांज घेऊन मागे साथ केली. श्रीनारायणमहाराज कीर्तनास बसले होते. श्रीमामांचा शुद्ध भाव ओळखून महाराजांचे डोळेही पाणावले. रात्रौ महाराजांचे बोध-प्रचुर असे रसाळ कीर्तन झाले. हा समारंभ प्रत्येकाने हृत्कमलावर कोरून ठेवावा असा झाला.

### पार्वतीकाकू बोडस कीर्तन करू लागल्या.

पार्वतीकाकू या शाळेलाही गेलेल्या नाहीत. पण महाराजांचे कृपेने मननपूर्वक त्यांचे कीर्तन श्रवण करून नित्यनेमाने अभ्यास करून त्यांच्या कीर्तनाचा



आपले मनाशी ताळा घेऊन उत्तम कीर्तन करू लागल्या. हे एक मोठे आश्चर्य आहे. सर्वांना याचे आश्चर्य वाटे. दासबोध, ज्ञानेश्वरी व भागवत यांचे नेहमी त्या वाचन करीत असत. त्यांची श्रीनारायणमहाराज यांचेवर चांगली निष्ठा होती.

### जागती परंपरा निर्माण केली.

मुंजान योग लिहिणारे डॉक्टर डबीवाले, श्रीनारायणीय शिष्यप्रबोध लिहिणारे मोहोळकर, आठले, बार्शीकर, बी.ई.कुलकर्णी, बाबा कानिटकर, भाऊराव देशपांडे, देशमुख, यशवंतराव दळवी, चरणकर, पुण्याचे कॅप्टन जोशी, ज्यांचे घरी प्रतिवर्षी महाराज मोठ्या प्रेमाने सांगलीस येवून तळमळीने मार्गदर्शन करीत, असे श्री.रघुनाथ विनायक देशपांडे अशी उच्चश्रेणीतील मंडळी ज्या श्रीनारायणमहाराजांनी निर्माण केली, त्यांची थोरवी कोणी आणि कोठवर वर्णन करावी?

### मालकच कीर्तन करतील.

संत झाले तरी प्रारब्ध सुटत नाही. श्रीनारायणमहाराज यांचे शरीराचा एक भाग लटका पडला. तोंडाने स्पष्ट बोलता येईना. त्यामुळे कीर्तनाचे साधन ‘तोंड’ तेच काम देईनासे झाले. श्रीसाधुमहाराज यांचे महोत्सवास श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव आम्हाला गुरुस्थानी असलेले गु.श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज हे चिमडास गेले होते. महाराजांनी आपले कीर्तनात सांगितले, ‘या पुढे माझे हातून आता कीर्तन होणार नाही. कीर्तनाचे येथील अधिकारी आलेले आहेत. तेच यापुढे कीर्तन करतील.’ व यापुढे महाराज असेपर्यंत श्रीबाबूरावजींनीच प्रतिवर्षी उत्सवातील दहा कीर्तने केली व आपले वडिलांची परंपरा राखली.

### मला झालेले शेवटचे दर्शन

श्रीनारायणमहाराज यांनी ज्या वर्षी देह ठेवला, त्या आधी दोन तीन महिने श्रीसाधुमहाराज यांचे रथोत्सवास चिमडला गेलो होतो. महाराजांचे दर्शन घेतले. त्यांनी विचारले की, ‘रामभाऊ रोज कीर्तन चालू आहे का?’ महाराजांचे जवळच बेळगली होते. ते म्हणाले ‘यांचे वडील बापूराव केळकर गेल्याचे दुसरे

दिवसापासूनच यांचे कीर्तन सुरू झाले आहे.' महाराजांचे डोळे पाण्याने भरले व अश्रुधारा सुरू झाल्या. महाराज म्हणाले, 'रामभाऊ, असेच कीर्तन चालू ठेवा.' त्यांना म्हटले 'आपला आशीर्वाद असावा.' महाराज इतके मनापासून हसले. तो चेहरा अजुनी माझे डोळ्यासमोर येत आहे. महाराजांनी एक नारळ त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव पंडितराव यांना हाक मारून त्यांचे हाती दिला. व सांगितले 'पंडित, महाराजांची आरती करून नारळ रामभाऊंच्या ओट्यात घाल.' त्याप्रमाणे पंडितरावमहाराजांनी आरती करून तो नारळ माझे ओट्यात घातला. महाराजांचे पायावर मस्तक ठेवले. महाराजांनी पाठीवर हात फिरवला. मनाला मोठी कृतार्थता वाटली. या सर्व घटनेचे रहस्य एक महाराजांनाच माहिती. आपणास त्यातील काय कळणार!

### पंडितराव यांना कीर्तनास उभे केले.

याच वर्षी श्रीनारायणमहाराज यांनी आपले ज्येष्ठ चिरंजीव गु.पंडितराव यांना हाक मारली व 'कीर्तनास उभा रहा' म्हणून सांगितले. आणि आश्चर्य पंडितराव यानी हुबेहुब महाराजांचे सारखे कीर्तन केले.

### श्रीनारायणमहाराज यांचे निर्याण

सोमवार माघ शुद्ध १० शके १८६५ या दिवशी सायंकाळी श्रीनारायणमहाराज यांनी आपले पलंगावर निजल्या स्थितीत श्रीसाधुमहाराज यांचे देवळाचा कळस पाहिला. त्यास तेथूनच वंदन केले आणि आपल्या आयुष्याचा शेवट केला. एकच हाहाःकार झाला. हा हा म्हणता ही दुःखद घटना सर्वत्र कळली. मिरजेस महाराजांचे एक शिष्य यशवंतराव दळवी यांना तार आली. गु.बाबूरावजी, पांडोबा यरगट्टीकर हे लगेच चिमडला रवाना झाले. आसपासचे खेड्यातून सुमारे चार पाच हजार तरी माणूस गोळा झाले. पार्थिव देहासमोर रात्रभर भजन झाले. दुसरे दिवशी सकाळी 'सद्गुरूनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।' या घोषात आठपासून बारा वाजेपर्यंत अंत्ययात्रा झाली. श्रीसाधुमहाराजांचे वटवृक्षानजिक महाराजांचा अंत्य संस्कार झाला. व



जड अंतःकरणाने सर्व माणसे परतली. गावकऱ्यांनी महाराजांची गादी रिकामी ठेवावयाची नाही म्हणून गु. पंडितराव यांना गादीवर बसविले.

### श्रीनारायणमहाराज यांच्या पादुकांची स्थापना

चिमडचे मठात औदुंबराखाली श्रीनारायणमहाराज यांच्या अस्थि ठेवल्या असून त्यावर गु.श्री.बाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी श्रीनारायणमहाराज यांचे नावे शिवपिंडीची स्थापना केली आहे. गु.पंडितराव यांनी श्रीनारायणमहाराज यांचे मठात एक छायाचित्र ठेविले व उपासना, परंपरा, आराधना, रथयात्रा पूर्वीप्रमाणे चालू ठेविली. या रथोत्सवाचा सोहळा पूर्वीप्रमाणे अपूर्व होतो. गु. श्रीबाबूरावजी हे हल्ली चिमडास प्रकृती अस्वास्थ्यामुळे जाऊ शकत नाहीत. यामुळे हल्ली उत्सवात गु. पंडितरावच कीर्तन करीत असतात. पंडितराव, नीळकंठराव बापू, सदाशिवराव ही सर्वच मुले या महोत्सवात फार परिश्रम घेतात. महाराजांचे कृपेने या स्थानाचे महत्त्व अधिक अधिक वाढत जावे, आम्हा सर्वांना शांति, समाधान लाभावे हीच त्यांचे चरणी प्रार्थना.

### निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके अठराशे सत्त्यांशी । विश्वावसु संवत्सर उत्तरायण ।।१।।
माघशुद्ध दशमी आणि सोमवार । रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।
नारायणरावांनी केले हो निर्याण । साधनी निमग्न ऐक्य झाले ।।३।।
साधु देवालय कळस वंदून । सोडियेले प्राण निजसत्ते ।।४।।
नारायण रूपे नारायण झाले । कीर्तिरूपे उरले *दासापाशी* ।।५।।

***

## (३)

# प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस

## (अ)

## प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्राख्यान

### मूळ अभंग

हनुमंताचा राय श्रीराम सद्‍गुरु । आत्मऋणभारू मुक्त करी ।।१।।
सांगितली सेवा करिता यथार्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी ।।२।।
संतांचा जो मार्ग अहर्निशी स्मरण । दिधलीसे खूण निजकृपे ।।३।।
रामनाम हेचि एक निज धन । तयाविण जाण पाप द्रव्य ।।४।।
अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेचि पै कीर्तन *दासालागी* ।।५।।

### आख्यान

श्री सद्‍गुरु तात्यासाहेबमहाराज यांचे सत्य चरित्र जर कोठे आपणास आध्यात्मिक दृष्टीने पहावयास मिळणार असेल तर ते त्यांच्या पद्यांतून सापडणार आहे. संताचे ग्रंथ म्हणजे संताची रूपेच होय. संतांना आलेले स्वानुभव हे तिऱ्हाईतास अगम्य होत. त्यांचे व्यावहारिक जीवन अगर ऐतिहासिक आणि चमत्काराच्या गोष्टी संशोधकांना अगर चरित्र लेखकांना खुलविता येतील, पण परमार्थातील जे काही प्रात्यक्षिक आहे की ज्यावर त्यांच्या तत्त्वज्ञानाची उभारणी होत असते, ते कृतिरुप विचार हेच त्यांचे अंतश्चारित्र्य किंवा त्यांचे अंतरंगाचे यथार्थ दर्शन होय. तात्यासाहेबमहाराजांचे आजमितीसही आपणास दर्शन घेता येईल; पण त्यांच्या पद्यांचे हृद्‍गद त्यांचे कृपेने आपण उकलून पाहिले पाहिजे. (म्हणजे चिमड सांप्रदायाचा ते कळस कसे झाले, अध्यात्मातील उच्च कोटी त्यांनी कशी संपादन केली, हे आपल्या अंतःकरणात उमटून, चित्ताला खरे समाधान प्राप्त होईल. ‘ही खुण गुरु जाणे गुरु जाणे । येरा टकमक



बाणे।’ अशी स्थिती असल्याने सांप्रदायिक खुणेनेच त्यांचे वर्म आपण जाणून घेतले पाहिजे.)

तात्यासाहेबमहाराज हे वकिल होते, विद्वान् होते, किंवा श्रीमान् होते, हे त्यांच्या मोठेपणाचे गमक नसून, ते मोठे गुणी, भगवद्‍गुणामध्ये रंगलेले असे अवतारी पुरुष होते. या ठिकाणी अवतारी म्हटल्यानंतर त्यांच्या मोठेपणाला जागा रहात नाही. परंतु अवतार या शब्दाचा अर्थ आपण व्यवहारात घेतो तसा मुळी नाहीच. अवतारी पुरुष जे आपण ओळखतो ते त्यांचे कर्तबगारीवरून. जन्माला येताना काही त्यांचे कपाळावर ‘अवतारिक पुरुष’ म्हणून शिक्का मारलेला नसतो. परंतु भगवद् इच्छेने, सद्‍गुणांच्या जोरावर, विरोधी परिस्थितीला टक्कर देऊन, जे आपले तत्त्वज्ञान अजरामर करून, जगताला आध्यात्मिक वैभवाने चकित करून सोडतात, आणि प्राणिमात्रांना अवनीपासून तारून अखिल विश्वही सुखी करण्याची ग्वाही आपल्या अधिकारवाणीने देतात. असे जे संत तेच अवतारिक पुरुष होत. ‘अवनीपासून तारणारा तो अवतारी’ अशी व्याख्या खुद्द श्रीतात्यासाहेब आपल्या कीर्तनातून करीत असत. श्रीसमर्थांनीही याच अर्थाची अवतारी पुरुषाची व्याख्या केली आहे. :–

विवेके बहुत पैसावले । म्हणोनि अवतारी बोलिले ।

यावरूनही संताची कामगिरी आणि त्यांचे चारित्र्य स्पष्ट होणार आहे. त्यांनी काय केले म्हणून जर पाहिले तर श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दांत

ऐसे माझेनि नामघोषे । नाहीच करिती विश्वाची दुःखे ।
अवघे जगची महासुखे । दुमदुमीत भरले ।।१।।

असे अनंत उपकार केले आहेत.

संसार सुखाची कहाणी । ऐकिजेल कवणाचे श्रवणी ।
कैची सुख निद्रा आंथरूणी । इंगळाच्या ।।१।।

निखाऱ्याच्या खाईवर सुखनिद्रा घेण्यापैकीच संसारसुख आहे, असे ज्याचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजानी केले आहे. किंवा

संसार दुःखमूळ चहुकडे इंगळ । विश्रांती नाही कोठे रात्रंदिवस तळमळ । असे ज्याचे बाबतीत उद्‌गार काढले आहेत.

जन्म दुःखं जरा दुःखं जाया दुःखं पुनःपुनः ।
संसारसागरे दुःखं तस्मात् जागृहि जागृहि ।।

अशा शब्दात ज्या संबधी श्रीमद् जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य यांच्या सारख्यांनी तीव्र जागृति निर्माण केली आहे, आणि 'दुःख बांदवडी आहे हा संसार' असा निर्वाळा श्रीतुकाराममहाराजांनी दिला आहे, असा विषमयी असलेला अखिल विश्वाचा संसार सुखरूप करून टाकला, हाच त्यांच्या कामगिरीचा निष्कर्ष असून हेच त्यांच्या श्रेष्ठत्वाचे बीज व गमक आहे.

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ।।१।।
तेणे होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश काही ।।२।।

अशाप्रकारची अवस्था ज्यांनी भोगली आणि श्रीनाथमहाराजांचेप्रमाणे नित्य कीर्तनानंदात ज्यांनी आपला संसार ब्रह्मरूप करून टाकला आणि चिमड संप्रदायाचे तत्त्वज्ञान आपल्या आचरणाने सिद्‌ध करून, ज्याकडे सर्व संप्रदायांचीही दृष्टी खेचून घेतली, असे श्रीतात्यासाहेबमहाराज महान् पुरुष असल्याने, त्यांच्या कीर्तीला साजेल अशी त्यांची पुण्यतिथि आपण साजरी करीत आहोत.

श्रीतात्यासाहेबमहाराज हे अवतारी पुरुष होते, असे म्हटल्यानंतर ते कोणाचा अवतार होते, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. तात्यासाहेब अनेक सद्‌गुणांनी मंडित असल्याने आपापल्या बुद्‌धिकौशल्याने त्याना कोणाचाही अवतार म्हणता येईल. 'कैवल्यवैभवा' चे प्रस्तावनेत सुप्रसिद्‌ध विद्‌वद्रत्न गुरुवर्य रामभाऊ रानडेसाहेब यांनी त्यांना 'आधुनिक एकनाथ' म्हणून संबोधले आहे. कै.राजकवि साधुदास यांच्यासारख्या सरस्वतीच्या लालांनी त्यांना 'अर्वाचीन दामाजीपंत' असे म्हटले आहे. अशी अनेक रूपके त्यांना देता येण्याजोगी आहेत. परंतु त्यांच्या पद्यांच्या आधारे जे त्यांचे जीवन चरित्र



उपलब्ध आहे ते मुख्य प्रमाण जर आपण पाहिले तर माझे तीर्थरूपांनी साधनमार्गास धरून लिहिलेला 'श्रीहनुमद्‌गुरु चरित्र बोधसार' ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणे, ते श्रीमारुतिरायांचे अवतार होते असे आपणास निःसंदेह म्हणता येईल. रामायणकालीन श्रीराम अवतारात हनुमंत हेच एकनिष्ठ रामभक्त असून, प्रभु रामचंद्राच्या कृपानुग्रहाने त्यांनी महान् राम कार्य केले. अर्थात् या स्वामिकार्याकरिता अंजनी मातेची इच्छा असूनही ते ब्रह्मचर्य व्रतानेच राहिले. त्यांचा अवतार समर्थ, हे तर प्रसिद्‌धच आहे. त्यांचा अवतार धर्म–कार्याकरता असल्याने, त्यांच्या मातोश्री राणूबाई यांनाही नारायणाचे लग्न व्हावे असे मनापासून वाटत असल्याने, भोवल्यावर (बोहल्यावर) उभे रहा असे त्यांच्या तोंडून निघालेल्या उद्‌गारांचा शब्दशः अर्थ करून समर्थ बोहल्यावर उभे राहिले व सावधान म्हणताच पळून गेले, हे सर्वश्रुत आहेच.

समर्थांच्या मनाच्या श्लोकांनी, मेलेला अखिल महाराष्ट्र जिवंत केला. प्रत्येकाच्या रोमारोमात धर्मजागृति निर्माण केली आणि धर्मनिष्ठ श्री छत्रपति शिवाजीमहाराजांचे सारख्यांना हाती धरून 'आताचे ब्राम्हणी काय केले जे अन्न मिळेना ऐसे झाले' अशी उत्पन्न झालेली दुर्दैवाची अवस्था आणि

राज्य नेले म्लेंचि क्षेत्री । गुरुत्व नेले कुपात्री ।।
आपण अरत्री ना परत्री । कांहीच नाही ।।

बहुसाल कल्पांत लोकासी आला। महर्गे बहुधाडी केली जनाला ।
किती गुर्जरी ब्राह्मणी भ्रष्टविल्या । किती एक देशांतरी त्या विकील्पा ।।

अशा तऱ्हेची विपन्नावस्था दूर करून,स्वधर्मरक्षणाकरता स्वराज्य स्थापना केली. आणि श्रीशिवाजीमहाराजांना 'उदंड झाले पाणी स्नानसंध्या करावया' अशा तऱ्हेच्या उद्‌गाराने धन्यवाद देऊन, आपला देह रामार्पण केला. अर्थात् या अवतारातही रामचंद्रच गुरु. पूर्वावतारातील मातेची इच्छा पूर्ण करण्याकरिताच की काय श्रीतात्यासाहेबांचा जन्म कार्तिक शुद्‌ध ८ मि. शके १७७६, सोमवारी, कोटणीस घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पांडुरंगराव असे असून मातोश्रींचे नाव रखमाबाई असे होते. याही अवतारात प्रभू रामचंद्रच गुरु.

वकिलीसारखा धंदा करूनही प्रपंचात परमार्थरूप होता येते, आणि आदर्श प्रपंच आणि आदर्श परमार्थ गुरुकृपेने साधता येतो, हेच त्यांनी या अवतारात दाखवून दिले.

तात्यासाहेबांचे चुलते वामनकाका यांनीच बालपणी तात्यासाहेबांचे वडिल निवर्तल्याने संरक्षण केले आणि अशा प्रकारे तात्यासाहेबांचेवरती आपले ऋण करून ठेवले. तात्यासाहेबांनी वामनकाकांना आपल्या गुरूची गाठ घालून देऊन व त्यास जीवन्मुक्त स्थितीत नेऊन कधीही न फिटेल असे ऋण वामनकाकांचेवर करून ठेवले की ज्या योगे ऋणांतून मुक्त केल्याबद्दल वामनकाकांना, तात्यासाहेबांना धन्यवादच द्यावे लागेल. ते म्हणतात:-

सद्‌गुरूच्या हाते दिले आत्मज्ञान । दुर्लभ निधान ब्रह्मादिका ।।
ऋणातुनि मज मुक्त करी जो कां । धन्य जगी देखा वायुपुत्र ।।

या अभंगाच्या आधारे पाहता,

केली अघटित साधनाची करणी । येत लोटांगणी हनुमंत ।।

अशा तऱ्हेचे उद्‌गार खुद्द श्रीतात्यासाहेबांनी ज्या वामनकाकांचे बाबतीत काढले, त्यानी तात्यासाहेबांना 'वायुपुत्र' या नावाने संबोधले, आणि मारुतिराय हे वायुपुत्र होते, या दृष्टीने ते मारुतिरायांचे अवतार होते. याही पलीकडे तात्यासाहेबांनी आपल्या एका अभंगात, वामनकाकांना तारीख ७/७/१९०६ रोजी पाठविलेल्या पत्रात, 'ऐशा बळवंताचे पायी पै नमन । अंजनीनंदन करीतसे,' असे म्हटले आहे. तात्यासाहेबांच्या प्रत्येक पद्यात 'दास' अशी मुद्रिका घातली आहे. परंतु या पद्यात मात्र 'अंजनीनंदन' अशी मुद्रिका घातली आहे. यावरून आमच्या विधानाला अधिकच पुष्टी येते. 'पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती,' अशा तुकाराममहाराजांचे उक्तीप्रमाणे, त्यांचे कुळ तर धन्यच होय. पण त्यांचे आईबापही कोणी सामान्य नसून, त्यांना 'शिवशक्ती' किंवा 'ब्रह्मभूमी माया' च म्हटले पाहिजे. तात्यासाहेबांनी आपल्याच जन्माचा सोहळा जणू काही आध्यात्मिक दृष्टीने एका अभंगात वर्णिला आहे. तो अभंग जिज्ञासूनी गु.श्रीबाबुरावजींनी प्रसिद्ध केलेल्या -



'कैवल्यवैभवात' अवश्य पहावा. त्यातील महत्त्वाची कडवी यावेळी आपण पाहू :- हा जन्म आधिभौतिक नसून आध्यात्मिक आहे, की ज्या स्थितीत हरिहरेश्वराचे अखंड ऐक्य होऊन गुरुकृपा होते आणि साधन संप्रदायात नानाप्रकारच्या मौजा अनुभवयास सापडतात.

सद्‌गुरुवचने ब्रह्मजन्म हा । माया जठरीहूनी ।
काढी वेगळे मज लागूनी । अगाध ही करणी ।।१।।
शांती, क्षमा, दया कामिनी येती । माझे जन्मकाळी ।
अनुहात ध्वनि झेंगट पिटिले । बोलती वेल्हाळी ।।२।।
बहू भाग्याचे मूल जन्मले । आपरुपलक्षणी ।
सोहंपणाने कैसे पाहते । बालक हे नयनी ।।३।।

यावरून श्रीतात्यासाहेबांचे आईबाप हे काय अधिकाराचे व स्वरूपाचे होते हे दिसून येईल.

तात्यासाहेबांना बाबासाहेब मुजुमदार यांचे संगतीत ज्या काही गोष्टी ऐकावयास मिळाल्या, त्यामुळे अंतःकरणाला परमार्थाचा चटका लागून राहिला आणि त्यामुळे ते श्रीरामचंद्रावमहाराज यरगट्टीकर यांना शरण गेले. त्यांच्या अंतःकरणातील तळमळ कुडी-आत्म्याच्या संवादात उत्तम रीतीने प्रतीत होत आहे. संवादातील विचार तात्यासाहेबांचे तळमळीचे द्योतक आहेत. त्यातील मुमुक्षुत्व जेथे निर्माण झाले, असे कडवे आपण या ठिकाणी पाहू :-

कुडी बोलली सांगा कोठे । जानवसा हो मला दिला ।
जाता तुम्ही कोठे तरी । ठावचि सांगा तसा मला ।।१।।
येरु बोलला मसणपुरी । तुज ठाव जाण गे नेमियला ।
मुक्तीपुरीमध्ये जाणे मजला । सौख्यसिंधु झणि भरला ।।२।।
दास विनवितो रामकृपेविण । मजला काही नको नको ।
गाठ आमुची बहु जन्माची । निष्ठुर आता होऊ नको ।।३।।

रामकृपेशिवाय तात्यासाहेबांना दुसरे काही नकोच होते. अर्थात् तात्यासाहेबांच्यावरती मार्गशीर्ष वद्य ५ मी, गुरुवार या दिवशी

श्रीरामचंद्रावजीमहाराजांनी पूर्ण कृपा केली. आणि पुढे सर्व घराणे चिमडसंप्रदायाचे बनून त्यांचे वैष्णवत्व सुटून, ते पूर्ण अद्वैतमतानुयायी बनले. या दृष्टीनेच

संत सज्जन तेचि बोलिले । हरिहर एकरूप ।
समज दृढ मनी दास विनवितो । होई तू निष्पाप ।।१।।

अशा तऱ्हेचे उद्गार एका अभंगात काढले आहेत.

श्रीरामचंद्रमहाराजांचा अनुग्रह झाल्याबरोबर, तात्यासाहेबांना महाराजांनी विष्णुस्वरूपात दर्शन दिले, असे त्यांच्या एका पद्यावरुन दिसते. ते म्हणतात,

पूर्ण कृपेने नाममंत्र तो कर्णी फुंकियला ।
जिकडे तिकडे देव निरंजन निर्गुण दावियला ।।
महाविष्णू तू एकनाथ तू स्वामी गुरुनाथा ।
दास प्रभूचा राम कृपेचा वंदित पद माथा ।।

तात्यासाहेबांची दृष्टी ही साधनी असल्याने, नेहमी अधोमुख असे, हे त्यांच्याकडे पाहणाऱ्यांना कळून येई. गुरूकृपेचा लाभ झालेल्यालाच या गोष्टी कळून येणार आहेत. तात्यासाहेब म्हणतात :-

डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही ।
बाप सद्गुरु कृपा करील जरी लाभ घडे देही ।।१।।

तात्यासाहेबांना परमार्थाचा पूर्ण लाभ झाल्याने, त्यांचे आचरण अगदी शुद्ध होते. विष्णुस्मरणात आणि शिवस्मरणात प्राणाची धारणा अखंड असल्याने,व

ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे ।
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ।।१।।

अशा तऱ्हेची वृत्ती झाल्याने, तात्यासाहेब हे आपल्या उपासनेने आणि शुद्ध चारित्र्याने तीर्थांचे जनक झाले होते, की यामुळेच कृष्णामाईला महापूर आला



असता, त्यांचा पादस्पर्श होताच तीर्थाला पुण्यत्व येऊन पाणी भराभरा ओसरून पात्रात गेले. अर्थात् त्यांचे चारित्र्य हे साधकावस्थेला साजेलसे होते.

परद्रव्या अंध नयनी । परस्त्री पाहता क्लीबत्व मनी ।
परापवादी मूकत्व वदनी । तीर्थ -जनक तोचि ।।

अशा पथ्याने साधनसिद्धि झाल्याने त्यांना आत्मानुभवाच्या मौजाही अपरंपार भोगावयास मिळाल्या. त्यांतील मासल्यादाखल एकदोन पाहू :- एका पदात भगवंताच्या मुरलीरवाचा त्यांनी दिलेला आत्मानुभव साधकाला मार्गदर्शन करणारा आहे. ते म्हणतात :-

चला बाई गुरुपायी रम्य मुरली वाजे ।
अनुहात वेणु तीचा नाद श्रवणी गाजे ।।
सप्तस्वर्गी खुण तिची मंजुळती ध्वनि ।
अकल्पित गुरुकृपे पडली माझे कानी ।।

नादानुसंधानाची पराकाष्ठा झाल्यानंतर जे काही निर्गुण साक्षात्कार झाले ते कोड्याच्या रूपात मांडून गुरुपुत्राला त्यांनी अर्थ विचारला आहे. अर्थ जाणणारा गुरुपुत्र विरळाच असेल असे वाटते. ते म्हणतात :-

येवढे कोडे उकलुनी दावी अर्थ तयाचा सांगुनि दे ।
न कळे तरी सद्गुरुपायी शरण जाऊनी पुसुनि घे ।।१।।
तोंडाळ प्राणी मुकेचि जाहले अर्थ तयाचा सांगुनि दे ।
डोळ्याने गगन टाके रे फोडले अर्थ तयाचा सांगूनि दे ।।२।।
वळचणीचे पाणी आढ्याला गेले अर्थ तयाचा सांगूनि दे ।
पांगुळ पर्वतमाथा रे चढले अर्थ तयाचा सांगूनि दे ।।३।।
मोत्याचा सागर डोळ्यात भरला अर्थ तयाचा सांगूनि दे ।
चांदण्याचा गोंधळ दृष्टीत जडला अर्थ तयाचा सांगूनि दे ।।४।।

या पदात वर्णिल्याप्रमाणे परमार्थातील अनेक मौजा तात्यासाहेबांनी अनुभविल्या, त्या कोठवर वर्णाव्यात?

निंबरगीमठ आणि चिमड संप्रदाय याबद्दल तात्यासाहेबांची अनन्य

निष्ठा होती. चिमड परंपरेखेरीज दुसरे दैवत त्यांच्या चित्ताला शिवले नाही. त्यांनी आपल्या परंपरेच्या पद्यात, मूळ रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध त्यांचे शिष्य श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर, त्यांचे शिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज, लक्ष्मीबाई अक्का व रामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर व त्यांचे शिष्य तात्यासाहेब, अशी परंपरा दिली असून 'स्थावरजंगम भरली पाही । दासा दैवत त्याविण नाही ।।' अशी आपली अंतर्निष्ठा त्यानी व्यक्त केली आहे. निंबरगीकरमहाराजांची समाधि निंबरगी येथे असून, साधुमहाराज, रामभाऊमहाराज व लक्ष्मीबाई अक्का या त्रिमूर्तिंच्या समाधी चिमड येथे आहेत. निंबरगीपीठावर श्रीनागाप्पाण्णामहाराज हे विराजमान असून चिमडपीठावर श्रीनारायणरावजीमहाराज हे विराजमान आहेत. चिमड क्षेत्री श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे वचनाप्रमाणे, ज्या तीर्थात श्रीसाधुमहाराजांची समाधी बांधली आहे, त्या तीर्थाचे ठिकाणी तात्यासाहेबांना आलेला अनुभव फार महत्त्वाचा आहे. म्हणून तो आपण पाहू :-

विहीर साधुरायाची । हरते पाप ताप साची ।।ध्रु।।
गुरुलिंगजंगम वचनी । गंगा आली तया स्थानी ।।१।।
रोगग्रस्त जन आले । स्नाने रोगमुक्त झाले ।।२।।
विहीरीचे पाणी सुंदर । पाट चाले निरंतर ।।३।।
मुक्त रत्न माणिके भरली । गुरुच्या हाती असे किल्ली ।।४।।
तेजःपुंज नाग डुलतो । परी तो भाग्यवंता दिसतो ।।५।।
अद्वय प्रभा पूर्ण पाही । पाहता दास धन्य होई ।।६।।

चिमड स्थानाचे माहात्म्य याप्रमाणे आहे. निंबरगीचे स्थानही अद्वय स्थितीला नेऊन वायुसुताचे दर्शन करविणारेच आहे. रामचंद्रराव म्हणतात :-

धन्य ते स्थळ महासिद्धाचे । झळकते शिखर वायुसुताचे ।
होसी पावन नरा जा वेगी । प्रगट बोलती जया निंबरगी ।।१।।
धन्य ते नर तया स्थळी जाती । ते स्वये स्वस्वरुपी मिळती ।
लाऊनिया ऐक्य निशाणी । भोगिती परमपद निर्वाणी ।।२।।

अशा तऱ्हेचे निर्वाण ऐक्य ज्या ठिकाणी प्राप्त व्हावे अशी स्थिती



असल्याने श्रीतात्यासाहेबांनी या दोन्ही ठिकाणी आपले सर्वस्व वेचले व निंबरगीची यात्रा, चिमडची यात्रा, अशा प्रसंगी अमाप खर्च केला.

तात्यासाहेबांची साधनसिद्धता इतकी झाली होती की प्रत्यक्ष सगुण साक्षात्कारालाही ते पात्र झाले होते. 'स्वयंभ दत्तराज योगी ध्यानी प्रगटले,' या पदावरून तसेच

रामदास श्रीसमर्थ स्वामी तूची सत्य अससी ।
ज्ञानदृष्टीने पाहता दासा ब्रह्मरूप दिससी ।।१।।

अशाप्रकारे साधुमहाराजांना उद्देशून काढलेल्या उद्गारावरून दिसून येते. निंबरगीकरमहाराजांचे दर्शनही त्यांना झाले असून त्याचे संबंधी

सत्पथ-लोप झाला ऐसा अनुभव दाखविला ।
नामरूपाचा लाभ कैसा मार्ग प्रगट केला ।।१।।

असा इतिहास सांगितला आहे. 'दत्त दिंगबर सिद्ध मुनीश्वर दर्शन तुज देती,' इत्यादि वचनावरून श्रीरेवणसिद्ध आदिकरून सिद्धांचे व नवनाथांचे दर्शन त्यांना खचित होत असले पाहिजे. अशा कोटीला गेलेले तात्यासाहेब दिगंतरी कीर्तिमान् होऊन त्यांच्या कीर्तनांना अलोट रंग भरला तर नवल काय? साधन संप्रदायात कीर्तन उपासनेची जोड जर कोणी दिली असेल तर तात्यासाहेबांनीच.

पहाटे काकड आरती, स्नानसंध्या, पूजा, नंतर दासबोध, संध्याकाळी पुराण व रात्री पंचपदी, कीर्तन व शेजारती असा तात्यासाहेबांचा नित्यक्रम असे. सदर संप्रदायातील पंचपदी ही चिमड संप्रदायाची संध्याच होय. अर्थात् या नित्यक्रमाच्या उपासनेतून, व 'निद्रा ही रांड खोटी ।' या रामभाऊमहाराजांचे उक्तीप्रमाणे निद्रेचे धिंडवडे काढून साधनसिद्धीने तात्यासाहेबांनी आपला परमार्थ साधला. याबद्दल वामनकाकांनी एक गोड अभंग केला असून, त्यातील शेवटची दोन कडवी त्यांचे चरित्राचा निष्कर्ष होय. ते म्हणतातः-

यामिनी माझारी कीर्तन करीत । साधिला परमार्थ वामन म्हणे ।।

अर्थात् ही कीर्तन परंपरा तात्यासाहेबांनी आपल्या सद्गुरूंच्या आज्ञेनेच चालविली होती. असा सबळ पुरावा तात्यासाहेब व वामनकाका यांच्या पत्र

व्यवहारात दिसून येतो. वामनकाकांच्या वरील पद्याला तात्यासाहेबांचे जे उत्तर आहे, ते असे आहे :- सांगितली सेवा करिता यथार्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी।। त्यांनी केलेली कीर्तनाची व्याख्या तर अमोल आहे. ते म्हणतातः- 'अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेची पै कीर्तन दासालागी ।।' अर्थात् अशाप्रकारच्या कीर्तनात महाराज खूष झाले आणि तात्यासाहेबांना उठून चिमडमठात उत्सवात झालेल्या कीर्तन प्रसंगी, त्यांनी प्रेमाने आलिंगन दिले. त्यावेळचा प्रसंग अंतर्बाह्य अवर्णनीय होता. त्यासंबंधी आलेला अनुभव त्यांनी आपल्या पद्यात मोठ्या बहारीने व्यक्त केला आहे.

हरिकथा गोड बहु झाली । वाचे न बोलवे बोली ।
भाग्यवंत मंडळी बसली । अशी शोभा कोठे न दिसली ।
स्वारी सद्गुरूची आली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ।
जिउबाई कीर्तना आली । शिउबाई तिजसी भेटली ।
मनुबाई निवांतची ठेली । दासा प्राप्त झाली गुरुपायी ।।१।।

यावेळी हजर असणारे खरोखरीच भाग्यवान् होत. या कीर्तनाच्या तपश्चर्येवर खूष होऊन, महाराजांच्या अधिकारसंपन्न पत्नी माईसाहेब यांनी महाराजांचे पायातील पादुकाचा जोड, त्यांचेवरील व त्यांच्या तोडीच्याच त्यांच्या पत्नी मा. लक्ष्मीबाई आईसाहेब यांचेवरील परिपूर्ण कृपावात्सल्याने, तात्यासाहेबांना दिला, की मोठ्या कवतुकाने त्यांचे चुलत्यांनी पुढील उद्गार काढले :-

पादुका मिळाल्या सद्गुरू लाभला । उणे काय त्याला सांगा आता ।।

तात्यासाहेब स्वतः आत्मानंदात रंगून तर गेलेच पण ते कीर्तनाच्या वाटेवर सराटे पेरणाऱ्या मत्सरी लोकांनाही तारकच झाले. 'लोकानी आपल्या वाटेत काटे पसरले तरी आपण त्यांच्या वाटेत फुले पसरावी,' ही म्हण त्यांनी अक्षरशः खरी केली. आपण तर साक्षात्कार भोगलाच परंतु श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकर यांचेसारख्या चिकित्सक संस्थानिकांनाही त्यांचे मनोगताप्रमाणे कुरुंदवाड मुक्कामी गणेशोत्सवात झालेल्या कीर्तनप्रसंगी श्रीगजाननाची प्रार्थना करून अण्णासाहेबांना गजाननाचा साक्षात्कार करविला, की ज्यायोगे अण्णासाहेब



कृतार्थ झाले. तात्यासाहेबांनी केलेली प्रार्थना बहारीची असून त्यातील शेवटचे कडवे मार्मिक आहे. ते म्हणतातः-

चित्त दुर्वांकुर आवडे म्हणुनी अर्पितसे तुजला ।
स्वानंदाचा मोदक देऊनी उद्धरी दासाला ।।१।।
गजावदना तू सुखसदना रे वेगी मला पावे ।
मनमूषकावरी बैसुनि शीघ्र तुवा यावे ।।ध्रु।।

अशाप्रकारे अध्यात्माच्या कळसाला तात्यासाहेब पोचले असताही त्यांचा छळ करणारे काही द्विपाद पशु होतेच. विषप्रयोग करणारेही एक वीर निघालेच. काही केले तरी तात्यासाहेबांची कीर्ति कमी होईना, म्हणून हा विषप्रयोग करणेत आला होता. सन १९११ सालच्या मार्च महिन्याच्या सुमाराची गोष्ट. सात दिवस ते बेशुद्ध होते. परंतु केवळ महाराजांच्या कृपेने त्यांना काही होऊ शकले नाही. त्यावेळी त्यांनी केलेल्या अभंगात ते म्हणतातः-

माझ्या नाशासाठी मोठा यत्न केला । परी तो विफल झाला गुरुकृपे ।।

स्वतः महाराज व्हावे ही इच्छाच नसल्यामुळे चिमडच्या परवानगीवाचून त्यांनी कोणासही अनुग्रह दिला नाही. त्यांची कीर्ति सर्वत्र दुमदुमली. शके १८४५ मध्ये त्यांनी देह ठेवावा असा विचार केला आणि आपल्याबरोबर येण्याकरिता श्रीतुकाराममहाराजांचेप्रमाणे सर्व जनांना ब्रह्मपुरीस येणे बद्दल बोलावणेही पण केले. पण तसा इसम कोणी भेटला असे दिसत नाही. यावेळी केलेले पद हेच त्यांचे शेवटचे पद होय.

ब्रह्मपुरी आम्ही जातो रे । कोणी येतो का रे ।।ध्रु।।

अखेर विश्रांतीसाठी पसंत केलेल्या संध्यामठाचे शेजारचे, हल्ली समाधि असलेल्या जागेत त्यांनी कायमची विश्रांती घेतली. याकरताच त्यांनी पूर्वी देह ठेवणेचे आधी या जागेबद्दल भाकित केले होते असे यावरून दिसेल:-

पार झाला तुका । उरली वाचा मारी हाका ।।

या उक्तीप्रमाणे तात्यासाहेब हे आपल्या पश्चात्ही आपल्या भक्तांना हाक

देण्यास सज्ज आहेत. त्या हाकेस जागे राहतील ते कृतार्थ होतील यात संशय नाही. याला अनुसरून कै.साधुदास यानी पश्चात् प्रकरणात साक्षात्काराचे काही प्रसंग दिले आहेत.

हातोहाती राम । जगाचा विश्राम ।
कैवल्याचे धाम । दास म्हणे ।।१।।

हे तात्यासाहेबांचे भाकित आणि आपण प्रत्यक्ष पाहतो हे कैवल्यधाम, हाही साक्षात्कारातील एक प्रकार आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेची पै कीर्तन दासालागी ।

या तात्यासाहेबांचे उक्तीप्रमाणे त्यांचे कीर्तन हे अखंड असल्याने कीर्तन परंपरेचा ओघ पुढे चालू आहे हाही एक साक्षात्कारच होय. शेवटी

मना साधने सद्गुरू डोलवावा । मना राम तो अंतरी साठवावा ।।१।।

असा त्यांचा सारभूत असलेला उपदेश आमचे आचरणात उतरून संप्रदायाचा हा दीप अखंड तेवत रहावा एवढी श्रीतात्यासाहेबांचे चरणी प्रार्थना करून, त्यांचे हे अल्पसे चरित्र-आख्यान, त्यांचे कृपेने स्फुरलेले, त्यांचे पवित्र चरणी अनन्यभावाने समर्पण करतो.

***

(३)
(ब)

## प.पू. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे स्वभाव चरित्र

अर्थात

## आधुनिक एकनाथ

धन्य ते संत आणि धन्य ते जन. खरोखर या आधुनिक काळात अशा तऱ्हेचे निस्पृह संत निर्माण होणे अतिशय कठिण आहे. खरोखर या हल्लीच्या काळात ज्याप्रमाणे स्वराज्य मिळवणे कठिण त्याप्रमाणे मनोनिग्रहाने अंगी निस्पृहता बाणवून घेणे तितकेच अवघड आहे. ज्याने मनोनिग्रहाने आपली इंद्रिये ताब्यात घेतली तो आपले वजन साऱ्या जगतावरही पाडू शकतो. ‘परमार्थी तो राज्यधारी। परमार्थी नाही तो भिकारी। यया परमार्थाची सरी। कोणास द्यावी ।।’ असे समर्थ म्हणतात तेव्हा अशा या आधुनिक काळातही या हिंदू धर्मावर अनेक तऱ्हेचे हल्ले चढत असताना अंधश्रद्धा व अंधश्रद्धेचे प्राबल्य माजले असताना व धर्माबद्दलचा (लोकांमधील) अभिमान निस्तेज होत असताना अशा तऱ्हेचा असामान्य पुरुष निर्माण होणे म्हणजे हा दैविक अवतारच आहे असे म्हटले पाहिजे.

कारण भगवंतांनी म्हटले आहे, ‘यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत’ यांच्या अवताराचे वर्णन याप्रमाणे आहे. त्रेतायुगामध्ये रामअवताराचे वेळी हे अग्निनारायणाच्या कृपाप्रसादाने अंजनीच्या पोटी जन्मास आले व त्यांनी आपले नांव रामायणात अजरामर केले की ज्यांचे चरित्र त्या रामायणातून गाळले तर ते नीरस लागेल. ते खरोखर रामचंद्राचे दास होते. पुढे द्वापारयुगातही

त्यांनी श्रीरामचंद्राचे दर्शन घेतले व त्या युगातही त्यांनी रामाचीच भक्ती केली. नंतर कलियुगात समर्थ या नावाने या महाराष्ट्रात प्रसिद्धीस आले. हे मारुतीचे अवतार, श्रीरामचंद्राचे उपासक व श्रीरामचंद्रांनी ज्यांना अनुग्रह दिला अशी ज्यांची ख्याती आणि त्रेतायुगात व द्वापारयुगात त्यांना श्रीरामचंद्रांनीच अनुग्रह दिला. ज्याप्रमाणे मारुतीचे चरित्र रामायणातून वगळले तर ते नीरस लागेल त्याप्रमाणे समर्थांचे चरित्र जर महाराष्ट्राच्या इतिहासातून वगळले तर ते बेचव होईल. परंतु ज्या अंजनीच्या पोटी यांचा जन्म झाला, तिची एक आशा होती ती त्रेतायुगांत पूर्ण करणे शक्य नव्हतेच. द्वापारयुगातही नव्हते. कलियुगामध्ये धर्माची आखणी करावयाची होती. म्हणून शक्य नव्हते. तेव्हा तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी यांनी कोटणीसांचे कुळात जन्म घेतला.

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी.' यांचे पूर्वज अतिशय शुद्ध होते. ज्या कुळात परंपरागत रामोपासना चालली होती, अशा स्थळी यांचा जन्म झाला. यांचे नाव हनुमंतच होते. यांचे वडिलांचे नांव पांडुरंग व मातोश्रींचे रखुमा आहे. यांच्या पोटी कार्तिक शुद्ध आठ शके १७७६ सोमवार रोजी जन्म झाला. यांचा बांधा उंच गोरापान आणि ठेवण गोंडस होती. या ठिकाणीही त्यांना प्रभु श्रीरामचंद्राचाच अनुग्रह झाला. खरोखर त्यांची निष्ठा गुरुपदी होती यात शंका नाही व याठिकाणीच रामायणाचा कळस म्हणजे इमारतीचा कळस झाला असे म्हणावयास हरकत नाही. यापुढे अशा तऱ्हेच्या इतक्या बिकट परिस्थितीत अशा तऱ्हेचा सोज्ज्वळ सत्पुरुष निर्माण होणे जवळजवळ अशक्यच आहे. याठिकाणी यांनी इमारतीचा कळस केला. परमेश्वराचे गुणानुवाद गाईले, लोकांना सांगितले व परमार्थाचा सोज्ज्वळ मार्ग आखून दिला. रामायणातून हनुमंताचे, महाराष्ट्राच्या इतिहासातून समर्थांचे चरित्र गाळल्यास ते नीरस लागेल त्याप्रमाणे या महात्म्यांचे चरित्र गाळल्यास ते नीरस लागेल, त्याप्रमाणे या महात्म्यांचे चरित्र खरोखर सांगली ग्रामच्या इतिहासातून काढल्यास ते बेचव लागेल. धर्मावरती अनेक तऱ्हेचे लढे चालले असताना यांनी निशाण रोविले. याला आणखी एक दाखला असा आहे की, त्यांनी पाच पन्नास जी



पदे केली आहेत, त्याच्या खाली 'दास' असे म्हटले आहे. पण एका पदाखाली 'अंजनीसुत' असे म्हटले आहे. तेव्हा खरोखर या हिंदुभूमीचे बलवत्तर भाग्य आहे. म्हणून अगदी जगाच्या आरंभापासून तो तहत् आधुनिक कालापर्यंत तिच्या इच्छेप्रमाणे अशा तऱ्हेचे सत्पुरुष निर्माण होत आहेत. हे खरोखर आमच्या सांगली ग्रामचे भाग्य म्हणून अशा तऱ्हेचे लोक, विजयी पुरुष निर्माण झाले. ज्यांच्या योगाने हे एक प्रकारचे क्षेत्रच होऊन बसले आहे, की हजारो लोक त्यांच्या पायावर लोळण घेण्याकरिता लांबलांबून येत आहेत. खरोखर नारळ ज्याप्रमाणे वरून दिसावयास अतिशय कठिण व तो फुटता फुटत नाही असा असतो. पण आत गोड पाणी व गोड असे खोबरे असते. फणसाला वरून काटे असतात. पण आत रसभरीत गोड गरे असतात.

काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ।

म्हणजे केवड्याच्या झाडाला जरी काटे असले तरी त्यामध्ये ज्याप्रमाणे सुवासिक असा केवडा निर्माण होतो, गुलाबाच्या झाडाला काटे असूनसुद्धा ज्यामध्ये नाजुक सुवासिक फूल निर्माण होते, त्याप्रमाणे या जनतेचे भाग्यच की काय कोण जाणे अशा या दुर्धर प्रसंगीसुद्धा असे सत्पुरुष निर्माण होतात. खरोखरच तेच संत धन्य होत व तीच जनता धन्य होय की काही तरी जगामध्ये येऊन महत्त्वाची कामगिरी ज्यांनी केलेली असते तेच संत धन्य होत. यांच्या सहवासात राहून त्यांच्याकडून काहीतरी उपयोग करून घेणे, त्यांच्या प्रकाशाबरोबर आपणही मार्ग आक्रमण करणे अशा तऱ्हेने जी जनता वागलेली असते ती जनता धन्य होय. अशा सत्पुरुषाला ज्यांनी या डोळ्यांनी पाहून आपल्या जन्माचे सार्थक करून घेतले असेल, ज्यांनी त्यांची रसाळ कीर्तने ऐकली असतील की, कशी तर

कीर्तन चांग कीर्तन चांग होय अंग हरिरूप ।।१।।
प्रेम छंदे नाचे डोले हरपला देहभाव ।।२।।

असा ज्यांचा अधिकार, अशी ज्यांनी त्यांची कीर्तने श्रवण केली असतील व त्यांच्या सहवासात जे कोणी राहिले असतील ते खरोखर धन्य होत यात

तिळमात्र शंका नाही. त्यांना मी शरणागत आहे.

त्यांचे लहानपणी त्यांचे घरची स्थिती पाहिली तर अत्यंत गरिबीची असून कर्जबोजा होता. पण तात्यासाहेबांचे सर्वच काही निराळे असल्यामुळे त्यांनी कसला तो हट्ट केला नाही. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात ते काही खोटे नाही. त्यांचे लक्ष लहानपणापासून देवधर्माकडे होते. त्यांचे वडील लहानपणीच वारल्यामुळे त्यांचे कनिष्ठ चुलते वामनराव यांनी त्यांचे चांगल्याप्रकारे संगोपन केले व आपली जबाबदारी पार पाडली. घरची स्थिती बिकट असूनसुद्धा त्यांनी पुष्कळ हाल सोसूनही आपला मार्ग काढला व हायकोर्ट प्लीडरची परीक्षा देऊन केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी अलोट धन मिळविले व त्याचा सत्कारणी विनियोग केला, कर्ज वगैरे फेडले. अशा तऱ्हेने परमार्थमार्गाला धनाची व विद्वत्तेची जोड दिली. यामुळे 'आधीच सोन्याचे । वरी जडावाचे ।।' अशी स्थिती झाली. व अशा त्यांच्या उत्तीर्णावस्थेत 'नित्य सण सात आम्हा सदा दिवाळी' या तुकारामांचे म्हणण्याप्रमाणे बहार उडून गेली होती. त्यांचे पंगतीला रोज सकाळ संध्याकाळ ५०-६० माणूस होते. त्यांनी आपल्या मुलाबाळांकरिता रामनामाच्या इस्टेटीखेरीज दुसरे काही ठेवले नाही. त्यांनी आपल्या गुरुस्थानी अलोट संपत्ती दिली. चिमड ग्रामी एक धर्मशाळा बांधली. (त्या काळाला अनुसरून त्यांचे लग्न १७ व्या वर्षी झाले.) त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई असून त्यांना आठ मुले झाली व तीही चांगलीच जहाली. गुरुकृपेने त्यांनी हा संसार यथासांग पार पाडून देव आपलासा केला. त्यांची वृत्ती सदैव साधनातच निमग्न होती. हे रामभाऊमहाराजांचे शिष्य होत.

महाराजांचा अष्टपैलूपणा होता. जो ज्या दृष्टीने त्यांना पाहील त्याप्रमाणे ते त्यांना दिसत. यांची वृत्ती तुकारामांनी सांगितल्याप्रमाणे होती. म्हणूनच त्यांचा परमेश्वर अंकित झाला. 'जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन। भगवंत जाण तया जवळी.' याप्रमाणे शुद्ध गंगाजलाप्रमाणे त्यांचे मन शुद्ध असे. यांची रहाणी घरची श्रीमंती असून साधी व वर्तन सरळपणाचे असे. एकादा संसारी



माणूस त्यांचेकडे गेला म्हणजे त्याला ते संसारीच दिसत. कारण

परमार्थीच्या बागी संसार कुंपण । देवाची राखण करीताती ।।

ते आपल्या कामात अगदीच चूर असत. परंतु त्यांची वृत्ती उल्हसित असे व पुन्हा ते सदा मोकळेच असत. तेव्हा संसारी माणूस आला म्हणजे तो म्हणे की काय हो हे परमार्थी? परमार्थी माणूस त्यांना भेटावयास आला असता त्याला ते परमार्थागत दिसत. कारण त्यांची वृत्ती नेहमी परमेश्वराच्या ठिकाणी असून त्यांची वागणूक निःस्पृहपणाची असे व गुरुपदाच्या ठिकाणी अत्यंत निष्ठा असून तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे ते वैभवशाली होते. व त्यांनी भक्तीचा जिव्हाळा जाणलेला होता.

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ।।

म्हणून त्यास ते परमार्थी दिसत. कोणी एकादा विद्वान गृहस्थ त्यांच्याकडे आला असता त्यास ते विद्वान दिसत. त्यांची स्मरणशक्ती अचाट होती. ते एकपाठी होते. कोणतीही गोष्ट एकदा नजरेखालून गेली की ते पुन्हा विसरत नसत. अशी त्यांची ख्याती होती. कोणी कर्मठ आला असता त्यास ते कर्मठाप्रमाणे दिसत. थोरात थोर लहानात लहान असे असत. जो ज्या भावनेने त्यांच्याकडे जाई त्यांना ते तसे दिसत. कारण त्यांची वागणूकच अष्टपैलूपणाची होती. आरशात ज्याप्रमाणे बघावे तसे दिसणार. साहेबाचा पोशाख करून उभे राहिले की साहेबाचे चित्र दिसते. पूर्वजांच्यागत एकादा पोशाख करून उभे राहिल्यास त्यासारखेच दिसते. एकाद्या बावळटागत उभे राहिल्यास त्यासारखे चित्र दिसते. परंतु मूळ आरसा कसा तर शुद्ध. तुम्ही ज्या तऱ्हेने त्यांच्याकडे बघाल तसे ते तुम्हास दिसते. पण मूळची त्यांची मनोवृत्ती कशी शुद्ध गंगोदकागत. 'पाणी तेरा रंग कैसा । जिसमे मिलावे वैसा ।।' पाण्याला विचारले की तुझा रंग काय? ते म्हणते, 'मी मुळात शुद्ध आहे. मी रंगहीन असून पारदर्शक आहे. आता ज्या रंगात तुम्ही मला मिसळाल त्या रंगाचा मी आहे. तांबड्यात मिसळले तांबडे, पिवळ्यात मिसळल्यास पिवळे, वा हिरव्यात मिसळल्यास तर हिरवे.' त्याप्रमाणे हे अष्टपैलू होते. ज्या दृष्टीने बघावे त्या दृष्टीने

त्या तऱ्हेचे ते दिसत. त्यांचे प्रेम मुलांच्यावर विशेष असे. परंतु ही गोष्टसुद्धा मोठ्या भाग्याची असल्याने ती सर्वांनाच लाभते असे नाही.

'साधु समागम दुर्लभ भाई ।'

तुकाराम म्हणतात

नलगे मुक्ती धनसंपदा । संतसंग देई सदा ।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।

तुकाराममहाराज असे म्हणतात की, 'देवा आम्हाला धन, मुक्ती नको पण संतांचा संग तेवढा दे. हा फुकट जाणार नाही. आम्हास एकवेळ पुनर्जन्म दे. पण संतसंग अवश्य दे.' त्यांचा बाणेदारपणा तर विलक्षणच होता. पाहण्याजुकता होता. अमुक वेळी अमुक एक गोष्ट झाली पाहिजे तर ती त्या वेळेस झालीच पाहिजे.

त्यांची गुरुपदाच्या ठिकाणी अढळ निष्ठा होती. त्यांना अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक त्रास होत होते. तथापि त्यांनी गुरुपदाची निष्ठा सोडली नाही. खरोखर आम्हाला जर नुसते पडसे झाले व किंचित् अंग मुडखळून आले तर आम्ही अंथरूण पसरतो. परंतु त्यांची वृत्ती इतके अनंत रोग असतानासुद्धा जनकराजाप्रमाणे अढळ होती. कोणत्याही स्थितीत त्यांनी आपले कीर्तन सोडले नाही. समाजात एकादा सत्पुरुष निर्माण झाला की, त्याचे हाल व्हायचेच हे ठरलेले आहे. लढाईस जाणाऱ्या माणसाने ज्याप्रमाणे मेलो म्हणूनच जावयाचे त्याप्रमाणे येथे आहे. तुकाराम म्हणतात,

रात्रंदिस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर बाह्य जग आणि मन ।।१।।

अशा तऱ्हेने या सत्पुरुषाला दोन्हीकडून टक्कर द्यावी लागे. बाहेर जगाशी व आत मनाशी झगडा करीत असता आपली चित्तवृत्ती शांत ठेवणे व इकडे व्याधींना टक्कर देणे हे काम हलक्या सत्पुरुषाचे आहे काय? त्यांनी लोकांसाठी काहीच केले नाही व लोकांची वाट त्यांनी कधीच पाहिली नाही. त्यांना जर कोणी विचारले की, 'हणमंतराव तुम्ही हे काय आरंभिले आहे?' तर त्यांना ते स्पष्ट सांगत की, 'हे बघा, मी काही कोणास बोलवत नाही की, बुवा तुम्ही आमच्या घरी कीर्तनास या असे नाही. वर मी माझी वकिली करून त्यावर



माझा चरितार्थ चालवितो. मी माझ्या घरात कीर्तन करतो व ते माझ्या स्वतःकरता करतो. दुसऱ्याकरता नव्हे. मला जे काही गुरूने सांगितले त्यावर माझा विश्वास असल्याकारणाने ते मी करतो व माझ्या समाधानाकरिता कीर्तन करतो. बरे जर कोणी आपल्या समाधानाकरीता कीर्तन ऐकावयास आले तर त्यास मी जा म्हणत नाही.' ज्या ज्या माणसाने त्यांना असा प्रश्न केला तो तो माणूस या भाषणाने खजिल झाला.

त्यांचा खरा परमार्थ म्हणजे एक सद्गुरूंच्या पादुका हा होय. त्यांनी संसार कसा करावा हे जगास दाखविले व परमार्थाचा योग्य रीतीने धडा घालून दिला की सर्व परमार्थ या तेरा अक्षरात साठविला आहे असे ते म्हणत. त्यांनी या जन्मामध्ये येऊन खरे सार्थक केले. संसारी असावा तर असा असावा, परमार्थी असावा तर असा असावा व संत असावा तर असाच असावा. त्यांनी जगामध्ये पुष्कळ प्रकारची क्रांती केली. याला मुख्यतः त्यांची वागणूक, विद्वत्ता, शुद्ध आचरण, लीनता व त्यांची समवृत्तीच कारण झाली असे म्हटले पाहिजे. कोणतीही जगामध्ये क्रांती घडवून आणण्यास ज्या विषयी आपण या जगामध्ये क्रांती करावयाची तो विषय अंगी बाणावा लागतो व विद्वत्ताही लागते. कारण 'विद्वान सर्वत्र पूज्यते।' हे होय. व त्यांचा तुकारामांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा बाणा असे. तो म्हणजे 'अधिकार तैसा करू उपदेश ।' स्वतःमध्ये ती गोष्ट बाणल्याखेरीज ते बोलत नसत. स्टेजवर उभे राहून चहा पिऊ नका असे सांगून व्याख्यान संपल्यावर चहा पिण्याचा त्यांचा बाणा नसे. त्यांनी सत्याची कास धरली होती. वकिली हा धंदा खोटेपणाचा असूनसुद्धा त्यांनी खरेपणानेसुद्धा वकिली करता येते हे दाखविले. त्यांचे जेवढे वर्णन करावे तेवढे ते अपुरेच होणार आहे. 'आधी केले आणि मग सांगितले' अशा तऱ्हेचा त्यांचा बाणेदारपणा होता. साधनाचे तेज अंगी उतरले होते. प्रत्यक्ष कृती करून या पद्धतीचे साधन समाधान प्राप्त होते की नाही हे त्यांनी पाहिले व मग जगाला सांगितले. ते म्हणतात की, 'उदाराचे काम नाही सांगतो मी ठोक रे'. मी उदारीचे सांगत नाही; याचा रोख ठोक अनुभव घ्यावा. प्रत्यय

आल्यास होय म्हणावे. त्यांनी जगाच्या कल्याणासाठी आपले प्राण खर्ची घातले.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।।'

अशा तऱ्हेने ज्यांनी लोकांना नामामृत पाजिले, लोकांच्या मनामध्ये दैविक भावना जागृत केल्या, लोकांत धर्माचे प्रतिबिंब उमटविले व या परमेश्वराच्या नामस्मरणाने मानवाचा उद्धार कसा होतो हे प्रत्यक्ष दाखविले. त्यांनी

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोची साधु वोळखावा । देव तेथेची जाणावा ।

तुकारामांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे वर्णन होते. ते प्राणिमात्रांवर दया करीत होते. 'भूतावरील दया भांडवल संता' याप्रमाणे प्राणिमात्रांवर दया करणे हेच त्यांचे भांडवल होते. तेव्हा त्यांनी हजारो लोकांना हा ज्ञानमार्ग दाखवून हे साधन केले असता परमेश्वराचे दर्शन होते असे सांगितले. चिमड संप्रदायाचा प्रसार जर कोणी केला असेल तर तो यांनीच केला आहे, हे विसरता कामा नये. यांनी आपल्या नामसंकीर्तनांनी सबंध ग्राम दुमदुमून सोडले. त्यांनी छत्तीस वर्षे कीर्तन केले व लोकांच्या मनात त्या गोष्टी इतक्या बिंबवल्या की, सांगली गावातील पाच वर्षाचे मूल जे ब्रह्मज्ञान अगर जे तत्त्वज्ञान बोलते ते दुसरा पन्नास वर्षाचा बी.ए.एम.ए. शिकलेला पुरुषसुद्धा बोलू शकत नाही. अशा तऱ्हेने सर्व ठिकाणी चिमड संप्रदायाचे वैशिष्ट्य दाखवून त्याचा प्रसार केला. व धर्माची तत्त्वे पटवून दिली. व अशा तऱ्हेने त्यांनी पुष्कळ तऱ्हेने आपल्या शुद्ध आचरणाने, आपल्या विद्वतेने व साधनाच्या जोरावर त्यांनी पुष्कळच कार्य केले. त्यांच्या मनात आणखीसुद्धा प्रसार करावयाचा होता. त्यांनी या कीर्तनाचा दौरा काढावयाचा ठरवला होता. परंतु कोणत्याही गोष्टीचे असेच आहे की ती गोष्ट कळसास गेली की तिचा अंत होतो. त्याप्रमाणे हे अल्पायुषी होते व हे या जनतेस जास्ती दिवस लाभावयाचे नव्हते. सबब पुढे त्यांना हे कार्य करता आले नाही. तथापि हे निश्चित आहे की, ते जर आणखी थोडे दिवस जगले असते तर सबंध महाराष्ट्र हालवून पाडला असता, असे यांच्या अंगी सामर्थ्य



होते. पुढे हे फार दिवस जनतेस लाभले नाहीत. तेव्हा त्यांनी ३६ वर्षे अखंड कीर्तन केले व त्यांनी अनेक तऱ्हेचे चमत्कार दाखविले. तेव्हा अशा तऱ्हेने जितके त्यांच्याबद्दल वर्णन करावे तितके थोडेच होणार आहे. व त्यांच्या बद्दल वर्णन करण्यास प्रत्यक्ष शेषसुद्धा अपुरा होता, तेथे हा मी क्षुद्रपामर कोठवर वर्णू !

त्यांनी लोकांना लोकांची मने परमेश्वराकडे वळावीत एवढ्याकरिता अनेक चमत्कार दाखविले. त्यांचे अंगात अशा तऱ्हेचे विलक्षण सामर्थ्य होते की त्यांच्यापुढे एकादा अगदी कट्टर नास्तिक जरी आला व तो जर त्यांच्याशी वादविवाद करू लागला तर ते त्यास मोठ्या मार्मिक रीतीने पटवून देत व अशा रीतीने ती गोष्ट त्यास पटली म्हणजे तो अगदी खजिल होई. व अशा ज्याच्या मनात दैविक भावना जागृत झाल्या नसतील त्याच्या मनात दैविक भावना जागृत करीत. त्यांच्या उलट बाजूचे त्यांचे कट्टर शत्रूसुद्धा त्यांच्या एका शांत वृत्तीमुळे शरण आले. खरोखर याबाबतीत त्या महात्म्याला किती त्रास झाला असेल, त्यांचा लोकांनी किती छळ केला असेल याची कल्पना करवत नाही व सत्कार्यात ठरल्याप्रमाणे त्रास, विघ्ने असावयाचीच. सत्कार्य आणि निर्विघ्न असे कधी घडावयाचे नाही, कीर्तनास लोक येतात हे काही दुष्ट लोकांना बघवले नाही. त्यांनी कीर्तनास मंडळी येऊ नयेत म्हणून काही लोकांनी त्या वाटेवर काटे पसरले व 'कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही,' या न्यायाने लोक यावयाचे. थोडेच कमी होणार ते चढच येऊ लागले. इतका अनेक तऱ्हेनी त्या दुष्टांनी त्या महात्म्याचा छळ केला असता त्यांनी आपली वृत्ती, शांत वृत्ती सोडली नाही. ते म्हणत की 'जर कोणी आपल्या दारात काटे पेरले तर आपण त्यांच्या दारात फुले पेरावीत.' आणि अनेक प्रकारे छळ केला. त्यांनी पुष्कळ चमत्कार दाखविले आहेत पण या लेखात आम्ही स्वानुभव चमत्कारच दिले आहेत. दुःखाची गोष्ट. तेव्हा ते या जनतेला फार दिवस लाभावयाचे नव्हते इतकेच. त्यांचे चरित्र व एकनाथांचे चरित्र यात यत्किंचितही ते चरित्र अवलोकन केल्यास अंतर नाही असे दिसते. फार काय सांगावे? प्रा.

दांडेकर म्हणतात, की हे प्रत्यक्ष एकनाथांचे अवतारच होते. जगामध्ये पाहिले तर असे दिसते की कोणतीही चांगली गोष्ट फार दिवस टिकत नाही. काहीही म्हणा आमचे दुर्दैव त्यांना पहाण्याचे सुद्धा आमचे सुकृत नव्हते. इतके आम्ही पुण्यवान, इतके आम्ही सज्जन! 'दास तुमचा वाट पाहतो । बोलता नये कंठ दाटतो ।' अशा या समर्थांच्या म्हणण्याप्रमाणे या गोष्टी बोलाव्यात तर कंठ भरून येतो आहे. या लिहाव्यात तर ते लिहिणे सुद्धा होत नाही. तेव्हा त्यांनी अशा तऱ्हेचे एक प्रचंड कार्य करून आम्हा लेकरांना, आम्हा अनाथ अशा या दुबळ्यांना सोडून जाण्याचा निष्ठूर विचार स्वारींच्या मनात आला. ते आम्हावर निष्ठूर झाले. त्यांनी आता इहलोक सोडण्याचा विचार केला आणि त्यांनी आपल्या वयाच्या सुमारे ६५ व्या वर्षी पौष वद्य षष्ठी इहलोक सोडण्याचे ठरविले. त्यांनी ती.रा.रा.नानबांच्या जवळ सकाळी त्याच दिवशी आम्ही संध्याकाळी जाणार असे सूचित केले व कीर्तनातही पाच सहा वेळा सूचित केले. त्यावेळी त्यांनी 'ब्रह्मपुरी आम्ही जातो रे कोण येतो का रे?' हा अभंग म्हटला व त्या दिवशी संध्याकाळी पाचच्या सुमारास सद्गुरुचरणाची आरती करून परमेश्वराचे नामस्मरण करता करता देह ठेवला. तेव्हा त्या वेळेला लोकांना काय दुःख झाले असेल त्याचे वर्णन काही करता येत नाही. त्या वेळेस किती लोकांनी हंबरडा फोडला 'गेला गेला आमचा वाली गेला. हिरा हरपला. आता आम्हाला या जगात कोण विचारणार?' असे त्या लोकांचे उद्गार आहेत. असो. या दुःखाचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. पण त्यांना छळलेले लोक त्यावेळेस जरी त्यांनी छळले तरी आता ते त्यांच्या पायावर लोटांगण घेत आहेत. हे सांगण्यास आम्हास मोठा अभिमान वाटतो. ज्या ज्या लोकांचा त्यांच्याशी संबंध आला ते ते लोक अजून डोळ्यांतून पाणी काढतात, हंबरडा फोडतात. आणि तसे वाटण्याजुकतेच त्यांचे चरित्र आहे. ज्याप्रमाणे शिवाजीने स्वराज्याचे तोरण लावले त्याप्रमाणे या महाराजांनी धर्माचे कार्य केले व धर्माचे तोरण लावले. ही गोष्ट ध्यानात घेण्याजुकती आहे. अशा तऱ्हेने हजारो लोकांचा ज्यांनी उद्धार केला व आपण परमेश्वराच्या स्वरूपात मिळाले



ते खरोखर धन्य होत. आता त्यांच्याप्रमाणेच त्यांचे मागे चि.ह.भ.प.बाबूरावजी कोटणीस त्यांच्या बरहुकूम आपले कार्य चालवीत आहेत. सद्गुरु हणमंतरावजींच्या चरित्राची कल्पना आज कोणाही अपरिचिताला आल्यावाचून रहाणार नाही. खरोखर तेच धन्य होत की ज्यानी आपले नाव आज जगामध्ये अजरामर करून ठेविले आहे. त्यांनी समर्थांचे म्हणणे खरे केले की 'मरावे परी कीर्ती रूपे उरावे'. जरी ते गेले तरी ते गेले नाहीत. ते या जगात कीर्ती मंदिराच्या शिखरावर अढळच आहेत. ते कीर्तिरूपाने आहेत. ते सूर्य, चंद्र या पृथ्वीवर असेपर्यंत त्यांची कीर्ती अढळ राहील. जे 'न भूतो न भविष्यति' असे दिग्विजयी विख्यात झाले, व जे या महाराष्ट्रात झळकत राहिले ते धर्मवीर पुरुष धन्य होत. संत असावे तर असे असावेत, परमार्थी असावे तर असे असावेत, संसारी असावे तर असे असावेत. प्रत्येक गोष्ट त्यांची कित्ता गिरवण्याजुकतीच आहे. अशा त्या धन्य सद्गुरूला माझा नमस्कार असो! त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ज्याप्रमाणे मनुष्य जन्मामध्ये काहीही केले तरी मातेचे ऋण फिटत नाही. त्याप्रमाणे सद्गुरूंचे ऋण फिटणे शक्य नाही. त्यांचे आपल्यावर अत्यंत उपकार असतात. ते जे काही सांगतात ते आपल्या हिताकरता, मोठ्या कळकळीने सांगत असतात, हे आपण विसरता कामा नये. समर्थ म्हणतात, 'परी तो सद्गुरू वेगळाची ।' शाळेतील पोटाचे गुरू एका जन्माची व्यवस्था करतात पण हे सद्गुरू चौऱ्याऐंशी लक्ष योनीची तरतूद करतात. असा यांचा अधिकार. असे ते उदार असतात. त्यांचा मी कसा उतराई होऊ!

***

(३)
(क)

## भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस

### (श्रीहनुमान् समाधिमंदिरात प्रतिवर्षी वाचनात येणारे)

भगवान श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांची पदे व श्लोक हे काव्य स्वानुभवाचे असल्याने त्यातच त्यांचे खरे अंतश्चरित्र आहे. ते खरे त्यांचे स्वरूप आहे. यावरूनच त्यांची खरी ओळख करून घेणे व त्यांचे कृपेस पात्र होऊन कृतार्थ होणे हे अगत्याचे आहे. त्यांची कृपा असली तरी त्या कृपेला त्यांचे कृपेनेच आपण पात्र होणेत काही औचित्य आहे.

श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणजे ते चालते बोलते ब्रह्म आहे. त्यांचा जन्म हाच मुळी ब्रह्मजन्म आहे. आणि तोही त्यांचे सद्‌गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज चिमड यांचे वचनाने झाला आहे. श्रीरामचंद्र व श्रीहनुमंत ही अनादि कालची गुरुशिष्यांची अद्वितीय अशी जोडी आहे. ते श्रीतात्यासाहेबांचे एका पद्यावरूनच स्पष्ट होत आहे. श्रीतात्यासाहेबांचे चुलते श्रीवामनकाका हेही श्रीचिमडचे महाराज यांचे मोठे अधिकारी शिष्य होते. त्यांचा व श्रीतात्यासाहेबांचा जो पारमार्थिक पत्र व्यवहार झाला आहे, त्यापैकी एका पत्रात त्यांना आमचे श्रीतात्यासाहेब म्हणतात 'ऐशा बळीवंताचे पायी पै नमन । अंजनी नंदन करीतसे.' जिच्या दृष्टीत गुरुकृपेचे अंजन पंडले आहे अशी ती अंजनी, तिच्या पोटी ज्या श्रीमारुतिरायांचा अवतार परमात्म्याचे इच्छेने झाला तेच आपण ही खूण श्रीतात्यासाहेबांनी येथे 'अंजनीनंदन' या मुद्रिकेने दिली आहे. तेथेही गुरू श्रीरामचंद्रच होते. आणि मौज ही प्रत्येक अवतारात हीच जोडी कायम आहे. मायेचे जठरी जन्माला येऊन जे मायेवेगळेच रहातात, जन्माला येणेपुरताच त्या मायेचा संबंध नंतर ते वेगळेच आहेत, मायेत सापडणारे नव्हेत. जे कोणी



सापडले असतील त्यांना मुक्त करणार. त्याकरता नाना युक्त्या प्रयुक्त्या करणार. वेळप्रसंगी आपणही त्यांत सापडलो आहोत हे दाखविणार पण तेही त्यातून पुनः मुक्त कसे व्हावे हेच आम्हा सामान्य जीवांना स्पष्ट करून दाखविण्याकरता हे ध्यानात ठेवले पाहिजे. ही देखील शिष्टाई म्हणजे वकिली आहे. आणि श्रीतात्यासाहेब तर जन्मापासून देव वकीलच आहेत. म्हणून ते एका पदात म्हणतात,

आत्मस्वरूपा विसरुनिया मी भवचक्री फिरलो ।
काय सुकृत होते नकळे शरण पदी आलो ।।१।।

'आत्मस्वरूपा विसरुनिया मी' असे ज्यांनी म्हटले आहे ते खरेच विसरले होते का असा प्रश्न आहे. विसरला तो विसरलाच. तेथे स्वरूपाला आपण विसरलो हे आत येईलच कसे आणि हे आले तर ते विसरले कसे. केवळ आमच्यासारख्या पक्षकारांचेकरता त्यांनी ही शिष्टाई केली आहे. भवचक्रात जे फिरले ते फिरतच रहातात पण हे नुसते भवचक्रात फिरले नाहीत. ते भवचक्रातून जे फिरले ते पूर्व सुकृताने सद्‌गुरूपाशी शरण आले. गुरुपदी शरण येणे करताच हे भवचक्र असेल तर असेना, बिघडले कोठे?

वकील असून गोरा कुंभारांचे काम करणारे आमचे तात्यासाहेब सगुण साकार ब्रह्म होते. आणि अजुनी ते एका विशिष्ट रूपाने तेच काम करीत आहेत. सर्व विश्वाचा कारभार ते चालवीत आहेत. श्रीतात्यासाहेब म्हणतात, 'गुरुनाम स्कंधी वाहूनी पाही । हनुमंत मातीत नाचतो बाई ।।' गुरुनामाची धारणा ठेवून जे माती तुडवत होते असे आमचे तात्यासाहेब यांची कृपादृष्टी लाभल्याशिवाय आत्मसुख, आत्मविश्वास, आत्मसाक्षात्कार, आत्मज्ञान व्हावे कसे?

मग असा ज्यांचा ब्रह्म अवतार झाला त्या जन्माचा सोहळा कसा असेल आपण कल्पना करू या. माती तुडवत गुरुनामाचे धारणेत नाचताना अनुहत घोष सुरू झाला. दया, क्षमा, शांती हे गुण तेथे आविर्भूत झाले. बहु भाग्याचे हे बालक आपण आपल्यालाच पहात राहिले. सोहं भाव हा त्यांचा सहज धर्म. आजही त्या रूपाने ते जगात वावरतच आहेत. फक्त ते शरीर

आपणाला आता दिसणार नाही इतकेच. तेच निरालंबीच्या पालखात जे निजत्वास आले आणि तेथे ऐक्य व्हावे म्हणून ज्या दया, क्षमा, शांतींनी तेथे जयघोष केला.

असे तात्यासाहेब ज्यांचा जन्म मुळी असा त्यांचे कर्म कसे असेल? ब्रह्मजन्म ज्यांचा झाला त्यांनी सर्वांना एकच सवाल टाकला. 'सांगा तुम्ही ब्राह्मण देव कोणे ठायी । देव ठावा नसता ब्राह्मणपण नाही ।।' हे ब्राह्मण हो, हे संन्यासी हो, जंगम हो, सांगा ना देव कोणे ठायी आहे. आणि हे जर ठाऊक नसेल तर ब्राह्मणपणा, संन्यासीपणा, जंगमपणा कोठे आहे? कोणस्थानात ते देवाचा शोध घेत होते. तेथेच ब्रह्मरूप सद्गुरूंचे त्यांना दर्शन झाले. ते भगवान् विष्णूचे अवतार श्रीरामचंद्र हसतमुख त्यांचे पुढे आविर्भूत झाले. आणि या वायुरूप श्रीहनुमंतांचे कर्णी त्या हंसावर आरूढ झालेल्या प्रभूंनी नाममंत्राचा फुंकर घातला. आणि वाऱ्यात वारे जो मिसळले त्यातून अनिर्वचनीय शब्द उमटू लागले. आणि ते हरिकीर्तन जन्मभर निनादत राहिले. श्रोत्यांचे कान आणि डोळे तृप्त झाले की ज्यांचेकडे आणि इतरे जनांनी पाहून त्यांचे कान डोळे याच नादाने थंड झाले. ज्या तात्यासाहेबांनी आयुष्याचे साधन आयुष्यभर केले आणि साधन म्हणजेच ते आणि ते म्हणजेच साधन असे झाले. यामुळे जे तीर्थरूप झाले आणि ज्यांचे चरणापाशी ही तीर्थे प्रत्यक्ष आली, ज्यांनी आत्मानुभवाच्या मौजा भोगल्या आणि इतरांकडून भोगविल्या त्यांचे वर्णन कोणी आणि कोठवर करावे?

रामकृपेशिवाय हनुमंता या नाही दुजा शोक ।
कहाणी ऐकता नाही तुला मग जन्म मरण भाक ।।

अशी ज्यांची अवस्था झाली. रामकृपेशिवाय ज्यांना दुसरी काही इच्छाच नव्हती. रामाचे नुसते नाव घेतले तर भूत जीव घेऊन पळाले मग ही कहाणी ऐकल्यावर जन्म आणि मरण स्मृतिपटलावर तरी राहतील काय? या दृष्टीने आमचे तात्यासाहेब दशदिशा अवलोकू लागले. जन्मजात ज्ञानी ते. पूर्वीचा काही मोठा अभ्यास होता त्यांचा. सहज खूण गवसली आणि मोठा चमत्कार झाला. त्यांचे हृदयातच श्रीरामचंद्राचा अवतार झाला आणि आपण



कोठे आहोत हे बरोबर दाखवून दिले.

श्रीतात्यासाहेब म्हणतात,

अवलोकिता दाही दिशा । पडला रामरूपी ठसा ।
गती खुंटली श्वासोच्छ्वासी । माजी राम कोंदाटला ।
दासाचा हा कैवारी आला ।।१।।
श्रीराम अवतरला । जिकडे तिकडे दृष्टीत भरला ।।ध्रु।।

सहज श्वासोच्छ्वासाची गती कुंठित झाली व त्यात कोंदाटून राहिलेला आत्माराम धावून आला. तोच ठसा दशदिशेला उमटला. अनुग्रहाची आतुरता निर्माण झाली. तेच स्वरूप साकार होऊन चिमडात वावरत होते. जे आत पाहिले तेच येथे आहे ही खात्री झाली आणि महाराजांची मनोभावाने श्रीतात्यासाहेबांनी प्रार्थना केली तोच अनुग्रह झाला. अधर्म शिगेला गेलेला पाहून धर्मस्थापना करावी असा विचार महाराजांचे मनात घोळत होता. तेही या कामी योग्य अशा आपल्या सत् शिष्याची वाट पहात होते. तोच हा प्रसंग निर्माण झाला. श्रीतात्यासाहेब तेथे दाखल झाले आणि म्हणाले

स्वयंभसदना सुहास्य वदना प्रगटलासी रामा ।
भवतारक तव पवित्र चरणी देई नित्य प्रेमा ।।ध्रु।।
वाट धर्माची मोडली साची सीग अधर्मा चढला ।
धर्मस्थापना करावयाचा विचार मनी ठरला ।।१।।
आत्मस्वरूपा विसरूनिया मी भवचक्री फिरलो ।
काय सुकृत होते न कळे शरण पदी आलो ।।२।।

येवढे म्हणताच महाराजांनी डोळे उघडले व दृष्टीला दृष्टी दिली, पूर्ण कृपेने वायुरूप श्रीहनुमंतांचे ठिकाणी हंसावर आरूढ झालेल्या प्रभूंनी नाममंत्राचा फुंकर घातला आणि जिकडे तिकडे निर्गुण साक्षात्कार दाखविला. काय सामर्थ्य असेल त्यांचे? पाण्यात पाणी मिसळायला वेळ किती? त्याला बारा न बारा चोवीस वर्षे हवीत कशाला? आपण ज्याला साधन म्हणतो ती एक धारणा किंवा जबाबदारी असती. ती पुढे अखंड रहाणे हेच साधन. पण ते

साध्याला धरून असते. येवढेच त्यात साधावयाचे असते नाही का? मग ती काय तपश्चर्या आहे का तो आनंद आहे हे ज्याचे त्याने ठरवावे. श्रीतात्यासाहेब म्हणतात

महाविष्णु तू एकनाथ तू स्वामी गुरुनाथा ।
दास प्रभूचा रामकृपेचा वंदीत पद माथा ।।१।।

हे साध्य अखंड साधणेकरता जी अवस्था लागते ती अवस्थाच महाराजांनी श्रीतात्यासाहेबांना लावून दिल्याने गाडी चालू झाली.तो यांचा प्रवास सुरू झाला. प्रवास करण्याचे श्रम पडले नाहीत. यामुळे ते जे साधन सुरू झाले ते शेवटच्या क्षणापर्यंत चालूच होते. हे जो कोणी श्रीतात्यासाहेबांचे साधनातील वर्म ओळखण्याची तसदी घेईल त्यास दिसून येईल.

श्रीतात्यासाहेब म्हणतात, 'हंसावर राम बसून पुढे चालले आहेत. हंसाच्या दोन गती आहेत. त्यामुळे तो खाली आणि वर उड्डाण करीत आहे. एक गती खाली आली की दुसरी वर जाते व एक वर आली की दुसरी खाली येते. प्राणी झोपला तरी त्याची जी निजावस्था आहे ही कायमच असते. ज्यावर जागृती,स्वप्न ,सुषुप्ती या अवस्था येतात व जातात अशी स्थिती आहे, तेथे डोळे झाकून पाहिले तर स्वरूप साक्षात्कार होतो. हा लाभ आपले वडीलच जे सद्‌गुरू किंवा जे सद्‌गुरूच जे वडील यांनी कृपा केली तर या देहातच होतो.' श्रीतात्यासाहेब म्हणतात,

डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही ।
बाप सद्‌गुरू कृपा करील हा लाभ घडे देही ।।१।।

श्रीतात्यासाहेब हे प्राण तर प्राणशक्ती सौ.आईसाहेब. त्यांचे पोटी श्रीदादांचा जन्म ही भाग्याची गोष्ट. त्यातच वडिलांचा अनुग्रह. ही त्यापेक्षा भाग्याची गोष्ट. सारा परिवार भाग्यवान.

आमच्या संप्रदायाचे हे वैशिष्ट्य आहे की आधी साक्षात्कार मग जन्मभर नाही, जन्मोजन्मी उपासना. साक्षात्कार सदा मग साधन कदा कसे? आपण जे काही डोळयाने दृश्य पाहतो हा एक नुसता दैवी चमत्कार आहे.



कारण पन्नास वर्षाखाली हे पाहिल्याचे आठवत नाही आणि पन्नास वर्षांनी हे दिसेल का? नाही. मग केव्हा तरी दृष्टीसमोर येणारा चमत्कार जो केला आहे आणि केला नाही हा चमत्कार. एखादा मनुष्य फार वर्षाने गाठ पडला म्हणजे माणसे म्हणतात 'आज काय मोठा चमत्कार झाला बुवा' त्यातलेच हे दृश्य आणि व्यवहार आहेत. थोडक्यात म्हणजे चुना कात एक झाला की तांबडा रंग होतो पैकी आहे. पण ज्या आत्म्याचे अधिष्ठानावर स्थानावर हे सर्व घडले तो सदा आहे. तो कळला नाही तर या कशाचाच उपयोग नाही. असा संप्रदाय ज्या भगवान श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी संस्थापित केला. त्यांची खरीच धन्य आहे. असे महात्मे जगात होणे नाही. ते धन्य, त्यांचे गाव धन्य, त्यांचा संप्रदायात जे जे कोणी आले ते तुम्ही आम्ही सारे धन्य धन्य. श्रीतात्यासाहेब म्हणतात,

धन्य निंबरगी क्षेत्र भूतळी जेथे अवतरले ।
संत राय श्रीतुकाराम ते तारक जगी जाहले ।।१।।
नाऊ धन्य नीऊ धन्य धन्य धन्य आगी देऊ ।
धन्य आगी देऊ शिव स्वयंभु लिंग नोडी ।

आपले स्वयंपूर्ण आत्मतत्त्व जर आम्ही तुम्ही पाहिले तर आपण धन्यच आहोत, नाही का? निंबरगी गाव हे आमचे श्रीनिंबरगीमहाराज यांचेमुळे धन्यच झाले. त्यांनी प्रत्यक्ष सप्रमाण असे दाखवून दिले की, 'सत्पथ लोप झाला ऐसा अनुभव दाखविला । नामरूपाचा लाभ कैसा मार्ग प्रकट केला ।' सत् स्वरूपाचा साक्षात्कार करून देणारा पंथच लुप्त झाल्याने आमचे श्रीनिंबरगीमहाराज अवतीर्ण झाले व नाम तेच रूप व रूप तेच नाम ज्यात अनादि सिद्ध प्रगट व्हावे असा मार्ग प्रकट केला.

आता दृश्यावर वृत्ती उठणारच नाही. पापच चालत नाही मग आता करावे काय हा प्रश्नच आहे. आमचे श्रीतात्यासाहेब म्हणतात,

बसू या साधनाला । गडे ग काळ व्यर्थ गेला ।।ध्रु।।

सद्गुरूपायी चित्त ठेवुनी । त्यांच्या वचनाला ।
मनी दृढ धरूनी साधन करू या । नामस्मरणाला ।।१।।
नामस्मरणाविण साधन । नाही नाही तुजला ।
सद्गुरूचा हा बोध असा गे । पाळी नित्य त्याला ।।२।।

दृढतेने नामस्मरण यापरते साधनच नाही ते बसल्याशिवाय होत नाही. दृश्यावर उठणाऱ्या वृत्तीने ते घडणार नाही. साक्षात्काराशिवाय वृत्ती बसणार नाही. चमत्कारात सापडला की साक्षात्कार संपला हेच त्याचे खरे रहस्य आहे. हे साधन ज्यांचे अखंड चाललेले त्यांना समुद्रासारखा साक्षात्कार झाला नसता तर ते नवलच होते. या मौजा सांगताना ते म्हणतात,

प्रथमारंभी ब्रह्म बिंदु तो दृष्टीपुढे दिसला ।
बिंदू पहाता तयापासूनी सिंधू पुढे जाहला ।।१।।
नाना परीची स्वरूप संपदा कोण वर्णी त्याला ।
रामकृपेने दीन दासाला अनुभव हा आला ।

श्रवणाच्या ठिकाणी श्रीचिमडच्या महाराजांनी जी पेरणी केली तो अनुहत घोष सारखाच होऊ लागला. यामुळे आमचे श्रीतात्यासाहेबांनी आपले तेथे सर्वस्वच वेचले. ते म्हणतात,

चला बाई गुरूपायी रम्य मुरली वाजे । अनुहात वेणू तिचा नाद श्रवणी गाजे ।।
तनु मन धन सद्गुरूसी आवडीने वाहू । मुरली ऐकूनी याच देही मुक्त होऊनी जाऊ।।

तन,मन,धन सद्गुरूंना नाइलाजाने नव्हे तर मोठ्या प्रेमाने अर्पण करून हा अनहत श्रवण करीत याच देहात आम्ही मुक्त होऊन जाऊ. याचे नाव परमार्थ. याला म्हणतात प्रतिज्ञा. नाही तर माणसे कंटाळून म्हणत असतात 'मेलो की सुटलो बुवा'. सुटतो कुठला 'पुनरागमनाय च' असे आहे. हे कुठे माहीत आहे? मेल्यावर मुक्ती नाही 'आम्ही आधी मुक्त होऊ आणि मग जाऊ' असे तात्यासाहेबांनी आपले हृद्गद येथे प्रकट केले आहे.

मनाची एकता होऊन जीव शिवाची गाठ पडल्यावर परमात्मरूपात मिळून जाणेस काय अवघड आहे? असा ज्यांनी आत्मानंद सेवन केला त्यांचे



मुखातून तरी दुसरे काय यावे? आतच जे मावेना त्याला तोंडातून वाट फुटणारच. ती काही नुसती तोंडाची वाफ नव्हे. जीवनाची वाफ आत कोंडल्याने बाहेर जगाच्या व आपल्या कल्याणाकरता आली त्याचे नाव हरिकीर्तन. त्याकरताच तर त्यांचा अवतार होता. हे कीर्तन ऐकून तर श्रीचिमडचे महाराज बेहद खूष झाले होते. नव्हे नव्हे देहभान विसरले होते. म्हणजे जे मुळातच देहावर नव्हते. आनंदरूपच होते त्यांनाही मोठा आनंद झाला होता. सामान्य श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यांनी या कीर्तनाने वेडे केले आणि तेही जन्मभर कीर्तनात रमले तर तेही आश्चर्य नव्हे. तसे जर झाले नसते तर ते मात्र आश्चर्य होते. श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन 'देव प्रगट झाल्यानंतरचे होते'. देव प्रकट व्हावा म्हणून तो नुसता आरडाओरडा नव्हता. ते काटे दरवाजातले कीर्तन नव्हते. कीर्तन गणपतीपुढचे पण दुर्दैवी काटे दरवाजात अडकले व ते तेथेच आजवर राहिले. त्याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. श्रीतात्यासाहेब म्हणतात,

देव कीर्तनात प्रगटला । जेथे तेथे पाहता भरला ।
असा अनुभव कोठे न आला । तनु पुलकित जेथे होई ।।१।।
स्थिर स्थिर होई मनु बाई । हरिकीर्तनी सावध होई ।।ध्रु।।
हरिकथा गोड बहु झाली । वाचे न बोलवे बोली ।
भाग्यवंत मंडळी बसली । अशी शोभा कोठे न दिसली ।
स्वारी सद्गुरूंची आली । चित्तवृत्ति तल्लीन झाली ।
जीऊबाई कीर्तना आली । शिऊबाई तिजसि भेटली ।
मनुबाई निवांतची ठेली । दासा प्राप्त झाली गुरूपायी ।।२।।

श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनात जेथे महाराज तल्लीन झाले तेथे कीर्तन करत असताना प्रथम श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांना नमन केले होते.

रघुनाथप्रिय गुरुवरा । करी मम वसती हृदय मंदिरा ।।ध्रु।।
भवाब्धिमग्ना पाहूनी माते । उद्धरी आपुल्या करा ।।१।।
पतितोद्धारक जाणूनी तू ते । शरण मी तुज गुरुवरा ।।२।।
दीन दास हा निश्चय करतो । तारक तूचि खरा ।।३।।

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे मुखाने श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या आज्ञेने श्रीचिमडचे महाराजांना अनुग्रह झाला असून श्रीसाधुमहाराजांनी चिमड येथेच देह ठेवल्यावर श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेने श्रीचिमडचे महाराज यांनी श्रीसाधुमहाराजांची समाधी केली. स्थापनेचे वेळी श्रीनिंबरगीचे महाराज स्वतः आले होते. असे फार मोठे या स्थानाचे महत्त्व आहे. यांचे कृपाप्रसादानेच आत्मानुभव येतो. हे चिमड सांप्रदायाचे मोठे जागृत दैवत आहे. श्रीतात्यासाहेब म्हणतात,'रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी यांचा प्रसाद घ्यावा । आत्माराम सर्वा ठायी नेत्रांतरी पहावा.' विहिरीमध्ये हे देवालय असून त्यात श्रीनिंबरगीमहाराजांची पिंडी, काडसिद्धांचा बाण, श्रीसाधुमहाराजांच्या पादुका अशा त्रैमूर्तींची स्थापना यात केली आहे. शिष्याच्या समाधिस्थापनेस सद्गुरूंचे आगमन व त्याचवेळी त्यांचे सद्गुरूसह व त्यांचेसह त्यांचे सहमतीने शिष्याचे समाधीची स्थापना ही गोष्ट अलौकिक आहे. आपल्यापेक्षाही निंबरगीकरमहाराजांनी श्रीसाधुमहाराजांना मोठे केले. देव करून बसविले. येथे बुद्धीच चालत नाही. निंबरगीकरमहाराजांचे नावे पिंडी बसविण्याची गोष्ट चिमडचे महाराजांनी काढली. तेव्हा निंबरगीकरमहाराज म्हणाले 'आम्ही जिवंत असताच आमची समाधी करता काय? बरे काय करणेचे ते करा पण आमचे सद्गुरू जे काडसिद्ध त्यांना घेऊन काय करणेचे ते करा.' मग याप्रकारे येथे त्रैमूर्तीची स्थापना झाली. याचे वर्णन शब्दाने करणेच शक्य नाही.

जिवंतपणी समाधी कोण करणार? गेल्यावर व्हायची जेथे पंचाईत आणि 'काय करावयाचे ते करा आमचे सद्गुरूना घेऊन करा.' असे कोण म्हणणार? याहीपेक्षा आपल्या शिष्याच्या पादुका आपल्याजवळ कोण घेणार? जगाच्या इतिहासात कोठे असा इतिहास आहे का? असा प्रश्न आहे. ज्या विहिरीत ही साधुमहाराजांची समाधी आहे त्या विहिरीचेही वर्णन श्रीतात्यासाहेबांनी त्यांना तेचे प्रत्यक्ष काही अनुभव आल्याने केले आहे. पाया काढताना श्रीनिंबरगीकरमहाराजांचे वचनाप्रमाणे येथे साक्षात् गंगा आली म्हणून हे देऊळ विहीरीतच बांधून काढले आहे तात्यासाहेब म्हणतात,



विहीर साधुरायाची । हरते पाप ताप साची ।।ध्रु।।  
गुरुलिंगजंगम वचनी । गंगा आली तया स्थानी ।।१।।  
रोगग्रस्तजन आले । स्नाने रोगमुक्त झाले ।।२।।  
विहिरीचे पाणी सुंदर । पाट चाले निरंतर ।।३।।  
मुक्तरत्न माणिके भरली । गुरूच्या हाती असे किल्ली ।।४।।  
तेजःपुंज नाग डुलतो । परी तो भाग्यवंता दिसतो ।।५।।  
अद्वय प्रभा पूर्ण पाही । पाहता दास धन्य होई ।।६।।

तेजःपुंज अशा शेषाचे दर्शन श्रीतात्यासाहेबाना या स्थानी झाले. यावरून याचे महत्त्व वर्णन करावे तेवढे ते थोडेच आहे.

चिमडशिवाय दुसरे स्थान नाही व महाराजांचेशिवाय दुसरे दैवत नाही. सर्व जगात त्यांना महाराजच दिसत होते. रामनवमी ते थाटाने साजरी करीत. पण आत त्यांच्या त्या प्रसंगी चिमडचे महाराजच आविर्भूत होत. आणि याप्रकारे त्यांची रामनवमी साजरी होत असे. ही अगदी अंतर्गत गोष्ट आहे. या स्थानाचे महत्त्व आणि तेथे राहिलेले अवतारी पुरुष यांची परंपराच त्यांनी आपल्या एका पद्यात नमूद केली आहे. ते संपूर्ण पदच खाली देत आहे.

चिमडक्षेत्री सद्गुरूमाई । जगदोद्धारा तिष्ठत राही ।।ध्रु।।  
रघुनाथप्रिय गुरुवर त्राता । कैवल्याचा पूर्ण प्रदाता ।।१।।  
रामचंद्र प्रभू दीनोद्धर्ता । घोर भवाचे शासन करता ।।२।।  
मोक्ष लक्ष्मी अक्का माऊली । जन ताराया उभी राहली ।।३।।  
गुरुलिंगजंगम स्वामी कृपेची । छाया सर्वा परोपरीची ।।४।।  
संसारी जन फिरता श्रमले । भवभय वारूंनी मुक्तची केले ।।५।।  
हरीनामाची माला दिधली । आत्मस्वरूपी वृत्ती वेधली ।।६।।  
स्थावर जंगम भरली पाही । दासा दैवत त्यावीण नाही ।।७।।

श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीसाधुमहाराज व श्रीरामचंद्रावजीमहाराज व श्रीलक्ष्मीबाई अक्का यांनी हे क्षेत्र पुनीत केले आहे. सर्पोदरासारख्या दुखण्यातून राजवैद्यांनी हात टेकले असताना, ज्यावर या जगात औषधच नाही अशी स्थिती असताना

मृत्यूच्या जबड्यातून आमच्या श्रीतात्यासाहेबांना ज्यानी ओढून आम्हाला परत आणून दिले त्या मोक्ष लक्ष्मी – लक्ष्मी अक्कांची थोरवी – आणि त्या संबंधी आमचे अंतरात उसळणाऱ्या निष्ठापूर्वक भावना कोणत्या शब्दांनी व्यक्त कराव्या?

कैवल्याचे प्रदाते श्रीसाधुमहाराज ज्यांचे पाठीशी होते म्हणूनच श्रीतात्यासाहेबांचे हातून कैवल्यवैभवासारखा ग्रंथ बाहेर पडला. खरोखरीच ते वैभव आहे. नव्हे नव्हे तो आमच्या संप्रदायाचा 'ग्रंथ साहेब' आहे असे अगदी अभिमानाने आम्ही सांगतो. हे सांगणेतही आम्हाला अभिमान आहे. असा ग्रंथ होणेच नाही. फक्त जाणकार पाहिजे. तो मला होयच म्हणेल. मला पूर्ण विश्वास आहे.

संसारात वणवण फिरणाऱ्याला एक सुंदर असा विश्रांतीचा मार्ग आहे. सर्व सांप्रदायावर आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेची छाया पसरलेली आहे. त्या छायेचे बाहेरच जर आम्ही गेलो तरच चटके आहेत नाही तर विश्रांतीला कमती नाही. त्या छायेला आम्ही रहाण्यात सुख आहे. आम्हीच कोणावर छाया करू गेलो तर चटके बसलेच म्हणून समजणेस हरकत नाही. हरिनामाची माला आत्मस्वरूपाचा वेध लावते. हे या सांप्रदायाचे सार आहे.

'जो का जन्मा आला कधी तरी त्याला । सोडुनी देहाला जाणे असे ।।'

अशी श्रीतात्यासाहेबांची वृत्ती असल्याने लोकांनी जरी आपल्या वाटेवर काटे पसरले तरी आपण त्यांचे वाटेवर फुलेच पसरावीत–विलायती नव्हेत– ही म्हण त्यांनी अक्षरशः खरी केली. यातच त्यांचे खरे खुरे साधुत्व आहे.

येथे सकाम देव नाही व सकाम भक्ती नाही असा हा निरपेक्ष प्रेमाचा मामला अन्यत्र क्वचित्‌च दिसेल. आमचे श्रीतात्यासाहेब म्हणतात,

सांडोनीया सकाम कोण । फुकाचा धरितो देव ।
दास कपाळी होता पहा हो । गुरुकृपे जडला ।

नुसते कीर्तनाचे वाटेवर काटे पेरण्यानेच भागले नाही. कोर्टाने विचारले 'हणमंतराव तुमचा कोणावर वहीम आहे?' या महापुरुषाने उत्तर दिले 'माझा कोणावरही वहीम नाही.' श्रीमंतांच्या मातोश्री आजीबाईसाहेब पहाटेस कृष्णाबाईचे स्नानास जात असताना त्यांचे पायात काटे बोचू लागल्याने हा बोभाटा



आपोआपच झाला होता. मग चौथा वर्ग म्हणावयाचे कशाला. 'माझे नाक कापून घेईन पण तुला अपशकुन करीन' 'अरे पण नकटा होशील ना?, 'झालो तर बेहेत्तर, अपशकुन तर होईल.' या स्वभावाला काही एकादे औषध आहे का? ज्यांचे पाठीशी महाराज आहेत तेथे कोणाचे काय चालणार आहे? कोणी श्रीतात्यासाहेबांचेवर विषप्रयोगही केला होता. सात दिवस ते मूर्च्छागत झाले होते. अतिशय ताप झाला असून लक्षणेही विलक्षण होती. तथापि केवळ महाराजांचे कृपेने ते या मोठ्या गंडांतरातून निभावले. काय सामर्थ्य असेल त्या कृपेचे आणि काय निष्ठा असेल श्रीतात्यासाहेबांची. श्रीतात्यासाहेबच आपल्या एका अभंगात म्हणतात :-

सद्‌गुरूंनी दया बहूतची केली । कृपेची साऊली वर्णवेना ।।१।।
माझ्या नाशासाठी मोठा यत्न केला । परी तो विफल झाला गुरुकृपे ।।२।।
सप्तदिन मज दीर्घ मूर्च्छा आली । काया व्यपियेली नाना रोगे ।।३।।
माझे अपराध सर्व क्षमा केले । संकटी धावले राखावया ।।४।।
जेथे राम माझा उभा वाचवाया । कोण गणी वाया संकटासी ।।५।।
दासाचा हा स्वामी आकांती पावतो । दुःख भय हरतो निजकृपे ।।६।।

काळाचे जेथे चालले नाही तेथे खोकल्याचे काय आणि विषप्रयोगही जेथे लोटांगण घालून गेला तेथे एका विंचवाच्या पिल्लाचे काय? सर्वावर त्यांचे कीर्तन हेच एक जालीम औषध होते. खोकल्याने बेजार झाले म्हणून कोर्टाने घरी पाठविले. आणि रात्री श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांचे इच्छेप्रमाणे कीर्तन केले. श्रीमंताना हे कळल्याने आपण औषध केव्हा घेतले म्हणून विचारले. श्रीतात्यासाहेब म्हणाले 'कीर्तन हेच आमचे औषध आहे.' यानेच खोकला गेला.

त्यांचे कीर्तनात भगवान प्रगट होत होते. साक्षात् श्रीरेवणसिद्ध प्रगट झाले होते. ही साक्ष चिमडास अनेकांनी घेतली आहे. जेथे काळ सलाम करत होता तेथे प्रारब्धाचा काही खेळ झाला इतकेच. यांना काय त्याचे? मारुतीच्या शेपटाला चिंध्या बांधून तेल ओतून रावणाने पेटवा म्हणून सांगितले व त्याने पेट घेतला नाही. रावणाच्या दाढी मिश्या फु फु करताना जळल्या. शेपटाला अग्नीने

स्पर्शही केला नव्हता. ते काही बिन शेपटाचे माकड झाले नाही. ही एकच गोष्ट ध्यानी घेतली म्हणजे तेच हे तात्यासाहेब होते आणि त्यांच्या पाठीशी श्रीरामचंद्रमहाराज होते. जगाला सर्व लीला त्यांनी दाखवून परमार्थाचा आदर्श सर्वांचे डोळ्यासमोर ठेवला हेच सार ग्रहण आपण यातून करावयाचे आहे.

कुरुंदवाडी श्रीगणपती उत्सवास श्रीमंतांचे इच्छेप्रमाणे श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनात त्यांनी प्रार्थना केल्याप्रमाणे साक्षात् गजानन प्रगट झाले. ते श्रीमंत अण्णासाहेबांनी आपण भ्रमात नाही ना ही खात्री करून आपले अंगाला चिमटा घेऊन पाहिले. त्यांनी श्रीतात्यासाहेबांचे पायावर लोळण घेतली. तात्यासाहेबांनी दूर्वांकुर गणपतीला वाहिले आणि आपण मात्र त्यांचेकडून मोदक घेऊन स्वतः खाल्ले आणि तो महाप्रसाद इतरानांही वाटला आणि सर्व श्रोत्यांना त्या आनंदाचे वाटेकरी केले. श्रीतात्यासाहेब म्हणतात,

गजवदना तू सुख सदना रे वेगी मला पावे ।
मन मूषकावरी बैसुनिया शीघ्र तुवा यावे ।।१।।
चित्त दूर्वांकुर आवडे म्हणूनी अर्पीतसे तुजला ।
स्वानंदाचा मोदक देऊनी उद्धरी दासाला ।।२।।

आम्ही केलेली पापे तीर्थानी खावीत व त्यांनी पुनः पुनीत होण्याकरीता संतचरणाचा स्पर्श व्हावा म्हणून धाव घ्यावी आणि पुनीत व्हावे अशी स्थिती असल्याने श्रीकृष्णाबाईस १९१४ साली आलेला प्रचंड महापूर श्रीतात्यासाहेबांच्या नुसत्या पदस्पर्शाने ओसरला व पाणी पात्रात गेले. ही केवढी साक्ष सर्व सांगली गावाने घेतली आहे. हे काय काव्य आहे? असे ते तीर्थरूप होते. श्रीतात्यासाहेब म्हणतात, 'शुचिर्भूत शुद्धमती । ईश्वरभाव सर्वा भूती । तोच सदा वसे तीर्थी। तीर्थे त्या संगे ।।'

श्रीतात्यासाहेबांनी विचार केला आपण आता जेथून आलो तेथेच पुनः जावे. श्रीमहाराजांची प्रार्थना केली,

मी हीन सर्वापरी रामचंद्रा । दयाळू तू रे करूणा समुद्रा ।
माझे बरे वाईट सर्व कोटी । अपराध सारे प्रभु घाल पोटी ।।



जिथल्या तिथे सर्वस्वार्पण केले आणि ते सर्वातून मोकळे झाले.

पाचवी कहाणी पाच भूतांचा देहचि हारपला ।
ज्ञानाचा हा प्रलय पाचवा शब्दचि मावळला ।
वेद पाचवा स्वर पाचवा हितार्थ दृढ कळला ।
गुण पाचवा स्वर पाचवा हितार्थ दृढ कळला ।
गुण पाचवा वर्ण पाचवा कोण जाणे त्याला ।

त्याला जाणणार कोण अशी अवस्था झाली. आणि त्यांनी सरळ सरळ कीर्तनात स्पष्ट सांगितले.

ब्रह्मपुरी आम्ही जातो रे कोणी येतो का रे ।
संगे येईल त्यासी नेतो रे लाभ होतो रे ।।

काय सामर्थ्य असेल त्यांचे? पण त्यांचे बरोबर जाणार कोण? श्रीतात्यासाहेबांनी पौष वद्य षष्ठी शके १८४५ रोजी सायंकाळी पाच वाजता आपला देह ठेविला व ते ब्रह्मसागरात विलीन झाले.

पूर्वी ते कीर्तनात म्हणावयाचे 'येथे कोटणीस कीर्तन करीत होते असे लोक बोलतील.' श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव गु.श्रीबाबूरावजी यांनी ती जागा सोडली व ते राधाकृष्ण एक्स्टेंशन भागात रहावयास आले. यामुळे तात्यासाहेबांचे ते शब्द खरेच ठरले. 'हातो हाती राम जगाचा विश्राम । कैवल्याचे धाम दास म्हणे ।।' या श्रीतात्यासाहेबांचे उद्गाराप्रमाणे श्रीबाबूरावजींनी आपले रहाते जागी श्रीतात्यासाहेबांची समाधी केली व तेथे पूजन, कीर्तन, भजन चालू केले. श्रीतात्यासाहेबांनी हे भाकित आपले अभंगात पूर्वीच करून ठेवले होते. ही गोष्ट काय आहे असा प्रश्न आहे? श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन देह ठेवणेपूर्वी एक वर्ष संध्यामठात झाले होते. तेथे ते म्हणाले 'ही जागा विश्रांतीला फारच चांगली आहे.' आणि आश्चर्य असे तेथेच त्यांनी कायमची विश्रांती घेतली आहे. गु.भ.प.गंगाधरराव सिंग हे श्रीतात्यासाहेबांचे भक्त असून तेथे त्यांनी पूजा ,अर्चा, पंचपदी चालू ठेवली आहे. श्रीबाबूरावजींचेकडे व समाधीत दोनीकडे पुण्यतिथि महोत्सव मोठे होत असतात.

आमचे घरी श्रीतात्यासाहेब देह ठेवणेपूर्वी एक वर्ष भोजनास आलेवेळी आमचे ती.प.पू.कै.वडील श्रीबापूरावजी केळकर यांना 'तुम्हाला पाच ही वेळ फार चांगली आहे,' असे म्हणाले होते. याचा खुलासा श्रीतात्यासाहेबांनी प्रगटरूपाने माघ वद्य ३ शके १८४५ रोजी दर्शन देऊन केला. तेव्हापासून आमचे घरी ती.प.पू.कै.श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबांची नित्यनेमाने कीर्तनसेवा आमरण केली.

श्रीतात्यासाहेबांची कृपा व सत्ता अशी जबरदस्त आहे की, तो कीर्तनाचा ओघ अजुनी चालूच आहे आणि तसाच तो या सांगलीमधे अखंड वहात राहील असा पूर्ण विश्वास आहे. तेच खरेखुरे श्रीतात्यासाहेबांचे स्वरूप असून तीच त्यांची आवडती उपासना आहे. त्यांचे ठिकाणी जी निष्ठा तीच जेथे प्रतीत होईल ते त्यांचे परमभक्त यात संशय नाही.

श्रीतात्यासाहेब म्हणतात,

कीर्तनगुणे होत सप्रेम । प्रेम रंगी मेघश्याम ।
मेघश्यामा ठाई विश्राम । पावती ते संत ।।१।।
संत तेथे पूर्ण ज्ञान । ज्ञान तेथे आनंद घन ।
आनंद तेथे समाधान । समाधानी सुख ।।२।।
सुख तेथे असे समाधी । समाधी तेथे तुटली आधी ।
आधी तुटल्या जीव उपाधी । नुरेचि शोधिता ।।३।।
उपाधी तुटता होत अभेद । अभेद तेथे पूर्ण बोध ।
बोध तेथे ब्रह्मानंद । ठसावे परिपूर्ण ।।४।।
ऐसा कीर्तनाचा महिमा । झाली बोलायाची सीमा ।
रामकृपेने परमात्मा । जोडिला दासाला ।।५।।

भगवान् श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज यांनी आम्हा सर्वांकडून आपल्या परिपूर्ण कृपेने अखंड सेवा घ्यावी आणि आपल्याच स्वरूपात शेवटी मिळवून घ्यावे आणि सर्वांना आनंदी आनंद करावा हीच अनंत लोटांगणे घालून पुनः पुनः प्रार्थना.

***

(४)

## प.पू. श्री अनंत गंगाधर केळकर

आमचे आजोबांना आम्ही 'नाना' म्हणतो. आमचे ती. नानांचे वडील ती.कै. गंगाधरपंत व मातोश्री ती.सौ.कै. पार्वतीबाई होत. नानांचे शिक्षण फायनल अखेर झाले असून ते सांगलीस एज्युकेशन इन्स्पेक्टर ऑफिसमध्ये हेडक्लार्कचे काम करीत होते. ३० वर्षे सर्व्हिस झालेनंतर त्यांनी पेन्शन घेतली. ते मोठे मातृभक्त होते. आपल्या आईला भात आवडतो म्हणून त्यांनी बेळगावजवळ कलखांब येथे भाताची जमीनच खरेदी केली. सांगलीस घर बांधले आणि आपले मातोश्रीचे स्मृतिप्रीत्यर्थ घरी असलेल्या विहिरीचा जीर्णोद्धार केला. ह्यांचा हिशोबात हातखंडा होता. दानधर्म वाटेल तेवढा करतील पण हिशेबात एक पै ही सुटणार नाही. अशी बाणेदार वृत्ती होती. नानांच्या पहिल्या पत्नी ती.सौ.कै. राधाबाई या श्री. मामांचे बालपणीच कैलासवासी झाल्या. यामुळे त्यांची चांदीची वाटी मामानी जिवापाड जतन केली. आमचे नानाना सांगलीचे श्री. लक्ष्मण दीक्षित या सत्पुरुषांचा अनुग्रह असून त्यांचेकडून नानानी पार्थिव पूजा घेतली होती. संध्या, पार्थिव पूजा, रोज बारा हजार शंकराचा जप व सोमवारचा उपवास त्यांनी आमरण केला. पूर्वी ते वैश्वदेवही रोज करीत. गुरू घराण्याकरिता त्यांनी तन, मन, धन वेचले यात प्रश्नच नाही. आपल्या गुरूंची विष्णुघाटावर समाधी बांधली. त्याची पूजा ते नित्य नेमाने करीत. व सद्गुरूंची पुण्यतिथी दीक्षितांचे घरी साजरी करून पद्यांत गुंफलेले श्री. लक्ष्मण दीक्षितांचे चरित्र ब्राह्मण भोजनास बसले म्हणजे उत्कट भावपूर्ण असे उभे राहून म्हणत व नंतर आपण प्रसाद घेत. नानांचे नंतर बरीच वर्षे आमचे वडील ती.प.पू.कै. श्रीमामा हे पद्य दीक्षित यांचे घरी याच

श्रद्धेने म्हणत असत. आमचे श्रीमामा हे अत्यवस्थ आजारी असताना माईंनी आपले आयुष्य तू बापूला दे अशी ईश्वराची प्रार्थना केली व तसेच ते घडले! अनेक संतांचे दर्शनाचे भाग्य आमचे नानांना लाभले होते. श्री. ब्रम्हचैतन्य गोंदावलेकरमहाराज यांचा अनुग्रह आमचे नानांच्या द्वितीय पत्नी ती.सौ.कै. लक्ष्मीबाई (माझी आजी) यांना असून त्यांच्यामुळे नाना गोंदावल्यास महाराजांच्याकडे जात आणि महाराज त्यांना ठेवून घेत, सोडत नसत. कितीही राहिले तरी एवढी काय गडबड आहे रहा असेच म्हणत. मग अगदी केव्हातरी नानानी आता गेलेच पाहिजे असे म्हटले म्हणजे मग या तर असे म्हणत. माझ्या तीर्थरूपांच्या जनक मातोश्री ती.सौ.कै. राधाबाई (माझी आजी) या तीर्थरूपांचे लहानपणीच कैलासवासी झाल्याने बुधगांव स्टेशनवर महाराजांना पहाताच आपली आईच भेटली असे वाटून त्यांनी महाराजांचे कमरेला मिठी दिली आणि प्रणिपात केला. महाराजानी माझ्या तीर्थरूपांचे पाठीवर हात फिरवला व हा पुढे महासाधू होईल असे उद्‌गार काढले. असे महाराजांचे परमशिष्य श्री. पाठक मास्तर मला आमचे घरी आले की सांगत असत.

श्री. टेंबे स्वामी व त्यांचे अधिकारी शिष्य श्री दीक्षित स्वामी यांचेही आमचे नानांचेवर फार प्रेम होते. त्यांनी आमचे नानाना प्रसाद म्हणून एकेक रुपया दिला होता. तो प्रसाद आमचे घरी तेव्हांपासून जिवापाड जपला असून त्याची वार्षिक पूजा आमचे येथे होत असते. श्री टेंबे स्वामींचे परमशिष्य श्री वामनरावजी गुळवणीमहाराज आमचे घरी माझे तीर्थरूपांनी देह ठेवल्यावर आले. त्यावेळी हे रुपये पाहताच आपले मस्तकी धारण केले व त्यांचे डोळ्यातून प्रेमाश्रू सुरू झाले. आमचे श्रीमामांचे (तीर्थरुपांचे) दर्शनास महाराज आले याचा धागा दोरा येथे आहे. हा योग श्री तात्या कुलकर्णी यांनी घडवून आणला.

भगवान श्रीसद्‌गुरु तात्यासाहेब कोटणीस यांचे नित्याचे कीर्तनास माझ्या आजी ती.सौ.कै. माई (लक्ष्मीबाई) या रोज जात असत. त्यांचा व श्री.



तात्यासाहेबमहाराज यांच्या पत्नी ती.प.पू. श्रीसद्‌गुरु सौ. मातोश्री लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेब यांचा फार घरोबा होता. आमचे घरी एखादा पदार्थ केला तर तो कोटणीसांचेकडे जावयाचा व तेथे काही पदार्थ केला तर तो आमचेकडे यावयाचा. आमचे नानाही वरचेवर श्री तात्यासाहेबांचे कीर्तनास जात व ते याना 'मौज दिसती रे' हे पद्य म्हणावयास सांगत आणि हे पद नानांनी म्हटले की, खरीच मौज होई. म्हणून ते पद्य या खाली उधृत करतो.

मौज दिसती रे । आजी मोठी मौज दिसती रे ।।ध्रु.।।
ध्वनीमध्ये मन रंगुनि गेले । भृभंगावरी लक्ष लागले ।
नढळे पाती नीर चालिले । लाटचि येती रे ।।१।।
अरूणोदयसम सुरंग सगळे । विजा चमकती बहु कल्लोळे ।
येके येके जळी उठती विशाळे । भासति नासति रे ।।२।।
पाहता पाहता न दिसे काही । दिसते परि ते फिर फिर पाही ।
मागे पुढे दाटले घनदायी । सहजचि ज्योती रे ।।३।।
नरहरीनाथे हस्तकी धरिले । जन्म मरण हे सहज विसरले ।
महपती नयनी स्वरूप भरले । स्वयंज्योती रे ।।४।।

श्रीतात्यासाहेबानी देह ठेवल्यावर आमचे ती.प.पू.कै. वडील श्रीमामा यांना नित्य कीर्तन करणेची आज्ञा प्रत्यक्ष प्रगट होऊन दिली व त्याप्रमाणे श्रीमामांनी हे नित्य कीर्तन आपले देहावसानापर्यंत केले. या कीर्तनात नाना झांज घेऊन साथ करीत व 'आमचे नानांनी येवढे घर बांधून ठेवले म्हणून मला कीर्तन करणेची सोय झाली. माझ्या आईचा आशीर्वाद व श्रीतात्यासाहेबांची परमकृपा अशी मोठी दुहेरी शक्ती या मागे आहे' असे मामा वारंवार म्हणत असत. नानांनी या प्रकारे एक तप श्रीमामांचे कीर्तनास सहाय्य केले. श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन-श्रवण केल्याने नानांची कीर्तन-भक्तीवर निःसीम भक्ती होती. श्रीतात्यासाहेबांचेकडून नानांनी मार्गदर्शनही करून घेतलेले होते. यामुळे त्यांनी आपला अंतकाळ उत्तमच साधला. आमचे नाना

श्रीतात्यासाहेबांचेबद्दल म्हणतात,

अज्ञजना ताराया संता येणे असे हरी वदले ।
सद्य स्थितीहि पहाता सांप्रत तैसे महंत मज गमले ।।१।।
गुरु अंजनीच दृष्टी स्थिर करताना घडे हा अवतार ।
हनुमंत नाम साजे जन उद्धरण्या आलेचि साचार ।२।।
विद्वत्ता बहु असुनी वर्तन साधे कितीतरी वानू ।
भूत दया अती तरती ज्ञानी शोभती जसा नभी भानू ।।३।।
गुरु सेवा रूपाने हीना दीना प्रमोद हा करिती ।
छत्तिस वर्षे ऐसे कीर्तन चाले गुरुकृपेवरती ।।४।।
शक अठराशे सत्तिशी विभूती मासीच कृष्ण षष्ठीसी ।
सोमवार शुभ पाहुनि गुरुनाथे घातलेचि पाठीशी ।।५।।
हीन दीन मी असतां गुरुराये मज कृपेचि करि धरिले ।
भवव्याधी ही निरसुनि अनंताला अनंतची केले ।।६।।

नानांना आपला अंतकाल समजलेला होता. एक वर्ष त्यांनी घरातील संपूर्ण लक्ष काढले होते. आमचे मामेबंधू ती.रा. नारायणराव पटवर्धन यांना त्यांनी तुझा तू आता व्यवहार पहा असे सांगितले. आमच्या ती. आत्याबाई बोलली, नाना असे का म्हणता ? नाना म्हणाले, माझा आता नेम नाही. पुढे त्यांना घशाचा कॅन्सर झाला होता. औषधपाणी व सेवा शुश्रूषा माझे ती. श्रीमामा यांनी व ती.सौ. मातोश्रींनी फार उत्तमप्रकारे केली असे नानांनीच उद्‌गार काढले. श्री. बाबूरावजी करमरकर यांचेवर नानांचा फार लोभ होता. त्यांना 'बापूकडे लक्ष ठेवा' असे नानांनी सांगितले व लिमये मामींना ताईंकडे लक्ष देण्याबद्दल सांगितले. ब्राह्मणांना हजार पाचशे रुपये तरी दानधर्म केला. गु. शंकरभटजी दीक्षित हे गुरु घराण्यातले. ते आले असता त्यांना दूध प्यावयास दिले व त्यातील थोडे वगळणेस सांगून तो



शेष प्रसाद आपण घेतला. धन्य त्या गुरुभक्तीची. सहस्रबुद्धे स्वामींना आता येतो म्हणून नमस्कार केला. हे स्वामी श्रीमामांचे नित्याचे कीर्तनास नेमाने येत असत. पहिली आषाढी एकादशी. कीर्तनात 'शंकरा अंत करावा बरवा' हे पद नानांनी म्हटले. व रात्री जे निजले तेथून एकदम त्यांचे जास्तच वेगळे दिसू लागले. डॉ. जोशी आले होते त्यांना नाना म्हणाले, 'मला फक्त बापूचे कीर्तन ऐकावे एवढीच इच्छा होती पण येतो आता.' असे म्हणून डॉक्टरांना नमस्कार केला. श्री. अंतोबा म्हसकर यांनी विचारले, नाना स्मरण आहे ना ? तेव्हां नानानी ताडकन 'ॐ नमः शिवाय' ही अक्षरे उच्चारली. आश्चर्य ! रात्री तीन वाजेपर्यंत हा घोष चालू होता. पुढे त्यांना घोर लागला. तोंड बंद झाले पण हातातील माळ चालू होती. सकाळी ६ वाजता हातातील माळ गळून पडली. दुसरी आषाढी एकादशी वार सोमवार. सकाळी ८ वाजता भ्रूमध्यावर दृष्टी स्थिर करुन नानांनी शिवस्मरणात आपला देह ठेविला. असे आमचे आजोबा होते. त्यांचे आठवणीने अजूनही अंतःकरण हेलावून जाते. त्यांना माझे अनेक प्रणिपात.

***

(५)

## प.पू. श्रीचांगदेवमहाराज

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पूर्वी १४०० वर्षे चांगदेवांचा जन्म झाला म्हणजे त्यांच्या जन्मास आज दोन हजार वर्षे होऊन गेली असे मानले तरी त्यांचा जन्मकाल ठरवण्याइतका इतिहास पूर्णपणे उपलब्ध नाही. आपणांस आख्यायिकांवर विसंबून रहावे लागते.

महिपतिकृत भक्तलीलामृतात, अध्याय ६ ते १० मध्ये चांगदेवांविषयीचा उल्लेख आला आहे. तो असा – चांगदेव हा देवलोकी इंद्रसभेतल्या मरुद्गणांपैकी एक मरुद्गण होता. पण इंद्रसभेत बसला असता, त्याचे हातून असभ्य वर्तन घडलेले दिसताच, देवेंद्राने त्याला शाप दिला की " तुला मृत्युलोकी जन्म घेऊन १४०० वर्षे राहावे लागेल व पुढे ज्ञानदेवांचा अवतार होऊन त्यांच्या कृपेने तूं मुक्त होशील."

### चांगदेवाचा जन्म व अध्ययन

मुधोपंत नावाच्या गृहस्थांना नारायणडोही या क्षेत्रात वास्तव्य असताना, एक सुंदर व मोहक असा मुलगा झाला. त्याचे मोहक सुस्वरूप व बालपणाच्या अंगच्या उत्तम गुणांची प्रचीती येऊन त्याचे लाडके नांव 'चांगा' असे ठेवण्यात आले. हेच चांगदेव.

त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे त्याची मुंज वयाच्या पाचव्या वर्षीच करण्यात आली. चांगा जात्याच चलाख बुद्धीचा असल्याने संध्या, रामरक्षा, देवतांची स्तोत्रे, पुरुषसूक्त, रुद्र, रूपावली, समासचक्र ही तेव्हाच तोंडपाठ झाली. तो जसजसा मोठा होत गेला, तसतसे त्याचे अध्ययनही वाढत गेले.

प्रौढ वयात चारी वेदांच्या संहिता, व्याकरण, न्याय, ज्योतिष, पूर्व मीमांसादि शास्त्रे व भागवतादिपुराणे या सर्वात चांगदेव प्रवीण झाला होता. वेदांगे, मंत्रतंत्रादी साधने साध्य साधून चांगदेव चौदा विद्या व चौसष्ट कलांच्या मध्ये परिपूर्ण झाला होता. ही शास्त्रे व कला जडदेहाचे तादात्म्य अधिकाधिक वाढवणारी आहेत. परमानंद प्राप्तीचे उपनिषदादींनी प्रतिपादिलेली, श्रवण मननादी साधने



साधून त्या योगे आत्मसाक्षात्कार होऊन स्थितप्रज्ञ अशी जीवन्मुक्त दशेतली अखंड सहज समाधि-स्थिती त्याला, सिद्ध हठयोगी, पूर्ण सिद्ध पुरुष होऊनही, श्रीज्ञानदेवांची भेट होईपर्यंत प्राप्त झाली नाही, हे मर्म ध्यानात ठेवले पाहिजे.

### चांगदेवास योगविद्या कशी प्राप्त झाली?

चांगदेवास चौदा विद्या व चौसष्ट कला आत्मसात् होऊन, त्याची प्रतिष्ठा लोकसमुदायांत वाढली, तरी त्याचे समाधान तेवढ्यावर न होऊन, त्याने योग-विद्येत पारंगत होण्यासाठी श्रीक्षेत्र काशी गाठले व या मार्गातील निष्णात व परिपूर्ण शास्त्रपारंगताचा शोध घेण्यास आरंभ केला.

प्रत्यक्ष काशी क्षेत्रात त्याला अपेक्षित गुरू लाभला नाही, पण समजले की, या क्षेत्रात एक मोठे लांबच लांब विवर असून तेथे एक योगी 'समाधिमग्न' असतात. चांगदेवाने तात्काळ जाऊन त्या विवराचा शोध घेतला. पण त्याला आढळून आले की विवराच्या तोंडाशी मोठमोठे नाग, सर्प, वाघ पसरलेले आहेत. पण मंत्र-तंत्रादी विद्येत चांगदेव निपुण असल्याने त्याने मंत्राच्या बळावर नाग, वाघ अशा विषारी प्राणघातक प्राण्यांचे मुखबंधन व दृष्टिबंधन करून, त्यांना म्लान करून ठेवले व त्या भयंकर आणि भयाण विवरात सहज प्रवेश केला.

विवरात बराच आत प्रवेश झाल्यावर त्याला प्रकाश दिसू लागला व तेथे एक समाधिमग्न योगी पुरुष दिसून आला. थोड्याच वेळात तो समाधिस्थ महापुरुष समाधिस्थितीतून भानावर आला. त्याने चांगदेवाची विचारपूस केली. त्याचे मनोगत ओळखले व त्याची योग्यता पारखून त्याच्याकडून सर्व साधना करून घेतल्या. त्याचे आता षट्चक्राचे भेदन होऊन कुंडलिनीचा संचार भ्रूमध्यात होऊन ती आता प्राणवायुरूप झाली व म्हणून प्राणजय व मनोजयामुळे चांगदेवास अष्ट सिद्धि प्राप्त झाल्या. त्यामुळे तीन दिवसांची, सात दिवसांची व पुढे तेरा दिवसांची समाधी लागून ती उतरण्याइतकी सिद्ध दशा प्राप्त झाली. यानंतर त्याच्या सिद्ध गुरूने आशीर्वाद दिला की योगसिद्धीचा हा सांप्रदाय वाढवून कायमचा चालू ठेवावा व त्यास विवराच्या बाहेर पडण्यास अनुज्ञा दिली.

### चांगदेव सिद्ध हठयोगी होतात

गुरूची आज्ञा घेऊन चांगदेव काशीक्षेत्रात आला व तेथे त्याचा सत्कारही

झाला. विद्वज्जनही येऊन भेटू लागले. चांगदेवाने काही दिवस काशी क्षेत्री काढले व पुढे खानदेशातील तापी व पयोष्णी नद्यांच्या संगमावरील शिव मंदिरात कायमचे वास्तव्य ठेवले. थोड्याच दिवसांत सिद्ध योगी म्हणून त्याची प्रसिद्धी झाली. व त्याचेकडून अनेक चमत्कारही होऊ लागले. समाधी लावून ती तीन दिवसांनी उतरल्यावर लोक प्रेते आणून ठेवीत. ती नुसत्या हस्तस्पर्शाने सहज उठवीत असे. त्याच्या हस्तस्पर्शाने असाध्य रोग बरे होत. आकाशमार्गाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संचार करणे, एके ठिकाणी अदृश्य होऊन दुसऱ्या ठिकाणी प्रगट होणे, वाघावर बसून गमन करणे, अजस्र नागांचा चाबकासारखा उपयोग करणे, निपुत्रिकांना नुसत्या आशीर्वादाने संतती लाभ करून देणे, अशा प्रकारचे दैवी चमत्कार करण्यात चांगदेवाची चौदाशे वर्षे निघून गेली.

## चांगदेवास श्रीज्ञानेश्वरमहाराजांस भेटण्याची प्रेरणा

पैठणास एका पखालवाहक 'ग्यान्या' नावाच्या रेड्याच्या मुखांतून एकसारखे तीन तासपर्यंत ऋग्वेदसंहितेचे अस्खलित उच्चारण श्रीज्ञानेश्वरमहाराज करवीत असताना ते चांगदेवाच्या गावच्या एका यात्रेकरू वैदिक ब्राह्मणाने पाहिलेले होते. त्याने ही अघटित, अति आश्चर्यकारक घटना चांगदेवाच्या कानी घातली. त्यासरशी चांगदेवाच्या मनाने घेतले की, असल्या दैवी विभूतीची भेट अवश्य व्हावीच व त्याच्या हा भेटीचा निश्चय ठाम झाला व हा मनोदय श्रीज्ञानदेवास कळविणेसाठी पत्र लिहिण्याचे ठरविले. पण त्यांचेपुढे असा प्रश्न उभा राहिला की, श्रीज्ञानदेवाचे लौकिक दृष्टीने वय लहान म्हणून त्यांना पत्रारंभी आशीर्वाद लिहिणेच योग्य खरे, पण ज्ञानदेव हे रेड्याच्या मुखातून वेद बोलविणारे प्रत्यक्ष ईश्वरी अवतारच खास असावेत. म्हणून त्यांना नमस्कार लिहिणेच योग्य; अशा मनाच्या अनिश्चित द्विधा अवस्थेत असतानाच चांगदेवाने अखेर कोरा कागदच शिष्याहाती श्रीज्ञानदेवांस पाठविला. या कोऱ्या कागदाचा आशय श्रीज्ञानदेवांनी पूर्णपणे ध्यानी घेऊन या कोऱ्या कागदावर, पासष्ट ओव्या लिहून, जो उपदेश केला, तीच ही चांगदेव पासष्टी.

## चांगदेवाचा वेष

त्याचा नित्याचा वेष म्हणजे मस्तकावर गुंडाळलेला मोठा थोरला



उंचच उंच उभारलेला विशाल जटाभार, खूपच रुंदशा त्याच्या त्या गळ्यात रुळत असलेल्या रुद्राक्षांच्या घवघवीत माळा, पिळदार अशा त्यांच्या दंडात तशा मनगटांतही असलेल्या. योगाभ्यासाने शरीर तेजःपुंज बनलेले, तेच भस्माच्या अतीव शुभ्र पट्ट्यांनी चर्चिलेले म्हणून शोभायमान, कंबरेला नैष्ठिक ब्रह्मचर्य दर्शक भगवी कौपीन व कफनीवजा सर्वांग झाकणारी भरजरीची मेखळा परिधान केलेली अशी तीक्ष्ण चक्षूंची ही भव्यमूर्ती.

त्यांचे नित्याचे वाहन म्हणजे मोठा थोरला ढाण्या वाघ व हातात फड्या महानागाचा लांबच लांब चाबूक. अशी ही दीर्घायुषी भव्यमूर्ती. बाराशे शिष्यांसहित एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंतचा लांबचा प्रवास आकाशमार्गाने सहज करी.

## चांगा वटेश्वर नांव कसे पडले?

चांगदेवाचे तापी पयोष्णी नद्यांच्या संगमावर वास्तव्य असताना एका चातुर्मास्यांतल्या पावसाळ्यांत दिवसास भयंकर पाऊस पडला व नदीकाठी चिखलच चिखल झाला. चातुर्मास्यांत चार महिने मौनव्रत धारण करून डोळे मिटून चांगदेव अंधत्वात रहात असे व त्यांचा नित्याचा क्रम स्नान होताच पार्थिवलिंग पूजनाचा असे. या प्रघातास अनुसरून शिष्याने माती मळण्याचा कंटाळा करून वाळूतच वाटी पालथी घालून, तिच्यावर माती थापून लिंग तयार करून ठेवले. नित्याप्रमाणे स्नान उरकून चांगदेवाने लिंगास आवाहनपूर्वक मंत्राक्षता वाहून ते उचलून हातावर घेऊ लागला. तो ते मुळीच हलेनाच. त्याने डोळे उघडून पाहिले तेव्हा ते वाटीवर स्थापलेले लिंग त्याच्याच उपासना बळामुळे स्वयंभू लिंग झालेले चांगदेवास दिसून आले. यावर मंदिर बांधून त्याचे नाव 'वाटेश्वर-वटेश्वर' ठेवले गेले व चांगदेवास चांगा वटेश्वर असे नाव पडले व तेच रूढ झाले.

## चांगदेवाची ग्रंथरचना व गुरुप्राप्ती

चांगदेवाने अभंग-रचना केली आहे व एका अभंगात त्याला स्वप्नात वटेश्वराचा अनुग्रह झाल्याचा उल्लेख आहे :-

चांगा वटेश्वरी सोऽहं झाला । अवघाचि बुडाला ज्ञान डोही ।।
डोळा लावुनी निजी निजेला एकांत । स्वप्नी वटेश्वर देखिला निवांत ।।

चांगा म्हणे जिवीचे गुज । वटेश्वरी मज सांगितले ।।
चांगा सोय धरी ज्ञान वटेश्वरी । मुक्ताई जिव्हारी बोध करी ।।

या अभंगावरून दिसून येते की चांगदेवाला शिवस्वरूपाचा सगुण साक्षात्कार स्वप्नात प्रत्यक्ष श्रीवटेश्वर शिवाचे दर्शन होऊन मंत्रदीक्षेने झाला. आणि श्रीमुक्ताईच्या कृपेने स्वात्मबोधाने निर्गुण स्वरूपप्राप्ती झाली असल्याचे स्पष्ट होत आहे. अभंगाखेरीज 'तत्त्वसार' हा ग्रंथ असून त्याच्या १०३६ ओव्या असाव्यात. पैकी ४०५ च उपलब्ध आहेत. ज्ञानेशांचे भेटीनंतर त्यांनी ग्रंथरचना केली.

**समारोप**

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जड भिंत चालवून दाखवून चांगदेवाची भेट घेतली. व त्यांच्या योग सामर्थ्यविषयक सामर्थ्याचा गर्वहरण केला. ही कथा वर्णनाची आता जरुरी नाही. ती सर्वश्रुत आहे.

नित्य कर्मान्तर्गत गायत्री पुरश्चरणाच्या प्रदीर्घ अनुष्ठानांचा व वटेश या स्वयंभू सगुण शिवोपासनेच्या नित्य आराधनेचा त्याच्या ठिकाणी परिपाक झालेला. हठयोगातल्या अष्टांगांनी साध्य झालेल्या समाधिद्वारा सिद्धावस्थेस पोचलेला चांगदेव. यास अनुताप पूर्ण झालेला असून त्यास आता खास परब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार व्हावयास हवा. म्हणून त्यास पत्ररूपाने बोध केला. यानंतर चांगदेवाने श्रीमुक्ताबाईस सद्गुरू केले व तिच्या उपदेशाने तो पूर्ण ब्रह्मरूप झाला, कृतार्थ झाला.

**सारांश**

श्रीरामाचे सामर्थ्य समजण्यास रावणाचे ज्ञान व तप सामर्थ्य परिपूर्णतेने सर्वांगीण दृष्टीने आकलन व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणे चांगदेवाचे चरित्राचा समग्र विचार करावयास पाहिजे. चांगदेवाचे योग सामर्थ्य, त्याने मिळवलेल्या सिद्धी, त्याने या विश्वातील चेतन शक्ती-चेतन पदार्थावर मिळवलेला विजय यांचा विचार केला, म्हणजेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे अद्भुत सामर्थ्य, त्यांनी समाजाचे उद्धारासाठी केलेले कार्य यांची प्रचीती येऊन 'ज्ञानेशो भगवान विष्णुः।' ही उक्ती सार्थ वाटते.

***

## (६)

## प.पू.श्रीराधाबाई अक्का

### हरिपुरासारिखे क्षेत्र नाही कोठे

खरोखरीच हरिपुरासारखे क्षेत्र आपल्याला सापडणे कठीण आहे हेच खरे. जवळ असले म्हणजे त्याचे महत्त्व आपल्याला कळत नाही हेच खरे. जवळच्या गोष्टी लांब व लांबच्या जवळ व्हाव्यात त्यातलेच हे आहे. आकाश जवळ असते पण ते लांब दिसते व डोंगर लांब असतात ते जवळच आहेत असे वाटते. आत्मा आपल्या शरीरातच आहे पण तो कोठे आहे असा प्रश्न उभा रहातो. आत्मा काय आहे हे नक्की सांगता येत नाही इतके त्यात व आपल्यात अंतर पडते. शरीर खरे तर त्या दृष्टीने लांबच आहे पण आपल्या जीवनात त्याच्या इतके जवळ असे काय आहे. काशीची माणसे गंगा स्नान न करता कोल्हापुरास दक्षिण काशी म्हणून येतात. व आपल्या इकडील लोक काशीत गंगा स्नानाकरिता जातात. हा मनुष्य स्वभावच आहे. मग आपल्याला या हरिपूरचे महत्त्व कळावे कसे?

श्रीराम प्रभूची परमपवित्र पाउले दंडकारण्यात ज्या ज्या ठिकाणी उमटली त्यापैकी एक हरिपूर क्षेत्र आहे. याचे महत्त्व कोणत्या प्रकाराने वर्णन करावे? प्रश्नच आहे. कृष्णा व वारणा यांचे संगमावर श्रीरामप्रभूंनी वाळवेचे शंकराचे लिंग आपल्या हस्ते स्थापन केले. त्या लिंगाचा अंत लागत नाही असे म्हणतात. हे लिंग किती खाली खोल आहे म्हणून पहाण्याचा पूर्वी कोणी प्रयत्न केला तो आतून भोंगे बाहेर पडले व त्यांनी त्या संशयात्म्याचे अंग फोडून काढले. अर्थातच त्याने तो नाद सोडला असे म्हणतात. रामायणकालीन हे श्रीशंकराचे प्रभू रामचंद्रांनी स्थापन केलेले स्वयंभू लिंग असलेने यास संगमेश्वर

म्हणतात. हजारो वर्षांनी नद्यांची पात्रे बदलतात असे म्हणण्यात येते. नव्हे नव्हे असे भूगोलशास्त्र बोलते. त्याच न्यायाने आता संगम मागे गेला व ईश्वर पुढे राहिला आहे. आपल्या पाहण्यातही हे नदीचे पात्र सरकले आहे, असे दिसून येईल. श्रीगुरुचरित्रात सुद्धा या क्षेत्राचा समावेश आहे. या दृष्टीने या क्षेत्राचे महत्त्व आपल्यास कळून येईल.

**पवित्र तो गांव पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ।।**

श्रीतुकाराममहाराज म्हणतात ज्या ठिकाणी भगवद्भक्त जन्म घेतात तो गांव पवित्र असून तो देशही पावन आहे. आमचे सांगली गांव हे शिक्षण, व्यापार वैगेरे बाबतीत सर्व दृष्टीने पुढे आहे. पण पूर्वी लोक विचारत की हे क्षेत्र कोठे आहे? पण माझे ती.प.पू.कै.वडील श्री.गोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी केळकर (श्रीमामा) हे आपल्या कीर्तनात सांगावयाचे 'श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचेसारखे महापुरुष आमचे सांगलीस आले. त्यांनी येथे वास्तव्य करून अखंड कीर्तन केले व ही सांगली पुनीत झाल्याने हे क्षेत्र झाले.' शिवाय येथे जे तपोवन आहे तेथे पूर्वी श्रीसमर्थ, आनंदमूर्ती, मिरजेचे अण्णाबुवा यांसारखे महान सत्पुरुष येऊन गेले. त्यांचे पदरजःकणाने ती जागा पवित्र झाली. श्रीसत्यव्रत तीर्थांनी तेथेच जिवंत समाधी घेतली. श्रीलक्ष्मण दीक्षितांनी तेथेच विश्रांती घेतली आणि सांगली हे क्षेत्र झाले. एखाद्या गावी संत साधू अवतीर्ण झाले तर ते क्षेत्र होते. मग एखाद्या क्षेत्रात जर साधुसंत अवतीर्ण झाले तर त्या क्षेत्राला कोणती उपमा देता येतील असा प्रश्न आहे?

**परमपूज्य राधाबाई अक्का आणि हरिपूर क्षेत्र**

श्रीराधाबाई अक्का या महान् अधिकारी आणि पुण्यश्लोक होत्या. पुण्यश्लोक म्हणण्याचे कारण प्रातःस्मरणाचे वेळी त्यांचे नांव घेऊन पुण्यवान् व्हावे अशी त्यांची खरी योग्यता होती.

अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।।
पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ।।



या मालिकेत त्यांचे नांव घेता येईल असेच त्यांचे चरित्र आहे. या अक्कांचे चरित्र पाहिले तर त्यांची उभी हयात परमार्थातच गेली. व्यावहारिक असे त्यांचे जीवन फारच थोडे आहे. मूर्तिमंत तपश्चर्या हीच त्यांची खरी चर्या असून त्या एक तपोमूर्तीच होऊन गेल्या. त्यांचे व्यावहारिक जीवनाचा थोडासा आढावा घेऊन त्यांचे अंतश्चरित्राकडे आपण वळू. संतांचे अंतश्चरित्र हेच त्यांचे खरे चरित्र असते. प्रारब्धाने त्यांचे व्यवहार भिन्न दिसतात. पण ते अंतरंगी एकच असतात. दिवे अनेक पण ज्योती एक पैकीच येथेही आहे, असे आपणास दिसून येईल. 'साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।।' असेच समर्थ म्हणतात. मग अशा पुण्यश्लोक श्रीराधाबाई अक्कांचे उभे आयुष्य ज्या हरिपूर क्षेत्रात गेले त्यांची थोरवी काय वर्णावी?

**श्रीराधाबाई आक्कांचे व्यावहारिक जीवन आणि परमार्थाचा श्रीगणेशा**

श्रीराधाबाई अक्कांचा जन्म सुमारे १७६ वर्षीपूर्वी झाला. खुद्द राधाबाई अक्कांचे जीवन हे अगदीच गुप्तपणाने व्यतीत झाले. त्यांनी आपली हकीगत आपल्या तोंडाने कोणालाच कधी सांगितली नाही.

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।।
हा अमुका ऐसी नोहावी । से चि लोका ।।

या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे आपले नांवही कुणाला कळू नये अशी त्यांची मनापासूनची इच्छा. मग त्या ठिकाणी पूज्यता आणि कीर्ती यांचे तर खरे वावडेच होते. आम्ही हे जे चरित्र लिहीत आहोत तेही आमच्या समाधानाकरिता व थोड्याच मिळालेल्या माहितीवरून. ज्यांचे परमार्थाला चकाकी व लकाकी नव्हती असा ज्यांचा खराखुरा परमार्थ आणि तोही अहर्निश होता. त्यांचे वेळची माणसे आता कालवश झालेली आहेत. अशा स्थितीत त्यांचे हे पुण्यस्मरण होत आहे. हा विषय आपण ध्यानात घेतला म्हणजे मला काय म्हणावयाचे आहे हे ध्यानी येईल.

श्रीराधाबाई अक्कांचे माहेरचे आडनाव 'वेंगुर्लेकर' असावे. आठव्या

वर्षात पूर्वीचे पद्धतीप्रमाणे अक्कांचा मंगल विवाह झाला. त्यांचे वयाचे चाळिसाव्या वर्षापर्यंत त्यांचे पती होते. नंतर ते दिवंगत झाले. अक्कांची वृत्ती ही लहानपणापासूनच विरक्त होती. त्यामुळे त्यांना एक मुलगी झाली. व ती मुलगी गद्रे घराण्यात दिली. अक्कांना एक दीर होता. परंतु त्यांना फेफऱ्याचा विकार जबरदस्त होता. त्यामुळे त्यांना वारंवार आचके येत असत. पूर्वीचा काळ. यामुळे अक्कांचे शिक्षण काहीच झालेले नाही. त्या आपले पायावर उभ्या नव्हत्या. अर्थात सर्व दृष्टीनेच त्या अगदी निराधार झाल्या. एकच आधार होता तोही गेला. आता या दिराला तरी काय घालावे व आपण काय खावे येथूनच सर्व प्रश्न उभा होता. खरोखरी त्यांना काही सुचेना. कोणी गोड बोलायलाही माणूस नाही. मग बाकीचे तर सारे दूरच राहिले. अशा स्थितीत अन्नत्याग हा एकच मार्ग त्यांना दिसला. व तोच त्यांनी आपल्या मनाशी या पतिनिधनानंतर निश्चित केला.

### देवाचा धावा

श्रीअक्कांना पतिनिधनाचे जे दुःख झाले ते शब्दांत सांगणे कठीण आहे. या काळात त्यांनी देवाचा सारखा धावा केला आणि 'देवा, तू हे काय केलेस?' एवढेच उद्‌गार काढले. त्या म्हणाल्या

धाव धाव रे श्रीहरी । अंत पाहसी केवि या परी ।।ध्रु।।
धाव धाव रे धाव केशवा । धाव धाव रे धाव माधवा ।।१।।
धाव धाव रे धाव राजसा । धाव धाव रे धाव पाडसा ।।२।।

हा धावा आमचे श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे कीर्तनात प्रसंगोपात्त येत असे. अशा स्थितीत शेजारधर्म या नात्याने शेजारच्या लोकांनी अगदी आग्रहाने त्यांना खावयास घातले व 'राखावी बहुतांची अंतरे' या श्रीसमर्थोक्तीप्रमाणे त्यांनी अन्नसेवनही केले. याप्रकारे चौदा दिवस झाल्यावर मात्र कोणाचेही न ऐकता श्री अक्कांनी पुन्हा अन्नत्याग केला. एका प्रकारे श्री अक्कांचे आयुष्यातील ही एक मोठीच कसोटी होती. नव्हे नव्हे ते एक अग्निदिव्यच होते.



**निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ ।।**

अजिबात अन्न नाही की पाणी नाही. अशा स्थितीत देवाचा धावा करीत अक्का राहिल्या. चोवीस तास झाले. पंधरावे दिवशी पहाटे श्रीअक्कांचे स्वप्नात पहाटे एक तेजःपुंज असा ब्राह्मण आला. तो ब्राह्मण होता का आणि कोण होता हे येथे वाचकांनीच ठरवावयाचे आहे. श्रीतुकाराममहाराजांना ज्याप्रमाणे स्वप्नात श्रीबाबाजींनी अनुग्रह दिला व श्रीपांडुरंगच श्रीबाबाजींचे रूपाने आला हे आमचे मनचे मांडे नव्हेत. खुद्द श्रीतुकाराममहाराजच म्हणतात,'माझ्या विठोबाचा कैसा प्रेम भाव । आपणचि देव होय गुरू ।।' कदाचित हे म्हणणे कोणास मोघम वाटेल तर श्रीतुकाराममहाराज आणि एका ठिकाणी म्हणतात 'ब्रह्मानंद माझा गुरू । कैसा फेडू हा उपकारु ।।' नव्हे नव्हे 'पांडुरंगे सत्य केला अनुग्रह । निरसिला संदेह अहं बुद्‌धी ।।' असेही सांगतात, खुद्द श्रीपांडुरंगांनीच श्रीबाबाजींचे रूपाने अनुग्रह केला व माझी अहंबुद्‌धी व संशय पार काढूनच टाकला असे म्हणणेचा श्रीतुकाराममहाराज यांचा भावार्थ आहे. सांगावयाचे कारण इतकेच की जो ब्राह्मण श्रीअक्कांचे स्वप्नात आला तो अक्कांना म्हणाला,'तू काही शोक करू नकोस. आता नाम घे.' अक्का त्या ब्राह्मणाला म्हणाल्या, 'महाराज, या अवस्थेत मी कोणाला तोंड दाखवू? जाऊ तरी कोठे? व कोणाकडून नाम घेऊ व हे तरी मला सांगा.' मग तो तेजस्वी ब्राह्मण म्हणाला, 'मीच तुझा गुरू आहे व मीच तुला नाम सांगतो.' मग श्रीअक्कांनी त्या महापुरूषाचे पाय धरले व त्यांनी अक्कांचे कानात तारकमंत्राचा उपदेश केला. अक्का पुनीत झाल्या. 'शोक करू नको, नाम घे, समाधान मिळेल,' हे शब्द स्पष्ट शब्दात श्रीअक्कांचे कानावर आले. आणि अक्का जाग्या झाल्या. निश्चयाचे एक फळ असे अक्कांना मिळाले हे सांगणे नकोच.

### प्राप्त परिस्थितीतच निर्वाह

ब्राह्मणाने अगदी कानात मंत्र सांगितला. अक्कांना तितकाच या अग्निदिव्यात थोडा विरंगुळा वाटला. क्षणभर त्या सारे विसरूनही गेल्या. पण

पुढे दिराला काय खावयास घालावयाचे व आपल्या पोटाला आहुती तरी कशाची द्यावयाची हा भेडसावणारा प्रश्न उभा होताच. ब्राह्मणाने आपणास अनुग्रह तर दिलाच आहे. आता नामस्मरणाने हा देह सार्थकी लावावा. मग काहीही होवो. हाच विचार शेवटी पक्का झाला. पण अन्नमय प्राण असल्याने नामस्मरणात काळ घालवण्याकरिता जी शरीरात शक्ती पाहिजे तेवढ्या अन्नाची तरी नितांत गरज आहे हेही अगदी निःसंदिग्ध स्पष्ट झाले. आणि श्रीअक्कांनी या दृष्टीने आपली आयुष्याची पुढची दिशा आखली. आणि तशीच पाउले टाकली. चारबिघे जमीन जी वाटणीस आली होती त्यातच अक्कांनी आपला निर्वाह चालविला व अखंड नामस्मरण मोठ्या निष्ठेने चालू झाले.

**नाम विठोबाचे घ्यावे । पुढे पाऊल टाकावे ।।**

श्रीअक्कांना श्रीकृष्णाची भक्ती फारच होती. मुखाने सारखे कृष्ण कृष्ण चालू असायचे. अयाचित वृत्तीने त्या रहात. समाधानाने व स्वेच्छेने कोणी भिक्षा घातली तरच त्या घेत. कोरडी भिक्षा घेत. त्यात दिराला वाढून कोणी अतिथी आल्यास त्यास वाढून उरले तर आपण घ्यावयाचे. 'श्री अतिथि देवो भव' हे श्रुतीतील वचन त्यांचे ठिकाणी पूर्ण बाणलेले होते.

**श्रीअक्कांची तपश्चर्या**

सतत भगवंताचे स्मरण हीच खरी तपश्चर्या आहे. 'पांडुरंग नाम जप । हेचि माझे महा तप।' असेच जनाबाईनी म्हटले आहे. चित्तशुद्धीशिवाय चैतन्याचा साक्षात्कार नाही व नामाशिवाय चित्तशुद्धी नाही. हे अक्कांनी पूर्णपणे वोळखले होते. 'नामे होय चित्त शुद्धी । नामे होय दृढ बुद्धी ।।' असेच श्रीसमर्थ म्हणतात. अक्कांचे नामस्मरण तर चालू होतेच. पण त्यांनी आपल्या जिभेवर फार मोठे नियंत्रण घातले होते. अक्कांनी एक गाय पाळली होती. हिंदू धर्मात गाईला श्रेष्ठ स्थान आहे. 'हिंदू धर्माचे भूषण । गाय तुळशी वृदांवन ।' ही उक्ती तर प्रसिद्धच आहे. शिवाय 'दारी तुळस हिरवी गार । पहा हो संतांचा संसार ।' असेच श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. यापुढे



अक्कांनी तप, साधना करण्याचे ठरविले. गाईला जोंधळे खाऊ घालावयाचे. शेणातून पडलेल्या जोंधळ्याची भाकरी गोमूत्रात करावी आणि ती खावी. काय ही त्यांची तपश्चर्या. काही कल्पना करता येते का? आपली तर बुद्धीच चालत नाही. या गोष्टी बोलतानाही अंगाला घाम फुटेल. मग आचरणात आणणे तर दूरच राहो. श्रीअक्कांनी अशी अंतर्बाह्य तपश्चर्या केली.

दोन बोटे देवाला व तीन बोटे आपल्याला. एक खारीक उगाळावी. दोन बोटे देवाला चढवावी व तीन बोटे आपण घ्यावी. 'भुकेलीया भूकची खावी। तहानेलिया तहानची प्यावी ।। अहोरात्र वावी । ममावा वारा ।।१।।' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे अक्कांची नामस्मरणाने अवस्था झाली होती. त्यांना देहाची शुद्धच नव्हती. त्या आत्मसाधनात रंगल्या होत्या. आणि एक वर्षे, एक दिवस नव्हे, दोन दिवस नव्हे अशी तपश्चर्या त्यांनी वीस वर्षे केली.

**शुद्ध ज्याचा भाव झाला । देव दुरी नाही त्याला ।।**

श्रीराधाबाई अक्कांना श्रीकृष्णाची ओढ, तर प्रत्यक्ष कृष्णाला या राधाबाई अक्कांची ओढ लागली. आणि ही राधाकृष्णाची ओढ तर पूर्वीपासून प्रसिद्धच आहे. 'राधा मोठी हरदम ख्याली कृष्णाला लंपट झाली' असे श्रीनाथमहाराजांनी आपल्या गौळणीत सांगितले आहे. आमचे श्रीमामा (श्रीबापूरावजी केळकर) हे नित्याचे कीर्तनात प्रसंगोपात्त सांगावयाचे 'राधा ही हराने आपल्या दमात जे काही धारण केले आहे असे जे कृष्ण नाम त्यात रंगून गेल्याने ती कृष्णाशी एकरूपच झाली.' अर्थात ही झाली फार पुरातनची द्वापार युगातील गोष्ट. पण आपण आता जो प्रसंग पाहणार आहे तो या शेदोनशे वर्षातीलच आहे. कृष्णाला या अक्कांचेकडे यावेसे वाटले. जो ब्राह्मण पूर्वी अक्कांचे स्वप्नात आला होता तोच पुन्हा अक्कांचे स्वप्नात आला आणि म्हणाला, 'मी विष्णुरूप आहे. तुझ्याकडे मी येत आहे. तू अन्नसंतर्पण कर.' अक्का म्हणाल्या, 'मजजवळ पैसा नाही मग मी अन्नसंतर्पण कसे करावे?' कारण ब्राह्मण भोजन घालावयाचे तर धान्याची कोठी तयार हवी. ब्राह्मण म्हणाला, 'तू भिक्षा मागून अन्नसंतर्पण

कर. मी येतोच. माझी स्थापना कर.' यावरून अक्कांना मागे अनुग्रह देणाराही ब्राह्मण कोण हे तर आता स्पष्टच होत आहे. सूर्यप्रकाशाइतकी ही सत्य गोष्ट आहे. हे आपणास दिसून येईल.

### कै.श्रीमंत धुंडीराज तात्यासाहेब सांगलीकर यांना झालेला दृष्टांत

श्रीकृष्ण परमात्म्याने कै.श्रीमंत तात्यासाहेबांच्या स्वप्नात येऊन "आपण कोठीमधे बरीच वर्षे असलेने तेथे आपल्याला अजिबात करमत नाही. म्हणून मला येथून तीन मैलावर असलेल्या श्रीहरिपूर क्षेत्री श्रीराधाबाई अक्का म्हणून माझी एक परमभक्त आहे. तिच्याकडे लगेच पोहचते करावे. मला तेथे जाण्याची उत्कंठा आहे. तेथे माझे सारे कोडकवतुक होईल. तरी मात्र येवढे जरूर करावे" असे सांगितले. प्रथमतः ते स्वप्न आहे अशा वारीच गेले. स्वप्नात काही तरी दिसले असेल असेही वाटले. श्रीतात्यासाहेबही मोठे भाविक होते. आपण या कृष्णाची काहीतरी चांगली व्यवस्था करावी असेच खरे त्यांचे मनाने घेतले व तशी योजनाही केली. पण भगवंतांनी पुन्हा स्वप्नात येऊन 'मला तेथेच जायचे आहे' असे सांगितले. 'मला राधाबाई अक्काकडूनच सेवा घ्यायची आहे. तरी तेथे पोचवावे' म्हणताच श्रीमंतांनी हरिपुरास येऊन श्रीराधाबाई अक्कांचे कानावर या तीन वेळा झालेल्या दृष्टांताची गोष्ट घातली. अक्कांनाही परमानंद झाला. सरकारी लवाजम्यानिशी पालखीतून श्रीमंतांनी ही कृष्णाची मूर्ती मोठ्या थाटामाटाने हरिपुरास आणली. या पालखी सोहळ्यात बहु संख्येने वारकरी दिंड्याही सामील झाल्या होत्या. भजनाचा रंग अपूर्व होता. याप्रकारे भगवान श्रीराधाबाई अक्कांचेकडे आले.

### वैष्णवाघरी देव सुखावला

"आता श्रीकृष्णाची स्थापना करण्याचे दृष्टीने आपण सर्वतोपरी सहकार्य देऊ. देवाला काही उत्पन्नही कायमचे देऊ," असे श्रीमंतांनी राधाबाई अक्कांना सांगितले. अक्कांची परिस्थिती काय आहे हे जातीनेच श्रीमंतांनी पाहिले होते. त्यांची परिस्थिती पाहून श्रीमंतांचे डोळे अक्षरशः पाणावले व केवळ भक्तीला



लुब्ध असल्यानेच भगवान् येथे आले आहेत हे ओळखून श्रीराधाबाई अक्कांची योग्यता जाणली. श्रीमंत काय म्हणतात ते अक्कांनी ऐकून घेतले व म्हणाल्या, "मग हा देव माझेकडे कशासाठी आला हेच मला कळेनासे झाले आहे. त्याने तुम्हालाच एखादे मंदिर बांधावयास खरे सांगावयास हवे होते. आणि तेथे याला कमी तरी काय झाले असते. परंतु एवढे दोन तीन वेळा सांगून जातो येथे आला आहे त्याला फक्त माझे कडून सेवा घ्यावयाची आहे हे निश्चितच आहे. माझे जवळ जे असेल तशी तो मजकडून सेवा घेईल. यापेक्षा मी तरी काय सांगू?"

अक्कांचे करिताच भगवान् आले. भगवंतानी अक्कांचेकडे वास्तव्य केले. आता देऊळ कोठे बांधावे व स्थापना कशी करावी हा प्रश्न होता. हरिपुरात भोई लोकांची वस्ती वेशीचे आतील बाजूस होती. श्रीमंतांनी भोई लोकांना दुसरीकडे घरे देऊन ती जागा या राधाकृष्णास दिली. भिक्षेवरच श्रीराधाबाई अक्कांनी देऊळ बांधले व भगवंताची स्थापना शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थितपणे केली. अन्नदानही भरपूर झाले. मोठा आंनदी आनंद झाला. जो तो म्हणू लागला 'हा सुखसोहळा स्वर्गी नाही.' अक्कांनी देऊळ उत्तमच बांधले. व पुढील सभामंडपाचे काम जुजबी केले. आणि पहाटे काकड आरती, सकाळी पूजा, नैवेद्य, दुपारी महानेवैद्य, रात्री भजन, शेजारती वगैरे प्रकारे नित्यनेमाने भगवंताची अखंड उपासना निष्ठापूर्वक आचरणात आणली. आणि साधुसंतांनाही त्या एक आदर्शच होऊन राहिल्या.

### गोपाळकृष्णाने तोंड वळविले

श्रीअक्कांचेकडे आलेली श्रीगोपाळकृष्णाची मूर्ती ही केवळ मूर्तीच नसून प्रत्यक्ष गोपाळकृष्णच आले होते. ही श्रीकृष्णांनीच प्रत्यक्ष भक्तवत्सलता सिद्ध करून दाखविली तेव्हाच श्रीराधाबाई अक्कांचा पारमार्थिक अधिकार काय आहे हे सर्वांना समजून आले. प्रसंगाशिवाय खरे काहीच समजत नाही हेच खरे आहे. एकदा असे झाले :- श्रीराधाबाई अक्का या भगवंताला नैवेद्य दाखविण्याकरिता गेल्या असता या कृष्णमूर्तीने आपले तोंड वळविले. आता

ही कृष्णाची मूर्ती का प्रत्यक्षच भगवान् अक्कांचेकडून सेवा घेत होते असा येथे एक मार्मिक प्रश्न आहे. अक्कांनी देवाला गहिवरून विचारले, 'देवा तू का खात नाहीस? आज काही उष्टे वगैरे झाले आहे का?' देवाने सांगितले, 'हो तसेच झाले आहे.' अक्कानी स्वयंपाकघरात येऊन विचारले, 'आज देव काही खात नाही. त्याला नैवेद्य दाखवण्यापूर्वी कोणी उष्टे केले आहे का? खरे खरे बोला नाही तर माझ्या देवाला आज उपवास होणार आहे. मला झाला तर एकवेळ चालेल पण माझा देव उपाशी राहील. तरी खरे जे घडले असेल ते एकवेळ सांगा. उष्टे झाले आहे असे मला देवानेच सांगितले आहे. त्याचे पुढे खोटे चालणार नाही. व मी तरी याकरताच विचारणेस आत आले आहे.' मग एका बाईने सांगितले, 'मी मेतकूट कसे झाले आहे हे पहावे म्हणून तोंडात टाकले होते हे मात्र खरे आहे. आणि खरेच माझ्या ध्यानात ते आले नाही. म्हणून मजकडून घडले. अक्का मला खरच माफी करा.' मग अक्कांनी देवाची माफी मागितली व देवाने जे आपले तोंड वळवले होते ते पानाकडे केले आणि तो जेवला. ज्यांचे घरी नेवैद्य आणला की देव जेवत असे त्यांचे भाग्याचे मोजमाप कोणी व कसे करावे? असे वाटल्यावाचून रहात नाही. श्रीनामदेवमहाराज यांचे हातचे भगवान् जेवले पण त्याला जवळजवळ सातशे वर्षे झाली. आमचे भगवान् श्रीसद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे हातचे भगवान् जेवले पण शंभर सव्वाशे वर्षे झाली. अशा गोष्टी का वारंवार घडतात का? त्यातीलच हा एक प्रकार आहे. नाहीतर तुझ्याकडे हात व माझ्याकडे भात असा नैवेद्य मोठ्या श्रद्धेने घरोघरी होतच असतो.

### साखरेचे मीठ झाले

अक्कांची योग्यता आता थोडी फार कळली होती, नाही असे नाही. तरीपण हे सर्व काही थोतांड आहे असे वाटून बायकांनी एक दिवस गम्मत केली. देवाचे नैवेद्याकरिता जी खीर केलेली होती, त्यात सारे मीठच घातले. व साखर तशीच ठेवून दिली आणि अक्कांना मात्र हे चुकून झाले आहे असे सांगितले.



अक्का म्हणाल्या, 'आता मिठाच्या जागी तुम्ही साखरच घाला म्हणजे झाले.' आणि आश्चर्य म्हणजे खिरीत जे मीठ घातले होते त्याची साखर झाली. खीर गोड झाली. नासली तर नाहीच आणि मिठाचे जागी जी साखर घातली होती त्याचे मीठ झाले. हा चमत्कार पहाताच अक्कांची पुन्हा अशी परीक्षा घ्यायची नाही हा निश्चय करून पश्चात्तापपूर्वक त्या बायकांनी अक्कांचे पाय धरले व क्षमा मागितली. अक्का म्हणाल्या, 'यात माझे काय सामर्थ्य आहे? हा तर सगळा माझ्या कृष्णाचा खेळ आहे. तो आत बसला आहे ना? त्याचे पाय धरा.'

### साठ एकर जमीन सुटेल

कोल्हापूर येथील खर्डेकर आडनावाचे गृहस्थ दीडशे एकर जमिनीचे मालक होते. पैसे कर्जाऊ घेतल्याने जमीन गहाण दिली होती. कोर्टामध्ये या जमिनीबद्दल वाद चालला होता. खर्डेकर यांनी 'गोपाळकृष्ण याबद्दल काही सांगतो का पहा' असा अक्कांना एकदा प्रश्न केला. अक्का म्हणाल्या, 'तू माझे मागून ये आणि पाउले मोजून किती पाउले होतात ते सांग.' देवळाच्या बाहेर येऊन रस्त्यावर थांबल्या आणि किती पावले झाली असे खर्डेकरना विचारताच साठ पावले झाली असे त्यांनी सांगितले. अक्का म्हणाल्या साठ एकर जमीन सुटेल. आणि कोर्ट दरबारी निर्णय होऊन खर्डेकर यांची साठ एकरच जमीन सुटली.

### अन्नसंतर्पणाकरिता दोनशे रुपये

हरिपूर येथे अण्णा गोखले या नावाचे फारच मोठे सावकार होते. एका वेळेला एक लाख रुपये देतील अशी त्यांची हिम्मत होती. अन्नसंतर्पणाकरिता अक्का या गोखलेंकडे दोनशे रुपये मागायला गेल्या तेव्हा गोखले यांचेजवळ फक्त दोनशे रुपयेच शिल्लक होते. अक्का म्हणाल्या, 'दुकानदाराने तसेच उधार सामान दिले आहे. पण त्याचे कशाला ठेवून घ्यावे म्हणून माझ्या गोपाळकृष्णाने सांगितल्यावरून मी तुमच्याकडे आले आहे.' अण्णा म्हणाले, 'अक्का, खरंच पैसे शिल्लक नाहीत. असते तर नक्कीच दिले असते.' अक्का म्हणाल्या, 'अहो अण्णा, पेटी तरी उघडून पहा आणि मग काय ते सांगा.' यामुळे अण्णांनी पेटी

उघडली पण त्यात खरेच दोन रुपये शिल्लक होते. पण मौज अशी कोथळीच्या पाटलांकडून एक हजार रुपये येणे होते. बरेच दिवस झाले ते पैसे मागावयाचेच होते. त्यांचे कडून एक हजाराचा तोडा घेऊन सनदी तेवढ्यातच तेथे येऊन दाखल झाला. अण्णांनी ते पैसे घेतले व जमा करून पावती दिली आणि अक्कांना सांगितले, 'आता लागतील तेवढे पैसे घेऊन जावा. एक हजार नेले तरी हरकत नाही.' अक्का म्हणाल्या 'दुकानदाराचे दोनशे रुपये द्यावयाचे आहेत ते तेवढेच मला पुरे आहेत.' अर्थातच अक्का दोनशे रुपये घेऊन आपल्या घरी आल्या. देवाने अक्कांचेकरिता अगदी अलीकडच्या या काळात काय काय केले हे पाहिले म्हणजे मन थक्क होते. या गोष्टीला आठ दिवस झाले. कोथळीचे पाटील एक हजार रुपयांचा तोडा घेऊन आले व अण्णांची माफी मागितली. अण्णा म्हणाले, 'अहो पाटील, माझी काय थट्टा करता काय? तुम्ही सनदीकडून ते पैसे पाठविले आहेत. आणि ते जमा करून पावतीही दिली आहे. आणि पुन्हा हा तोडा तुम्ही कसला आणला हे काही मला कळतच नाही.' पाटील म्हणाले, 'अहो अण्णा, हे काय बोलता तुम्ही ते मला काही कळेना. अहो मी सनदी पाठवलाच नाही. मग तोडा आणला कोणी?' अण्णा जो पहातात तो ते पैसे जमेलाही नाहीत व पावती दिल्याबद्दल काही दाखलाही नाही. मग ते एक हजार जमा करून पाटलांना पावती दिली. येवढ्यात श्रीअक्का दोनशे रुपये घेऊन अण्णांना देणेसाठी तेथे आल्या. अण्णा गोखले म्हणाले, 'अक्का तुमचेसाठीच गोपाळकृष्णाने ते पैसे दिलेले होते. मला खरे काही कळतच नाही आहे.' असे म्हणून त्या सावकारांनी सर्व प्रकार अक्कांना अगदी मोकळ्या मनाने सांगितला व ते दोनशे रुपये मला तुम्ही देऊ नका असे सांगितले. अक्का म्हणाल्या, 'अण्णा, मी तुमचेकडून पैसे उसने नेलेले आहेत मग ते द्यावयास नको का? हे घ्या, तुम्ही माझे ऐका.' अण्णा म्हणाले, 'ही मी भिक्षा घातली आहे असे तुम्ही समजा. मग तर काही प्रश्न नाही ना?' अक्का म्हणाल्या 'मी आता यावेळी पैसे देणे करताच आले आहे. मला गोपाळकृष्णाने पाठविले आहे. मी भिक्षेला मुळी आलेलीच नाही. तर मग मी ही भिक्षा कशी घ्यावी?' मग अण्णांनी ते पैसे



घेतले. अर्थात् या घटनेने अण्णांचे अंतःकरणात श्रीअक्कांचे बद्दल काय श्रद्धा निर्माण झाली असेल याची कल्पना वाचकांनीच करावी.

### पाण्याचे तूप झाले

सांगली येथे सरकारी गणपतीचे महोत्सवात पूर्वी फारच मोठ्या प्रमाणावर रमणा होत असे. ऋषिपंचमीस रमणा ठरलेलाच होता. पावली पावली दक्षिणा मिळे. त्या काळात पावलीला फारच किंमत होती. आणि गोप्रदानही एका पावलीत त्यावेळी लोक करीत. अशाप्रकारचा तो काळ फारच स्वस्ताईचा असल्याने व पैशाला किंमत असल्याने एका जेवणाकरिता फार लांबच्या पल्ल्याची माणसे येत असत. हरिपूरचे पट्टीचे जेवणारे मुंबईपर्यंत जाऊन त्यावर पैसे कमवीत असत. अशी उदाहरणे आजमितीसही पुष्कळांचे ऐकिवात आहेत. एके वर्षी तिथीचा काही गोंधळ झाल्याने आदले दिवशीच रमणा आहे असे समजून तीनशे माणसे फार दूरची सांगलीस प्रतिवर्षी प्रमाणे आली होती. मग हरिपूर येथे श्रीराधाबाई अक्कांकडे नित्य अन्नसंतर्पण होत असते. तेथे तुम्ही आज जा. तेथे तुमची चांगली सोय होईल. व उद्या तुम्ही येथे रमण्यास या, असेच या लोकांना सांगणेत आले. त्याप्रमाणे ही सर्व मंडळी हरिपुरास श्रीअक्कांकडे आली. तोपर्यंत अक्कांनी अन्नसंतर्पण होऊन आपली थाळी पालथी घातलेली होती. या लोकांनी आपली सर्व घडलेली हकीगत अक्कांचे कानावर घातल्याने अक्कांनी त्याना स्नान करून या म्हणून सांगितले. अक्कांनी ही सर्व मंडळी संगमावर स्नानास गेल्यानंतर दामले यांचे दुकानातून सर्व सामान आणले व कोथळीस दोन घागरी तूप आणणेकरिता दोघा इसमांना पाठवून दिले व चरकात जाऊन तूप घेऊन या असे सांगितले. अक्कांचा शब्द वेदवाक्याइतका सर्वांना वंद्य असल्यामुळे स्वयंपाकाची तयारी हा हा म्हणता झाली. सारी माणसे स्नानसंध्या करून अक्कांचेकडे आली. पाटपाणीही झाले. पण तुपाचाच पत्ता नाही. कोथळीस गेलेल्या माणसांना परत येणेस फारच वेळ लागला. देवाजवळ दोन घागरी पाण्याच्या भरलेल्या नित्याप्रमाणेच ठेवलेल्या होत्या. 'तेच तूप वाढावयास घ्या व भोजनास आता उशीर झाल्याने लगेच

सुरुवात होऊ दे', असे सांगितले. आश्चर्य, त्याच पाण्याचे तूप झाले. सर्वांचे जेवण समाधानाने आणि आकंठ झाले. सर्वजण हात धुणेस बाहेर येतात तोच कोथळीहून तुपाच्या घागरी आल्या. तेव्हा कृष्णाबाईने दिलेले हे तूप कृष्णाबाईला द्या म्हणून श्रीअक्कांनी सांगितले. त्याप्रमाणे त्या दोन्ही घागरी संगमावर जाऊन ओतल्या व पुनः कृष्णाबाईचे दोन घागऱ्या पाणी देवाजवळ आणून ठेवले. सर्वांनाच आश्चर्य वाटले व श्रीअक्कांना वंदन करून सारी मंडळी तेथून सांगलीस रमण्यासाठी परत आली.

### माझिये जातीचे मज भेटो कोणी

जयाचा जगी जन्म नामार्थ झाला । जयाने जनी वास नामात केला ।।
जयाच्या मुखी सर्वदा नामकीर्ती । नमस्कार श्रीब्रह्मचैतन्यमूर्ती ।।१।।

या श्लोकात ज्या महात्म्याचे स्वरूप, पारमार्थिक अधिकार व तत्त्वज्ञान सांगितले आहे, ज्यांचा जन्म केवळ नामाकरताच झाला म्हणून ज्यांना नामावतार म्हणतात, ज्यांचे नाम हेच जीवन असल्याने ज्यांचा वास भगवंताच्या नामातच आहे, ज्यांचे मुखातून नामाशिवाय कोणी काही ऐकलेच नाही, असे जे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज ते सद्गुरूच्या शोधार्थ जे घरातून बाहेर पडले ते थेट हरिपुरास प्रथम या अक्कांचेकडेच आले. यावरून श्रीअक्कांची खरी योग्यता ध्यानात आल्यावाचून रहात नाही. ब्रह्मचैतन्य हे तर मूर्तिमंत ब्रह्म आणि चैतन्य होते. हे काही काव्य अगर कांदबरी तर नव्हे ना! या नावाला तर खरोखरीच फार मोठा अर्थ आहे. विचार केला तर दिसून येईल. ब्रह्मचैतन्य हे नांव अगदी सार्थ-यथार्थ असेच आहे. त्या महात्म्यांनी श्रीक्षेत्र इंदूर येथे पानात कोणी घातलेले निखारे खाऊन दाखविले. आपल्याला वाफेसरशी भात तर खाता येतो का? हा प्रश्न आहे. बरे ज्या बाईंनी पानात निखारे घातले ते निखारे भक्षण करताच बाईनी अक्षरशः पाय धरले. यावरून हे काम चैतन्याचेच आहे हे स्पष्ट होते. हा प्रसंग पाहिलेली म्हातारी माणसे अजुनी क्वचित असतीलही. कोणी विष्णूचा अवतार, कोणी शंकराचा, कोणी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा तर कोणी



श्रीनामदेवांचा अवतार, पण श्रीब्रह्मचैतन्य यांना मात्र नामावतार असे म्हणण्यात येते. का? नाम हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहे. हे तर जाणती माणसे जाणतातच. 'नाम रामसे जादा भाई नाम रामसे जादा । सागर उप्पर फत्तर तारे पावे रघुवीर खेदा।' हा प्रसंगच श्रीकबीरांनी नामाचे महत्त्व सांगताना सर्वांपुढे ठेवला आहे. ज्या ब्रह्मचैतन्यांनी ब्रह्मानंद, आनंदसागर, कूर्तकोटी आणि श्रीतात्यासाहेब केतकरमहाराज यासारखे महापुरुष निर्माण केले, गावोगांव रामभक्ती प्रसृत करून राममंदिरे स्थापन केली, अनेक ठिकाणी रामनामाचे सप्ते सुरू केले आणि आसेतुहिमाचल रामनामाचा प्रसार केला, 'गुरुराव माझे ब्रह्मची साकार' ही थोरवी ज्यांचे संबंधाने काव्यात प्रकाशमान झाली, असे श्रीब्रह्मचैतन्य प्रथम या हरिपूरसारख्या अगदी लहानशा खेड्यात श्रीअक्कांची भेट घेतात ही गोष्टच अभूतपूर्व आणि श्रीअक्कांच्या योग्यतेची साक्ष सूर्यप्रकाशाप्रमाणे सर्वांना देणारी आहे असे मला वाटते. 'माझीये जातीचे मज भेटो कोणी' असे श्रीब्रह्मचैतन्यांना वाटले आणि श्रीअक्कांनाही वाटले. यामागे काही ईश्वरी सूत्र निश्चितच आहे. आणि आपण ते ओळखून त्याचे महत्त्व जाणावयाचे आहे.या एकाच गोष्टीने पुढे अनेक संतसज्जन या पुण्यवान् जागेमध्ये नाना प्रकाराने येऊन गेले. तो वृत्तांत पुढे यथाक्रम येईलच.

श्रीअक्कांनी सांगितलेवरूनच श्रीब्रह्मचैतन्य हे मिरजेला विदेही साधू श्रीअण्णाबुवा यांचे दर्शनास गेले. दत्तावतार श्रीअक्कलकोट स्वामी, श्रीमाणिकप्रभू अशा महापुरुषांकडे जाऊन शेवटी श्रीतुकामाई यांचेकडे येळेगावी येऊन त्यांचे अनुग्रहाने चैतन्यरूपच झाले. सद्गुरुशोधाची पूर्तता ईश्वरी सत्तेने येथे झाली. आणि संतांचे महत्त्वही याच पर्यटनात स्पष्ट झाले.

### एकमेकांचे हृदयी

याच प्रसंगाला अनुसरून या चरित्राशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी एक प्रसंग सांगणेचा मोह होतो. आणि हा मोह गैरवाजवी आहे असे कोणी म्हणणार नाही असा मला पूर्ण विश्वास आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष कोठेच उद्धृत

केली गेली नाही हेही तितकेच सत्य आहे. पण त्याचबरोबर ही गोष्ट मी ज्यांचे तोंडून ऐकली त्यावरून ती तितकीच सत्य आहे हेही तितकेच सत्य आहे. श्रीराधाबाई अक्कांचा उल्लेख श्रीब्रह्मचैतन्यांचे पुष्कळ चरित्रातून आलेला आहे. आता जो प्रसंग आपण पहाणार त्याचा उल्लेखही कोठे नाही. तरी पण ती महत्त्वाची असून ज्यांचे संबंधी ती गोष्ट आहे त्यांचा व राधाबाई अक्कांचे या स्थानाचा का होईना पुढे संबंध आलेला आहे. श्रीराधाबाई अक्कांचे नंतर येथे त्यांची कीर्तनेही पण झालेली आहेत. असे महापुरुष श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज हे सांगलीचे आध्यात्मिक वैभव. श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांना पुढे कोणी विचारले, 'मिरज व कागवाड येथे तुम्ही बरेच वेळा गेलात पण सांगलीस श्रीतात्यासाहेब कोटणीसांसारखे महापुरुष असून तुम्ही सांगलीस कसे गेला नाही?' श्रीब्रह्मचैतन्य म्हणाले,'फार चांगला प्रश्न केलात. अहो काय सांगू? श्रीतात्यासाहेब कोटणीस आणि आम्ही दोघेही एकच आहोत. म्हणून माझे येणे सांगलीस झाले नाही. माझे म्हणणेतील आशय कळला का?' मग ज्यांनी हा प्रश्न केला त्यांनी श्रीब्रह्मचैतन्यांचे पाय धरले. प्रश्नाचा उलगडा फारच चांगला झाला. शिवाय माझे श्रीसद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांची ही योग्यता या प्रसंगाने सर्वांना कळली. आता झाकून तरी का ठेवावे? ही गोष्ट मला श्रीब्रह्मचैतन्यांचे परमभक्त श्रीहरिभाऊ हरिदास हे आमचे घरी माझे वडील श्रीबापूरावजी केळकर यांचेकडे येत असून त्यांचेकडूनच मला ही गोष्ट कळली. येथे ही गोष्ट नमूद करणे अप्रस्तुत होणार नाही असे वाटल्यावरून दिली आहे.

### तू कीर्तन कर

म्हणवा हरीचे दास । तुका म्हणे मजही आस ।।१।।

असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. श्रीअक्कांनाही मनापासून अशीच खरी इच्छा होती. हे एका घडलेल्या प्रसंगाने स्पष्ट होत आहे असे आपणास दिसून येईल. हरिपूर येथे चिंतामणशास्त्री तेलंग या नावाचे उत्तम विद्‌वान ब्राह्मण रामाचे देवळात भागवत सांगत असत. संस्कृतात तर त्यांचा हात कोणीच



धरणार नाही इतका त्यांचा व्यासंग होता. 'तू कीर्तन कर', असे एकदा श्रीअक्का या शास्त्रीबुवांना म्हणाल्या. शास्त्रीबुवा म्हणाले, 'अक्का, मी भागवत सांगतो हे खरे, पण मला कीर्तन काय करता येणार? कारण मी तर कीर्तन कधीच केलेले नाही.' अक्का म्हणाल्या, 'अरे, तू कीर्तनाला उभा तर रहा. तुझे कीर्तन उत्तमच होइल. इतकेच नव्हे तर ते माझ्या गोपाळकृष्णाला फारच आवडेल.' श्रीअक्कांचेवर शास्त्रीबुवांची फारच निष्ठा होती. या अक्कांच्या प्रेमळ आश्वासनाने आणि आशीर्वादाने त्यांचे मनाला धीर आला व अक्कांचे आज्ञेप्रमाणे कृष्णाला व अक्कांना नमस्कार करून ते कीर्तनास उभे राहिले मात्र संस्कृतमध्येच शास्त्रीजींनी अस्खलित असे चार तास कीर्तन केले की जे ऐकताना सामान्य श्रोतेही भक्तिरसात अक्षरशः न्हाऊन निघाले. पुढे शास्त्रीजींनी श्रीगोपाळकृष्णाची प्रतिवर्षी सेवा केली, हे सांगणे नकोच.

### कोणे दिशी मागू जाता न मिळे भाजीचे पान

हरिपूर येथे जगन्नाथ गोपाळ ताम्हनकर यांचे आजोबांचे घरी अक्का एकदा गेल्या होत्या. त्यांनी भिक्षा मागितली. त्यांचे घरची परीस्थिती अगदीच गरिबीची होती. घरात धान्याचा कण तरी आहे की नाही अशी अवस्था. घरात खरे म्हणजे काहीच नव्हते. मग बोलावयाचे तरी काय आणि त्यापेक्षा भिक्षेत घालावयाचे काय? असा प्रश्न उभा राहिला. तेव्हा 'घरात जे असेल तेच घाला' असे अक्कांनी सांगितले. 'घरात काहीच नाही आणि तुम्हांला अगदी भिक्षेला येथेच यावे असे वाटले काय?' म्हणून अगदी आदळआपट करीत बाईने थोडी भिक्षा घातली. अक्का देवळाकडे निघाल्या. तोच सांगलीहून श्रीमंत बाळासाहेब लागू यांचे आजोबांनी चातुर्मासात दहा माणसांना चार महिने पुरेल इतका शिधा ताम्हनकरांकडे पाठविला होता. तो त्यांचे घरी नोकराने त्याचवेळी नेऊन दिला. मग 'आणखी भिक्षा घ्या' म्हणून ती बाई अक्कांचे मागे लागली. अक्का म्हणाल्या, 'मला एवढीच भिक्षा पुरे आहे.' बाईने अक्कांना भिक्षा घातली केवढी आणि देवाने बाईला दिले काय? याचे सर्वांनाच आश्चर्य

वाटल्यावाचून राहिले नाही. त्या दिवशी हरिपूरात हा एक सर्वत्र चर्चेचाच विषय झाला होता. अक्का मात्र मोठ्या समाधानाने, आदळआपट करीत ज्या बाईने अल्पस्वल्प भिक्षा घातली होती, तेवढीच घेऊन घरी आल्या.

### श्रीमंत तात्यासाहेब सांगलीकर यांचे आगमन

श्रीराधाबाई अक्कांचेकडे श्रीमंत तात्यासाहेब सांगलीकर हे मोठ्या श्रद्धेने येत असत. भिक्षेवरच कृष्णाचे सर्व काही व्यवस्थितपणे चालले आहे व तेही पूर्ण समाधानाने याचे श्रीमंतांना मोठे नवल वाटे. 'दोन हजार रुपये प्रतिवर्षी या देवाकरता आपण कायमच देऊ', असे त्यांनी अक्कांना सांगितले पण ती भिक्षा होत नाही म्हणून आपल्याला ते नकोत असेच श्रीअक्कांनी श्रीमंतांना सांगितले होते. हे ऐकून श्रीमंतांना जे काही अंतःकरणात वाटले तेच वाचकांनाही वाटल्याशिवाय रहाणार नाही म्हणून त्याचे विश्लेषण येथे करीत नाही. श्रीअक्कांची वृत्ती किती त्यागी होती हे यावरून स्पष्टच होत आहे.

### नको वाजवू श्रीहरी मुरली

द्वापारयुगात कुंजवनात ज्या भगवत्प्रेमाने वेड लागलेल्या गोपगोपींनी कृष्णाचा मुरलीरव ऐकला त्यांचे भाग्याची कल्पना करताच येणार नाही. 'तदर्पिता खिलाचारता । तद्विस्मरणे व्याकुलता ।' अशी त्या गोपींची खरी अवस्था होती. ज्यांनी आपले सर्व आचारविचार भगवंतालाच केवळ अर्पण केले होते, त्यांची श्रेष्ठता कोणत्या शब्दांनी वर्णन करावी? भक्ती कशी करावी याचे उत्तर देताना 'यथा व्रजगोपिकानां' असेच वर्णन श्रीनारदांनी आपल्या भक्तिसूत्रात केले आहे.

तुझ्या मुरलीचा सुंदर ध्वनी । अकल्पित पडला माझे कानी ॥
विव्हळ झाले अंतःकरणी । मी घरधंदा विसरले ॥१॥
सावरिया कृष्णा रे । कशी वाजविली मुरली ॥ध्रु॥

असे मुरलीचे वर्णन श्रीएकनाथमहाराजांनी केले आहे. श्रीराधाबाई अक्का असताना अशाप्रकारचा मुरलीरव या हरिपूर क्षेत्री भाविकांनी ऐकला आहे. रात्री



भगवान् मुरलीतून आलाप घेत आणि अक्षरशः हरिपूरचे लोक कृष्णप्रेमाने वेडे होऊन जात. धन्य त्या राधाबाई अक्का आणि धन्य ते भाविक जन.

### देहभाव हरपला तुज पाहता विठ्ठला

श्रीराधाबाई अक्का ह्या रात्ररात्र भजन करीत आणि भजन करता करता देहभानही विसरून जात. 'कहत कबीरा सुनो भाई साधू । भजन करो दिनरात' असे कबीरांनी म्हटले आहे. त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच या राधाबाई अक्का. भक्तीने भजन घडले तरच देहभान नाहीसे होते. म्हणून 'एका जनार्दनी गुरू का बंदा । भक्ती भजन की प्राण ।' असेच श्रीनाथमहाराजांनी म्हटले आहे. नव्हे नव्हे प्रेमाशिवाय भजनाचा उपयोग काय, असे म्हटले आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात,'प्रेमावीण भजन नाकावीण मोती ॥ अर्थावीण पोथी वाचू नये ॥' तात्पर्य असे :- अक्कांचे प्रेमपूर्ण देहभावातीत भजन असल्याने त्याचा परिपाक जे समाधान ते त्यांचे जवळ पूर्णतः होते. श्रीतुकाराममहाराज तर यालाच भजन म्हणतात. त्यांची व्याख्याच आहे :- 'हेचि देवाचे भजन । सदा राहे समाधान ।' आणि असे जेथे भजन तेथेच भगवान प्रगटरूपाने दर्शन देतो आणि ते समाधान अढळ होते. 'हेचि देवाचे दर्शन । सदा राहे समाधान ।' असेच श्रीतुकाराममहाराज यांनी सांगितले आहे. ज्या भगवद्दर्शनाने सदा समाधान होते अशा महात्म्यांचे आपणास पूर्वपुण्याईने दर्शन घडले तरी आपले काम होते. 'जे हारपले आपण पे पावे । ते संताते पहाता गिवसावे । म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥' या ज्ञानेश्वरमहाराज यांनी सांगितलेल्या ओवीप्रमाणे या संतदर्शनाचेही फार मोठे महत्त्व आहे. अशा प्रकारची अवस्था पहाण्याचे ज्यांना भाग्य लाभले तेही खरेच भाग्यवान्. या दृष्टीने श्रीअक्कांचे आयुष्यातील एक अत्यंत मोलाचा बोलका प्रसंग येथे वर्णन करण्यासारखा आहे. तोच येथे नमूद करतो.

### तेजःपुंज नाग डुलतो । परि तो भाग्यवंता दिसतो

असे वर्णन आमचे श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी आपले एका पद्यात केले आहे. श्रीअक्कांची नेहमीचीच अशी देहभावातीत अवस्था होती. श्रीकृष्णाचा

मुरलीरव व श्रीअक्कांचे भजन रात्ररात्र चाले. मुरलीचा सूर भजनात व भजनाचा सूर मुरलीत मिसळत असे. ही एक मोठी अपूर्वताच होती. कृष्णासमोर राधा व राधेसमोर कृष्ण. हेच गाणारे आणि ऐकणारे श्रोते वक्ते होते. 'खेलो आपने रामही साथ । जैसी वैसी करले हो मात ।।' या श्रीतुकाराममहाराज यांचे उक्तीप्रमाणे श्रीअक्कांची अवस्था असल्याने काही कारणानेच हे हरिपुरास ज्ञात होणेचा प्रसंग निर्माण झाला. रात्री दोनचा सुमार. विनायक चिंतामण खाडिलकर हे सांगलीहून हरिपुरास पायीच आले. वेशीतच हे राधाकृष्णाचे मंदिर असल्याने वेशीत पाऊल टाकताच त्यांना केवड्याचा घमघमाट चांगलाच जाणवला. कृष्णमंदिरापाशी तर सुगंध चांगलाच दरवळला व दाराचे फटीतून एक तेजस्वी प्रकाशाचा किरण त्यांनी प्रत्यक्ष आपल्या चर्मचक्षूनेच पाहिला. अर्थात् आत काय आहे हे पहावे अशी त्यांना साहजिकच इच्छा झाली. त्यांनी आत डोकावून पाहिले तोच काय चमत्कार सांगावा? श्रीअक्कांचे भजन तन्मयतेने चालू आहे. त्यांचे मांडीवर नाग डुलत आहे. त्याचे तोंडात लाल मणी आहे. त्या प्रकाशाचा झोत बाहेर येत आहे व त्यामुळेच सुगंध दरवळला आहे. श्रीकृष्णाची मुरलीही आलाप घेत आहे. झाले हे खाडिलकरही देहभान विसरून त्या दाराशी तेथेच खिळून पहाटेपर्यंत उभे राहिले. अर्थात् सर्वांना हे कळणेची वेळच आली होती. खाडिलकर तर तल्लीन झालेच. पहाटे अनेकांचे नजरेला ही गोष्ट आल्यावाचून राहिली नाही. वर्षानुवर्षाचा तपानुतपाचा हा कार्यक्रम पण भक्ताचे महत्त्व जगाला कळावे म्हणूनच की काय ही घटना मोठ्या लीलेने घडून आली. झाले कार्यक्रम झाला. कृष्णाने मुरली थांबवली. अक्कांचे भजन झाले. नागही अंतर्धान पावला. अक्कांनी दरवाजा उघडला व सडासंमार्जन करणेसाठी त्या बाहेर आल्या. खाडिलकर बाहेर उभेच होते. ते अक्कांना म्हणाले, 'अहो अक्का, आज भजनाच्या वेळी नाग तुमच्या मांडीवर डुलत होता पण तुम्हांला भीती कशी वाटली नाही तेवढे सांगा.' अक्का म्हणाल्या, 'अहो खाडिलकर, मीही माणूसच आहे. मीही फार भित्री आहे. मग मला भीती वाटणार नाही का? सांगा ना? पण मी देहावरच नव्हते मग मला भीती कशी



वाटणार?' या उत्तराने खाडिलकर चकित झाले व त्यांनी अक्कांचे पाय धरले. आणि काही भाग्यवंतांनाही हा अनुभव आलाच होता. मग त्यांना अक्कांचे भजनाचे वेडच लागले.

**यारे यारे लहान थोर । याती अवघे नारी नर ।।**

अक्कांचे भजन दार लावूनच एकांतात चालावयाचे खरे पण रस्त्यावर माणसे हे भजन ऐकण्याकरिता जमावयाची व त्यांचा पाय तेथेच रुतावयाचा. घरी जावे असे कोणाला वाटायचे नाही, असे होऊ लागले. मग भगवंतांनीच दार उघडावयास सांगितले. मग मात्र अक्कांचे भजन सर्वांना ऐकण्याची सोय झाली. बाकीची माणसे भितील म्हणून अक्का म्हणाल्या 'नको वाजवु श्रीहरी मुरली.' कृष्णही श्रोता होऊन अक्कांचे भजन ऐकू लागला. नागही अंतर्धान पावला. तथापि भजन संपेपर्यंत त्या जागेत सुगंध दरवळलेला अखेरपर्यंत सर्वांनाच जाणवत असे. ही गोष्ट माझे आजोबांनी, कै. अंताजीपंत केळकर यांचे तोंडून लहानपणी ऐकल्याचे मला आठवते. माझे वडील ती.प.पू.कै.बापूरावजी केळकर यांचे नित्याचे कीर्तनातही श्रीराधाबाई अक्कांच्या काही गोष्टी प्रसंगोपात्त ऐकावयास मिळत असत व अक्कांचे शब्दचित्र डोळ्यासमोर उभे रहात असे.

**।। बहु अवघड आहे संत भेटी ।।**

श्रीअक्कांच्या भजनात जसा केवड्याचा सुगंध नेहमीच दरवळू लागला तर श्रीअक्कांचा कीर्तिसुगंधही सर्वत्र पसरत चालला. अनेक संतसज्जन त्यांचे दर्शनास नेहमी येऊ लागले. एक संत भेटावयाचा झाला तर अनेक जन्माची पुण्याई पाठीशी असावी लागते. पण श्रीअक्कांचे निमित्ताने हरिपूरकरांना अनेक संतांचे दर्शन सहज सुलभ झाले. आधी हरिपूर क्षेत्र, त्यात श्रीराधाबाई अक्कांचे तेथे कायमचे वास्तव्य आणि त्यात संतांची होणारी दर्शने म्हणजे येथे हा एक त्रिवेणी संगमच झाला. श्रीअक्कांचे नंतरही अनेक संतसज्जन या स्थानात येऊन गेले. त्यांचा उल्लेख पुढे प्रसंगोपात्त येईलच.

## श्रीसंत बालमुकुंदांचे आगमन व निर्याण

कल्याण येथील सुप्रसिद्ध संत श्रीराम मारुतिमहाराज यांचे सद्‌गुरू श्रीबालमुकुंदमहाराज हे इंदूर येथून शेपन्नास शिष्यांसहवर्तमान हरिपूर क्षेत्री केवळ श्रीराधाबाई अक्कांचे दर्शनासाठीच आले होते. श्रीराधाबाई अक्का त्यावेळी परगावी गेल्या होत्या. त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय हरिपुरातून जावयाचे नाही असा त्यांचा पक्का निर्धार होता. श्रीबालमुकुंद हे फेर धरून उत्तम भजन करीत, नव्हे नव्हे भजन करताना ते देहभान विसरून जात व ऐकणारेही मोठ्या प्रेमाने ते भजन ऐकून तल्लीन होत. श्रीराधाबाई अक्कांचे राधाकृष्ण मंदिराशेजारीच हे भजन चालू झाले. रात्ररात्र भजनरंग उसळून रहात असे. सुमारे पंधरा दिवस अक्कांना यावयास लागले तरी श्रीबालमुकुंदानी हरिपूर सोडले नाही. शेवटी अक्का आल्या. त्यांना हे सर्व वर्तमान कळले. श्रीबालमुकुंद म्हणाले,'आज मी तुमचे पुढेच भजनसेवा करणार आहे.' अक्का म्हणाल्या, 'जेथे पंधरा दिवस भजन चालले आहे तेथेच मी भजनास येईन. भजन तेथेच होऊ दे.' याप्रमाणे श्रीअक्का भजनास आल्या. भजन चांगलेच रंगले. रंगदेवता भजनात नाचू लागली. पहाटे भजन झाल्यावर अक्का मंदिराकडे निघताना श्रीबालमुकुंदांनी श्रीअक्कांचे दर्शन घेतले व त्यांचे पदकमळी आपल्या प्रेमाश्रूंनी अभिषेक केला. 'भजन आज फारच चांगले झाले. कृष्णाला ते फारच आवडले,' असे अक्का बोलल्या व मंदिराकडे आल्या. तोच कोणीतरी अक्कांना येऊन सांगितले 'श्रीबालमुकुंद कसेतरीच करीत आहेत. तुम्ही एकदा येऊन पहा.' अक्का आल्या व त्यांनी पाहिले. श्रीबालमुकुंद म्हणाले, 'अक्का, येतो आता.' अक्का म्हणाल्या, 'या. आता मीही लौकरच येणार आहे.' हे काय चालले आहे व ईश्वरी योजना यामागे काय आहे हे कोणा मानवास कळणार? झाले श्रीबालमुकुंद त्याच क्षणी वैकुंठास गेले. त्यांचे पार्थिव देहास हरिपूर येथील संगमावर अग्निसंस्कार झाला. तेथेच त्यांच्या पादुकाही पुढे प्रतिष्ठित केल्या. या घटनेने लोकांना काय वाटले असेल याची कल्पनाच करवत नाही. बालमुकुंद हरिपुरास आले का? पंधरा दिवस अक्कांचे दर्शनाकरता राहिले का? रात्री भजन का केले व अक्कांना सांगून ते कोठे गेले व अक्कांनी लगेच प्रस्थान का काढले या सर्व घटना अतर्कित आहेत. एकच म्हणता येईल अक्कांचे दर्शन घेऊन देह ठेवायचा हे या महापुरुषाने मनाशी नक्कीच ठरवले होते व ईश्वरी संकेताने ते तसेच झाले. अक्कांनाही आता या लोकीं रहाणे नको वाटले म्हणून त्यांनी प्रस्थान काढून ठेवले आणि त्या पुढील मार्गास लागल्या. श्रीबालमुकुंद यांनी पौष वद्य १० शके १८०८, इ.स.१८८६ या रोजी पहाटेचे वेळी देह ठेविला आणि ते ब्रह्मस्वरूपी विलीन झाले.



## श्रीराधाबाई अक्का यांचे महानिर्याण

संत हे इच्छामरणी असतात. त्यांची काळावरही हुकुमत चालते. त्यांचा अधिकार फार मोठा असतो. म्हणून त्यांच्या गोष्टी मानवी बुद्धीस उमजून येत नाहीत हेच खरे. 'काळ हमारा पोंगडा मैं करू गुलाम । यहा से डेरा उठावु तो वैकुंठ करू मुक्काम' असे श्रीकबीरसाहेबांनी यासंबंधी म्हटले आहे. आणि ते सार्थ आहे. श्रीतुकाराममहाराजही असेच म्हणतात 'काळ गुलाम सलाम करी । तुकया घरी राबतो ।।' नामस्मरणाने या संतांचा अधिकार फारच मोठा असतो. आमचे श्रीमामा (श्रीबापूरावजी केळकर) एका अभंगात म्हणतात 'संतांचे बोलणे रामनाम वाचा । अधिकार त्यांचा थोर असे ।' संत हे नामस्मरणाशिवाय काही बोलतच नाहीत. श्रीराधाबाई अक्का यांचे नामस्मरण अहर्निश चालूच होते. कलिसंतरणोपनिषदात भगवंतांनी सांगितलेला महामंत्र हाच श्रीअक्काचा जीवनात अतिशय प्रिय असलेला महामंत्र होता. 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।' रात्रंदिवस हाच मंत्र चालू झाला. मधून मधून 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव। प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।' हा श्लोक म्हणत असत. या श्लोकातील भगवंताची बारा नावे मुखातून आली तर विष्णुसहस्रनाम म्हटल्याचे पुण्य आहे असे संत सज्जन सांगत असतात. 'की झाकिलीया घरीचा दिवा । काय झाला न कळे केव्हा ।। नये परी जो पांडवा । देह ठेवी ।' या ज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे श्रीराधाबाई अक्कांनी पुढे

लगेच आश्विन वद्य तृतीयायुक्त चतुर्थी दिवशी शके १८०९ मधे म्हणजे इ.स.१८८६ सालीच आपला देह नामस्मरण करीत असतानाच ठेविला. श्रीअक्कांची प्राणज्योत श्रीकृष्ण स्वरूपात विलीन झालेली संतसज्जनांनी पाहिली. हरिपुरात मोठा आकांत झाला. एवढेच नव्हे 'मूर्तीच्या नयना अश्रु आले' अशी अवस्था झाली. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज काशी यात्रेस चालले तेव्हा देखील श्रीगोंदावले क्षेत्री रामप्रभूंना रडू कोसळले आणि हे दृश्य अनेकांनी पाहिले. हे तर श्रीअक्कांचे महानिर्याण होते. येथे श्रीकृष्ण मूर्तीच्या नेत्रातून पाणी आले नसते तरच नवल. मला सांगावयाचे आहे ते हे की भगवान श्रीकृष्णालाही मोठी व्यथा झाली, त्यालाही हा विरह जाणवला. सर्व हरिपूर शोक सागरात बुडून गेले. श्रीअक्कांचाही अंत्यसंस्कार हरिपूर येथे संगमावरच झाला व श्रीबालमुकुंदांचे शेजारीच श्रीअक्कांचे पादुकांची स्थापना केली. श्रीबालमुकुंदांना जी अक्कांनी भाक दिली होती त्याप्रमाणे श्रीअक्काही मोठ्या तातडीने वैकुंठी निघून गेल्या.

शालिवाहन शके अठराशे नवात । श्रीअक्कांनी एकांत सेवियेला ।।१।।
राधाबाई अक्कांनी केलेसे निर्याण । महिना अश्विन पावन झाला ।।२।।
भाक जी दिधली बालमुकुंदासी । नेली पूर्ण तिसी नामस्मरणे ।।३।।
आश्वीन वद्य तृतीयायुक्तते चतुर्थी । झाली प्राणज्योती कृष्णमय ।।४।।
*दासराम* वंदी तयांची पाऊले । आणि मुखी बोले राधाकृष्ण ।।५।।

### भजनीबुवा

श्रीबालमुकुंदांचे अधिकारी शिष्य श्रीधोंडोपंत गोगटे हे भजनीबुवा या नावाने ओळखले जात. श्रीबालमुकुंदांचे बरोबरच हे आलेले होते. श्रीबालमुकुंद हे पूर्वी यात्रेचे वेळी अनेक वेळा आपली यात्रा हरिपूर येथेच संपवावयाची असे म्हणत व त्यानंतर कोठे यात्रेला जायचे नाही इतकाच अर्थ शिष्य करीत. पण श्रीबालमुकुंदांनी व श्रीराधाबाई अक्कांनी आणभाक करून जी आपली जीवितयात्रा संपविली त्या योगाने यामागे असलेली ईश्वरी सत्ता व या दोन महापुरुषांची खरी योग्यता सर्वांनाच कळून आल्यावाचून राहिली नाही. श्रीबालमुकुंदही गेले व श्रीराधाबाई अक्काही आत्मरूपी विलीन झाल्या. यामुळे सेवाव्रत पत्करून या



भजनीबुवांनी आपले हरिपूर येथे कायम वास्तव्य केले. हे अयाचित वृत्तीने रहात. सकाळ संध्याकाळ श्रीगुंडोजी सांप्रदायाप्रमाणे भजन करीत. पायांत चाळ, हातात वीणा आणि चिपळ्या असा त्यांचा भजनाचा थाट असे. फेर धरून नाचत नाचत ते प्रेमळ भजन करीत. श्रीलक्ष्मीबाई गद्रे यांचे ज्येष्ठ चिरंजीव रामभाऊ गद्रे हे गेल्यामुळे श्रीलक्ष्मीबाई या फारच दुःखीकष्टी झाल्याने भजनीबुवांचे भजनास नित्यनेमाने जाऊ लागल्या. आणि सर्व दुःख विसरून केवळ भजनानेच त्यांना पूर्ण समाधान वाटले. यामुळे त्यांनी भजनीबुवांचा अनुग्रह घेतला. श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज हे इ.स.१९२१ मध्ये श्रावण महिन्यातील श्रीगोकुळाष्टमीचे उत्सवात एक दिवस आले असून तेथे त्यांनी सायंकाळी हरिकीर्तन केले. आणि या श्रीराधाकृष्ण मंदिरात मोठाच रंग भरून राहिला. पुढे कैक वर्षे श्रीहरिपूरकरांचे स्मृतिपटलावर या अभूतपूर्व कीर्तनाची स्मृती अखंड राहिली होती. इ.स.१९२१ मध्ये फाल्गुन वद्य प्रतिपदेस श्रीभजनीबुवांनी शांतपणे आपला देह ठेवला, व ते कृष्णस्वरूपाकार झाले.

### श्रीकृष्णाबाईचा महोत्सव

माघ शु.दशमी ते माघ शु.१५ अखेर श्रीकृष्णामातेचा उत्सव श्रीराधाबाई अक्कांनीच आपले हयातीत सुरू केला असून श्रीरामेश्वरशास्त्री तेलंग यांनी 'पहिले चार दिवस नैवेद्य आणि ब्राह्मणसंतर्पण आम्ही करतो व एकादशीचा मंत्रजागर व पौर्णिमेचा महाप्रसाद तुम्ही करा' असे श्रीअक्कांना सांगितले व त्यांनी ते मान्यही केले. हा महोत्सव घाटावर होऊ लागला. या उत्सवातही श्रीतात्यासाहेबांची कीर्तने इ.स.१९२१ साली झाली आहेत. या तेलंगांचे नातू श्रीवासुदेव बाळशास्त्री तेलंग यांनी पुढाकार घेऊन त्यांचे मित्रमंडळाकडून पौर्णिमेचा महाप्रसाद भिक्षेवरच वर्गणी गोळा करून फारच मोठ्या प्रमाणात चोवीस वर्षे केला. इ.स.१९३९ नंतर श्रीचिपळूणकर व त्यांचे स्नेही मंडळी हा महोत्सव करू लागली. त्यांनतर हरिपूर येथील महिला मंडळाने हा उत्सव चालविला. श्रीतेलंग यांनी प्रसाद चालू ठेवला आहेच.

श्रीअक्कांचेवर या लोकांची केवढी निष्ठा आहे हे यावरून स्पष्टच होत आहे.

### श्रीकृष्ण देवस्थानची व्यवस्था

श्रीराधाबाई अक्कांची मुलगी गद्रे घराण्यात दिली. त्यांना (रघुनाथराव यांना) हरी व केशव असे दोन मुलगे होते. त्याचप्रमाणे एक कन्या होती. हरी व केशव लहान असतानाच या मुलांचे मातोश्रींनी देह ठेवला. सोलापुराहून रघुनाथराव गद्रे यांनी या मुलांचे पालनपोषण कोणी करणार नाही म्हणून त्यांनी हरिपुरास आणून ठेवले. अक्कांचे आयुष्य भजनातच व्यतीत झाल्याने या मुलांचे शिक्षण झाले नाही. तथापि ही मुले श्रीअक्कांचे अर्ध्या वचनात असत. हरिभाऊंना केळकरांची मुलगी दिली असून केशवराव यांना भाऊ करंदीकरांची मुलगी दिली होती. हरिभाऊंची बायको भीमाक्का व केशवरावांची बायको श्रीलक्ष्मीबाई. हरिभाऊ हे श्रीअक्कांचे आधीच गेल्याने हरिपूरातील श्रीकृष्ण देवस्थानची व्यवस्था भीमाक्कांनीच पहाणेस सुरुवात केली. सुमारे चार वर्षे त्यांनी व्यवस्था पाहिली व इ.स.१८९० मध्ये श्रीभीमाक्कांनी आपला देह ठेवला. श्रीअक्कांनी आपली चार बिघे जमीन श्रीगोपालकृष्णाचे नावे केली होती. आपले नातवांनी पूजा वैगेरे करून जमिनीचा उपभोग घ्यावा असे लिहून ठेवले होते. आता हरिभाऊही गेले. व भीमाक्काही गेल्या. यामुळे ही व्यवस्था श्रीकेशवराव यांचेकडे साहजिकच आली. भिक्षा मागणेची त्यांची प्रवृत्तीच नसलेने ते म्हणाले, 'मी काही भिक्षेला जाणार नाही. चार बिघे जमिनीचे उत्पन्नातून जे होईल तेवढेच करीन. भिक्षा मागणे हे आपल्याला जमणारच नाही.' श्रीगोकुळअष्टमी जवळ आली आणि त्यांनी अंथरूण धरले. त्यांना ऊर्ध्ववाताचा विकार झाल्याने ते बेशुद्धच असावयाचे. शुद्धीवर थोडेच यावयाचे. याप्रसंगी चिंतामणशास्त्री तेलंग हे तिथे आले. केशवराव म्हणाले, 'या परिस्थितीत आता माझे हातून काय होणार आहे? तथापि माझे जवळ शंभर रुपये आहेत. त्यातून हा उत्सव व्यवस्थितपणे करा' एवढेच सांगितले. दुसरे दिवशीच श्रावण वद्य प्रतिपदा होती. याप्रमाणे उत्सव सुरू झाला.



'कदाचित् माझे काही कमी जास्त झाले तरी उत्सव हा राधाबाई अक्कांचा आहे. गद्रे यांचा नाही. गद्रे यांचा त्यात तसा काही संबंध नाही. उत्सव हा उत्तमच झाला पाहिजे. त्यात खंड होताच कामा नये,' असेच केशवराव यांनी श्रीचिंतामणशास्त्री यांना सांगितले. श्रीगोकुळाष्टमीचा हा उत्सव प्रतिवर्षाप्रमाणे थाटात सुरू झाला. तसे श्रीकेशवराव यांचे दुखणेही जास्तच होऊ लागले. श्रीगोकुळाष्टमीचे पारणेदिवशी महाप्रसादही झाला. त्या दिवशीच दुपारी एक वाजता केशवराव यांचे प्राणोत्क्रमण झाले.

श्रीकेशवराव यांनी आपले सौ.पत्नीस सांगून ठेवले होते की तसाच काही प्रसंग आला तर तोंडात बोळा घालून ठेव पण मुळीच रडू नकोस. त्याप्रमाणे त्यांनी आपले मन अगदी घट्ट केले व मागील दारी पुढील तयारी लोकांनी चालू केली. पण राधाबाई अक्का अजुनी तेथे आहेत याची साक्ष सर्वांनाच या प्रसंगाने आली. श्रीगोपाळकृष्णाने मोठे नवल केले. केशवराव यांचा श्वास पुन्हा चालू झाला. आणि असाच प्रकार तीन वेळा घडून आला. रात्रौ उत्सवातील लळितही झाले. चिंतामणशास्त्रींनी सर्वांना प्रसाद वाटला. तसाच तो श्रीकेशवराव यांनाही दिला व त्यांचेकडून आपणही प्रसाद घेतला. 'उत्सव तर फारच चांगला झाला' असे श्रीकेशवराव यांना सांगितले. केशवराव तर या प्रसंगातून पूर्णतः निभावले. नव्हे नव्हे त्यांचे आयुष्य वाढले. अर्थात् श्रीराधाबाई अक्कांचे कृपेनेच श्रीगोपाळकृष्णाने आपल्यास या प्रसंगातून वाचविले. याची मोठ्या प्रकर्षाने त्यांचे अंतःकरणात जाणीव निर्माण झाली. व त्यांनी यापुढे मी राधाबाई अक्कांचेप्रमाणे भिक्षा मागून तुझा उत्सव प्रतिवर्षी करीन असे श्रीगोपाळकृष्णास सर्वांसमक्ष सांगितले.

सांगलीचे सुप्रसिद्ध ह.भ.प.दामोदरबुवा दिवेकर हे प्रतिवर्षी श्रीगोपाळकृष्णाचे या महोत्सवात कीर्तनसेवा सादर करण्याकरिता येत असत. त्यांना तरी मराठी, संस्कृत, कानडी, इंग्रजी, हिंदी, उर्दू वैगेरे सर्वच भाषा उत्तम येत होत्या. त्यांचे कीर्तन म्हणजे ती एक प्रेमभक्तीची उत्तम मेजवानीच होती. हे दामोदरबुवा या कृष्ण मंदिरात तब्बल छत्तीस वर्षे सेवेसाठी येत होते. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे

पट्टशिष्य श्रीब्रह्मानंदमहाराज हेही या श्रीराधाबाई अक्कांचे कृष्ण मंदिरात भगवंताचे दर्शन घेणेसाठी मुद्दाम आले होते, हे नमूद केल्यावाचून रहावत नाही. कदाचित् आपले सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्यमहाराज सद्गुरुशोधार्थ निघाले असताना प्रथम ज्या राधाबाई अक्कांचेकडे गेले होते तेथे तर आपण गेलेच पाहिजे असेच त्यांचे मनाने घेतले असावे असा आपला कयास आहे.

श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेही हरिकीर्तन या कृष्णमंदिरात इ.स.१९२१ साली सायंकाळी मोठ्या थाटाने झाले. ती एक अध्यात्माची खैरातच होती व या समारंभास मोठीच अपूर्व शोभा आली होती असे परमप्रिय ह.भ.प.बापूसाहेब गद्रे यांचे मुखाने कळले व मनाला मोठाच आनंद वाटला. श्रीकेशवराव यांनी जशी अनुकूलता असेल त्याप्रमाणे हा उत्सव आपल्याकडून चांगल्याप्रकारे चालू ठेवला.

वृद्धापकाळामुळे श्रीभीमाक्कांचे नातू सदाशिवराव व नाना हेही केशवराव यांचे बरोबर भिक्षेस जाऊ लागले. इ.स.१९१४ साली सदाशिवराव यांनी देह ठेवला. इ.स.१९१४ सालापासून श्रीकृष्णाजीपंत ऊर्फ बापू हे केशवराव यांचेबरोबर भिक्षेस जाऊ लागले. इ.स.१९१६ सालापासून बापू हे स्वतःच भिक्षेस जाऊ लागले. फक्त ठराविक ठिकाणीच जायचे. भिक्षा मागावयाची नाही. कोणी आपणहून दिली तरच घ्यावयाचे. या प्रकाराने त्यांनी मोठी मर्यादा राखली होती.

**भिक्षेचे काही नियम होते तेही पहाण्याजोगे आहेत**

१) हॉटेलातील आपण काही खावयाचे नाही, फार काय, दुसऱ्या बरोबरही हॉटेलात जायचे नाही.

२) भिक्षेतील पैशाचे काही खावयाचे नाही.

३) स्टेशनपासून तीन मैल गांव असेल तर वहानात बसावयाचे नाही.

४) सिनेमा, नाटक, सर्कस पहावयाचे नाही. कोणी नेले तरी जायचे नाही.

हे सारे नियम बापूंनी कटाक्षाने पाळले. यात प्रश्नच नाही. अर्थात् अशाप्रकारे भिक्षा मागावयाची तर ते एक खडतर व्रत आहे. ते बापूंनी आचरणात आणले ही गोष्टदेखील तशी सामान्य आहे असे कोणी जाणता



माणूस म्हणेल असे वाटत नाही.

बापू हे केशवरावांचे नातू व विष्णुपंतांचे चिरंजीव होत. आईचे नांव सौ.राधाबाई असे होते. इ.स.१९२६ मध्ये बापूंचा मंगल-विवाह इचलकरंजी येथील व्यंकटेश विष्णू लेले यांची सुशील कन्या चि.सौ.का.यमूताई यांचेबरोबर थाटाने झाला. यांचे सासरचे नांव सौ.रुक्मिणीबाई असे आहे. इ.स.१९२६ मध्ये मार्गशीर्ष अमावास्येस श्रीकेशवराव हे अनंतात विलीन झाले. पुढे इ.स.१९२६ ते १९२९ पर्यंत श्रीविष्णुपंतांनी आपला शिक्षकाचा पेशा व्यवस्थितपणे सांभाळून श्रीगोकुळाष्टमी आपल्या सांप्रदायाप्रमाणे चांगल्याप्रकारे साजरी केली. इ.स.१९२६ ते १९२९ अखेर या गोकुळअष्टमीच्या महोत्सवात माझे वडील तीर्थरूप प.पूज्य ह.भ.प.श्रीबापूरावजी केळकर यांची कीर्तने भावपूर्ण झाली, असे म्हणणेस प्रत्यवाय नाही. तीर्थरूपांना येथील आमंत्रणही मोठ्या प्रेमाने करीत असत. हे अगदी ध्यानात ठेवणे सारखे आहे. कोणत्याही कारणाने त्यांची ही सेवा अंतरली नाही. मिरजेचे सुप्रसिद्ध ह.भ.प.श्री.नामदेवराव चांदोरकर वकील यांचीही तीन तपावर या कृष्णमंदिरात उत्कृष्ट अशी निरूपणे झाली. हे नमूद केल्यावाचून रहावत नाही. घाटावरील श्रीअक्कांचे पादुकांवर बराच गाळ साचला होता. तो काढून यांनीच त्यांच्या पादुका वर काढल्या. श्रीनामदेवराव हे मोठे भाविक असून पंढरपुराला दंडवत घालत जाणेचा त्यांचा मानस होता. बापूंनी त्यांना शेवटाला एकच टप्पा दंडवत घाला व बाकीचे फार तर पायी वारी करा असे सांगितले होते. बापू व श्रीनामदेवराव हे आमचे श्रीमामांचा म्हणजे माझे तीर्थरूप यांचा आशीर्वाद घेणेस आले होते. श्रीमामांनी त्यांना बापूंचे प्रमाणेच सांगितले होते. परंतु श्रीनामदेवरायांचा पक्का निश्चयच असल्याने ते दंडवत घालत पंढरपूरला श्रीविठुरायाचे दर्शनास निघाले. आणि वाटेतच त्यांचे देहावसान झाले. ही गोष्ट न विसरणे सारखीच आहे. वाटेत गेले तरी ते पांडुरंगापाशीच गेले असा त्याचा अर्थ आहे. त्यांचीही योग्यता फारच मोठी होती. श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथी महोत्सवातही सांगलीस त्यांची निरूपणे होत असत. त्या कीर्तन श्रवणाचा लाभ आम्हा सांगलीकरांना अधूनमधून

होत असे. म्हणून हा खुलासा येथे मुद्दाम केला आहे.

सांगलीचे कै.ह.भ.प.केशव भिकाजी केळकर यांची श्रीभगवद्गीतेवरील सुरस प्रवचने या कृष्णमंदिरात झाली असून वारकरी संप्रदायातील अध्वर्यू सुप्रसिद्ध ह.भ.प.कै.श्रीमामासाहेब दांडेकर यांची बहारदार प्रवचने झाली आहेत. सांगलीचे देवधरशास्त्री, सदाशिवशास्त्री भिडे यांची प्रवचने, श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे अधिकारी शिष्य कै.ह.भ.प.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची दत्तपंथी भजने वर्षोनुवर्षे येथे झाली आहेत. ही भजने तरी रात्ररात्र होत असत. श्रीपांडुरंगमहाराज करमरकर, कणकवली येथील श्रीअरविंदबाबूंचे परमशिष्य कै.नानामहाराज बर्वे यांचे सारखे विदेही साधू येथे कैकवेळा आले. तर श्रीरामानंद खटावकर यांचे परमशिष्य श्रीमहादबामहाराज पाटील यांचेसारखे विदेही साधू हे तर वरचेवर येत असतात.

सुप्रसिद्ध संत श्रीनारायणमहाराज केडगावकरांसारखे महापुरुषही या जागेत येऊन गेले. या कृष्णमंदिरात त्यांची पाद्यपूजा केली होती. त्यांना मोठे समाधान वाटले. श्रीधरस्वामींसारखे मौन व्रताचरण करणारे, रामदासी सांप्रदायाला ज्यांना मोठे मानाचे स्थान आहे असे पुरुष येथे आले होते. त्या योगे परमपवित्र असे हे स्थान अधिकच पवित्र झाले.

इ.स.१९३६ पर्यंत बापू हे परगावी जात होते. परंतु पुढे पैसे येण्याचे प्रमाण कमी कमी होत चालले. व भिक्षेत आलेले पैसे भाडे खर्चालाही पुरेनात. तेव्हा आता काय करावे हा प्रश्न उभा राहिला. इ.स.१९३७ साली श्रीबापू आमचे श्रीमामांकडे आले व त्यांनी हे सर्व माझे तीर्थरूपांना विचारून यापुढे चातुर्मासात चार महिने हरिपूरची शीवच ओलांडायची नाही असा निश्चय केला. श्रीगुरुचरित्राचे सप्ते सुरू केले व मामांनी सांगितलेप्रमाणे गुरुचरित्र, दासबोध सप्ताह व श्रीज्ञानेश्वरीतील रोज १०० ओव्या वाचावयाच्या असा परिपाठ सुरू ठेवला. अनेक भाविक संत सज्जन यात सामील होऊ लागले व या नित्यक्रमाला साहजिकच एक उपासनेचे स्वरूप प्राप्त झाले. बापूंनी त्यावेळी किराणामालाचे दुकान चालू ठेवले असून ते सांभाळूनच या सर्व गोष्टी ते करीत



असत. श्रीविष्णुपंत हे फारच मोठे श्रद्धावान् आणि भाविक असून सांगली, मिरज, माधवनगर, बुधगाव या ठिकाणी ते भिक्षेला जात असत.

ही भिक्षा माझे समजुतीप्रमाणे ते आमचे घरापासूनच सुरू करीत. माझे तीर्थरूप श्रीबापूरावजी केळकर यांचे पाठीवर लहानपणीच श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचा हात फिरलेला श्रीविष्णुपंतांना माहीत असलेने व श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे आज्ञेने आपले घरी नित्य कीर्तनसेवेचे व्रत चालविले असल्याने माझे तीर्थरूपांचे बद्दल विष्णुपंतांना फारच आदर वाटे. शिवाय तीर्थरूपांचे कीर्तनात श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे नाव तर नित्यनेमाने येत असे. प्रसंगोपात श्रीब्रह्मानंद किंवा ज्यांचे आपण चरित्र लिहीत आहोत त्या श्रीराधाबाई अक्कांच्या गोष्टीही कीर्तनात येत असत. आणि त्या ऐकत असताना श्रीविष्णुपंतांच्या नेत्रातून अश्रुधारा सुरू होत. हे ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले असेल त्यांनाच मला काय म्हणावयाचे आहे याची कल्पना येईल.

तात्पर्य, भिक्षेचे येणाऱ्या पैशातून श्रीबापूंनी हळूहळू तबला, पेटी, झांजा, तंबोरा, पखवाज इ. सर्वच कीर्तन/भजनाला लागणारा संच थोडे पैसे बाजूला ठेवून केला.

श्रीगोकुळाष्टमीचा हा महोत्सव हळूहळू चांगलाच मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तशी दूरदूरची भाविक माणसेही उत्सवासाठी येऊ लागली. आणि कीर्तन, भजनात फारच मोठा रंग भरू लागला. हुबळी येथील श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे शिष्य श्रीसच्चिदानंदमहाराज यांच्या प्रिय शिष्या ह.भ.प.मीराबाई या उत्सवात न चुकता येऊ लागल्या. या फारच उत्तम कीर्तन करीत व असंख्य भाविक श्रोते भक्तिरसात अक्षरशः डुंबत असत. श्रीबापूंना तर हा उत्सव फार मोठा व्हावा असे मनापासून वाटे व तशी ते पाउले उचलीत. श्रीराधाबाई अक्कांचे कृपेने त्यांना यात यश येत गेले आहे असे म्हणणेस प्रत्यवाय दिसत नाही.

बापूंचेवर कागवाड येथील श्रीब्रह्मचैतन्यांचे शिष्य कै.श्रीमंत आप्पासाहेब कागवाडकर यांचे आत्यंतिक प्रेम व श्रद्धा होती. श्रीराधाबाई अक्कांचेकडे

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज आले होते, या एकाच गोष्टीने ही श्रद्‌धा मोठी दृढमूल झाली होती. आणि यामुळे हे या स्थानास वारंवार अखंड भेट देत आणि मोठ्या प्रेमाने परामर्ष घेत असत, हे सांगणेत मला मोठा आनंद वाटतो.

### गाणगापुरात सेवा

श्री.बापू हे गाणगापुरात श्रीदत्तदर्शन स्वप्नात तरी व्हावे या हेतूने या महाक्षेत्री गेले होते. कोणाची ओळख नाही. जवळ चिठ्ठी चपाटी नाही. पैशाचे ते तर नावच नाही. श्रीदत्त प्रभूंचाच एक काय तो आधार. झाडाखालीही रहाणेची तयारी. वेळ पडली नुसते पाणी पिऊन रहाणेचा निर्धार. पण श्रीदत्तप्रभूंनी जशी परीक्षा घेतली तसे कवतूकही निश्चितपणे केले. निरपेक्ष सेवा ही फुकट जात नाही म्हणतात ते हे. मग बापूंना मधुकरीही मिळू लागली. रहाणेची सोयही झाली. आणि आश्चर्य तीन महिने याप्रकारे श्रीगरुचरित्राची सेवा झाल्यावर प्रभूंनी स्वप्नात दर्शनही दिले.

### चार कपात चारशे कप चहा

आपल्याला हे ऐकून खरे तरी वाटेल का? पण श्रीराधाबाई अक्कांचे कृपेने त्यांनी या घटनेने या कृष्णामंदिरातील वास्तव्यच सिद्‌ध केले आहे. चार कपाचे सकाळी आधण ठेवले तवर आणि कोणी आले त्यांना चहा द्या. मग आणि काही माणसे आली त्यांना द्या असेच चालले होते. पण चहा आहे किती व आपण देत आहोत किती जणांना हे ध्यानातही आले नाही. झाले सकाळपासून संध्याकाळपर्यंत हा कार्यक्रम चालूच होता. शेवटी तो चहा देणारा व कपबशा विसळणारा माणूसच दमला. त्याच्या लक्षात आले व तो म्हणाला, 'बापू, आता तुम्ही चहा द्या. माझे अंगात काही आता त्राणच राहिले नाही.' मग बापूंनी चहा घेतला व तो चार कप तयार केलेला चहाही संपला. मग कोणी आलेही नाही व चहा द्यावा लागलाही नाही. बापू म्हणाले, 'हे सारे काम अक्कांचेच आहे. यात काही संशय नाही ना?' मग या गोष्टीचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.



### श्रीबालमुकुंदांचे पुण्यतिथीस अखंड वीणा

बापूंनी तंबोरा, पंखवाज, झांजा हा सारा संच केल्याचे मागे सांगितले आहेच. किती तरी ठिकाणी अखंड वीणा असतो. येथेही या निमित्ताने का होईना अखंड वीणा ठेवावा असे बापूंना वाटले. श्रीविष्णुपंतांना हे तितकेसे रुचले नाही. त्यांची थोडी नापसंतीच होती म्हटले तरी चालेल. आणि याचे कारण दुसरे काही नसून इतरत्र या अखंड वीण्याची कशी फटफजिती होती हे त्यांना माहिती होते व तसा प्रसंग येथे निर्माण होऊ नये म्हणूनच त्यांनी आपले असे मत व्यक्त केले होते. तथापि 'एका जनार्दनी निर्धार । तेथे प्रगटे विश्वंभर ।।' या न्यायाने बापूंनी आपले निर्धाराचे पाऊल उचलले व ज्या ज्या ठिकाणी भजनी मंडळे होती अगर भजनाचे अड्डे होते त्या त्या ठिकाणी स्वतः पायी जाऊन अगत्यपूर्वक आमंत्रण दिले. हरिपूर, सांगली, सांगलवाडी, मिरज येथपर्यंत त्यांनी सर्वांना सप्त्याचे आमंत्रण दिले. सर्वानी येतो म्हणून सांगितलेही, पण घरातील वातावरणच थोडे प्रतिकूल असलेने ऐन वेळी सर्वांनीच त्यातून आपले अंग काढून घेतले व कोणीही आले नाही. अर्थात बापूंना त्याची काहीच कल्पना नव्हती. सप्ताह सुरू होण्याचा दिवस उजाडला तरी कशालाच काही ठावठिकाणा नाही अशी परिस्थिती. बापू देवापुढे आले व म्हणाले, 'देवा, ही प्रेरणा तुझीच आहे. अक्कांच्या करता तू वाटेल ते आजवर केले आहेस. यातून पार करणारा तूच आहेस. मी वीणा घेऊन उभा राहतो. अगदीच शरीर जेव्हा आडवे होईल तेव्हाच हा वीणा खाली ठेवीन व समजेन की ही एवढीच तुझी इच्छा होती.' पुढे बापूंचे तोंडून शब्दच फुटेना. बापूंनी वीणा उचलला आणि रामकृष्णहरी सुरू केले आणि तास दीड तासातच कोणी तरी आले आणि कोणी आले आणि वीणा चालूच झाला. मग सप्ताहाला चांगलाच रंग भरला. कोणी आपणहून आपली सेवा व्हावी म्हणून कीर्तन, प्रवचनही करू लागले. रात्री थाटाने भजनही होऊ लागले आणि सारीच चक्रे व्यवस्थित फिरू लागली. एक गृहस्थ आला. तो म्हणाला, 'मला वीणा मिळेल का?' बापू म्हणाले, 'कोणी नाही असे वाटले तर तू घे.' तो तेथे अगदी पडून होता व लागेल ते काम

करीत होता. आता पुढे काय हा प्रश्न उभा केला. सप्त्याला आलेली सारी माणसे आता प्रसादाला येणार. त्यांना घालावयाचे काय? पण आश्चर्य अगदी ठरविल्याप्रमाणे दुपारी वाजता सामानही आले. कोठून आले ते ईश्वर जाणे. आचारी, पाणके आपणहून हजर झाले. बापूंना म्हणाले, 'तुम्ही काही काळजी करू नका. आम्ही सारे करतो.' बापूंना इतका आनंद झाला की त्या उन्मादानेच ते बेशुद्ध झाले. ती समाधी अवस्था कोणाला कळणार? मग त्यांचे तोंडात थोडे तीर्थ घातले. प्रसाद घातला. तवर त्यांचे पोटात काहीच नव्हते. पगंतीवर पंगती उठल्या. बापू सावध झाले. बापूंनी सर्वांना प्रसाद दिला व सारी माणसे परतली. जो तो म्हणू लागला हा सुखसोहळा अनुपम्य.

### कोठीत धान्य कोठून आले?

एके वर्षी बापू हे परगावी रत्नागिरीकडे गेलेले होते. त्यांना तेथून हरिपुरास येण्यासच फार उशीर झाला. घरात आजारपणाचेही सत्र होते. उत्सवाची तरतूद करणेस काही अवधीही राहिला नाही. जवळ पैसाही नाही. सर्व बाजूंनी सर्व काही जमूनच आलेले. गोकुळाष्टमीचा उत्सव तर सुरू होणेचा. कोठीत धान्याचा कण नाही. बापूंनी श्रीकृष्णाची व श्रीराधाबाई अक्कांची प्रार्थना केली. कोठीची पूजा केली. आणि आश्चर्य, कोणीतरी धान्य आणून दिले. 'उत्सवाकरिता आपले थोडे आणले आहे' असे सांगितले. आणि त्यातूनच सर्व उत्सव यथासांग पार पाडला. ज्यांना खरी वस्तुस्थिती माहिती होती त्यांना या गोष्टीचे आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही.

### कै.श्रीमंत आप्पासाहेब, बापूंची वाटच पहात होते

श्रीमंत आप्पासाहेब कागवाडकर हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे एक प्रमुख शिष्य असून श्रीब्रह्मानंदमहाराज यांचे देवस्थानचे मुख्य ट्रस्टी होते. कागवाड येथील उपासना पद्धती त्यानीच आखून दिली. सारखे नामस्मरण चाले. महाराजांचे नांव निघाले तरी त्यांचे डोळ्याचे पाणी खळत नसे. शेवटी त्यांना शुद्ध राहिली नव्हती. अशी काही लोकांची कल्पना होती. ते बापूंची



वाटच पहात होते. डॉक्टरांनी 'त्यांना पूर्ण विश्रांती पाहिजे आहे. कोणाशी त्यांना बोलू देऊ नका' असे सांगितले होते. आप्पासाहेबांची प्रकृती चिंताजनक आहे असे कळल्याने बापू त्यांना भेटणेस कागवाड येथे गेले. त्यावेळी तेथे कोणास भेटून देत नव्हते. डॉक्टरांनी तसेच सांगितले होते. बापू म्हणाले, 'मला त्यांचेशी काही बोलावयाचे नाही. फक्त त्यांना भेटून जावे असे वाटते.' आश्चर्य मोठे असे. बापूंची व आप्पासाहेबांची भेट होताच ते नामस्मरणात आहेत व चांगले शुद्धीवर आहेत असेच बापूंचे प्रत्ययास आले. 'आता काही माझा नेम नाही' असे आप्पासाहेब बापूंना म्हणाले. दोघांचेही डोळ्यातून प्रेमाश्रू ओघळले. जड अंतःकरणाने बापूंनी त्यांचा निरोप घेतला. जो नामात आहे तो शुद्धीत आहे या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे वचनाची त्यावेळी आठवण झाल्यावाचून राहिली नाही. पुढे थोडेच दिवसांत श्रीआप्पासाहेबांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली.

कशी जाहली कृष्णस्वरूप राधा ।। जिचे नाव घेता नुरे देहबाधा ।।
भजनामृते पूर्ण होवोनि ठेला ।। नमस्कार हा भक्तिभावे पदाला ।।१।।
– दासराम

आरती कृष्णराधा ।। करू आपुलीया छंदा ।।
देहभाव नुरे जेथे ।। पावुनिया स्वानंदा ।।ध्रु।।
ब्रह्मचैतन्यासारिखे ।। तव भेटीसी आले ।।
केडगांव नारायण ।। समाधान पावले ।।१।।
हरिपूरी भजनात ।। झाली अघटित लीला ।।
*दासराम* आठवी ते ।। साथ करी मुरलीवाला ।।२।।

***

## (७)

# प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर

आमचा हिंदुस्थान देश कुत्सित, चिकित्सक पण भावनाप्रधान असल्याने साधुसंतांचे हयातीत जरी तो त्याविषयी उदासीन असला, तरी मागाहून का होईना, तो त्यांची स्तुतिस्तोत्रे गाऊ लागतो. आणि त्यांचे हयातीत जरी आपण त्यांची शिकवण समजून घेतली नाही, तरी त्यांचे चरित्र समजावून घेण्याविषयी अत्यंत उत्सुक असतो. आणि लेखन, श्रवण, पठण द्वारा त्यांतील पावित्र्याचा लाभ घेऊन, मनाला समाधान मानीत असतो.

खुद्द ज्ञानेश्वर, तुकाराममहाराजांचे हयातीत जर आपण पाहिले, तर त्यांचे बाबतीतही वरील प्रकारचा अत्यंत खडतर अनुभव आला आहे असे दिसून येईल. त्यांनाही आपली सत्य तत्त्वे जगताच्या गळी उतरविताना काही कमी श्रम पडले नाहीत. सर्व संसाराची राखरांगोळी करूनही जगताकडून निंदेचे प्रहार आणि आत्यंतिक हालअपेष्टा त्यांना सहन कराव्या लागल्या आणि मगच त्यांनी जगात अमर कीर्ती संपादिली. लोककल्याणार्थ धावून आलेल्या या संतांनी सर्व दुःखापत्ती पुष्पशय्येप्रमाणे मानून, लोकांवर अगणित उपकारच केले. तरीही त्याची दाद जनतेस लागलीच नाही. ज्ञानेश्वरमहाराजांना वाळीत टाकून, तुकोबारायांना 'वेडा तुक्या' म्हणण्यास कमी केले नाही. अशा तऱ्हेची एवढ्या मोठ्या दांडाईत संतांची स्थिती. तथापि सत्य हे अमरच रहाते. ह्या कारणाने त्यांचा कीर्तिध्वज त्यांच्या देहावसानानंतर ह्या दिगंतरात चोहीकडे फडकू लागला. पंढरीच्या वाळवंटात लाखो लोक हातात टाळ घेऊन 'ज्ञानबा तुकाराम' या नामाचा जयघोष करीत असल्याचे मनोहर दृश्य दिसू लागले. आणि त्यांचे ग्रंथ अभ्यासून परमेश्वरी समाधान प्राप्त होत असल्याचे दाखले अनेक भाविक भक्तांना येऊन, त्यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांची नीतितत्त्वे



ही सर्व जगात आदर्श होऊन राहिली.

तेव्हा ज्ञानेश्वर, तुकाराममहाराजांची जेथे ही स्थिती, तेथे इतर सत्पुरुषांची दाद कोठून लागणार? 'देणेवाला है तो घेणेवाला नही, घेनेवाला है तो देनेवाला नहीं' ही स्थिती नेहमीचीच आहे. जगताचा उद्धार करण्याकरता व खरे ज्ञानार्पण करून ईश्वरी समाधान साक्षात् प्रचीतीने देण्याकरिता संत जेव्हा अवतीर्ण होतात, तेव्हा त्यांची किंमत कोणालाच नसते आणि ते गेले म्हणजे मग त्यांची पवित्र कार्ये दृष्टीसमोर राहून आता असा ज्ञानदाता कोण बरे मिळेल ह्याची वाट पहात रहातात. 'उतरली पेठ आणोनिया गोणी, गिऱ्हाईक कोणी नाही देवा,' 'किती सांगू तरी नायकती बटकीचे, पुढे शिंदळीचे रडतील,' 'मागे पुढे रडाल कराल आरोळी, मग कदाकाळी तुका न ये,' असे जेथे तुकाराममहाराजांना म्हणावे लागले, तेथे इतर संतांना थोड्याफार प्रमाणात हाच कटू अनुभव आला आहे, हे निर्विवाद होय.

श्रीरामानंदमहाराज यांचे बाबतीतही आपणास असेच म्हणता येईल. त्यांना पाहिलेले, त्यांच्या सांनिध्यात राहिलेले, किंबहुना त्यांच्या परिचर्येस सर्वस्वी वाहिलेले शेकडो लोक हयात आहेत. ते होते तोपर्यंत त्यांनी आपला अधिकार शक्यतो कोणास कळूच दिला नाही. तथापि त्यांच्या देहावसानानंतर त्यांच्या भक्तांनाही त्यांचे विशेष महत्त्व निदर्शनास आले, आणि त्यांची उज्ज्वल तत्त्वे लावण्यातून व पद्यातून जिकडे तिकडे विखुरली गेल्याकारणाने, नास्तिक लोकांच्यावरही बराच प्रकाश पडला, व त्यांची निंदा करणारे लोकही त्यांचे विषयी प्रेमादरयुक्त होऊन, त्यांची कीर्ती जेथे तेथे प्रसृत झाली, त्यांचे डोळे त्यांचे भजनमार्गाकडे म्हणजे खटाव पंथाकडे लागले आहेत. म्हणून ज्यांना त्यांचा सहवास लाभला नाही अगर ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले नाही, आणि ते एक संत होते ह्या पलीकडे ज्यांना माहिती नाही अशा प्रेमी, भाविक जनांना त्यांची माहिती करून देण्याकरिता, आणि त्यांचे जे भक्त त्यांच्या दर्शनाची इच्छा करतात, त्यांना चरित्राच्या द्वारे महाराजांचे सगुण दर्शन नित्य घडवावे, आणि महाराजांच्या अंतःकरणात विकसित झालेले समाधान त्यांचेच मुखातून

आलेल्या चारित्र्याच्या द्वारे भक्तजनास कळवावे, या हेतूने दुधाची तहान (ताकावर) भागवून, श्रीरामानंदमहाराज यांचे सांप्रदायातील साधनसेवा करणारे महाराजांचे प्रेमी नातू यांनी सांगितल्यावरून, प्रस्तुतचे लहानसे चरित्र गुंफून, वाचकांचे हाती देण्याचे आम्ही योजिले आहे.

वाचकांस इतके कळविणे इष्ट आहे की श्रीरामनंदमहाराज यांचे जे काही काव्य आहे, त्यातून जे काही त्यांचे तोंडून स्वात्मचरित्र सहजरीत्या निवेदन झाले आहे, तेच या ठिकाणी आम्ही ग्रथित करणार असून, त्यांचे अभंगांच्या आधारेच हे चरित्र-वाग्पुष्प जनताजनार्दनाचे हाती आम्ही देत आहो. याशिवाय त्यांची सांप्रदायिक तपशीलवार माहिती त्यांच्या कागदपत्रांवरून उपलब्ध होणारी ऐतिहासिक माहिती पुढे मागे सविस्तर चरित्र लिहिणेत येणार आहे, त्यावेळी देऊ.

आता आपण चरित्रनायकाचे चरित्राकडे वळू.

श्रीसद्‌गुरू रामानंदमहाराज यासारख्या महान सत्पुरुषाचा जन्म अधिकारपात्र महान् सिद्ध पुरुष श्रीरघुनाथमहाराज यांचे पोटी, 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगोक्तीप्रमाणे, भगवंताचे आज्ञेने जन्म झाला. 'हरिदासाचिये घरी मज उपजवा जन्मांतरी' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. तर 'ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा । त्याचे वंशी मज जन्म देई देवा' असे श्रीउद्धवचिद्घनमहाराज श्रीभगवंतापाशी प्रार्थना करितात. यावरून श्रीरघुनाथमहाराजांच्यासारख्या सत्पुरुषांच्या उदरी जन्म येणे व श्रीरघुनाथमहाराजांच्यासारखे वडील लाभणे ही किती महत् पुण्याईची गोष्ट असेल, याचा विचार वाचकांनीच करावा. म्हणून रामानंदमहाराज म्हणतात, 'काय माझे पूर्वी पुण्य असंख्यात, सद्‌गुरू भगवंत भेटले हो, त्यांचे पोटी जन्म दिला नारायणे.' यावरून प्रत्यक्ष भगवान्च सद्‌गुरुरूपाने प्रगट झाले असून, श्रीभगवंताचे इच्छेनुरूप अगणित पुण्याईचे जोरावर रामानंदमहाराजांचा जन्म या अवतारी पुरुषांचे पोटी झाला, हे सिद्ध होते. अर्थात् साधा फाटका तुटका मनुष्यसुद्धा मुलाबाळांचे संगोपन करून, त्यांचे कोडकौतुक पुरवितो, तर



महाधिकारी, अवतारी पुरुष श्रीरघुनाथमहाराज यांनी आपल्या या अर्भकाचे कोडकौतुक मोठ्या प्रेमाने पुरविले, हे सांगणे नकोच.

म्हणूनच 'पाळिले तयाने आम्हालागी । कृपेने पोसिले माय बापे,' अशा तऱ्हेचे उद्‌गार रामानंदांचे मुखातून निघाले आहेत. श्रीरघुनाथमहाराज हे त्यांचे तर पिता होतेच, पण आईचेही प्रेम तेच करीत होते आणि योगायोग असा की तेच पुढे त्यांचे सद्‌गुरू झाले. म्हणून 'रघुनाथ पिता तोची माझी माता, ब्रह्मांड उभवितो सद्‌गुरू तो,' असे त्यांनी म्हटले आहे. आई, बाप आणि सद्‌गुरू या तीन प्रेमांचे जेथे ऐक्य झाले आहे, त्या प्रेमाचे वर्णन कोणी करावे? अशातऱ्हेच्या वात्सल्याने श्रीरघुनाथमहाराजांनी आपल्या लेकरावर पूर्ण कृपेची पाखर केली.

श्रीरामानंदमहाराज यांचे बालपण अज्ञानातच गेले. त्यांचे शिक्षणाकडे विशेष लक्ष नव्हते. तेव्हा ज्याप्रमाणे लहान अर्भक आपल्या पोटाची चिंता करीत नाही, किंवा 'पक्षी अजगर न करी संचित । तयासी अनंत प्रतिपाळे,' या न्यायाने ज्याप्रमाणे पक्षी आपल्या पोटाचा विचार करीत नाहीत, त्याप्रमाणे आपल्या उदरनिर्वाहाची चिंता रामानंदमहाराजांनी कधीच केली नाही. 'चिंता देवाला आहे' असे ते म्हणत असत. ज्याप्रमाणे लहान मुलाचे सर्व व्यवहार आईलाच संभाळावे लागतात, त्याप्रमाणे बालपण संपून जरी हे तारुण्यावस्थेत आले, तरी 'लहानपण देगा देवा' या तुकाराममहाराज यांचे उक्तीप्रमाणे यांची वृत्ति असून, रघुनाथमहाराजांना सर्व काही काळजी आहे, असे मानून, त्यांनी त्यांच्यावरच भार टाकला असल्याकारणाने सर्व काही व्यवहार या निःसीम भक्ताकरिताच रघुनाथमहाराजांना करावे लागत. यावरून रामानंदमहाराजांची निःसीम अनन्यता आणि रघुनाथमहाराजांचे निष्काम वात्सल्य काय तऱ्हेचे होते, हे भगवंतांनी जशी भक्तांची कामे केली व त्यात त्याला अपमान मुळीच वाटला नाही, तद्वत्च रघुनाथमहाराजांनी रामानंदाचे सर्व व्यवहार चालविल्याने, रघुनाथमहाराजांचे थोर अंतःकरण आणि 'असोनी नसणे जनी आम्हा,' या श्रीतुकाराममहाराज यांचे उक्तीप्रमाणे असलेला प्रपंचातील अलिप्तपणा, व

सद्‌गुरूंचे ठिकाणी असलेला अनन्यभाव यांत प्रतीत होत आहे. म्हणूनच 'बालपण सरता आले जाणपण, व्यवहरती पाहून सद्‌गुरूची,' असे रामानंदांनी एका अभंगात म्हटले आहे.

अशा स्थितीत गुरुकृपा होण्यापूर्वी अनन्य भावाने आणि बालवृत्तीने पूर्व भूमिका पूर्ण रंगल्यावर, या विविध तापाची चांगलीच जाणीव होऊन, अंगी मुमुक्षुत्व बाणण्यास कितीसा वेळ?

श्रीरघुनाथमहाराज पुराण फारच उत्तम सांगत असत. हे काशीचे श्रीसद्‌गुरू काशीनाथमहाराज या नावाचे मुकुंदरायांचे मालिकेतील एक महान् अधिकारी सत्पुरुष होऊन गेले, त्यांचे पट्टशिष्य होत. रघुनाथमहाराजांचे वर त्यांची पूर्ण कृपा होती. रघुनाथमहाराज यांनी पूर्ण साधनसिद्धता केल्यावर, सद्‌गुरूकडून त्यांना जगदोद्धार करण्याची आज्ञा झाली. तेव्हापासून त्यांच्या वाणीत एक दिव्य सामर्थ्य प्राप्त झाले. त्यांचा उपदेश लोकांच्या मनावर फार परिणामकारक होऊ लागला, व तेव्हापासून त्यांच्या सांप्रदायात शेकडो लोक सामील झाले आणि मुकुंदराज मालिकेतील साधनपरंपरा आणि उज्वल तत्त्वज्ञान अबाधित राखण्याचे सर्वस्वी श्रेय श्रीरघुनाथमहाराज यांनी मिळवले. येवढ्यावरून रघुनाथमहाराजांच्या कर्तृत्वाविषयी वाचकांस सामान्य कल्पना येईल. श्रीरघुनाथमहाराज यांचे शिष्यपरंपरेत श्रीभीमानंद व श्रीरामानंद हीच काय ती दोन रत्ने निपजली आणि आपल्या दिव्य आचरणाने प्रभावशाली होऊन, अमर कीर्तिमान् होऊन राहिली.

श्रीभीमानंद हे श्रीरामानंदांचे वडील बंधू असून, तेही महान् अधिकारी सत्पुरुष होऊन गेले. यांनी या परमार्थ-परंपरेत कडकडीत वैराग्याची भर टाकली आणि साधनबलाने सद्‌गुरूला संतोषित करून, त्यांनी जगदोद्धाराची आज्ञा मिळविली, आणि सर्व संप्रदायास वंदनीय होऊन राहिले. काही एका क्षुल्लक कारणावरून जे एकदा बायकोशी भांडले, ते तिला पुनः स्पर्शच केला नाही. यावरून त्यांचे कडकडीत वैराग्य निदर्शनास येण्याजोगे आहे. त्यांची बायकोही महान् पतिव्रता अधिकारी असून, तीही अखेरपर्यंत पातिव्रत्याने



राहिली. भीमानंदांच्या लावण्या फार प्रसिद्ध आहेत. त्यांनी शिवशक्तीचा वाद मोडून, त्यांची ऐक्यता आणि श्रेष्ठता या लावण्यातून सिद्ध केली असून, कलगी आणि तुरा हे जे दोन वाद आहेत, त्यांचे त्यांनी समूळ उच्चाटण केले आहे. आणि त्याला नीतितत्त्वाचीही पण जोड दिली आहे. हे त्यांचे खटावसंप्रदायातील विशेष कार्य होय. परस्त्रीला ते पहातही नसत. ही सिद्धाची भूमिका त्यांनी पूर्णपणे कमावली असल्याने त्यांनी आपल्या लावण्यांनी मोठमोठ्या कलगीवाल्यांना आणि तुरावाल्यांना अगदी वेड लावून टाकले होते. जेथे जेथे लावण्यांचे अड्डे आहेत, तेथे तेथे भीमानंदांची लावणी ही आदर्श मानली जाते, आणि शिव-शक्ति-वादाची ऐक्यता भीमानंदांनी केल्याने, लोकांच्या पाठात भीमानंदाच्या लावण्याच विशेष आहेत. यावरून त्यांची योग्यता वाचकांनीच ठरवावी. त्यांच्यावर श्रीरघुनाथमहाराजांनी कृपा केल्यावर, ते काय योग्यतेला जाऊन पोचले होते, त्याचे वर्णन त्यांनी आपल्या एका अभंगात केले आहे, तो अभंग असा :-

आम्ही भोळे आम्ही भोळे । पिंडब्रह्मांडा वेगळे ।।
आम्ही लुच्चे आम्ही लुच्चे । नित्य ब्रह्मपदी नाचे ।।
आम्ही वेडे आम्ही वेडे । जीवाशिवा पलीकडे ।।
भीमदास म्हणे आम्ही । मिरास केली परब्रह्मी ।।

असो. याप्रमाणे हे सर्वच घराणे या तोडीचे असल्याकारणाने, रघुनाथमहाराजांनी जिथे बाहेरच्या शेकडो लोकांना आपल्याकडे खेचून घेतले तेथे पोटच्या पोरास खेचून घेण्यास कितीसा उशीर? 'शास्त्र हे पुराण ऐकता श्रवणी । पश्चाताप मनी झाला असे' असे श्रीरामनंदमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे, श्रीरघुनाथमहाराज हे जेव्हा पुराण सांगत असत, तेव्हा श्रीरामानंदमहाराज यांच्या कानावर ती ओजस्वी वाणी नित्य पडत असल्याने, त्याची गोडी रामानंदांना लागली, आणि त्यांनी घट्ट पाय धरले आणि सांगितले, 'महाराज, माझ्या अज्ञानपणाचा मला पश्चाताप झाला आहे. माझे सर्व अपराध क्षमा करा आणि मला पदरात घ्या.' असे विनविताच करुणासागर श्रीसद्‌गुरू त्यांना त्या लेकराची

कीव आली आणि 'मग सद्गुरूचे चरणासी लागता । ज्ञानाची खूण दाखविली ।। 'असे श्रीरामानंदमहाराज यांनी म्हटल्याप्रमाणे, रामानंदांच्या ठिकाणी कृपा करून, त्यांना रघुनाथमहाराजांनी त्यांचे मस्तकावर हात ठेवून, परिपूर्ण आत्मज्ञान त्यांचे अंतःकरणात निर्माण केले.

रामानंदमहाराजांचे वरती या रीतीने सद्गुरूंची कृपा झाल्यावर, सद्गुरूंनी साक्षात् ब्रह्मस्वरूप त्यांचे डोळ्यापुढे उभेच केले. तेव्हा रामानंदमहाराजांनी आपले तन ,मन, धनच त्यांना अर्पण केले, आणि इतके करूनही सद्गुरूंचे उपकार अनंत आहेत; त्या उपकारांची फेडच होणे शक्य नाही, त्यांचे चरणी हा जीव जरी अर्पण केला तरी 'काय द्यावे ह्यासी व्हावे उतराई, ठेविता हा पायी जीव थोडा,'ह्या श्रीतुकाराममहाराजांचे उक्तीप्रमाणे, इतके करूनही फिटणार नाहीत, असे म्हणून त्यांनी आपली कृतज्ञता 'या देहावाचोनी आणखी काय देऊ, ठेविता हा पायी जीव थोडा,' या अभंगवाणीतून व्यक्त केली.

साधनसिद्धता होऊन स्वरूपसिद्धी साधण्यासाठी त्यांनी झटून साधन केले.याप्रमाणे १८ वर्षांचा काल जवळजवळ अहर्निश त्यांनी भगवन्नाम-साधनात घालवून, साधनाची पूर्ण सिद्धता केली. शिष्याचे हे अलोट साधन पाहून, श्रीरघुनाथमहाराज त्यांच्यावर पूर्णपणे प्रसन्न झाले आणि त्यांच्यावर पूर्ण कृपेची पाखर केली. हे 'अठरा वर्षामध्ये प्रसन्न ते झाले, मस्तकी ठेविले हस्त माझे, रामचंद्र म्हणे माझी ती माऊली, कृपेची साऊली केली आम्हा,' या श्रीरामानंदमहाराज यांचे वचनावरून स्पष्ट होत आहे.

सरकारस्वारींची मर्जी जर एकाद्यावर बसली, तर तो मनुष्यसुद्धा त्यांचे जिवावर विलास करू शकतो, मग त्यांचे पोटी जन्मलेले पुत्ररत्न राजवैभव भोगल्याशिवाय राहील काय? तद्वत् संतांनी जर एखाद्यावर कृपा केली, तर ते त्याचे ऐहिक आणि पारत्रिक कल्याण करतात. मग जे गुरुपुत्र झाले ते पारमार्थिक वैभव भोगल्याशिवाय राहतील काय? जे सुख सुरासुर-वरांना दुर्लभ आहे, ते सुख 'दिवसा पहाव्या तारा रे, रात्री रवीचा फेरा रे, सुरासुरवरा दुर्लभ जे का, ते सुख गुरुच्या पोरा रे' या चिमडच्या श्रीरामचंद्रावजीमहाराज



यरगट्टीकर यांचे उक्तीप्रमाणे गुरूंच्या सामान्य पोरालासुद्धा जर ते प्राप्त होत आहे, तर परिपूर्ण साधनसिद्धता होऊन, सांप्रदाय चालविण्यास योग्य अशा महाधिकारी गुरुपुत्राला हे साक्षात्कार प्रचीतीला येतील यात नवल ते काय? या दृष्टीने सद्गुरूंनी त्यांना काय तऱ्हेचा अनुभव दिला हे त्यांच्याच अभंगावरून आपण पाहू. तो अभंग असा :-

मज दृष्टीचे निज दृष्टी । बैसविले तयापाठी ।।१।।
अलीकडे नीलवर्ण । पलीकडे शुद्ध घन ।।२।।
निळाअलीकडे श्याम रंग । पलीकडे माया सोंग ।।३।।
श्यामाअलीकडे शुभ्र वर्ण । पलीकडे शंभुस्थान ।।४।।
श्वेताअलीकडे रक्त खासे । पलीकडे विष्णू असे ।।५।।
रक्ताअलीकडे स्थूल देह । पलीकडे ब्रह्म आहे ।।६।।
ऊर्ध्वमुखीचा हा रस्ता । पाहे गुरुपुत्र पुरता ।।७।।
ऐसा हा रस्ता अवघड । रघुनाथे केले सोघड ।।८।।
रामचंद्र ऐसे बोले । आम्ही परिपाठ केले ।।९।।

यावरून श्रीमुकुंदराजमालिकेतील श्रीरामानंदांना प्राप्त झालेला मार्ग, त्यांना प्रचीतीस आलेल्या साक्षात्काराचे आडाखे, आणि हा अवघड रस्ता सुलभ करणारे श्रीरघुनाथमहाराज, या सर्व गोष्टींचा आपणांस बोध होत असून, श्रीरघुनाथमहाराज यांच्या कामगिरीवर चांगलाच प्रकाश पडतो आहे. इतक्या तऱ्हेची योग्यता श्रीरामानंदमहाराजांनी कमाविली असून, त्यांच्या अंगी अत्यंत नम्रता होती. आपण केले हे साधन काहीच केले नाही, असे त्यांना वाटत होते. 'याच देही मज ब्रह्म दाखविले, नाही करविले कष्ट काही,' 'नाही माझे हस्ते सेवाही घेतली, निज वस्तु दाविली डोळेभरी,' या त्यांचे अभंगोक्तीवरून त्यांची नम्रता आणि निस्सीम गुरुभक्ती व्यक्त होते. अशा तऱ्हेचे श्रीरामानंदमहाराज हे एक रघुनाथमहाराजांचे निस्सीम भक्त असल्याने, रघुनाथमहाराजांनी त्यांचा विशेष लळा पुरविला. त्या कारणाने श्रीरामानंदांचे मुखातून खालील अभंगोद्गार

निघाले :- 'आपुले म्हणोनी बालकाचा लळा पुरविला दयाळा रघुराया,' 'जैसी मनी होते तैसे पुरविले, नाही कमी केले काही आम्हा,' 'तीन्ही लोक जरी करिता अर्पण न पवे सरी जाण उत्तीर्णाची,' 'रामचंद्र म्हणे शरीर संपत्ती, तुमचे तुम्हाप्रती अर्पितो मी.'

या रीतीने श्रीरामानंदमहाराजांनी श्रीरघुनाथमहाराजांचे चरणांजवळ स्वात्मार्पण केले होते. अहंकाराचा लेशही उरला नाही असे पाहून, व श्रीरामानंदमहाराज काही विचारमग्न स्थितीत आहेत असे पाहून, श्रीरामानंदांना काहीतरी आपणांस विचारावयाचे आहे, असे जाणून, श्रीरघुनाथमहाराज हसतमुख होऊन, रामानंदांवर प्रसन्न झाले, आणि 'काय इच्छा आहे,' म्हणून विचारले.तेव्हा उभय हस्त जोडून, 'देवा इतुकेची मागणे, न्यावे मज उद्धरून' या रीतीने मोठ्या कळवळ्याने प्रार्थना केली. त्याबरोबर रामानंदांचे मनात आलेला संशय व ते स्वतः मुक्त स्थितीला गेले असताना, त्यांचे ठिकाणी अजून आपला उद्धार व्हावयाचा आहे ही मनोवृत्ती उत्पन्न झालेली पाहून, त्यांना प्राप्त झालेली मुक्तावस्था उजेडात आणून दाखविण्यासाठीच की काय रघुनाथमहाराजांनी मस्तकावर हस्त ठेविला आणि 'बघ' म्हणून सांगितले. तोच काय चमत्कार सांगावा? जिकडे तिकडे कोटी सूर्य तळपावेत याप्रमाणे प्रकाश दिसू लागला. तो अनुभव रामानंदांनी आपल्या एका अभंगात ग्रथित केला आहे. तो अभंग येणेप्रमाणे :-

हस्त ठेविता मस्तकी । नवल झाले एकाएकी ।।१।।
कोटी सूर्य उगवले । तैसे प्रकाश कोंदले ।।२।।
याची देही याची डोळा । देखिला हा घनसावळा ।।३।।
ऐशी आश्चर्याची गोष्टी । रामचंद्र देखे दृष्टी ।।४।।

यावरून रघुनाथमहाराजांचा अधिकार काय तऱ्हेचा होता हे वाचकांस सहज उलगडण्याजोगे आहे. रघुनाथमहाराजांनी रामानंदमहाराजांना मुक्त स्थिती तर दाखविलीच पण जन्ममरणाच्या अतीत होऊन रहाण्याची साधनक्रिया सांगून, शुद्ध स्वरूपाच्या उदयाने त्यांना जन्ममरणरहितच करून टाकिले. हे त्यांच्या खालील अभंगावरून दिसून येईल :-



अहो दयाळू सद्गुरू । ज्ञानबीजाचे आगरू ।।१।।
देव कृपेचा सागरू । रघुनाथ माझा गुरू ।।२।।
ज्ञान बीज हे पेरिले । शुद्ध स्वरूप उगवले ।।३।।
याच देही याच डोळा । केला प्रकाश बंबाळा ।।४।।
रघुनाथे ऐसे केले । जन्ममरण चुकविले ।।५।।

या रीतीने श्रीरामानंदमहाराजांची वृत्ति निःसंदेह केल्यावर, श्रीरघुनाथमहाराजांनी श्रीरामानंदांना पुनः एकवार

ब्रह्म ते आपण आपण ते ब्रह्म । ऐसे आहे वर्म अनादीचे ।।
शिवामध्ये जीव जीवामध्ये शिव । नाही भेदभाव उभयता ।।
संतांच्या कृपेने कळे अनुभव । सुलभ उपाव तात्काळची ।।
न लगे साधन सायास ते काही । जप तप तेही न लागती ।।
रामचंद्र म्हणे सद्गुरूचे पायी । ठेवविती डोई एक भावी ।।

या रीतीने परिपूर्ण निश्चयी वृत्ति करण्याकरता त्यांना बोध केल्याचे रामानंदांनी आपल्या अभंगात ग्रथित केले आहे.

यानंतर श्रीरामानंदमहाराज यांचे ठिकाणी स्वानुभवजन्य ज्ञान परिपूर्ण रीतीने बाणले आहे, असे पाहून आणि पुढे सांप्रदायपरंपरा चालविण्यास हे परम अधिकारी आहेत असे जाणून, श्रीरघुनाथमहाराजांनी देह ठेवण्याचा विचार चालविला. सर्व लोकांना आपले प्रयाण सुचवून, 'आमचा रामराम घ्यावा' अशी विनंती केली, आणि शके १७९६, माघ शुद्ध त्रयोदशी, वार गुरुवार, ह्या दिवशी रात्री समाधी घेऊन ब्रह्मरूपात मिळून गेले. त्याविषयी रामानंदांचा अभंग आहे तो असा :-

ऐसी कृपा करोनी ब्रह्म ठसविले । अघटित केले करणे पुढे ।।१।।
माघ शुद्ध त्रयोदशीचा हा दिन । गुरुवार पूर्ण साधियेला ।।२।।
शके हे सतराशे शहाण्णवाची खूण । ओळखावी पूर्ण सत् शिष्याने ।।३।।
बोलोनी चालोनी सांगितले सर्वा । रामराम घ्यावा आज तुम्ही ।।४।।
ऐसे बोलोनिया सव्वा प्रहर रात्र । पाहोनिया नेत्र झाकियले ।।५।।

रघुनाथ गुरूंनी ऐसी केली करणी । समाधि घेवोनी स्थिर झाले ।।६।।
रामचंद्र म्हणे समाधिद्वारात । चरणी लोळत राहू आम्ही ।।७।।

इतके झाल्यावर रामानंदमहाराजांना सद्गुरूंच्या निधनाबद्दल अत्यंत दुःख झाले. ते वर्णन करण्याचे पलीकडे आहे. 'जीवनावेगळी मासोळी, तुका तैसा तळमळी' ह्या श्रीतुकाराममहाराजांच्या वचनाप्रमाणे, रामानंदमहाराज सद्गुरूंच्या विरहाने फार कष्टी झाले. तथापि सद्गुरूंनी त्यांना सांप्रदायपरंपरा चालविण्यास सांगितली असल्याकारणाने, त्या कार्याकडे लक्ष ठेवून, त्यांनी आपला शोक आवरला. कारण सांप्रदायाची परंपरा चालवण्याबद्दल रामानंदमहाराजांचेकडून रघुनाथमहाराजांनी तीन वेळ वचन घेतले होते. रामानंदमहाराजांना कीर्तीची अपेक्षाच नव्हती. पण कस्तूरी दडवून तिचा सुगंध दडेल काय? किंवा सूर्याला मडक्यात ठेवून त्याचा प्रकाश झाकेल काय? त्याप्रमाणे रामानंद जरी कीर्तिनिरपेक्ष होते तरी ते कीर्तिविन्मुख रहातील काय? कधीच नाही. या कारणाने आपल्या प्रभावाने प्रभावशाली झालेले हे राम रघुनाथमहाराजांनी आपल्या देहावसान समयी उजेडात आणले, आणि लवकरच ते आपल्या प्रखर अशा देदीप्यमान तेजाने तळपू लागले.

तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करून, त्यांनी आपला शोक आवरला. त्यांच्या इतर शिष्यांनाही धीराच्या चार गोष्टी सांगून, आपल्या बुद्धिसामर्थ्याने गत गोष्टींचा त्यांना विसर पाडावयास लावले, आणि सर्वांवर कृपेची पाखर केली.

लवकरच त्यांनी आपल्या सद्गुरूंची समाधी बांधली, आणि त्यांच्या पुण्यतिथीस भंडारा सुरू केला. सद्गुरूंच्या देहावसानानंतर त्यांचे समाधिमंदिराकडे पाहून रामानंदाचे मनात आलेले विचार खालील अभंगात प्रगट झाले :-

धन्य रघुराया । दासा पूर्ण केली छाया ।।१।।
माझी सद्गुरूमूर्ती । नित्य जेथें फिरत होती ।।२।।
तया स्थलीचे महिमान । तेथे घालतो लोळण ।।३।।
गुरु स्नान जेथे करिती । तेची माझी भागीरथी ।।४।।



अहो सद्गुरू आसन । तेची माझे पद्मासन ।।५।।
रामचंद्र म्हणे स्वरूपा । माझे सद्गुरू तू बापा ।।६।। असो.

श्रीरघुनाथमहाराज यांची समाधी बांधल्यावर, त्यांचा मठ व्यवस्थीशीर बांधण्यास कोल्हापूरच्या एका बाईने एका रकमेने १० हजार रुपये देऊ केले होते. त्यावेळी 'आपले पैसे घेऊन श्रीरघुनाथमहाराज यांचा मठ बांधण्याला आमच्या महाराजांचे वैभव काही कमी नाही,' असे उद्गार काढले आणि 'त्यांचे मनात येईल तर काहीच अशक्य नाही,' असे सांगून एक प्रकारे त्यांनी आपली निर्मोहताच सिद्ध केली. समाधीच्या निमित्तानेही द्रव्यलोभास ते बळी पडले नाहीत. या व्यतिरिक्त शिष्यांचेकडून काही नजरनजराणा आल्यास, त्यासही त्यांनी स्पर्श केला नाही. ही गोष्ट किती बिकट आहे, हे मनासी आणून, त्यांच्या विरक्तपणाचा अधिकार काय होता, याचा विचार वाचकांनीच करावा. त्यांची नम्रताही वाखाणण्याजोगी होती. सर्व भूतमात्रांचे ठिकाणी त्यांचे उज्ज्वल प्रेम असून, सर्वा भूती ते भगवद्भाव पहात होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'जो सर्वा भूतांचे ठायी । द्वेषाते नेणेची काही । आपपरु जया नाही । चैतन्या जैसे,' या तऱ्हेची त्यांची वृत्ति होती. आपल्या प्रेमळ शब्दांनी सर्वांना आकर्षित करण्याची अनुपम हातोटी त्यांच्याजवळ होती.

आता त्यांचे गुरुप्रेम पूर्णपणे विकसित झाले होते. देहावसानापूर्वी रघुनाथमहाराज हे केवळ ३।। हात देहातच व्याप्त होते. पण आता ते जगदाकारेच विद्यमान होऊन राहिले. लोकांना त्यांच्या सात्त्विक स्वरूपाचे दर्शन कसे होईल असे वाटत होते. तर रामानंदांना रघुनाथमहाराज सर्वत्र सगुण रूपाने दृग्गोचर होत होते. एकाद्या भयंकर संकटाचे वेळी आपदानिरसनार्थ हुकमी आश्वासन देणारा आता दुसरा पाठीराखा उरला नाही, असे इतरे जनांस वाटत होते, तर सर्वव्यापी महाराजांच्या दर्शनाने रामानंद निर्भयच होऊन राहिले होते. दृश्यातील सगुणत्वाच्या ठिकाणी होणाऱ्या हालचालीत रघुनाथमहाराजांची कृतीच रामानंदांच्या डोळ्यांत भरून राहिली होती. या कारणाने आपल्या विश्वव्यापी श्रीसद्गुरूंचे साक्षात्कारस्वरूप आणि वास्तव्य ठिकाण त्यांचेच समकालीन

असलेले सुप्रसिद्ध संत श्रीसद्‌गुरू हनुमंतरावजी कोटणीसमहाराज यांनी आपल्या पद्यात केलेल्या विश्वव्यापी सद्‌गुरूंचे वर्णनाप्रमाणेच, श्रीरामानंदांनी आपल्या एका अभंगात वर्णन केले आहे. म्हणून प्रथम श्रीसद्‌गुरू तात्यासाहेबमहाराजांचे पद्य व नंतर श्रीरामानंदांचा अभंग यथानुक्रमे खाली देत आहो :-

पद्य

सद्‌गुरूराज पहा प्राण्या । मग तू मुक्त होसी शहाण्या ।।ध्रु।।
त्रिकूट शिखरावरती पाहे । वस्ती ज्यांची आहे ।
इडा पिंगला सुषुम्नेच्या । संगमी वसताहे ।।१।।
पहाता मन हे तल्लीन झाले । दिसते मौक्तिक माला ।
गगनाहूनी कोसळताती । नक्षत्रांच्या माळा ।।२।।
रघुनाथप्रिय गुरुवर स्वामी । यांचा प्रसाद घ्यावा ।
आत्माराम सर्वा ठायी । नेत्रांतरी पहावा ।।३।।

अभंग

कोण स्थळी रहाती गुरू । तोही सांगतो विस्तारू ।।१।।
निर्गुण पुर त्यांचे गाव । तेथे आहे रघुनाथ ।।२।।
जन वन तेथे नाही । ब्रह्मसुख सदा पाही ।।३।।
ब्रह्मसुखाते मिळाले । रामचंद्रासी कळले ।।४।।

यावरून सर्व संतांचे विचार एक कसे असतात, आणि त्यांची हृदय-वाटिका एक कशी असते, हे आपणांस दिसून येईल.

सर्व संत हे एकच असल्याने, ते कोणत्याही अन्य सांप्रदायांचा द्रोह करीत नाहीत. कारण निरनिराळे सांप्रदाय नामाभिधानाने भिन्न असले, तरी तत्त्वतः ते एकच आहेत, आणि सर्वांचे ध्येय एकच आहे, हे त्यांनी जाणलेले असते. या कारणाने 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे' ही त्यांची हृदयवृत्ती तुकाराममहाराजांनी म्हटल्याप्रमाणे परिपूर्ण होती. म्हणून ते अन्य सर्व सांप्रदायांशी अद्रोहतेने आणि एकनिष्ठेने वागले. याचा आम्हांस जातीने अनुभव आहे. आम्ही चिमडचे सांप्रदायिक असूनही, खटाव



सांप्रदायिकांवर ते जितके प्रेम करीत होते, तितकेच ते आम्हांवर आणि इतर सर्व अन्य सांप्रदायिकांवर अकृत्रिम प्रेम करीत होते आणि खटाव-पंथातील मूळ सत्पुरुषांच्यावर त्यांची जितकी अनन्य निष्ठा होती, तितकीच इतर सर्व संतावरही, ज्ञानेश्वर, तुकाराममहाराजांच्यासारख्या वारकरी संतांवर आणि त्यांचे समकालीन असलेल्या श्रीसद्‌गुरू तात्यासाहेबमहाराज यासारख्या चिमड सांप्रदायातील महान् संत विभूतीवर त्यांची अनुपम निष्ठा होती. श्रीसद्‌गुरु तात्यासाहेबमहाराज यांचे समाधीचे दर्शनास मुद्दाम ते दोन तीन वेळा येऊन गेले. तसेच श्रीसद्‌गुरू तात्यासाहेबमहाराज यांचे पट्टशिष्य ह.भ.प.गुरुवर्य बापूरावजी केळकर यांचेवर आणि त्यांचे चिरंजीव राम गोविंद केळकर (= प्रस्तुत लेखक) यांजवर त्यांचे अकृत्रिम प्रेम होते. ते प्रेम काय तऱ्हेचे होते ते ह.भ.प.बापूरावजी केळकर यांचेवर निष्ठा ठेवणाऱ्या एका बाल विद्यार्थ्याने ओवीवृत्तात ग्रथित केले आहे, तेच आम्ही पुढे देणार आहो.

ह.भ.प.बापूरावजी यांचे बाबतीत रामानंद 'श्रीसद्‌गुरू तात्यासाहेबमहाराज हे तुकाराम व बापूरावजी हे निळोबा होत,' असे वारंवार म्हणत असत. यावरून बापूरावजीचे संबंधी त्यांचे किती उज्ज्वल प्रेम होते, याची कल्पना चाणाक्ष वाचक करतीलच.

श्रीरामानंदमहाराज यांचे श्रीमत् ग्रंथराज दासबोध, विवेकसिंधू, अमृतानुभव, पंचीकरण इत्यादी ग्रंथांवर चांगलेच प्रभुत्व असून, सोप्या पण मार्मिक भाषेत प्रवचन करण्यात त्यांचा हातखंडा असे. या त्यांच्या गाढ अभ्यासाने त्यांच्या वाणीत अतुल सामर्थ्य प्राप्त झाले होते. आणि या कारणाने सर्वांची मने ते सहज रीत्या आकर्षित करीत असत. हे त्यांच्या सांप्रदायात आज हजारो लोक समाविष्ट होऊन आज त्याला जे विस्तृत स्वरूप प्राप्त झाले आहे आणि त्या सांप्रदायाचा जो सर्व विस्तार झाला आहे, यावरून हे सहजच स्पष्ट होत आहे. अर्थात खटाव सांप्रदायाचे विस्ताराचे आणि ज्ञानवृद्धीचे सर्वस्वी श्रेय श्रीरामानंदमहाराज यांसच निर्विवाद आहे. त्यांच्या सांप्रदायातील अधिकारी वर्गास त्यांनी पंचीकरणाची चांगलीच माहिती करून दिली होती.

श्रीरामानंदमहाराजांचा नियमित पुराण सांगण्याचा प्रघात असे. ते भजनही फार गोड करीत असत. त्यांच्या चाली साध्या पण चित्ताकर्षक असत. ते भक्तजनांस वारंवार जागृती देण्याकरिता इतस्ततः संचार करीत असत व 'नाठवी तो स्वये द्यावी आठवण' या श्रीनिळोबारायांच्या वचनोक्तीप्रमाणे आपल्या शिष्यजनास भगवन्नाम-स्मृतीबद्दल वारंवार इशारा देऊन, आपले कार्य बजावीत असत.

१) याप्रमाणे संचार करीत असता, रामानंदमहाराज वरचेवर सांगलीस येत असत, तेव्हा ते ह.भ.प.बापूरावजी केळकर यांचे घराचे पुढील बाजूस रा.बाबाण्णा सोनार यांचे घरी उतरत असत. तेव्हा बहुतेक दासबोध सांगण्याचे काम चाले. त्यावेळी किती तरी वेळा एकदम सुवास सुटत असे आणि त्याबद्दल प्रस्तुत लेखकाने त्यांचेपाशी प्रश्न काढला की महाराज हसत असत. यावरून त्यांच्या प्रवचनात काय सामर्थ्य होते, याचा विचार वाचकांनी करावा.

२) एकदा श्रीरामानंदमहाराज यांची स्वारी सांगलीत रा. बाबाण्णा सोनार यांचे घरी आली असता, एक गृहस्थ त्यांना दासबोधातील शंका विचारण्यास आले होते. योगायोग असा की त्यावेळीच महाराजांचे प्रवचन चालले होते. मग चमत्कार काय सांगावा? त्या गृहस्थाने मनात धरून आलेल्या सर्व शंकांचे निरसन ताबडतोब प्रवचनातच झाले. अर्थात् महाराजांच्या सामर्थ्याची जाणीव त्या सद्गृहस्थास होऊन, त्याने महाराजांचे घट्ट पाय धरले, आणि गुरूपदिष्ट मार्गाने तो लौकरच कृतार्थ झाला.

३) त्याचप्रमाणे, महाराजांची स्वारी सांगलीस असता, एक गृहस्थ त्यांना शरण आला होता. परंतु आपले उपास्य दैवत जर रामानंद ओळखतील, तर ते संत होत, या भावनेने तो आला असल्याने, व ते त्यांनी ओळखले तर तो शरण जाणार असल्याने, महाराजांचे मनात काय आले कोणास ठाऊक? 'उगवेल प्रारब्ध संतसंगे करूनी' या श्रीतुकाराममहाराजांच्या वचनानुसार त्यांनी एकदा सहज वर पाहिले, आणि 'काय, आपणांस दत्ताची उपासना करावयाची आहे काय?' असा अकस्मात् प्रश्न केला. त्याबरोबर तो चकित होऊन



महाराजांना शरण आला.

४) एकदा एक शिवशक्तींचा वाद करणारे पंडित गृहस्थ महाराजांचेकडे आले होते. घटकेत शिवाचे श्रेष्ठत्व सिद्ध करीत, तर घटकेत आपल्या वाक् चातुर्याने शक्तीला श्रेष्ठ करीत. त्यांनी शिवशक्तींच्या लावण्यांचा विशेष अभ्यास केला असून, महाराजांचे बरोबर वाद करून, त्यांना जिंकण्यासाठी ते आले होते. परंतु नवल चमत्कार असा :- महाराजांनी त्या गृहस्थाकडे क्षणमात्र दृष्टी खेळविली, तो त्याला बोलण्याचे काहीच सुचेना. या रीतीने महाराजांनी वादाची बाजू टाळली आणि 'तुटे वाद संवाद तो हितकारी' या समर्थांच्या शिकवणुकीचे रहस्य भक्तजनास सिद्ध करून, शिवशक्तींची ऐक्यता त्या विद्वानास दाखवून दिली. त्या बरोबर तो पंडित निरुत्तर झाला व त्याने अद्वय मार्ग स्वीकारला.

५) एकदा श्रीरामानंदमहाराज हे रा.बाबाण्या सोनार यांचे घरी असता, एक छलक गृहस्थ त्यांची छळणा करण्याकरिता आला होता. तो नेहमी त्यांचे विषयी दुष्टपणाने बोलत असे. पण सर्वच प्रकार एकदम उलटा झाला. महाराजांचे मुखावलोकन केल्याबरोबर तो महाराजांना शरणागत झाला. अर्थात् त्याचा मूळचा हेतू सर्वस्वी पालटला हे सांगणे नकोच.

६) महाराजांचे सांप्रदायातील काही लोकांना त्यांनी आपल्या पूर्ण कृपेने साक्षात् प्रचीतीचे समाधान आणून दिले होते आणि कित्येक कुमार्गी लोकांना आपल्या सत् प्रवृत्तीने त्यांनी योग्य त्या मार्गावर आणले होते. 'संतांचा हा संग नोहे दिसतो तैसा, पालटती दशा तात्काळची ।।१।। चंदनाचे संगती पालटती झाडे । दुर्बळ लाकडे देवमाथा ।।२।।' अशा तऱ्हेची अनुभव स्थिती श्रीरामानंदमहाराजांचे बाबतीत आली होती. फार काय सांगावे? त्यांच्या पुराणश्रवणाने एक मुसलमान कसाई आपल्या व्यवसायापासून परावृत्त होऊन, त्याला एकाएकी पश्चात्ताप झाला, व त्याने ऐनजिनसी आपला धंदा सोडून दिला.

७) महाराजांचे शिष्यमंडळीत ह.भ.प.शिवमूर्ती बालकृष्णबुवा व श्रीशिवरामबुवा ही मंडळी श्रीगुरुकृपेने बरीच अधिकाराला पोचली असून,

श्रीरामानंदांनी यांचेवर विशेष कृपा केली, असे म्हणण्यास हरकत नाही. ह.भ.प.बालकृष्णबुवांना तर गुर्वनुग्रहाने एकदम वैराग्य प्राप्त होऊन, त्यांनी सुमारे १६ वर्षे अरण्यवास पत्करला आणि सात्त्विक ईश्वरी समाधान मिळविले. ह.भ.प.श्रीशिवराममूर्ती यांनी इतका साधनाभ्यास केला होता आणि त्यांची एकनिष्ठा इतकी दृढतम होती की गुरुपादपूजा केल्याशिवाय त्यांनी कधीही अन्नग्रहण केले नाही. या योगे त्यांना आपला मरणकालही समजला होता आणि सर्वांना सांगून, त्यांनी आनंदाने देह ठेवला. हेच त्यांच्या गुरुभक्तीचे फळ होय.

ह.भ.प.श्रीशिवरामबुवा हे श्रीरामानंदमहाराजांचे चिरंजीव असून, त्यांचे ठिकाणी केवल ज्ञानावस्था प्राप्त झाली असून, 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचे त्यांनी समाधान मिळविले होते. या योगाने महाराजांचा सांप्रदाय चालविण्याचे पुढे ते अधिकारी झाले. तो भाग आपण पुढे पाहू.

८) सांगलीस श्रीरामानंदमहाराज वरचेवर येत असत. त्यावेळी प्रस्तुत लेखक त्यांचेकडे विशेष जात असे. त्यावेळी तो बाल्यावस्थेत होता. तथापि महाराज त्याचेवर प्रेम फार करीत असत, व त्यांचेकडे पाहिल्यावर त्या बालकांचे मनात विशेष आदर व प्रेम उत्पन्न होत असे. ते का होत असे, ते त्याला आजही सांगता येणार नाही. तथापि 'संताचिये गावी प्रेमाचा सुकाळ' या न्यायानेच त्याचे अंतःकरणात प्रेमाचे भरते येत असावे, असे मानण्यास हरकत नाही. श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज यांचा पूर्ण कृपानुग्रह चौदावे दिवशी प्रस्तुत लेखकास झाला असल्याने रामानंदांसारख्या सत्पुरुषाविषयी त्याचे अंतःकरणात प्रेम उत्पन्न होणे स्वाभाविकच होते. तेव्हा तो प्रेमसंबंध काय तऱ्हेने निर्माण झाला व वाढत गेला ते, व ह.भ.प. बापूरावजी केळकर यांचा व श्रीरामानंदाचा जो प्रेमादरसंबंध निर्माण झाला, तो मजकूर संक्षेपेकरून एकत्र, मागे सांगितल्याप्रमाणे रा.नामदेव मोरेश्वर कुलकर्णी याने आपल्या ओवीवृत्तात जो मजकूर ग्रथित केला आहे, तो खाली देत आहे :-

रामभाऊ केळकर । श्रीरामानंदांचा त्यांचेवर ।
लोभ असे अनावर । काय सांगू ।।१।।



हाक द्यावी प्रेमेकरून । रामानंदांनी प्रल्हाद म्हणून ।
प्रेमे सांगावे कीर्तन । करावया ।।२।।
बहुत घडले यांचे साधन । थोडे राहिले ते करावया पूर्ण ।
म्हणून आला जन्मासी जाण । हे श्रीरामानंद सांगती ।।३।।
म्हणोनी रामाचे चौदावे दिनी । तात्यासाहेबमहाराज संत शिरोमणी ।
कैचे पातले गृहालागूनी । अनुग्रह केला असे ।।४।।
ज्यांचिये जन्माचे चौदावे दिवशी । सद्गुरू पातले घरासी ।
मग त्यांचेयी भाग्यासी । जोड नाही ।।५।।
मग गेले सहज बोलून । की कीर्तन करील हा जाण ।
भाग्याची कैची गती जाण । अपरंपार ।।६।।
म्हणून पाचवे वर्षापासून । कीर्तन करू लागले जाण ।
झाले असे खरे वचन । तात्यासाहेब सद्गुरूंचे ।।७।।
सांगती परमार्थ विचार । बोलती अनुभव प्रकार ।
सद्गुरूकृपा जया अपार । संतांचे आशीर्वाद जयाते ।।८।।
श्रीरामानंदांनी कीर्तन करण्यास सांगावे । बालाचे कीर्तन रंगूनी जावे ।
तल्लीन होऊनी नाचावे । कितीतरी ।।९।।
प्रेमे करावे कीर्तन । कीर्तनात व्हावे एक जाण ।
सुवास रहावा भरून । तये ठायी ।।१०।।
एके वेळी रामानंद । सांगत होते दासबोध ।
तेव्हा गेले प्रल्हाद । ऐकावया ।।११।।
तेव्हा रामानंद सांगती । संत वचन हृद्गत बोल म्हणती ।
त्यावेळी रामराय काय म्हणती । रामानंदप्रभूलागी ।।१२।।
तुम्हांसारिखे परम संत । हनुमंतराय सद्गुरू समर्थ ।
गोविंद पिताजी भगवद्भक्त । पाठीशी असता काय उणे ।।१३।।
मग आले सत्वर घरात । केला रामदासबोध ग्रंथ ।
दाखविला रामानंदाप्रत । तव ते पाहोनी संतोषिले ।।१४।।

धन्य रामानंदराज । साधुपरुष महाराज ।
ज्यांनी प्रगटविले सिद्धानंदराज । रामरायांचे कीर्तनी ।।१५।।
जयाचे कीर्तनी अपार । सुवास सुटावा थोर ।
प्रसाद मिळावा अपार । परमेश्वराचा ।।१६।।
महाराजांनी सकळा सांगावे । रामराय भगवद्भक्त होतील सुभावे ।
तुम्ही तयांचे ऐकावे । मनोभावे कीर्तन ।।१७।।
बापूरावजी केळकर । जे रामरायांचे पिता साचार ।
महाराजांनी त्यांचेवर । लोभ अपार करावा ।।१८।।
जे असती रामभक्त । जयांचे सद्गुरु हनुमंत ।
रंगोनि गेले साधनात । साधुपुरुष ।।१९।।
ज्यांनी केले अघोर साधन । गोमूत्राची भाकरी खाऊन ।
सद्गुरूंची कृपा पूर्ण । म्हणोनी झाली ।।२०।।
गुरू आज्ञे रोज कीर्तन । करिती एकनिष्ठा धरून ।
ज्यांना नित्य भगवद्दर्शन । होत असे ।।२१।।
रामानंद स्तुती करीत । निळोबारायांचा अवतार म्हणत ।
ते महिमान असे सार्थ । सत्य सत्य त्रिवाचा ।।२२।।
धन्य धन्य बापूराव । ज्यांचा आवडता देव ।
पाठी असे सद्गुरू देव । हनुमंत ।।२३।।
अंताजीपंत केळकर । शिवभक्त धुरंधर ।
त्यांचेवरीही अपार । प्रेम असे महाराजांचे ।।२४।।
संतश्रेष्ठ रामानंदांना । सद्गुरूराज हनुमंतरायांना ।
संतश्रेष्ठ बापूरावांना । नमन करितो अत्यादरे ।।२५।।
संतश्रेष्ठ रघुनाथांना । तैसेची रामानंदप्रभूंना ।
स्तुति काव्य अर्पूनी चरणा । दास नामा वंदीतसे ।।२६।।

यावरून श्रीरामानंदांचे प्रस्तुत लेखकावर तसेच त्याचे वडील ती.ह.भ.प.बापूरावजी केळकर यांचेवर, आणि प्रस्तुत लेखकाचे आजोबा



ती.रा.रा.अंताजीपंत – थोडक्यात सांगावयाचे म्हणजे संबंध घराण्यावर– किती उज्ज्वल प्रेम होते, ते यावरून वाचकांचे सहजच निदर्शनास येईल. रा. नामदेव मोरेश्वर कुलकर्णी याने रेखाटलेला मजकूर पूर्वी रामानंदांचे वेळी गु.भ.प.शिवाप्पा रामाप्पा सोनार आणि सिद्धानंदांचे एक प्रेमी गु.भ.प.सिद्रामप्पा मैंदर्गी यांनी रेखाटलेल्या ओवीबद्ध वर्णनाचे आधारेच लिहिला असल्याने, त्यातील बराचसा भाग या लेखनात प्रतीत झाला आहे. अर्थात् प्रेमळपणाचे ते एक द्योतक आहे. असो.

यानंतर श्रीरामानंदांना झाले एवढे कार्य पुरे, आता आपण देह ठेवावा, असे वाटू लागले. दिवा जाऊ लागला म्हणजे तो जसा भडकतो, त्याप्रमाणे संतांचा देहावसान काल जवळ आला की त्यांच्या उर्वरित आयुष्यात त्यांची कीर्ती अमर्यादित पसरू लागते. याप्रमाणे, श्रीरामानंदांची कीर्ती दिगंतरात पसरली अणि त्यांच्या नामाचा डंका चोहीकडे गाजू लागला. त्यांच्या सांप्रदायात निरनिराळ्या जातीचे आणि निरनिराळ्या मतमतांतराचे शेकडो लोक येऊ लागले. त्यांची शिकवण सर्वत्रास पटू लागली, आणि त्यांचे उज्ज्वल चारित्र्य आणि तत्त्वज्ञान गुरुभक्तास व हरिभक्तास आदर्श होऊन राहिले. अभंगरूपाने आणि लावण्यांच्या रूपाने त्यांनी आपली शिकवण अजरामर करून ठेवली. श्रीभगवंताजवळ,

काय वर्णू माझ्या सद्गुरूंचे गुण । आठविता मन न धायिचे ।।१।।
वारंवार आम्हा आले सांभाळीत । कृपाळू बहुत स्वामी माझे ।।२।।
वेळोवेळा व्हावे त्यांचे दर्शन । हेची दान देई पंढरीशा ।।३।।
रामचंद्र म्हणे देवा रघुराया । दास आपले पाया विनवीतसे ।।४।।

या अभंगात श्रीरामानंदांनी प्रार्थना केली. त्यावेळी 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा, रविशशिकळा लोपलिया ।।१।। कस्तुरी मळवट चंदनाची उटी, रुळे माळ कंठी वैजयंती ।।२।। कासे सोनसळा पांघरे पाटोळा, घननीळ सावळा बाईयांनो ।।३।।' या शब्दांत श्रीतुकाराममहाराजांनी वर्णिल्याप्रमाणे 'श्रीपांडुरंगाची आवडे हे रूप गोजिरे सगुण । पहाता लोचन सुखावले ।। आता

दृष्टीपुढे ऐसाची तू राहे । तो मी तुज पाहे वेळोवेळा ।।' या तुकाराममहाराजांचे शब्दांत श्रीभगवंतास आपल्या दृष्टीसमोर उभे रहाण्यास विनविले आणि श्रीभगवंताचे मुखावलोकन करून, समचरण दृष्टी विटेवरी साजिरी, तेथे हरी माझी वृत्ती राहो या श्रीतुकाराममहाराजांचे शब्दांत याचना करून, श्रीभगवंताचे पदकमलावर मस्तक ठेवले. श्रीभगवंतांनी रामानंदांचे मस्तकावर हात ठेवला. रामानंदांनी वेळोवळी आपल्या सद्गुरूंचे दर्शन व्हावे अशी प्रभुपदाजवळ याचना करताच, श्रीभगवंतांनी तथास्तु ऐसे आशीर्वचन देऊन, रामानंदांचे दृष्टीसमोर प्रगट झालेले नयनमनोहर दिव्य स्वरूप दृष्टीसमोरून अंतर्धान पावले. श्रीरामानंदांना भगवंताकडून निजधामास येणेविषयी आज्ञा झाली. तेव्हा आपला निर्याणकाळ आपल्या भक्तजनांस त्यांनी वारंवार सुचविला आणि आपल्या भक्तजनांस आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ।।१।। आजवर होतो तुमचे गावी । आता दया असो द्यावी ।।२।। आता नाही येणे जाणे । सहज खुंटले बोलणे ।।३।। या श्रीतुकाराममहाराजांचे शब्दांत वेळोवेळी इशारत दिली.

श्रीरामानंदमहाराजांचे चिरंजीव ह.भ.प.शिवरामबुवा हे ज्ञानसंपन्न झालेले पाहून, श्रीरामानंदांना मोठे समाधान वाटले. 'सांप्रदाय चालविण्याला कोणी आहे काय?' असा त्यांनी अकस्मात् प्रश्न केला. तेव्हा कुणीच पुढे येईना. सर्वांनी सांगितले, 'महाराज, आम्हांला सांगितले आहे तेवढे पुरे. आमच्या हातून जास्त होणार नाही,' असे सांगितले. तेव्हा 'बरे तर' असे म्हणून त्यांनी आपल्या चिरंजीवांना म्हणजे श्रीशिवरामबुवांना हाक मारली, व 'तू पुढे सांप्रदाय चालीव,' असे सर्वांसमक्ष सांगून, परमार्थाचा नारळ प्रसाद देऊन, आणि ह.भ.प.शिवमूर्ती, ह.भ.प.बाळकृष्णबुवा, वगैरे शिष्यमंडळीवर पूर्ण कृपाप्रसाद करून, शिवनामाचे चिंतन करीत, सर्वांकडून श्रीशिवनामाचा घोष करून, त्यांनी आपला देह भूतलावर टाकला आणि ज्योतिरूप आत्मा परमात्मरूपात मिळवून, श्रीरामानंद श्रीनिजधामास जाते झाले. त्यावेळी झालेला शोक हा लेखणीपलीकडचा आहे. त्यांचे घरचे आप्तेष्टास आत्यंतिक दुःख झाले.



ह.भ.प.श्रीशिवरामबुवा, ह.भ.प.बालकृष्णबुवा, ह.भ.प.श्रीशिवमूर्ती हे विशेष शोकाकुल होऊन, 'जीवनावेगळी मासोळी, तुका तैसा तळमळी' या अभंगोक्तीप्रमाणे, हे लोक तर अगदी तळमळू लागले. तथापि पुन्हा त्यांनी आपल्या मनास धीर देऊन, एकमेकांचे सांत्वन केले आणि श्रीरघुनाथमहाराजांचे शेजारीच श्रीरामानंदमहाराजांची समाधी या शिष्यवर्गांनी बांधली.

पुढे श्रीरामानंदमहाराज यांचे पश्चात् श्रीरामानंदमहाराज यांचे आज्ञेप्रमाणे ह.भ.प.श्रीशिवरामबुवा यांनी सांप्रदायाची परंपरा अखेरपर्यंत नेकीने चालविली. त्यांचे सांप्रदायात, त्यांचे पुराणश्रवणाने शेकडो लोक त्यांचे अनुयायी झाले. त्यांनीही नुकताच फाल्गुन वद्य अमावस्या, शके १८६३ या साली देह ठेवला. त्यांचीही समाधी तेथेच करण्यात आली आहे.

आता त्या सांप्रदायात अधिकारपात्रतेच्या दृष्टीने शिवरामबुवांची मुले लहान असल्याने, सर्वस्वी ह.भ.प.बाळकृष्णाबुवा हेच त्या गादीवर बसण्याला योग्य आहेत. श्रीरामानंदांची इच्छा असेल तसे घडून येणार आहे.

आनंदाची गोष्ट एवढीच की श्रीरामानंदांचे इच्छेप्रमाणे, याही सर्व संतमंडळीचे प्रेम प्रस्तुत लेखकावर अलोट आहे. असेच ते अखंड राहो, अशी श्रीरामानंदचरणी विज्ञापना करून, हे प्रस्तुतचे त्यांचे 'फूल नाही फुलाची पाकळी' म्हणून लिहिलेले अल्पसे चरित्र-वाक्पुष्प श्रीरामानंदांचे पवित्र चरणारविंदी अर्पण करून, या चरित्राचा आमोद त्यांचा भक्तगण अखंड घेत राहो, अशी भगवत्-चरणी प्रार्थना करून, हे चरित्र-वाक्-पुष्प आम्ही या सुप्रसंगाने श्रीजनताजनार्दनाचे हाती देत आहो.

***

## (८)

## प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर

कन्नूर येथील श्री. शिवरामपंत कुलकर्णी हे विजापूर जिल्ह्यात शिरस्तेदार या हुद्द्यावर काम करीत होते. ते स्वत: व त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई हे धार्मिक प्रवृत्तीचे व सात्त्विक मनोवृत्तीचे होते. त्यांना तीन मुले होती. प्रपंच व नोकरी सांभाळून ते आपला अधिकाधिक वेळ ईश-चिंतनात घालवीत होते. सौ. सरस्वतीबाई या पुन्हा गरोदर असताना श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर हे कन्नूर येथे आले होते. 'संत पूजावे आदरे । देव सारावे परते ।।' या संत तुकाराममहाराजांच्या वचनाप्रमाणे श्री. शिवरामपंत हे देवपूजेला बसले होते, पण आपले सद्गुरू आले आहेत, हे समजताच त्यानी देव तसेच ठेवले. 'संत पूजा ज्यांचे घरी तेथे विठ्ठलाची फेरी' या उक्तीप्रमाणे त्यानी श्रीभाऊसाहेबमहाराज यांची मनोभावे पाद्यपूजा केली. त्यांच्या भक्तीने आनंदित होऊन श्रीभाऊसाहेबमहाराजांनी त्यांना 'तुमच्या पोटी सत्पुरुष जन्माला येईल,' असा प्रेमपूर्वक आशीर्वाद दिला. संताचा आशीर्वाद हा कधीच वाया जात नाही. जो वाया जात नाही त्यालाच आशीर्वाद म्हणतात! नाही तर सर्व लोक आपल्या शुभेच्छा व्यक्त करतातच पण त्या सर्व फलदायी ठरतातच असे नाही. त्या शुभेच्छाच असतात. त्यामागे ईश्वर असत नाही. ज्यांच्या चित्ती ईश्वर असतो त्यांच्या मागेच ईश्वर असतो ''आशीर्वाद तया जाती । कारण चित्ती ईश्वर।।'' शिवरामपंताच्या चित्ती ईश्वर असल्याने त्यांना हा संताचा आशीर्वाद लाभला व त्यांना उत्तम सत्पुरुष-पुत्ररत्नाचा लाभ झाला.

''आशीर्वाद सज्जनांचा । नाही फुकट जायाचा'' या माझे वडील ती.प.पू. कै.बापूरावजी केळकर यांच्या अभंगोक्तीप्रमाणे श्रीभाऊसाहेबमहाराजांचा



आशीर्वाद श्रीगणपतरावमहाराजांच्या जन्माने फलद्रूप झाला.

श्रीगणपतरावमहाराज यांचा जन्म भाद्रपद शुद्ध ४ इ. स. १९०९ साली कन्नूर ग्रामी झाला. गणेश चतुर्थीसच त्यांचा जन्म झाल्याने त्यांचे नाव 'गणपती' असे ठेवले.

अगदी बालपणापासूनच या सत्पुरुषाला भक्तीची ओढ होती, देवाची पूजा करावी, भजन करावे, आरती करावी, प्रसाद वाटावा हाच त्यांचा छंद होता. श्री नरसिंहाच्या दर्शनास ते नियमितपणे जात असत.

श्रीभाऊसाहेबमहाराज यांचे अधिकारी शिष्य श्रीसिद्धरामेश्वरमहाराज हे विजापुरास येत असत. श्रीसिद्धरामेश्वर यांच्या मातोश्रींना स्वप्नात सोलापूरचे श्रीसिद्धेश्वर देवांनी प्रसाद म्हणन भिजलेल्या हरभऱ्याची डाळ दिली व 'पुत्र होईल' असा आशीर्वाद दिला. त्यानंतर या महापुरुषाचा जन्म झाल्याने या मुलाचे नाव 'सिद्धरामेश्वर' असे ठेवण्यात आले. हा सिद्धपुरुषच जन्माला आल्याने जन्मताच त्याला भक्तीची आवड होती. त्यामुळे त्याचे शिक्षणात लक्षच नव्हते. श्रीभाऊसाहेबमहाराज यांचेकडे या पुरुषाने अनुग्रह मागितला, त्या दिवशी शनिवार होता. श्रीभाऊसाहेब हे सोमवारी किंवा गुरुवारीच नाम देत असत. पण 'हा तेजस्वी तारा पुढे चमकणार आहे म्हणून याला आजच नाम देतो' असे सांगून भाऊसाहेबमहाराजांनी श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांना शनिवारीच नाम दिले व या प्रसंगाची आठवण म्हणून पुढे ते शनिवारीही नाम देऊ लागले.

श्रीसिद्धरामेश्वरमहाराज यांच्याकडून वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षीच श्रीगणपतरावमहाराजांना अनुग्रह प्रसाद मिळाला. गुर्वाज्ञेने काही दिवस अंगात कफनी घालून तीर्थाटन केले. आध्यात्मिक सफलतेबरोबरच व्यवहारातील बी.एस. सी. ची पदवी मिळविली (१९३२). दासबोध, ज्ञानेश्वरी, नाथभागवत, तुकाराम गाथा आदी ग्रंथांचा त्यानी सूक्ष्म अभ्यास केला. गुरुदेव रानडेंच्या प्रमाणे हे उत्तम विद्वान असूनही यांनी कठोर साधन केले. औदुंबर, जुने महाबळेश्वर, रामतीर्थ, सीतमनी आदि ठिकाणी मोठे साधन केले. हे नैष्ठिक

ब्रह्मचारी असून अंतर्मुख बनलेले एक अनुभवी महापुरुष आहेत.

आपल्या वडिलांच्या मृत्युसमयी फक्त तेच त्यांच्या जवळ होते. इ. स. १९५० पासून कन्नूर येथे त्यांचे वास्तव्य असून त्यांच्या निवासस्थानी-शांतिकुटीर-येथे त्रिकाल नेम, त्रिकाल भजन होत असते. अधून-मधून सायंकाळी निरनिराळ्या ग्रंथांवर ते प्रवचनही करतात. आध्यात्मिक विषयावर कानडी व मराठी या दोन्ही भाषेत अपार ग्रंथ संपत्ती निर्माण केलेली असून त्यांचा कन्नड भाषेत 'दासबोध' ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे व तो वाचक वर्गात अत्यंत प्रिय झाला आहे. गुर्वाज्ञेने ते भक्तिप्रसार करीत असून त्यांचा शिष्यगणही सागरासारखा पसरला आहे.

माझे वडील ती. प. पू. श्रीबापूरावजी केळकर (श्री मामा) हे चिमड सांप्रदायापैकी भगवान सद्गुरु श्रीहणमंतरावजी कोटणीसमहाराज यांचे शिष्य असून श्रीसद्गुरु आज्ञेने आपले घरी अखंड नेमाबरोबर अखंड कीर्तन करीत असत. त्यांचेकडे अनेक संत सज्जन येऊन गेले. 'रामदासाची माऊली कळसावरी गंगा आली' या समर्थ उक्तीप्रमाणे मला घरबसल्या अनेक संतांचे दर्शन झाले हे माझे परमभाग्य आहे. गुरुदेव रानडेमहाराज सांगलीस आले आणि आमचे घरी आले नाहीत असे एकदाही घडले नाही. इ. स. १९६२ साली आमच्या श्रीमामांनी देह ठेवला. इ. स. १९७२ मध्ये श्रीगणपतरावमहाराज सांगलीस आले त्यावेळी श्रीअंबुरावमहाराज यांचे शिष्य श्रीबापूराव गोडबोले यांचेमुळे ते आमची घरी आले, त्यामुळे मला महाराजांच्या दर्शनाचा लाभ झाला. सांगलीत आले की ते आमचेकडे येत असतात व सवडीप्रमाणे दासबोधावर प्रवचन करतात त्यावेळी मनास मोठा आनंद वाटतो. प्रथम त्यांना पाहिल्यावर हे एक शांत पुरुष आहेत असेच वाटले. अशा महान पुरुषांच्या चरणी ही आदरांजली वाहण्याचा गुरुकृपेने सुयोग आला. श्रीगणपतरावमहाराज यांचा हा भक्ती सोहळा असाच चढता वाढता व्हावा व त्यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी निंबरगीकरमहाराजांचे चरणी प्रार्थना करून लेखणीस विराम देतो.

****

(९)

## प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर

ह.भ.प.पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी 'रामानंद बालमुकुंद । पंत परात्पर पांडुरंग ।।' अशी आपली गुरुपरंपरा आपल्या अवधूतपंथीय भक्त मंडळींना भजनाची धून म्हणून सांगितली आहे. यावरून हे पंत बाळेकुंद्रीकरमहाराज यांचे शिष्य आहेत असे स्पष्ट होत असले तरी त्यांचा पूर्ववृत्तांत जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी व सांप्रदाय मार्ग विस्तार यांची थोडक्यात माहिती मुमुक्षू जनांना मार्गदर्शक अशी असल्याने येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

ह.भ.प.पांडुरंगमहाराज हे स्वभावतः प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. परंतु ते ज्या सांप्रदायात आहेत तो दत्तावधूत सांप्रदाय असून त्याचे ज्ञात असलेले आद्यपुरुष श्रीरामावधूत हे होत.

बेळगांव जिल्ह्यात खानापूर तालुक्यात सीमेवर व गोव्याच्या सीमेलगत पसरलेल्या कॅसलरॉकचे जंगलात श्रीरामावधूत व श्रीबालावधूत यांची भेट झाली. तेथेच श्रीरामावधूतमहाराजांनी श्रीबालावधूतांवर कृपानुग्रह केला. या बालावधूतांचे पट्टशिष्य श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर हे होत. हे बाळेकुंद्री (रंभापूर)चे असल्याने यांच्या सांप्रदायाला रंभापूर म्हणजेच (बाळेकुंद्री) पंत सांप्रदाय असे म्हणतात. श्रीपंतांना या सांप्रदायात श्रीदत्तावधूत असेही संबोधितात. श्रीपंत परंपरा पुढे त्यांचे पुतणे, श्रीवामनराव यांचे चिरंजीव ह.भ.प.भाऊसाहेबमहाराज यांनी सुव्यवस्थित रीतीने चालविली असून श्रीपांडुरंगमहाराज हे श्रीपंतांचे सांप्रदायिक अनुगृहीत शिष्य आहेत.

श्रीपांडुरंगमहाराज यांचा जन्म भूवैकुंठ पंढरी क्षेत्रात जाहाला. म्हणून यांचे नाव पांडुरंग असे ठेविले गेले. त्यांच्या वडिलांचे नाव वासुदेवराव असून मातोश्रींचे नाव सावित्रीबाई असे होते. वैशाख शु.९ शके १८०१ श्रीक्षेत्र

पंढरीतील क्षेत्र प्रदक्षिणेच्या वाटेवरील मंगळवेढेकर यांच्या वाड्यात हे रहात असत. येथेच यांचा जन्म वासुदेव-सावित्री या दंपतीचे पोटी झाला. श्री.वासुदेवराव यांचा स्वभाव लहरी असून ते कोरान्न मागून उदर निर्वाह करीत असत. त्याच वाड्यात यांच्या बिऱ्हाडाचे अगदी समोर मिठाईचा धंदा करणारे, एक संतती नसलेले जोडपे रहात होते. त्यातील मुक्ताबाईंचे अनंत उपकार श्री.पांडुरंगांवर झाले आहेत.

श्री.वासुदेवराव मूळचेच विरक्त, संसाराकडे पूर्ण दुर्लक्ष करून हरिभजनांत रमून रहात असत. गीतापारायण झाल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचे नाही असा त्यांचा नियम. बिचाऱ्या सौ.सावित्रीबाईंनी संसाराचा सर्व त्रास सोसावयाचा. अशा या वैराग्यशील जोडप्याचे पोटी पांडुरंगाचा जन्म झाल्याने हेही तशाच कोटीतील आहेत यांत नवल करण्यासारखे विशेष काही नाही. श्रीपंढरीच्या पांडुरंग देवाने या बाल पांडुरंगाचे लालन पालन श्रीमुक्ताबाईंकडून करवून बाळपणापासूनच यास मुक्तीचे बाळकडू औषध पाजवून मुक्त करून ठेविले. श्रीवासुदेवरावांनी पुढे मोजणी खात्यात नोकरी केली. निजामस्टेटमध्ये जालनाकडे कामावर असताना त्यांना कोणा सत्पुरुषांची गाठ पडली. तेव्हापासून यांनी नोकरी सोडली. पोटासाठी कोरान्न व मोक्षासाठी गीतापाठ हा क्रम त्यांनी आमरण चालविला.

ह.भ.प.पांडुरंगमहाराज यांचे अधिकारी चुलते रा. विनायकमहाराज तथा सांयी (हे आवडते नाव श्रीपंतमहाराजांनी ठेवले होते) यांचे आपल्या पुतण्यावर अत्यंत प्रेम होते. श्रीविनायकराव यांचा निःस्वार्थीपणा व गुरुभक्ती यांवर खूष होऊन त्यांच्या विनंतीप्रमाणे श्रीपंतमहाराज यांनी मोठा दरबार भरवून श्रीविनायकरावांना स्वहस्ते कफनी घातली. सायींचा गळा गोड असून पदे म्हणण्याची त्याची धाटी व लकब आकर्षक होती. त्यामुळे श्रीपंतांची पदे ठिकठिकाणी म्हणून सांप्रदाय प्रसिद्धीस जोर आणिला.

सांगली जवळील उदगाव या गावी पंढरपूरहून श्रीपांडुरंगमहाराज आले. यांचे शिक्षण बेळगांवात श्रीपंतमहाराज यांचे शाळेत त्यांच्या हाताखाली झाले.



युनिव्हर्सिटी स्कूल फायनल परीक्षा पास होऊन त्यांनी प्रथम कलेक्टर कचेरीत कारकून नंतर मामलेदार कचेरीत, बेळगांव, खानापूर, बेळगांव पोलीस सुपरिटेंडेंट कचेरी, इन्स्पेक्टर जनरल कचेरी पुणे, जी.आय.पी.रेल्वे पोलीस मुंबई, एम्.एस्.रेल्वे पोलीस धारवाड वगैरे बऱ्याच ठिकाणी अल्पमुदतीच्या नोकऱ्या केल्या. अखेर टपाल खात्यात ते स्थिर झाले.

प्रथमतः परमार्थाविषयी फारशी आवड नसलेले पांडुरंग श्रीसायींच्या आशीर्वादाने श्रीपंतांकडून त्यांच्या शालेय गुरुजीकडून 'बळे येऊनीया कंठी घातलासे हार' या संतकृपावचनाप्रमाणे श्रीपंतमहाराजांनी मुद्दाम श्रीपांडुरंगरावांचे बिऱ्हाडी येऊन इ.स.१८९६ गुरुवारी ज्ञानोपदेश-मंत्रानुग्रह केला.

अठरा शाण्णौ वेणुग्रामी । मार्गशीर्ष महिन्यांत ।।
श्रीदत्तप्रभूंची लीला झाली । पांडुरंग सदनांत ।।१।।

लहानपणापासून श्रीपांडुरंगांना तालमीचा नाद होता. दररोज ५/६ शे जोर, उठाबशा काढणे, थोडे नमस्कार घालणे, असा ते नित्य व्यायाम करीत. शाळेतील हुषार मुलांत त्यांची गणना होत असे. यांना शाळेत असलेपासूनच कविता रचण्याचा नाद होता, म्हणून त्यांना 'कवि ताम्हनकर' असेही समवयस्क मंडळी विनोदाने म्हणत असत. कोणी सन्मान्य गृहस्थ आले, त्यांना शाळेकडून पानसुपारी मानसन्मान करण्याचे वेळी श्रीपांडुरंगाची वर्णी लागत असे. त्यावेळी समयानुसार राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक वृत्तीला पोषक अशी उदात्त काव्ये त्यांच्या हातून रचिली जात असत. परंतु त्याला सांप्रदायिक स्वरूप आलेले नसे. श्रीसद्गुरुकृपेची जोड मिळाल्यानंतर सुवर्णाला सुगंध यावा त्याप्रमाणे त्यांच्या काव्याला पुढे पुढे खुमारी चढू लागली.

शिक्षक व विद्यार्थी या नात्याने पांडुरंगांना श्रीपंतांचे बरोबर बोलण्याची संधी वारंवार मिळे. एखादा धार्मिक विषय काढून त्यावर अनुकूल-प्रतिकूल मते प्रदर्शित करून, त्या गुरुशिष्य संवादरूपी मंथनातून एखादे दिव्यसत्य बाहेर काढावयाचे, या कामांत पांडुरंगाचा हातखंडा असल्याने तोच प्रयोग त्यांनी श्रीपंतमहाराजांवर करून त्यांचेकडून सत्यज्ञानाचे साम्राज्य मिळविले. तेच

सत्यस्वरूप यांच्या वाट्याला आल्याने आपण कृतार्थ होऊन स्वतःचे सार्थक करून घेतले. इतकेच नव्हे तर

सेवितो हा रस । वाटितो आणिका ।
घ्या रे होऊ नका । रानभरी ।।१।।

अशा अमृतवाणीने जनासी उद्धराया करणे. यांनी वेदांतपर काव्याची रेलचेल करून भाविक भक्तांना परमार्थाचे मुक्तद्वार करून ठेविले आहे.

साधकांचे सार्थक करण्याकरिताच त्यांनी 'सार्थक' नामक अमोलिक ओवीबद्ध ग्रंथ निर्माण केला. श्रीपंतांचे अध्यात्मिक विचार, त्यांची पारमार्थिक विचार दृष्टी हे दोन्हीही जणू श्रीपांडुरंगमहाराज यांच्यात ओतली आहेत. म्हणून तर शिक्षक-विद्यार्थी या पहिल्या नात्याचे रूपांतर पुढे गुरुशिष्य अशा अत्यंत जिव्हाळ्याच्या व एकात्मतेच्या नात्यात झाले. श्रीपंतमहाराज हे श्रीपांडुरंगाचे साधन, राहणी व मुद्रा यावर खूष होऊन ते सर्वांसमोर त्यांचे मुक्तकंठाने कौतुक करीत असत.

श्रीगुरुकृपेची जोड मिळताच श्रीपांडुरंगांची काव्यशक्ती प्रासादिक व ओघवती होऊन श्रोत्यांचे अंतःकरणाचा ठाव घेणारी अशी आकर्षक बनली. श्रीगुरूंचे आशीर्वादाप्रमाणे यांची पदेसुद्धा श्रीपंतमहाराज, श्रीरामानंदमहाराज यांच्या पदाप्रमाणे बहुमुखी होऊन जनमानसाला आनंद देणारी अशी झाली. रंभापुरी (बाळेकुंद्री) सांप्रदायात एकतारी भजनावर विशेष पदांची गोडी बऱ्याच भजनी मंडळींना लागली. असे बरेच भक्त त्यांच्याकडे आकर्षित झाले.

आधी प्रपंच करावा नेटका । मग परमार्थ द्यावा विवेका ।।

या बाण्याने श्रीपांडुरंगांचे बाणेदार वागणे होते. प्रपंचाकरिता त्यांनी नोकरीपेशा पत्करला होताच. नेहमीचे राहणी साधी, नियमित, मिताहारी अशी असल्याने कधी आजारी पडण्याचा प्रसंगच त्यांजवर आला नाही. नोकरी निमित्त अहमदाबाद, पुणे येथे ते डेप्युटी व असि.पोस्ट मास्तरचे हुद्यावर व शेवटी जिल्हा धारवाड येथे हेडपोस्टमास्तरचे हुद्द्यावर असताना त्यांनी पेन्शन घेतली.

कबीर पंथ, नानक पंथ, हुबळी सिद्धारूढस्वामी पंथ,



श्रीगोंदवलेकरमहाराज पंथ, चिमड पंथ वगैरे बऱ्याच पंथ-सांप्रदायात यांचा संबंध आला असूनही सर्वच पंथ व सांप्रदाय याविषयीं आदर ठेवून यांनी काव्यरूपाने त्या सांप्रदायाला दृश्य-मधुर स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्व ठिकाणी सेवा या नात्याने भजनाचे कार्य त्यांनी केले आहे. सर्वांत मिसळून अहंकाररहित वृत्तीने वागून सर्वांची प्रीती संपादण्याची हातवटी यांना अप्रतिम अशी साधली आहे. सर्वांत राहून सर्वांपासून अलिप्त अशी जी गीतेची शिकवण ती यांच्यात मुरली आहे.

श्रीपंत सांप्रदाय हा शक्तिउपासक आहे म्हणून त्यांच्यात अभक्ष्यभक्षण व अपेयपान याचा विधिनिषेध पाळला जात नाही, असा जनप्रवाद आहे. तथापि श्रीपांडुरंगमहाराज हे त्या प्रवादापासून पूर्ण अलिप्त आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही. इतकेच नव्हे तर कित्येक लोकांना त्यांनी अशा दुर्व्यसनापासून मुक्त करून त्यांनी ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

निष्ठापूर्वक वाङ्मयरूपाने आणि भजनात्मक उपासनेने त्यांनी श्रीपंतमहाराजांची व बाळेकुंद्री (रंभापुरी) सांप्रदायाची निरपेक्ष सेवा चालविली आहे.यांचे कुटुंबात त्यांच्या साध्वी पत्नी,एक सुपुत्र, दोन कन्या आणि ५-६ नातवंडे असा परिवार असून त्यांतील पुत्र कन्यकांची कुटुंबे एकत्र पण विभक्त अशा स्वरूपात स्वावलंबनाने जीवन चरितार्थ चालविणारी अविभाज्य अशीच आहेत. यांची काव्य रचना :- १. सार्थक २. आनंद ३. अवधूत भजन माला अशी छापलेली विविधरूपाने प्रकाशित आहे. श्रीपंतांचे कृपेने श्रीपांडुरंगमहाराज यांना दीर्घायुरारोग्य लाभून त्यांच्या हातून असाच आत्मोद्धाराचा महिमा वाढीस लागो अशी श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना करून परिचय पूर्ण करतो.

***

## (१०)

## ह. भ. प. बापूसाहेब चांदवलेमहाराज

सांगलवाडीचे मोठे भाग्य जेथे ह.भ.प.चांदवलेमहाराज यांची बरीचशी हयात गेली. सांगलवाडीला त्यांनी भव्य दिव्य केले. क्षेत्राचे महत्त्व आणले. हे एक मोठे थोर पुरुष असून त्यांचे चरित्र चिंतनीय आहे. 'तन मेरे सुई मन मेरा धागा । खेचर जी के चरण पर नामा शिंपी लागा ।।' हे उद्गार ज्या श्रीनामदेवमहाराज यांनी काढले आहेत, ज्या श्रीनामदेवांनी भागवतधर्माचा विस्तार केला, त्या नामदेव समाजातच यांचा जन्म झाला. यांचे मूळ गाव पुणे हे होते. हे घराणे मोठे श्रीमंत होते. यांचे शालेय शिक्षण अगदी बेताचेच झाले. लिहिता वाचता येईल इतकेच यांनी शिक्षण घेतले असे म्हटले तरी चालेल. परमोच्च शिक्षणाचा लाभ जरी त्यांना झाला नाही हे खरे असले, तरी आळंदीच्या विश्वविद्यालयात त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृत अनुभव, चांगदेव पासष्टी, ज्ञानेश्वरमहाराज यांचा गाथा, हरिपाठ, एकनाथी भागवत, श्रीतुकाराममहाराज यांचा गाथा या श्रेष्ठ ग्रंथांचा, त्याचप्रमाणे सर्व संत वाङ्मयाचा अभ्यास केला. स्वानंदसुखनिवासी ह.भ.प.श्री.विष्णुबुवा जोगमहाराज यांची कृपा श्रीबापूसाहेबांच्यावर असून श्रीविष्णुबुवांचेवर यांची अत्यंत निष्ठा होती. स्वामी विवेकानंद, रामतीर्थ यांच्यानंतर नाव घ्यावे असे वै.ह.भ.प.श्री मामासाहेब दांडेकर यांचे हे गुरुबंधू होत. श्रीमामासाहेब दांडेकर हे तर वारकरी संप्रदायात मोठे अध्वर्यू होवून गेले. श्रीमामासाहेब या बापूसाहेबांना निरूपणकारांतील हा एक हिरा आहे असे म्हणत असत. यावरून श्रीबापूसाहेबांचे महत्त्व ध्यानी येईल. श्रीजोगमहाराज यांची कीर्तने वा प्रवचने श्रीबापूसाहेबांनी अनेक प्रसंगी ऐकली होती. श्रीजोगमहाराज यांचे परमशिष्य श्रीकेशवरावजी देशमुख, बंकट स्वामी व श्रीमामासाहेब दांडेकर होऊन गेले. यांच्या कीर्तन, प्रवचन श्रवणाचा



लाभ श्रीबापूसाहेबांना सर्वात अधिक झाला. माझे वडील ती.प.पू.श्रीबापूरावजी (श्रीमामा) केळकर हे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या आज्ञेने आपले घरीच सांगली येथे नित्य कीर्तन करीत असत. या कीर्तनासही श्रीबापूसाहेब येत असत. श्रीबंकट स्वामी हे अगदी परखडपणे कीर्तन करीत.

'नाही भडिभार । तुका म्हणे साना थोर ।।' अशी त्यांची अवस्था होती. एकादा मनुष्य अगदी विषयलंपट जरी असला तरी त्यास वैराग्य प्राप्त होईल अशी त्यांच्या बोलण्याला एक मोठी विलक्षण धार होती. कीर्तनात ते कधी कोणाची श्रीमंताचीदेखील भीडभाड ठेवीत नसत. 'उजळले भाग्य आता। अवघी चिंता वारली ।' या अभंगावरील त्यांचे उत्कृष्ट असे निरूपण सांगलीचे सुप्रसिद्ध राजवैद्य आबासाहेब सांबारे यांचे गणपती उत्सवात मला ऐकावयास मिळाले. ते अजूनही आठवते, अगदी चाली सकट. श्रीमामासाहेब दांडेकर यांचे निरूपण व्हावयाचे होते. ते उभेही राहिले होते. एवढ्यात बंकट स्वामी आले. मात्र श्रीमामासाहेबांनी तोच वीणा स्वामींच्या हाती दिला आणि आपण निरूपण ऐकावयास बसले. असे होते श्रीमामासाहेब. या दोन्ही गुरुबंधूंचा जिव्हाळाच काही वेगळा होता. सांगावयाचे कारण या बंगट स्वामींची छापच श्रीबापूसाहेबांच्या कीर्तनात दिसून येत होती. कीर्तनात श्रीबापूसाहेब कोणाचीही गय करणार नाहीत. सेवा ही बरोबरच आणि वेळेवर व्हावयास पाहिजे असा एक त्यांचा कटाक्ष असे. ह.भ.प बापूसाहेब यांची निरूपणे पद्मावतीचे देवळासमोर सांगली येथे होत होती. त्या निरूपणास काहीवेळा गेल्याचे मला स्मरते आणि काही मजेशीर प्रसंग डोळ्यासमोर तरळून जात. श्रीमामासाहेब दांडेकर हे सांगलीस भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे पुण्यतिथिनिमित्त प्रतिवर्षी अगदी वारी समजून गु.श्री.बाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी प्रतिष्ठित केलेल्या कैवल्यधामात येऊन निरूपण करीत. ते आमचे घरी व कृष्णाकाठी श्री हनुमान समाधि मंदिरातही येत असत. असेच श्रीबापूसाहेब या तिन्ही ठिकाणी येत. आमचे घरी श्रीमामासाहेबांचे प्रवचन झाले असेल.

श्रीबापूसाहेबांचे निरूपणही झाले असेल.

ताल स्वरांची माहीत श्रीबापूसाहेबाना उत्तम असून त्यात थोडी चूक झाली तर ती त्यांना मुळीच खपत नसे. श्रीमामासाहेबांचे ताल सुराकडे लक्षच असत नसे. त्यांचे निरूपण म्हणजे तो एक पवित्र गंगेचा ओघच. अशी निरूपणे सांगलीकरांनी श्रवण केली हे त्यांचे भाग्यच म्हटले पाहिजे.

श्रीबापूसाहेबांना पुणे येथे व सांगली येथे हरिपाठाचे महिन्याचे अनेक सप्ताह केले. हरिपाठ म्हणजे ती एक त्यांची त्रिकाळ संध्याच होती. भक्तिमार्गी आयुष्य असल्यामुळे पुढे त्यांची गृहस्थिती फारच खालावत गेली. परंतु सांगलवाडी येथील ह.भ.प.आकाराम पाटील वगैरे भाविक मंडळीनी मोठ्या निष्ठेने त्यांना आश्रय दिला व सांगलीवाडी येथेच ठेवून घेतले. गृहसौख्यही म्हणावे तसे श्रीबापूसाहेबांना लाभले नाही. परंतु त्यांनी त्यांची कधीच मोठी पर्वा केली नाही. सुमारे ७० वर्षे त्यांना आयुष्य लाभले. कीर्तननिष्ठा विशेष होती. माधवनगर येथील वै.ह.भ.प.वासुदेवराव जोशी बुवा व त्यांचे बंधू परम प्रिय ह.भ.प.बापू जोशी हे श्रीबापूसाहेबांचे कीर्तनास वेळ मिळेल तसे जात असत.

श्री वासुदेवराव हे आमचे चिमड संप्रदायापैकीच खरे. पण निरूपण पद्धती श्रीबापूसाहेबांची श्रवणाने त्यांना चांगली लाभली. त्यांचे निरूपणात प्रसंगाने श्रीबापूसाहेब यांचा उल्लेख होत असे.

श्रीबापूसाहेब हे कोल्हापूर येथे आपल्या मुलीकडे आश्रयी होते. पण त्यांना तेथे राहवेना. मला सांगलवाडीस पोहोचते करा. हा एकच लकडा त्यांनी सुरू केला. मुलीने आणून सांगलवाडी येथे पोहोचते केले. ‘नामा म्हणे जीवे करीन लिंबलोण । विटे सहित चरण ओवाळीन ।’ या श्रीनामदेवरायांच्या उक्तीप्रमाणे आपली प्राणज्योती श्रीविठ्ठलापुढे ओवाळली. त्यांचे आपादमस्तक दर्शन घेतले आणि इहलोकाची यात्रा संपवली. भाद्रपद नवमी शके १८८८ दि.८/१०/६६ रोजी श्री बापूसाहेबांनी आपली अखेर साधली.

सांगलवाडी येथे विठ्ठल मंदिरात तेथील परमप्रिय ह.भ.प.आकाराम



पाटील, परमप्रिय ह.भ.प.डॉ.धालेवाडीकर वगैरे मंडळीनी फार मोठ्या प्रमाणावर ता.१६/१/८३ ते २२/१/८३ भक्तिसोहळा आयोजित केला आहे. याप्रसंगी वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू सुप्रसिद्ध ह.भ.प.धुंडामहाराज, खंदारकरमहाराज, साखरेमहाराज, ह.भ.प.बोरगावकरमहाराज वगैरे सर्व मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. त्यांची कीर्तन, प्रवचने होणार आहेत. ज्ञानेश्वरीची १००० पारायणे करणेचा त्यांचा संकल्प आहे. हा सोहळा तर अपूर्वच होणारच आहे. हा सुखसोहळा स्वर्गी नाही, असेच श्रीतुकाराममहाराज यांनी म्हटले आहे. या पुण्यपर्वणीत स्मरणिका प्रसिद्ध करणेचे ठरवून श्रीमामासाहेब दांडेकर यांचे एक निःसीम शिष्य डॉक्टर असून कीर्तन, प्रवचन करणारे ह.भ.प.डॉ.धालेवाडीकर यांनी मला श्रीबापूसाहेब चांदवलेमहाराज यांचेबद्दल चार शब्द लिहून देण्याची संधी दिली यामुळे आनंद होत आहे. सांगलवाडी येथे हे भक्तीचे रोपटे श्रीबापूसाहेबांनी लावले ते आज सुंगधी फुलांनी बहरून गेले आहे. याचा आनंद तर बापूसाहेबांना होईलच. पण मला एवढे येथे म्हणावयाचे आहे :- या सोहळ्यामागे श्रीबापूसाहेबांची एक मोठी तपश्चर्या आहे. श्रीविठ्ठल मंदिरास सांगलीचे श्रीमंत राजेसाहेब यांनी जे उदार हस्ते सहाय्य केले तेही श्रीबापूसाहेबांच्या मुळेच. ही स्मृती सांगलीवाडी येथे सतत रहावी म्हणून या पर्वणीत ही भावसुमने श्रीविठ्ठलाचे चरणी समर्पण करीत आहे.

***

## (११)

## प.पू. श्रीगंगाधरसिंग दीक्षित

### दीक्षितांचे घराणे

दीक्षित हे शिरगुप्पी येथे रहाणारे. हे गाव कर्नाटकात आहे. या घराण्यात श्रीसंत रघुनाथराव हे एक चांगले साधक होते. यांचे भाग्यच मोठे, यांना श्रीक्षेत्र चिमड येथील सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीरामचंद्रावजी यरगट्टीकर तथा चिमडमहाराज यांचा कृपानुग्रह लाभला. श्रीरामचंद्रावजी साक्षात् विष्णूचा अवतार हे स्वानुभवाने या चिमड संप्रदायाचे कळस भगवान् श्रीसद्गुरू तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी आपल्या एका पद्यात नमूद करून ठेवले आहे. ते म्हणतात–

महाविष्णु तू एकनाथ तू स्वामी गुरुनाथा ।
दास प्रभूचा रामकृपेचा वंदित पद माथा ।।

चिमडच्या महाराजांचा अनुग्रह लाभल्यावर त्यांनी चांगल्या प्रकारे खूपच साधना केली. त्यांचा शेतीचा व्यवसाय होता. मळणी करून धान्य आले की शेतात जे काही पिकले असेल त्यातील प्रथम श्रीचिमडचे महाराज यांचेकडे मठात पोहोचते करून मगच आपण घरी आणायचे अशी प्रथा त्यांनी कडेपर्यंत ठेवली होती. महाराजांची यांचेवर मर्जी असे. कोणीतरी या रघुनाथरावांना प्रश्न केला, 'तुम्हाला साधे आसन तरी घालता येते का?' हे म्हणाले, 'कोण म्हणतो येत नाही म्हणून?' 'आम्हाला तेच पहावयाचे आहे.''मग बसा तर' ते गृहस्थ म्हणाले. आश्चर्य असे की या रघुनाथरावांनी श्वास वर घेतला मात्र, त्यांचे आसन एक हातभर अंतराळी झाले. श्वास वर घेतला की हातभर अंतराळी व्हावयाचे व खाली सोडला की जमिनीवर स्थिर व्हावयाचे असे चालले. हे पाहून 'महाराजांची मर्जी तुमचेवर का आहे याचे इंगित आज



आम्हाला कळले' असे त्या गृहस्थांनी उत्तर दिले. तेव्हापासून चिमड सांप्रदायिक श्रीरघुनाथरावांना मानू लागले. सांगलीत कृष्णाकाठी यांचा एक मोठा प्रशस्त वाडा आहे. तो आता विकला आहे. तरी पण सिंगाचा वाडा म्हणूनच तो प्रसिद्ध आहे.

### दीक्षित आडनाव का पडले

श्रीरघुनाथराव यांचे खरे आडनाव सिंग आहे. ते कनोज ब्राह्मण. हे घराणे मूळचे राजपुतान्यातील पण तिकडून कर्नाटकात आले. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर सांगलीस ते स्थायिक झाले. त्यांची शेती व मळा शिरगुप्पी येथेच आहे. चिमडमहाराजांचा 'अनुग्रह म्हणजे दीक्षा' रघुनाथरावांना मिळाली व त्यांनी साधनेने प्रभुत्व संपादन केले. म्हणून सांप्रदायिक त्यांना 'दीक्षित' म्हणू लागले व तेच आडनाव पुढे रूढ झाले.

### गुरुबंधु

रघुनाथराव व गोपाळराव दीक्षित हे दोघे गुरुबंधु. गोपाळराव दीक्षित हे मुधोळचे. माझ्या समजुतीप्रमाणे या दोघांची चांगलीच गट्टी होती. बाबासाहेब मुजुमदार व तात्यासाहेबमहाराज हे खरे परमार्थात हिमालयच होऊन गेले. गोपाळराव दीक्षित यांनी तरी चिमडच्या महाराजांचा अनुग्रह घेतल्यापासून जमिनीला अंग असे लावलेच नाही. महाराजांना नमस्कार करताना काय जमिनीला अंग लागेल तेवढेच. ते सारखे साधनातच असत. श्रीतात्यासाहेब तरी रविवारी सुट्टी दिवशी दुपारी दोन तास झोपावयाचे आणि आता आठवड्याची बेगमी झाली असे म्हणावयाचे. बाबासाहेबांनी चिमडच्या महाराजांच्या त्यांना ज्या प्रसाद म्हणून पादुका मिळाल्या त्यांचे पूजन केल्याशिवाय कधीच अन्नग्रहण केले नाही. त्यांचीही साधना खडतर होती. श्रीदत्तोपंत कुलकर्णी कुंभोजकर यांनी चिमडमहाराजांचा अनुग्रह झालेपासून रोज नऊ तास नेम केला व ते शेवटी नेमातच स्वरूपाकार झाले. यावरून श्रीरघुनाथराव यांचे गुरुबंधू श्रीगोपाळराव दीक्षित काय तोलामोलाचे होते हे दिसून येईल.

### गटारातील गाडी काढली

श्रीबाबासाहेब मुजुमदार हे मुधोळ येथील न्यायाधीश असून त्यांचा जमीन-जुमला मोठा होता. त्यांचे घर सांगलीतच दीक्षितांच्या वाड्यानजीकच होते. बैलगाडीने मुधोळहून जे धान्य आले ती गाडी मुजुमदारांचे घराशेजारीच गटारीत कलंडली व गाडीचे चाक गटारीत गेले. यामुळे धान्याची पोती काढणेही कठीण झाले. गोपाळराव दीक्षित व रघुनाथराव दीक्षित हे तालीमबाज असून पारमार्थिक होते. पारमार्थिक तालीमबाज होते. त्यानी हा प्रकार पाहताच अगदी हसत मोठ्या लीलेने ते चाक आपल्या एका हातानेच वर काढले. याचे त्या मुजुमदार गल्लीतील सर्वांना मोठे आश्चर्य वाटले. हे दोघेही गुरुबंधू एक कळशीभर दूध रोज पीत असत. दोघात फरक एवढाच की गोपाळराव दीक्षित हे ब्रह्मचारी व रघुनाथराव दीक्षित हे गृहस्थाश्रमी होते.

### काकांचा जन्म

सुमारे नव्वद वर्षाखाली इ.स.१८९८ साली श्रीगंगाधरराव यांचा जन्म शिरगुप्पी येथे त्यांचे घरी झाला. वडिलांचे नांव रघुनाथराव व मातोश्रींचे नाव गंगव्वा असे होते. वडीलही मोठे तालीमबाज असल्याने व त्यांचे शरीर गुटगुटीत व पिळदार असल्याने जे बाळ जन्माला आले तेही पण गुटगुटीत व पिळदार असेच झाले. हे पाहून घरी व गावात सर्वांना आनंद झाला व हे बाळ सर्वांचेच लाडके झाले.

### व्यायामाचा छंद

गंगाधर बाळाला, लहानपणापासूनच तो पिंडच मुळी व्यायामाचा असल्याने, व्यायामाचा छंद लागला. सूर्यनमस्कार, जोर, बैठका, उंच उडी, करेला व कुस्ती या सर्वात हे बाळ अग्रेसर असे. हल्लीचे इस्पिटे, सोंगट्या, कॅरम यांची त्यांना आवड नव्हती. शिक्षण क्षेत्रातही ते हुशार होते. गंगाधरराव इंटर परीक्षा उत्तीर्ण झाले होते. बाळ-गोपाळ सर्व गडी गोळा करून त्यांनी सूर्योपासनेची आवड निर्माण केली. थंड पाण्याने स्नान करून सूर्योपासना व



व्यायाम करावयाचा हाच एकमेव छंद होता.

सांगलीतील सुप्रसिद्ध मल्ल श्री. हरी नाना पवार यांना हे व्यायामाचे बाळकडू गंगाधररावांनीच पाजले. त्यांचेवर आध्यात्मिक प्रवृत्तीचे चांगले संस्कारही केले. ही गोष्ट हरिनाना आजही ताठ मान करून अभिमानाने सांगत असतात. याचा आम्हांस अभिमान वाटतो.

ओघाने आले म्हणून सांगतो :- मला व्यायामाची व फिरण्याची मुळीच आवड नव्हती. पण काही सूर्यनमस्कार व एक जोर, दोन बैठकांपासून दीडशे जोर व तीनशे बैठकांपर्यंत सुमारे चार महिने या गंगाधररावांनी मजकडून व्यायाम करवून घेतला. श्री पंढरीनाथ मणेराजुरीकर हेही मजबरोबर व्यायाम करण्यास येत असत. कृष्णामाईचे स्नान करून आम्ही दोघे व्यायामास जात असू. यानंतर दोनशे जोर व चारशे बैठका जेव्हा त्यांनी मला काढण्यास सांगितल्या तेव्हापासून व्यायाम हा शब्द देखील आपण काढला नाही. कारण तो व्यायाम मला पेलवणे शक्य नव्हते. निष्ठेने व्यायाम करणाऱ्या व सुदृढ व सुडौल प्रकृतीच्या मुलांबद्दल त्यांच्या मनात आत्यंतिक प्रेम असे. चि.बाळू गोखले बरोबर गणपती बागेत काही दिवस फिरावयास जात होतो. तेही बंद झाले.

### महाराष्ट्रात करेल्यात पहिला नंबर

पुणे येथे महाराष्ट्रात व्यायाम परिषद भरले वेळी श्रीगंगाधररावांनी जो करेला फिरवून दाखविला त्यात पहिला नंबर मिळविल्याने छत्रपति शाहूमहाराज(करवीर) यांचे हस्ते सरकारने मानपत्र व बक्षीस दिल्याचे वृत्त परमप्रिय सदुभाऊ साळुंखे यांनी सांगितले. श्रीसदुभाऊ साळुंखे व श्रीशिवरामपंत नातू हे श्रीगंगाधररावांचे नावाजलेले दोन शिष्य आहेत. श्रीगंगाधररावांनी फिरवलेला करेला श्री.हरिनाना पवार यांचे तालमीत असून तो मोठ्या नावाजलेल्या पैलवानांना देखील साधा उचलता येत नाही. हा करेला फिरविणाऱ्यास एकशे एक रुपयांचे बक्षीस अद्यापही ठेवले आहे. परंतु ते बक्षीस आजतागायत कोणीही मिळविले नाही.

## श्रीसद्‌गुरु तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह

आमचे सद्‌गुरू श्रीतात्यासाहेब हे एक सांगलीत चालते-बोलते ब्रह्मच वावरत होते. त्यांचा प्रत्यक्ष अनुग्रह श्रीगंगाधरराव यांना लाभला, हे महद्‌भाग्यच होय. इ.स.१९१७ चैत्र शुद्ध नवमीस श्रीगंगाधरराव, श्रीअनंतराव म्हसकर, श्रीएरंडोलीकर मास्तर, श्रीमहादेवराव मराठे व श्रीनारायणराव जोग यांना श्रीतात्यासाहेबांचा अनुग्रह लाभला. या सर्वांची श्रीतात्यासाहेबांचेवर अपार श्रद्धा व निष्ठा यात प्रश्नच नाही. चिमड पीठाधीश श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचेकडून सर्वांनी धडे घेतले. यासाठी ते वारंवार श्रीक्षेत्र चिमड येथे जात असत.

## चिमडचे नेमनिष्ठ वारकरी

श्रीगंगाधरराव दीक्षित, श्रीअनंतकाका म्हसकर हे श्रीक्षेत्र चिमडचे नेमनिष्ठ वारकरी बनले. गुरुद्वादशी ते पांडव पंचमी श्रीअनंतकाका यांचेकडे श्रीदासबोध वाचनाचा मान होता. चिमडचे पांडव पंचमीचे रथयात्रेस जावयाचे असा या दोघांचाही निश्चय असे. श्रीगंगाधरराव दीक्षित व अनंतकाका म्हसकर यांचे अनुक्रमे शके १९०९ मध्ये आळंदी यात्रा व चिमडमहाराज पुण्यतिथी या दिवशी देहावसान झाले. श्रीअनंतकाकांनी साधना व पंचपदी कधीही चुकविली नाही. श्रीतात्यासाहेबांचे भक्तांत श्री परम पूज्य श्रीमामांचे नंतर नाव घ्यावे असे एक श्रीअनंतकाका होऊन गेले. परस्त्री व परधन हे पथ्य श्रीअनंतकाकांनी कटाक्षाने पाळले, यापेक्षा काय सांगावे.

## परिवार

श्रीगंगाधरराव दीक्षित यांना चार भाऊ आणि तीन बहिणी असल्याने त्यांचा आप्तइष्ट परिवार मोठा आहे. सदाशिवराव, महादेवराव, गंगाधरराव व विश्वनाथराव अशी या भावंडांची नावे आहेत.

## सांगली हे क्षेत्र झाले

श्रीचिमडचे महाराज यांच्या आज्ञेने श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी सांगलीस वास्तव्य करून अखंड साधनेबरोबर अखंड पंचवीस वर्षे कीर्तन



केले. त्यामुळे सांगली ही कीर्तनपंढरी होऊन, त्याला क्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले. माझे प.पू.पितृदेव श्रीमामा केळकर यांनी श्रीतात्यासाहेबांच्या आज्ञेने अखंड साधनेबरोबर अखंड अडतीस वर्षे हरिकीर्तन केले. त्यामुळे सांगली हे दुप्पट क्षेत्र झाले. ज्यांनी परमप्रिय स्वामिभक्त श्रीबापूसाहेब चाफळकर यांना आमचे घरी आणून सोडले अशा श्रीवासुदेवराव जोशी यांनी आमचे पितृदेव श्रीमामा यांचेपासून स्फूर्ती घेऊन माधवनगर येथे कीर्तनाची झांज घुमवली. श्रीयशवंतराव पटवर्धन यांच्या मातोश्री मामांच्या कीर्तनास येत असत. परंतु माधवनगर येथे यशवंतराव स्थायिक झालेने त्यांच्या कीर्तन श्रवणाची होणारी गैरसोय दूर झाली. त्यानंतर आजतागायत ह.भ.प.श्रीबापूराव जोशी हे माधवनगर येथे कवठेकरांच्या घरी एकादशी व संकष्टीस कीर्तन करीत असतात. परमप्रिय श्रीकांत देशपांडे यांची प्रवचने 'रामकृष्ण आणि मामा' यांच्या जीवनावरच सुश्राव्य अशी होत असतात. सांगलीस ह.भ.प.श्रीगुरुनाथमहाराज यांनी श्रीगुरुवर्य बाबूरावजी कोटणीसमहाराज यांची परंपरा सांप्रत चालू ठेवली असून ह.भ.प.श्रीबापूसाहेब देशमुख प्रतिवर्षी चांगदेव पासष्टी सांगत असतात. ही कैवल्य बीजाचीच वाढ होय.

## श्रीतात्यासाहेबांची खडतर साधना

श्रीबाबासाहेब मुजुमदार, श्रीगोपाळराव दीक्षित, श्रीवामनकाका कोटणीस यांचेप्रमाणेच आमचे श्रीतात्यासाहेब रात्र रात्र साधना करीत असत. याशिवाय स्नान, संध्या, पूजा, सायंकाळी भागवत, रात्री नित्याचे हरिकीर्तन आणि वकिलीचा व्यवसाय या साऱ्या गोष्टी त्यात पुन्हा आल्याच. त्यांची दिनचर्या सांगतानाही अंगाला घाम फुटेल अशी होती. माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांनीही कीर्तनोत्तर रात्र-रात्र साधना केल्याचे प्रत्यक्ष प्रमाण, गुरुभक्त परायण श्रीविष्णू काशिनाथ तगारे यांनी वेळा पालटून अनुभवल्याचे 'मामा केळकर' दीपलक्ष्मी या अंकात नमूद केले आहे. श्रीगंगाधरराव हे चिमडच्या श्रीनारायणमहाराज यांनी सांगितल्याप्रमाणे वेळा घेऊन ध्यानास बसत हे दासरामानी पाहिले आहे.

श्रीमामांची चरित्रगाथा श्रीरामानंदमहाराज खटावकर, श्रीमंगेश रामचंद्र टाकीमहाराज, श्री रघुनाथ ओंडकर, डॉ.के.वा.आपटे, डॉ.दा.वि.कुलकर्णी, डॉ.गं.वि.कुलकर्णी, परम प्रिय प्रा.म.अ.कुलकर्णी (प्रज्ञानंद), परम प्रिय अण्णा दिवेकर, चि.प्रकाश भावे यांनी अनुक्रमे यथावकाश निरनिराळ्या ग्रंथांतरी गायली आहे. परम पूज्य श्रीपंत शिष्यवर श्री पांडुरंगमहाराज ताम्हणकर यांनी आमचे श्रीतात्यासाहेबमहाराज आणि मामा यांचे संदर्भात खूपच पद्य रचना केली असून श्रीतात्यासाहेबांनी गुरुभक्तीची ध्वजा फडकविली तर श्रीमामा केळकर पैठणचे एकनाथच सांगलीत पुन्हा अवतीर्ण झाले असून त्यांनी हरिभक्तीचा कळस केला असे भक्तिभावपूर्ण उद्गार प्रगट केले आहेत. ते म्हणतात,

पैठण क्षेत्री अतृप्त हेतु । सांगलीत पूर्ण इच्छा होतु ।
हरिभक्तीचा कळस डोलतू । पांडुरंग मनी भरला ।।

कीर्तनास नित्य नेमाने येणाऱ्या सौ. श्यामला कृष्णाजी पटवर्धन, शिक्षिका, श्रीमामांचे जन्मशताब्दी निमित्त 'दासराम गाथा' प्रसिद्ध करीत आहेत. त्यात मामांच्या जीवनाचा विविध प्रकारे आलेख स्पष्ट झालेला आहे. हे येथे सांगणे आवश्यक आहे. याही गोष्टीचा मला आनंद आहे.

### श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनाचे साथीदार

श्रीनानबा फडणीस, पुंडूकाका कोटणीस, साधुदास, श्रीअनंतराव म्हसकर हे श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनाचे प्रमुख साथीदार असून त्यांचे मागे अडतीस साथीदार साथीस उभे असत. श्रोत्यांना श्रीतात्यासाहेब हे या साथीदारांच्या घोळक्यात दिसतच नसत. म्हणून याला लोकांनी कूड ही संज्ञा दिली होती. तबलजी व पेटीवाले भरपूर असत. तबल्याची साथ कागवाडचे श्रीभाऊराव फाटक करू लागले तर त्यांना घडवंची सकट उपरण्याने बांधावे लागे. ते तबला चांगलाच घुमवीत. त्यांना देहभान रहात नसे. त्यांच्या बोटातून रक्ताच्या चिळकांड्या उडत तरी तबला चालूच असे. श्रीतात्यासाहेब हे तर देहातीत परब्रह्मच. तो कीर्तनाचा रंगच आगळा आणि वेगळा असे. श्रीसद्गुरु हनुमंत । कीर्तनी होती देहातीत ।। असे श्रीगणपतराव कानिटकर यांनी आपल्या अभंगात म्हटले आहे, ते यथार्थ आहे. श्रीतात्यासाहेबांचे सुपुत्र डॉ.श्रीगोविंदरावजी कोटणीस आणि लखूनाना हेही कीर्तनास वारंवार तबला पेटीची साथ करीत असत. श्रीवामन व्यंकटेश आपटे (शिक्षक) हेही तबल्याची उत्तम साथ करीत असत.



### श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनाचे श्रोते व मानकरी साथीदार

जे साथीदार कीर्तनाचे वेळी श्रीतात्यासाहेबांच्या मागे उभे असत त्यापैकी कुणास काही कुणास काही तात्यासाहेब फर्माईश करीत. श्रीतात्यासाहेबांचे अधिकारी चुलत बंधू श्रीगोपाळकाका कोटणीस यांना 'रंग माजला, रंग माजला रंग गुरुद्वारी ।' हे पद्य म्हणावयास सांगत तर आमचे आजोबा श्रीअंताजीपंत केळकर यांना 'मौज दिसती रे' हे पद्य म्हणावयास सांगत व त्यांनी हे पद्य म्हटले की कीर्तनात खरीच मौज होई. आमचे आतेबंधू श्रीनारायणराव व हरीभाऊ पटवर्धन यांचे वडील श्रीलक्ष्मणराव पटवर्धन कीर्तनातील संतांची अवतरणे टाचून घेत. म्हणून श्रीतात्यासाहेब हे त्यांचेकडे पहात व दोनदोनदा चरण म्हणत असत. श्रीगोविंदराव पडसलगीकर हे कीर्तनात बुक्का लावण्याचे मानकरी होते. या सेवेने त्यांची बऱ्याच दिवसांची भूतबाधा पार नाहीशी झाली.

श्रीगंगाधरराव दीक्षित हे श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनाचे एकनिष्ठ श्रोते. इ.स.१९१४ साली कृष्णेला महापूर आल्यावेळी ते कौलापूरहून पोहतच कीर्तनाला येत व पोहत परत जात. ह्या निष्ठेला काही तोड आहे का? असा प्रश्न आहे. हजारो श्रोते एका पारड्यात व गंगाधरसिंग एका पारड्यात घातले तर कोणाचे वजन जास्त भरेल हे सांगणेची जरुरी नाही.

माझ्या आजी सौ. लक्ष्मीबाई केळकर या श्रीब्रह्मचैतन्य महाराजांच्या अनुगृहीत असून श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनास नित्य जात व माझी ती.सौ.आई इंदिराबाई केळकर श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनास नेमाने जात असे. यांचे सोबतीला श्रीअनंतराव म्हसकर जात. पुढे त्यांनी श्रीतात्यासाहेबांचा अनुग्रह

घेतला. बापूराव केळकरांच्यामुळे या मार्गात मी आलो व सिटी हायस्कूलमध्ये नोकरी त्यांचेमुळेच मिळाली असे ते सांगत.

### असे किती दिवस चालणार

श्रीगंगाधरराव यांच्या मातोश्री गंगव्वा या एकदा श्रीतात्यासाहेबांना म्हणाल्या, 'तुमचा गंगाधर अतिशय खोडकर आहे, कोणाचे ऐकत नाही. मनाला येईल ते करतो. समर्थ रामदासस्वामीप्रमाणे त्याच्या अंगात शक्ती असल्याने त्याला फारच राग आहे. आपण त्यास चार शब्द सांगून शांत करावे अशी माझी प्रार्थना आहे.' मग श्रीतात्यासाहेबांनी गंगाधरराव यांची गाठ पडताच विचारले, 'अरे गंगाधर हे असे किती दिवस चालणार?' या नंतर गंगाधरराव शांत झाले याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

### सेवाधर्म

श्रीतात्यासाहेबांची सेवा गंगाधरराव मनोभावे करीत. त्यांचे हात तरी पोलादी होते. एकेक वेळा श्रीतात्यासाहेबांचे हातपाय चेपताना त्यांचे बोटही आत जात नसे इतके ते टणक असावयाचे तर एकेक वेळा श्रीतात्यासाहेबांचे हात पाय कापसासारखे मऊ असावयाचे. यावरून श्रीतात्यासाहेब हे ब्रह्मरूप होते हे सूर्य प्रकाशाइतके स्पष्ट आहे. कापूस म्हणजे 'रु' व रु या शब्दाचा एकाक्षरी कोषात 'ब्रह्म' असा अर्थ आहे. यावरून मला काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होईल.

### श्रीहनुमान समाधि मंदिराची उभारणी

श्रीगंगाधरराव यांचे पिताजी रघुनाथराव यांनी श्रीदतोपंतराव दीक्षित यांना तालीम शिकवली म्हणून 'माझ्याकडून काही गुरुदक्षिणा घ्या' असे ते म्हणत. परंतु रघुनाथरावांनी त्याना दक्षिणा कधीच मागितली नाही. नंतर गंगाधररावांनाही गुरुदक्षिणा मागा असे म्हणत. 'योग्य वेळी मागीन, मला आत्ता नको' असे गंगाधरराव बोलले. कृष्णाकाठी संध्यामठ असून फारच मोठी मळी व मोकळी जागा दत्तोपंतांच्या मालकीची होती. श्रीतात्यासाहेब



यांचे संध्यामठात कीर्तन झाले वेळी 'ही जागा विश्रांतीला फारच चांगली आहे,' असे उद्गार काढले होते. न जाणो आपल्या अखेरच्या विश्रांतीसाठी ही जागा त्याचवेळी पसंत केली की काय कोण जाणे. श्रीतात्यासाहेबांचे शब्द अक्षरशः खरे ठरले. रविवार पौष वद्य षष्ठी शके १८४५ रोजी श्रीतात्यासाहेब हे स्वानंदसुखनिवासी झाले. 'महाराज आले आहेत, आरती करा' हे त्यांचे अखेरचे शब्द. माझी ती.सौ.मातोश्री इंदिराबाई केळकर यांनी ऐकल्याचे मला सांगितले. श्रीतात्यासाहेबांचे वडील श्रीपांडूतात्या यांची त्याच दिनी श्राद्धतिथी होती. त्यामुळे श्रीतात्यासाहेबांच्या अंतःकरणात मोठीच कालवाकालव झाली. श्रीपांडूतात्यांचे श्राद्ध झाले, थोडा प्रसाद सेवन केला व श्रीतात्यासाहेबांचे कल्याण श्रीनानबा फडणीस यांना हाक मारून मी आज जाणार असे त्रिवार सांगितले. त्याप्रमाणे श्रीतात्यासाहेब हे सायंकाळी पाच वाजता 'ब्रह्मरूपी' लीन झाले, स्वरूपाकार झाले. हजारो माणसे दाटीवाटीने दर्शनास आली होती. त्यानंतर 'राजाधिराज सद्गुरुनाथमहाराज की जय' या गजरात त्यांची अंत्ययात्रा अत्यंत मंद गतीने 'सद्गुरुनाथ माझे आई मला ठाव द्यावा पायी' हे भजन करीत चालू झाली. श्रीमंत राजेसाहेब, सांगली म्युनसिपालटीचे चेअरमन, डी.एस्.पी.सर्वच लोक यात्रेत सहभागी झाले होते. अमरधामाचे रस्त्यात यात्रा आली व गंगाधररावसिंग एकदम आडवे आले व त्यांनी ही यात्रा थोपवून दीक्षितांनी ही मळी आपणास गुरुदक्षिणा म्हणून द्यावी असे सांगितले. त्यांनी बक्षीसपत्राने जागा दिली. सरकारी परवानगीही तेथेच मिळाली. श्रीसद्गुरू बाबूरावजी कोटणीसमहाराज या श्रीतात्यासाहेबांच्या जेष्ठ चिरंजीवांनी अंत्यसंस्कार केला. चंदन, कापूर, खोबरे वारण्यात आले होते. श्रीतात्यासाहेबांचा देह अस्तंगत झाला. यावेळी श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे एक लाडके शिष्य गुरुभक्तिपरायण बाबूराव गोखले यांचे समयोचित असे छोटेसे भाषण झाले. सारे भक्त श्रीतात्यासाहेबांचे गुणानुवाद गात आपापल्या घरी जड पावलाने परतले. श्रीतंम्मुकाका त्या रक्षेजवळ आपला तळ ठोकून तीन दिवस बसले होते. मग त्यांना काय वाटले कोणास ठाऊक?

पुढे श्रीतात्यासाहेबांची समाधी या दहनभूमीवर करण्याचे दृष्टीने हालचाल सुरू झाली. पाया लवकर लागेना. आज जेवढी इमारत वर दिसत आहे, त्याहीपेक्षा खोल पाया खणण्यात आला. या कामी श्रीशंभूराव इनामदार, शंकरराव ताम्हणकर, भाऊ भटजी बापट इत्यादी अनेक तालीमबाज लोकांनी फारच परिश्रम घेतले. श्रमदान करून ही इमारत बांधली. मंदिरात तळघर करण्यात आले. त्यात दगडी चौथरा सुंदर तयार केला. चिमडच्या तापनाशी तीर्थाचे अनुकरण करून चौथऱ्यावर मध्यभागी सुंदर समाधी बांधली. त्यात लाकडी पेटी ठेवून श्रीबाबू भटजी बापट यांनी श्रीतात्यासाहेबांच्या पादुका त्यांच्या पायास लावून आणल्या होत्या, त्यांची भक्तिपूर्वक स्थापना करण्यात आली. रात्रीच्या वेळी उजेडासाठी आमचे श्रीमामांनी एक म्युनसिपालटीचा कंदील आणून तेथे डांबावर लावून ठेवला होता. त्यावेळी संप्रदायात दोन तट पडल्याचा देखावा निर्माण झाला. दहनभूमीवर औदुंबर लावून समाधी दुसरीकडे करावी असा श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचा संकेत तर दहनभूमीवर समाधि करावी असा गंगाधरराव व त्यांचे परमस्नेही अनंतराव म्हसकर इत्यादी मंडळींचा संकेत निश्चयपूर्वक बळावला व 'सत्य संकल्पाचा दाता नारायण' या उक्तीप्रमाणे तो संकल्प सिद्धीस गेला.

श्रीचिमडचे महाराज यांचे तृतीय चिरंजीव श्रीउद्धवरावजीमहाराज हे समाधि मंदिरात इ.स.१९३१ साली येऊन राहिले होते. जन्मजातच त्यांच्या कानास भोके होती. श्रीलक्ष्मीबाई अक्का 'हा कानफाट्याच अवतीर्ण झाला' असे म्हणत. त्यांचे दर्शन होण्याचा मला श्रीमामांचेमुळे योग आला.

त्यानंतर श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज व त्यांची भक्त मंडळी यांचे संकेताप्रमाणे या समाधि मंदिराचे मागे श्रीतात्यासाहेबांच्या अधिकारी ज्येष्ठ कन्या श्रीकलव्वा अक्का यांचे हातून जमिनीत खोल खड्डा खणून श्रीतात्यासाहेबांच्या अस्थी व रक्षा सुरक्षित ठेऊन त्यात माणिक, पाचू, पोळे, हिरा, सोने व निरनिराळ्या क्षेत्रातील माती, गंगा व काही तीर्थे घालून त्यावर बंदिस्त भाग करून वरील बाजूस औदुंबर वृक्ष लावला. माझे पितृदेव श्रीमामामहाराज केळकर इ.स.१९६२ साली स्वरूपाकार झाले. त्यांचा अस्थिकलश श्रीगंगाधरसिंग यांनी खोल खणून या औदुंबराखाली ठेवला ही गोष्ट परमप्रिय श्रीनाना जोगळेकर यांचेकडून मला कळली. श्रीगंगाधररावांनी केळकर मंडळींच्यावर या योगाने मोठेच ऋण करून ठेवले आहे हे येथे नमूद करणे अगत्याचे आहे.



श्रीतात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीसद्गुरू दादासाहेब यांनी गणपति पेठेत सोबनसी वाड्यात श्रीतात्यासाहेबांची चलसमाधी करून श्रीनिंबरगीचे महाराज व चिमडचे महाराज यांचे तीर्थ तात्यासाहेबांच्या पादुकांवर पडेल अशी व्यवस्था केली. अगदी शेवटी श्रीतात्यासाहेब चिमडला गेलेवेळी श्रीनारायणरावमहाराज यांनी 'आम्ही तुमची समाधी करून गंध फूल घालू,' असे सांगितले. यावर हे अकल्पित बोलणे ऐकून श्रीतात्यासाहेब नारायणरावमहाराजांना बोलले, 'समाधीची तर तुम्ही गोष्टच सोडा.माझ्या अस्थीवरून श्रीसाधुमहाराजांचा वारा सांडत जावा एवढीच इच्छा आहे.' तथापि पुन्हा नारायणमहाराजांनी समाधी करणार असे म्हटल्यावर 'श्रीनिंबरगीकरमहाराज व चिमडचे महाराजांचे तीर्थ माझ्यावर पडेल असे करा' असे तात्यासाहेब बोलले. 'हजारो माणसे तुमच्या बरोबर आलेली आज मठात जेवतात, राहतात हा बोजा तुमच्यामुळे मठावर पडतो आहे' असे कुणी म्हटल्याचे तात्यासाहेबांना कळताच, तात्यासाहेबांनी चिमड सोडले व सांगलीस येण्यास निघाले. त्याचवेळी 'झाडाखाली झाड वाढत नाही, तू सांगलीस जा' असा चिमडच्या महाराजांचा दृष्टांत झाला. श्रीमाईसाहेब, श्रीनारायणमहाराज, श्रीउद्धवरावमहाराज हे चिमडच्या वेशीवर पोहचविण्यास आले. त्यांनी सजल नेत्रांनी श्रीतात्यासाहेबांना निरोप दिला. व पुन्हा कधी येणार असा प्रश्न केला. 'बाराव्या दिवशी येईन' असे श्रीतात्यासाहेब बोलले. आणि खरंच श्रीतात्यासाहेबांचा आत्मा बाराव्या दिवसांनी श्रीसाधुमहाराजांच्या अक्षय सेवेत चिमडक्षेत्री हजर झाला. यावरून श्रीबाबूरावांनी श्रीतात्यासाहेबांची इच्छा कशी पूर्ण केली हे स्पष्ट होईल.

दोन्हीकडे कीर्तन, पंचपदी, शेजारती, काकडारती, आराधना, उत्सव होऊ लागली व श्रीतात्यासाहेबमहाराजांची कीर्ती दिगंतरात पसरू लागली. श्रीमुरलीधर मंदिराजवळ 'कैवल्यधाम' ही प्रशस्त इमारत श्रीसद्गुरू दादासाहेब कोटणीसमहाराज यांनी उभी केली. त्यात शास्त्रोक्त पद्धतीने श्रीनिंबरगीचे महाराज, साधुमहाराज, काडसिद्ध, चिमडचे महाराज व तात्यासाहेबमहाराज यांच्या पादुकांची स्थापना करून श्रीनिंबरगीचे व चिमडचे महाराज यांच्या पादुकांचे तीर्थ समाधीवर येईल अशी व्यवस्था केली. श्रीदादांच्या आयुष्यात शेवटपर्यंत श्रीतात्यासाहेबांचा पुण्यतिथी महोत्सव थाटाने साजरा होत असे. कैवल्यधामात वस्तुसंग्रहालय, पारमार्थिक लायब्ररी, अनेक संतांचा चित्रसंग्रह मोठा पाहण्यासारखा असून फार दूरचे भाविक हे स्थान पाहून समाधान पावतात. श्रीदादासाहेब यांची परंपरा श्रीगुरुनाथमहाराज यांनी सांप्रत व्यवस्थितपणे चालविली आहे.

## मंगल विवाह

बुधगांवचे विदेही साधू गुंडुबुवा समाधि मंदिरात श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथी महोत्सवात व आमचे श्रीरामनिकेतनमध्ये माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे कीर्तनात नाचावयाचे व परमार्थात 'गोंदा पुरा' आहे असे म्हणावयाचे. हा वृत्तांत पुरुषार्थ मासिकात श्रीगुंडुबुवांच्या आशीर्वादाच्या चरित्रात समाविष्ट आहे. श्रीतात्यासाहेबांच्या परम कृपेने व गुंडुबुवांच्या आशीर्वादाने श्रीगंगाधरराव यांचा मंगल विवाह श्रीक्षेत्र पंढरपूर येथे ताकपिठ्या विठोबापुढे इ.स.१९४२ साली सौ.गिरिजाबाई यांचेबरोबर थाटाने संपन्न झाला. त्यानंतर त्यांना एक मुलगा झाला पण तो तसा लवकरच देवाघरी गेला. त्यावेळी मनाला काय वाटले ते सांगणे कठीण आहे. तो असता तर श्रीगंगाधर यांचे भक्तिकार्यास वेगळीच शोभा आली असती. महाराजांच्या इच्छेपुढे काही चालत नाही हेच खरे.

श्रीमाईसाहेब यरगट्टीकर, श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चिमडहून श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथी महोत्सवास हनुमान समाधि मंदिरात येत असत. त्यांचे आगमनाने सारेच वातावरण भारावून जात असे. एके वर्षी श्रीमामांचे



कीर्तनाच्या वेळी बाहेर खुर्चीवर बसून ते श्रीमामांचे कीर्तन ऐकत होते व त्यांनी आनंद व्यक्त केला, ही गोष्ट संस्मरणीय आहे. श्रीगोपाळकाका कोटणीस यांनी ललिताचे कीर्तन पौष वद्य सप्तमीस करण्याची प्रथा चालू केली. श्रीदादांचे आयुष्यास अखेरी पौष वद्य अष्टमीस समाधीत रक्षा पूजा होत असे. व कोटणीस व केळकर मंडळी प्रसादास येत असत.

चिमडचे महाराज यांचे एकनिष्ठ शिष्य वामन भटजी बाळेकुंद्रीकर व त्यांचे चिरंजीव श्रीसीताराम भटजी हेही या महोत्सवास येऊन महिना पंधरा दिवस रहात आणि समाधीची सेवा करत असत. प.पू.श्रीमामासाहेब दांडेकर, ह.भ.प.श्रीफुटाणे महाराज, श्रीघेवारे वकील, मिरजेचे ह.भ.प.चांदोरकर वकील, सांगलीचे ह.भ.प.चांडोलेबुवा, श्रीनारायणमहाराज मळणगांवकर आणि इचलकरंजीचे ह.भ.प.कडोलीकर येऊन जात. प्रसंगोपात्त त्यांची समाधिमंदिरात प्रवचने होत असत. प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हणकर यांचे रात्री बाराचे पुढे भजन होत असे. अनाथ विद्यार्थी आश्रमाचे संचालक श्रीनानासाहेब शिदोरे हे मुलींच्या शाळेत चित्रकलेचे शिक्षक होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ, निगर्वी कष्टाळू व शांत असा होता. ते शाळेत लोकप्रिय होते. श्रीतात्यासाहेबांचा त्यांना अनुग्रह असून त्याचा परिपाक त्यांच्या वृत्तीत झाला होता. यामुळे श्रीमामांच्या कीर्तनानंतर शिदोरेमास्तर आश्रमातील शंभर ते सव्वाशे मुले घेऊन येत व समर्थांची करुणाष्टके म्हणत. या विद्यार्थ्यात परमप्रिय मधुसुदन कुलकर्णी हे अग्रेसर असत. सर्व मुलांना नंतर दुग्धपान होई व ते आश्रमात जात.

एकदा श्रीकाकासाहेब तुळपुळे यांचे प्रवचन समाधि मंदिरात श्रीतात्यासाहेबांच्या पुण्यतिथी महोत्सवात झाले. त्यात त्यांनी निंबरगीपासून चिमड व हिंचगिरी या शाखा कशा प्रसृत झाल्या हे विशद करून 'श्रीबापूरावजी केळकर हे या चिमडपंथाचे भूषण आहे, खऱ्या अर्थाने त्यांनी ही परंपरा श्रीतात्यासाहेबांना शोभेल अशा पद्धतीने चढती वाढती ठेवली आहे' असे बहारदार वर्णन केले. श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

श्रीपंडितरावमहाराज यरगट्टीकर व श्रीउद्धवरावमहाराज यरगट्टीकर

यांचे चिरंजीव पांडोबामहाराज यरगट्टीकर हे श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात येत असत. श्रीपांडोबांच्या केवळ कृपेनेच श्रीगंगाधरराव यांच्या पत्नी सौ.गिरिजाबाई मोठ्या व्याधीतून पार पडल्या आहेत. यावरून माझ्या दृष्टीने श्रीपांडोबांचा पारमार्थिक अधिकार सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट होत आहे. पोस्ट ऑफिसमध्ये त्यांनी चांगली अधिकाराची नोकरी केली व निवृत्त झाल्यावर श्रीक्षेत्र चिमड येथे वास्तव्य करून आहेत. तेथेच त्यांचा मुक्काम झाल्याने चिमड क्षेत्री भक्तिकार्यास बहर आला आहे. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह सौ.गिरिजाबाई यांना लाभल्याने त्या मोठ्या भाग्यशाली आहेत यात प्रश्नच नाही.

**प.पू.श्रीसद्गुरू मातोश्री माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांची समाधी**

इ.स.१९८१ साली श्रीपांडोबा यरगट्टीकर यांच्या केवळ कृपालोभाने श्रीपंडितरावमहाराज यरगट्टीकर यांनी परवानगी दिल्यामुळे श्रीमाईसाहेब यांची समाधी साधुमहाराजांच्या मागील बाजूस असलेल्या 'त्रयमूर्तींच्या' समाधीच्या मागे थाटाने श्रीगंगाधरराव दीक्षित यांनी प्रतिष्ठित केली. योगायोगाने श्रीमंत सोनूबाई माने यांनी दासरामास तेथे नेल्याने श्रीपंडितराव आणि पांडोबा यांचे अनुज्ञेने दासरामाचे कीर्तन व आराधना थाटाने झाली. त्या दिवशी त्रयमूर्तींच्या समाधीपुढे केळीचे खुंट उभे करून विजेची रोषणाई केली होती आणि हजार पाचशे माणूस प्रसाद सेवन करून माईसाहेबांचा गुणानुवाद करीत घरी गेले.

**श्रीकाणेबुवांचे समाधि मंदिरातील वास्तव्य**

श्रीपंत शिष्यवर श्रीपांडुरंगमहाराज यांचे वचनाप्रमाणे श्रीकाणेबुवा हे समाधि मंदिरात बरीच वर्षे वास्तव्य करून होते. ते ब्रह्मचारी असून श्रीधरस्वामी प्रमाणे यांचा बराच काळ मौनात जात असे. माधुकरी मागून त्यावर निर्वाह करीत व जवळजवळ वर्षांवर्षांत पहिल्या ठिकाणी माधुकरी मागण्याची वेळ येऊ नये याची दखल घेत. दुसऱ्यावर बोजा पडू नये हाच त्यामागील हेतू होता. समाधि मंदिर झाडणे, सारवणे, रंगरंगोटी करणे, पूजेची तयारी करणे, सडा घालणे, उत्सवात खीर घोटणे, पंक्तीत वाढपाचे काम करणे इत्यादी हर एक काम ते करीत. नेहमी प्रसन्न चित्त असे. आणि हे सारे मोठ्या उत्साहाने व शांतपणे चाले. गंगाधरराव यांचे घरातील कामेही ते करीत व कोणी कांही म्हटले किंवा निंदा नालस्ती केली तरी श्रीतात्यासाहेबांच्या सेवेत त्यांनी कधीच कसूर केली नाही. त्यांच्याजवळ पंचधातूची मारुतीची मूर्ती असे. त्याची ते नित्यनेमाने पूजा करीत. भीमरूपीस्तोत्र म्हणत. दरवर्षी रामनवमी व हनुमानजयंती स्वखर्चाने थाटाने साजरी करीत असत. 'तुम्ही काणेबुवांची सेवा केलीत तर ती माझी केल्यासारखी आहे. तात्या, काका, मामा हे तिघे एकच आहेत. हे तुम्ही ध्यानात ठेवा' असे श्रीपांडुरंगमहाराज परमप्रिय श्री.दत्तात्रय कर्णेकर यांना बोलले होते. त्यांचे वचन श्रीयशवंतराव यांनी तंतोतंत आयुष्यभर पाळले. काणेबुवांचे कपडे धुण्यापासून ते सेवा करीत. कधीही कंटाळा केला नाही. श्रीमामांचे दर्शनास सोमवारी व गुरुवारी न चुकता येत असत. मजवरही त्यांची श्रद्धा होती. श्रीगुंडबुवा यांच्या तोडीचे श्रीसूरदास हे श्रीपांडुरंगमहाराज यांचे निस्सीम भक्त. त्यांची व सूरदासांची गट्टी होती. एके प्रसंगी श्रीकाणेबुवा व यशवंतराव झोपलेले. रात्र होताच काणेबुवांच्या उशाशी भला मोठा नाग असलेला श्रीयशवंतरावांनी पाहिला. ते किंचाळले, तोच काणेबुवा म्हणाले 'अरे हा नाग आज तू पाहिलास पण हा रोजच माझ्या उशाशी असतो व तोच आपले संरक्षण करतो. म्हणून तू घाबरू नकोस.' असे म्हणताच तो नाग कोठे गेला ते कळलेच नाही. एकदा भयंकर दुष्काळ पडला. काय खावे हा प्रश्न पडला. श्रीयशवंतरावांनी ही व्यथा श्रीपांडुरंगमहाराज यांच्या कानी घातली. 'मंगळवेढ्याहून मूठभर जोंधळे आण. कणगीत व डब्यात टाक. तुला कांही कमी पडणार नाही,'असे महाराज बोलले. आणि पूर्ण निष्ठेने पुढे कांही न बोलता श्रीयशवंतरावांनी तसेच केले. मात्र त्यांनाच काय त्यांचे चिरंजीव श्रीदत्तात्रय यांचे आयुष्यातही आजतागायत कांही कमी पडले नाही.



श्रीयशवंतराव रेल्वेने पंढरपूर येथे चालले होते. समोरच एक गृहस्थ बाकावर बसले होते, त्यांना पाहून यशवंतराव बोलले 'काय हो, तुम्ही अण्णाबुवांचे

चरित्र प्रसिद्ध करणार आहात नां? तुम्हीच ते लिहीत आहात ना? सांगा ना? मग ते आता कशात अडले आहे ते कांही कळत नाही.' त्या गृहस्थाने विचार केला, यांना कांही देखील माझी माहिती असण्याचा संभव नाही मग हे अचूक प्रश्न कसे केले? हा विचार करता करता ते गृहस्थ यशवंतरावांच्या पायी नतमस्तक झाले व साऱ्या अडचणी दूर होऊन श्रीअण्णाबुवांचे चरित्र लिहून पूर्ण झाले व प्रकाशितही झाले. हा वृत्तांत इतका बोलका आहे की तो अण्णाबुवांचे चरित्राच्या प्रस्तावनेत आला आहे. मला वाटते या प्रसंगातच श्रीयशवंतराव यांचे योग्यतेचे गमक दडलेले आहे. श्रीयशवंतराव यांना श्रीपांडुरंगमहाराजानी १९६४ साली पादुका प्रसाद म्हणून दिल्या हे त्यांचे मोठे परम भाग्यच होय. आज त्या दत्ता कर्णेकर यांचेकडे आहेत. श्रीयशवंतराव यांचे चिरंजीवही त्याच निष्ठेचे आहेत हे दिसून येईल. तेही समाधि मंदिरात आजतागायत सेवा करीत आहेत. परमप्रिय राघवेंद्र विष्णुपंत कुलकर्णी यांनी अत्यंत कलात्मक पद्धतीने समाधीस ऑईलपेंट रंग दिला आहे. हे निष्ठेचे द्योतक आहे.

### औदुंबर पारकट्टा

श्रीदत्तात्रय कर्णेकर यांच्या मनात बरेच दिवस समाधिमंदिरामागील औदुंबरास पारकट्टा करणेचा होता. त्यांनी सहजपणे गंगाधर सिंग यांची परवानगी मागताच त्यांनी ती मोठ्या आनंदाने दिली. व अवघ्या दीड दिवसात औदुंबराखाली पाया खणून त्यावर सिमेंटचा पारकट्टा व त्यावर एक लहानसे सुंदर देऊळ बांधून घेतले. प्रथमता दासरामकडून दि.९/११/८७ रोजी सकाळी ७.३० वाजता शुभारंभ म्हणून नारळ फोडण्यात आला. चि.चंद्रशेखरकडून हळद, कुंकू, बुक्का वाहून फुले व हार घालण्यात आला. औदुंबर वृक्षालाही हार घातला व आरती म्हणण्यात आली. श्रीगंगाधरसिंग यांनी बेसनाचे लाडू प्रसाद पाठवला. तो सर्वांना दिला. गुरुवारी लगेचच आधुनिक गुंडुबुवा श्रीपरमप्रिय सूरदास यांचे शुभहस्ते पारावर 'तात्या, मामा, काका, निजधाम' ही अक्षरे खोदलेली पाटी मोठ्या समारंभात बसविण्यात आली. या दिवशी गुरुवार असून गुरुपृष्यामृत



योग होता. या समारंभात किमान पन्नास ते पंच्याहत्तर साधक जमले होते. यावेळी गंगाधरकाका व सौ.गिरिजाबाई या समारंभास उपस्थित होते. श्रीगंगाधरराव यांना बसण्यास खुर्ची ठेवली. त्यांनी विचारले ही कल्पना कोणाची? तेव्हा ही कल्पना श्रीदत्तात्रय कर्णेकर यांना सुचली असे सांगताच 'हे काम फारच छान झाले आहे व ते व्हावयास पाहिजे होते. माझे मनातच पारकट्टा करणेचा होता पण प्रकृतीमुळे व कांही कांही कारणानी हे काम राहून गेले पण श्रीतात्यांनी कर्णेकरांच्याकडून ही सेवा घेतली. हे उत्तमच झाले' असे उद्गार काढले. मग श्रीगंगाधरराव यांनी पाटीला, श्रीविठोबाच्या देवळाला, आणि औदुंबराला हार घातला. त्यावेळी दासराम, गंगाधरराव, सूरदास आणि चि.चंद्रशेखर यांचा फोटो घेण्यात आला. सर्वांना केळीचा प्रसाद दिला. श्रीगंगाधररावांनी दासरामाकडून प्रसाद मागून घेतला. सौ.गिरिजाबाई पुढे येऊन, त्यांनीही दासरामाकडून प्रसाद मागून घेतला, पुढे सर्व लोकांना श्रीलक्ष्मणराव कुलकर्णी यांनी प्रसाद वाटला. 'श्रीयशवंतराव कर्णेकर यांचे स्मरणार्थ हा पारकट्टा श्रीदत्तात्रयाने तयार करून आपले वडिलांचे नांव अजरामर केले,' असे गौरवपर उद्गार दासराम यांनी काढले. व त्या पितृभक्तीला तोड नाही असे म्हटले. आई वडिलांची सेवा ही परमार्थाचा पाया आहे, हेच खरे. आणि हे सारे झाल्यावर शेजारी असलेल्या समाधीच्या कट्ट्यावर गंगाधरराव हा पारकट्टा पहात बराच वेळ बसले होते. अलीकडे गंगाधररावांना चालताना दोन दोन माणसांनी धरावे लागे. पण या समारंभास येताना कुणाचाही आधार न घेताना ते घरातून भराभरा चालत आले. याचे सर्वांना आश्चर्य वाटलेवाचून राहिले नाही. चि.चंद्रशेखरचा हात आपल्या हातात घेऊन श्रीगंगाधररावांनी डोळ्यातून पाणी काढले. त्यावेळी सर्वांना काय वाटले हे सांगणे कठिण. 'मौज दिसती रे' हे पद गंगाधरराव यांनी चि.चंद्रशेखरकडून म्हणवून घेतले. त्यानंतर श्रीगंगाधररावांना हात धरून घरी नेण्यांत आले. समाधिमंदिरात परमप्रिय श्रीशिंगाडे यांनी श्रीतात्यासाहेबांची आरती केली. त्यावेळी दासरामाने श्रीतात्यासाहेबांच्या पादुकांना पुष्पहार समर्पण केला.

यानंतर श्रीगंगाधरराव यांनी अन्न पाणी कमी केले. नुसत्या घोट घोट पाण्यावरच ते चार पाच दिवस राहिले. कार्तिकी वद्य एकादशीत आळंदी यात्रेचे दिवशी 'श्रीतात्यांच्याकडे लक्ष द्या' असे सौ. गिरिजाबाईना सकाळी सांगितले.त्यांच्या अंगातून घाम येऊ लागला. सायंकाळी श्रीगंगाधररावांना चिंताजनक परिस्थितीत हॉस्पिटलमध्ये नेले व त्यांच्यावर उपचार होण्याच्या आतच ते पंचत्वात विलीन झाले.

भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे समाधिमंदिरात समाधीपुढे असलेल्या तीन कमानीपैकी मधल्या कमानीत श्रीतात्यासाहेबांचे निष्ठावंत भक्त श्रीगंगाधरराव यांचे शनिवार दि. २-१-८८ रोजी जे वृंदावन बसविले आहे त्याची स्थापना गु. श्रीपांडोबा यरगट्टीकर यांचे हस्ते आरती होऊन झाली.

***

(१)

## श्रीरेवणसिद्ध (१)

श्रीगणेशाय नमः ।।
श्रीरेवणसिद्ध प्रभु राया । करी दीनावरी दया ।
आपुलिया कृपेची छाया । असो द्या या भक्तावरी ।।१।।
आपुला प्रसाद उच्छिष्ट । तुच्छ अमृताचा घोट ।
तव कथादीप प्रगट । झाला असे मजपुढे ।।२।।
तू तापलियांची साऊली । तू प्रेमाची माऊली ।
दाविली कैसी सगट खोली । सत्प्रेमाची ।।३।।
श्रीसोमेश्वराचे पिंडीपासूनी । जन्मला आपण नवल करणी ।
ब्रह्मरूपी जनी वनी । विचरला ।।४।।
जगताचा भवभ्रम । निवाराया परंधाम ।
अवतार जहाला परम । कृतयुगी ।।५।।
आपुले स्वरूप अनादी । आपणासी नाही आदी ।
परमार्थ निशाणी रोविली आधी । वैकुंठासी ।।६।।
भक्तिसोहळा अपूर्व । जगी प्रगटविला देव ।
अनेक मूढांचा स्वभाव । पालटला ।।७।।
नाना परंपरेचे मूळपीठ । चिमड सांप्रदाय वरिष्ठ ।
त्यात श्रीगुरुलिंगजंगम श्रेष्ठ । सिद्धराज ।।८।।
त्यांचे गुरूपरंपरेचे मूळ पीठ । रेवणसिद्ध अनादि दैवत ।
नामस्मरणे असंख्य भक्त । उद्धरिले ।।९।।
श्रीशंकरांचा कृपाप्रसाद । जया धन्य रेवणसिद्ध ।
होऊनी ठेले सुखकंद । परमात्मा ।।१०।।

सतत घोष जयजयकार । शिव हर जय शंकर ।
आपणची चराचर । होऊनी ठेले ।।११।।
रेणागिरी पर्वतावरी । निर्जन ऐशा अरण्यांतरी ।
साधन चाले निरंतरी । अहर्निशी ।।१२।।
असोनिया परम सिद्ध । नाही सोडिला साधन छंद ।
शक्ती जयांची अगाध । वर्णवेना ।।१३।।
रेवणसिद्ध सद्गुरु समर्थ । पूर्ण करिती मनोरथ ।
केवढे सामर्थ्य अद्भुत । पर्वत केले सोन्याचे ।।१४।।
त्यांचे भाग्य वर्णावे काय । सुरवर वंदिती पाय ।
कळिकाळा ज्यांचे भय । काय सांगो ।।१५।।
करिती सत्ता सर्वा ठायी । आकाश गमने गुरु माई ।
पाहोनी येती नवलाई । जावोनी येती काशीसी ।।१६।।
जिकडे फेकिती दृष्टिक्षेप किरण । खड्याचे परीस मौल्यवान ।
करिती रेवणसिद्ध भगवान । आद्य पुरुष ।।१७।।
इंद्रादिक भाग्यवंत । पायावरी लोळण घेत ।
परी चित्त अनासक्त । गोसिवियांचे ।।१८।।
नाभिकमली वाहे गंगा । जे पुनीत पावन करी जगा ।
विभूती चर्चियेली अंगा । दैदीप्यमान ।।१९।।
विभूती लाविण्याचे साठी । भस्म निर्मियेले सृष्टी ।
काय वर्णावे धूर्जटी । रेवणसिद्ध ।।२०।।
भस्माचे पर्वत निर्मियेले । पंच महासिद्धा आदि शोभले ।
प्रसिद्ध जगामाजी जहाले । अनाद्यनंत ।।२१।।
चढता नागनागिणींचे विष । मरणोन्मुख वाचविले प्राणास ।
कित्येके देखिले प्रत्यक्ष । सिद्धस्थानी ।।२२।।
रेवणसिद्ध स्वयंभू मूर्ती । वर्णिता न चले ब्रह्माची मती ।
सूर्यचंद्राचिये गती । स्थिर होय ।।२३।।



मृत शरीरे उठविली । ऐसी रेणाई माऊली ।
करिता कृपेची साऊली । अशक्य काय ।।२४।।
महामाया करवीर क्षेत्री । वास करीत होती निर्धारी ।
मनमोहना अतिसुंदरी । रमक नाम ।।२५।।
धर्मद्वेष्टी नागिणीपरी । चंचला चपला मनोहरी ।
सिद्धासी परावृत्त करी । ऐसी अविचारी महामाया ।।२६।।
तिचे साम्राज्य सर्वावरी । सामर्थ्य चाले सर्व प्रकारी ।
राज्यलक्ष्मी वास करी । जये ठायी ।।२७।।
कोणी सिद्ध येता भिक्षेस । वोगरी भरोनी आणी विष ।
प्राशन करिता जीवितास । मुकणे लागे ।।२८।।
जरी न केले प्राशन । ठेवी बंदी त्यालागून ।
ऐसे तिने बंदिजन । कित्येक केले ।।२९।।
सिद्धा हाती बांगड्या भरी । सिद्धपदच्युत करी ।
ऐसे कित्येक केले कामारी । स्वगृही ।।३०।।
नको नको कारागृहवास । सिद्ध कंटाळले त्यास ।
मायेपुढे सर्व सायास । फुकट गेले ।।३१।।
कवड्यांच्या माळा सिद्धांच्या गळ्यात । घातियेल्या त्या यथार्थ ।
कोण अपमान सत्य । असह्य दुःख ।।३२।।
अपूर्वची पाहिले डोळा । नाक फोडोनी कवड्यांच्या माळा ।
ओविता दिसे दुःखकळा । चिन्हे अंगी ।।३३।।
नव कोटी सिद्ध बंदिजन । प्रार्थिती शंकरालागून ।
सोडवा या बंदीपासून । दुःख कुडी न साहे ।।३४।।
दुःखित भाक ऐकिलिया । शंकराते आली दया ।
बंदिजन सिद्ध सोडवाया । रेवणसिद्ध प्रगटले ।।३५।।
नव कोटी सिद्धांचे बंधमोचन । करावया प्रभू रेवणसिद्ध आपण ।
करोनी करवीरक्षेत्री स्नान । आले मायेचे मंदिरा ।।३६।।

देखिलिया श्रीरेवणसिद्धासी । नव कोटी सिद्ध मानसी ।
म्हणाले आम्ही निश्चयेसी । सुटू बंदीपासुनी ।।३७।।
जरी प्रभूने कृपा केली । तरीच आमुची मुक्तता झाली ।
नाहीतरी बंधची कपाळी । कारागृही ।।३८।।
रेवणसिद्धे झेंगट पिटिले । त्रैलोक्य सारे थरारिले ।
त्रिशूल हस्तकी शोभले । जाण बापा ।।३९।।
आदळता त्रिशूळ धरणी । कंपित झाली शेषाची फणी ।
गल्लत झाली त्रिभुवनी । धरणीकंपे ।।४०।।
आल्लख नाम पुकारिले । मायेने तयाते देखिले ।
विरोध नाठवे ऐसे झाले । तीज काही ।।४१।।
विव्हळ अत्यंत झाली माई । सिद्ध तीस म्हणाले पाही ।
त्वरे भिक्षा घेवोनी येई । माये आता ।।४२।।
दोनी करी विष घेऊन । माया निघाली असे जाण ।
रेवणसिद्धा पहाता तल्लीन । झाली असे ।।४३।।
नवरत्न अलंकार । अंगी ल्याली जी अपार ।
धावोनी आले सुरवर । चमत्कार पहावया ।।४४।।
मायेसी सिद्ध बोलिले जाण । तुझी भिक्षा लवकरी आण ।
माया सवेची सावध होऊन । वोगरीभरी विष आणी ।।४५।।
जव माया विष आणाया जाये । तव ते स्वयेची शिवलिंगार्पण होये ।
चमत्कार देखिलाहे । सुरवरी ।।४६।।
माई विष आणिता आणिता थकली । सर्व थिल्लरे आटली ।
तव माया पस्तावली । हरली पणा ।।४७।।
माया सिद्धाते आली शरण । विनंती करी त्यासी येऊन ।
काय इच्छा आहे जाण । आपुलिये ।।४८।।
नव कोटी सिद्ध बंदीपासुनी । सोडवी ऐसे आज्ञापोनी ।
सर्व सिद्धा मुक्त करोनी । जयजयकारिला शिवघोष ।।४९।।



भक्तिमार्ग उजळिला । ज्ञानदीप पेटविला ।
काय वानू सिद्धलीला । साक्षात्कार ।।५०।।
रेणागिरि निवांत स्थान । होते तेधवा निर्जन ।
तेथ करिती अमूप साधन । राजयोग ।।५१।।
जया नाही अन्न तहान । नाही जया वारा ऊन ।
वस्त्र धरित्री पांघरूण । आकाशाचे ।।५२।।
ज्यांचा आकाशमार्गी संचार । करावया जनांचा उद्धार ।
फिरले भरतखंड समग्र । तत्कालिक ।।५३।।
उत्तर दिशेसी केला प्रचार । दाविला भगवत् साक्षात्कार ।
सामर्थ्य अघटित अपार । अतर्क्य ज्यांचे ।।५४।।
रेणागिरीसी केली वसती । जे महाविख्यात सिद्धपंथी ।
ज्यांचे अंगी अपूर्व शांती । बोलता नये ।।५५।।
रेवणसिद्ध करस्थळापासून । श्रीमरुळसिद्ध उदेले जाण ।
देऊनी अनुग्रहप्रसाद पूर्ण । केले आपणापरी त्यासी ।।५६।।
जगदोद्धारा त्याते ठेविले । देहे पंचभूती विराले ।
शिवस्वरूप होऊनी ठेले । शिवघोषे ।।५७।।
त्रेतायुगी मरुळसिद्धांनी । परमार्थ मार्ग वाढवुनी ।
केली अघटित करणी । गुरुकृपे ।।५८।।
श्रीरेवणसिद्धचरित्र कथन । गुरुकृपेचे हे सुमन ।
श्रीरेवणसिद्धपदी जाण । सुमने समर्पी *दासराम* ।।५९।।

***

## श्रीरेवणसिद्ध (२)

श्रीगणेशाय नमः ।।
आद्य सद्गुरू रेणाई । लीन झालो तव पायी ।
अल्पमती तव कृपे काही । करीन सेवा ।।१।।
आपण स्वयेची ब्रह्म झाला । त्रैलोक्यात भरोनी उरला ।
देही असता विदेही झाला । नामघोषे ।।२।।
रेणागिरी क्षेत्रस्थान । अद्यापि पुण्यपुरुषा दर्शन ।
देऊनी करिती निर्विघ्न । सहजपणे ।।३।।
धन्य हरिभक्त जयरामपंत । केले अनुष्ठान पंढरी क्षेत्रात ।
मिळावया परमार्थ । गुह्य भाग ।।४।।
तपश्चर्या झालियाहे । पंढरीनाथ प्रगटले पाहे ।
तयाते आज्ञा केली हे । रेणागिरी जावया ।।५।।
रेणागिरी अनुष्ठान । जहालिया बहु यत्ने जाण ।
प्रगटले भगवान । रेवणसिद्ध ।।६।।
आजानुबाहू भव्य मूर्ती । दिगंतरी गाजे कीर्ती ।
सुवास दरवळे निश्चिती । आसमंतात ।।७।।
तेजोवलय पसरले । लोक देखोनी दिङ्मूढ झाले ।
प्रभू जयरामा बोलिले । काय इच्छा ।।८।।
जयरामपंत तेधवा । बोलिले परमार्थ मिळावा ।
कृष्णदासाकडे जावा । आज्ञा झाली ।।९।।
संत शांतसिद्धांचे शिष्य । असती परम कृष्णदास ।
तिकडे जावोनी चरणास । लागले की ।।१०।।
कृष्णदासे दिधली खूण । पाठविले काय रेवोबाने ।
काय त्यांचे पायी उणे । होते नकळे ।।११।।



तव भक्त जयरामपंत । बहुत झाले आश्चर्यचकित ।
करोनी साष्टांग प्रणिपात । बोलिले कृपा करावी ।।१२।।
धन्य धन्य जयरामपंत । तयांचे थोर पूर्व सुकृत ।
मिळालासे परमार्थ । गुरुमुखे ।।१३।।
कृष्णदास जयरामस्वामी विख्यात । झाले महा भगवद्भक्त ।
जयासी अंकित समर्थ । स्वामी झाले ।।१४।।
रेवणसिद्ध नाहीत गेले । वस्तुरूप होऊनी ठेले ।
रेणागिरी वास्तव्य केले । भक्तकाजा ।।१५।।
श्रीहनुमंतराया दर्शन दिले । सेवा पाहोनी संतोषले ।
सिद्धस्वरूप भक्त केले । आपणापरी ।।१६।।
धन्य संतराज सद्गुरू हनुमंत । प्रपंची पूर्ण केला परमार्थ ।
कीर्तनी रेवणसिद्ध समर्थ । प्रगटले ।।१७।।
तेज दाटले अपार । हास्यमुखे अवलोकिले साचार ।
कृपादृष्टीचा साक्षात्कार । मुमुक्षू जना दाविला ।।१८।।
साधनाची अघटित करणी । राहिलो त्यांचा पायीक होऊनी ।
रामरूप ठेले होऊनी । एकमेव ।।१९।।
गुरु आज्ञे छत्तीस वर्षे । कीर्तनी रंगले अमृतरसे ।
गुरु रामाचे लागले पिसे । धन्य धन्य ।।२०।।
धन्य धन्य श्रीहनुमंत । अवतार सद्गुरू समर्थ ।
ज्यांची वृत्ती अति शांत । साधनबळे ।।२१।।
कचेरीसी जात असता । कोणी शेणखळा ओतिला माथा ।
परी शांतची राहिले तत्त्वता । सिद्ध पुरुष ।।२२।।
कचेरीसी होते निघाले । माडीवरून शेणगोळे फेकिले ।
ऐसे पाच सहा दिवस घडले । परी शांतची राहिले मानसी ।।२३।।
कोणी विषप्रयोग केला । परी होणार काय सिद्धाला ।
गुरुकृपे उतार पडला । धन्य धन्य ।।२४।।

अंगी असोनी अधिकार । नाही राग धरिला कुणावर ।
दुष्ट शरण आले सत्वर । शांत पुरुषा ।।२५।।
वकिली करोनी मेळविले धन । गुरुचरणी केले सर्वस्वार्पण ।
शिवस्वरूप करिता कीर्तन । प्रगट केले ।।२६।।
बहुत केला परोपकार । राखिले बहुतांचे अंतर ।
परमार्थ भाग्य निरंतर । मेळविले ।।२७।।
वाचीत असता रामायण । प्रगट होती हनुमान ।
रेवणसिद्धे वरदान । पूर्ण दिले ।।२८।।
वामनरावा दर्शन दिले । बैरागीरूपाने उभे ठाकले ।
भिक्षा घेवोनी अदृश्य झाले । रेवणसिद्ध ।।२९।।
केवढा दाविला चमत्कार । कलियुगीही साचार ।
सामर्थ्याचा महासागर । सिद्धराणा ।।३०।।
चौऱ्यांशी सिद्धा मुगुटमणी । गाईली कीर्ती शंकरानी ।
ज्यांचे नाम ध्याता मनी । ब्रह्म डोले ।।३१।।
रेवणप्रभूंचे चरण । हृदय ठेविले कोरून ।
मस्तकी पूर्ण अभय वचन । लाधले की ।।३२।।
श्रीरेवणसिद्ध चरित्र कथन । गुरुकृपेचे हे सुमन ।
श्रीरेवणसिद्धचरणी अर्पण । सप्रेमे करी *दासराम* ।।३३।।

***

## श्रीमरुळसिद्ध

श्रीगणेशाय नमः ।।
धन्य रेवणसिद्ध सद्गुरु परम । जया स्तविती आगमनिगम ।
बिंदुरूपे अविनाश ब्रह्म । व्यापिले देही ।।१।।
प्रभूंचे शिष्य मरुळसिद्ध । आदिनाथ अनादि सिद्ध ।
ज्यांनी तोडिले भवबंध । मायापाश ।।२।।
मायेसी ज्यांनी झुगारिले । वनांतरी बहू साधन केले ।
साधनरूप होऊनि ठेले । शिवचरणी ।।३।।
शिवरूप काया झाली । रेवणसिद्ध माऊली लाधली ।
कैसी प्रचीती दाविली । रोकडी जना ।।४।।
करवीर क्षेत्री मरुळसिद्ध । स्नाना पातले प्रसिद्ध ।
मुक्त कराया जड बद्ध । अवतार घेतला ।।५।।
करवीरक्षेत्री भिक्षेसी आले । मायेचे द्वारी उभे ठाकले ।
भव्य दैदीप्यमान भले । शोभले की ।।६।।
नवल दाखवाया करणी । तेथे आले सिद्ध मुनी ।
आल्लख नाम पुकारूनी । स्थिर झाले ।।७।।
माया अंतरी गडबडली । परी पापबुद्धी उद्भवली ।
द्वारी विष घेवोनी आली । वोगरी भरोनी ।।८।।
विष प्राशिलिया सिद्ध मरेल । न प्राशिलिया बंदीत राहील ।
आणि सिद्ध भ्रष्ट होईल । मम संगे ।।९।।
ऐसा विचार मनी करोनी । अविचारे पुढे होवोनी ।
हे प्राशन करा ऐसे वदनी । वदली की ।।१०।।
पाहू सामर्थ्य तुमचे । सिद्धपण नाही फुकाचे ।
सिद्ध म्हणविता काय वेचे । फुकाफुकी ।।११।।

ऐसे बोलली माया उत्तर । जनी तिचाची अधिकार ।
लोक झाले निरुत्तर । स्तब्ध चित्ते ।।१२।।
लोक मनी संतापले । परी त्यांचे धाडस न चले ।
मरुळसिद्धे स्मरण केले । रेवणप्रभूंचे ।।१३।।
जयांचे मन अति शांत । शिवनाम ज्यांचे मुखात ।
लोक पहाती प्रचीत । काय होते ।।१४।।
सिद्ध सामर्थ्य परमेशाचे । तेथे काय चाले मायेचे ।
मनी येता अर्ध क्षणाचे । काम नाही ।।१५।।
ऐसी दावाया स्थिति अद्भुत । सिद्धे विष घेतले हातात ।
त्याचे जहाले अमृत । आश्चर्य हे ।।१६।।
सर्व जनांचे समक्ष । प्राशन करोनी टाकिले विष ।
सुरवरे देखिले प्रत्यक्ष । आनंद झाला ।।१७।।
देहीच जे विदेही झाले । ब्रह्मस्वरूप होऊनी ठेले ।
एकमेवाद्वितीय उरले । जये ठायी ।।१८।।
त्रिपुटीचा झाला निरास । दाटला अद्वैत प्रकाश ।
एके ठायी सर्व ग्रास । सहज जहाला ।।१९।।
माया पावली परम खेद । ऐसा नाही देखिला सिद्ध ।
मनी बोलिली हृद्गद । आनंद झाला ।।२०।।
ऐशा सत्पुरुषाचे धरावे पाय । तेणे आपुले सार्थक होय ।
ऐसे म्हणोनी गुरुमाय । नमिली तिने ।।२१।।
परी तेथे न रहाता एक क्षणास । सिद्धे गर्जिला शिवघोष ।
आकाशमार्गे मूळ पीठास । येवोनी ठेले ।।२२।।
सद्गुरूसी सर्व निवेदिले । काय काय वर्तमान झाले ।
रेवणप्रभू आनंदले । मनामाजी ।।२३।।
पाहोनी शिष्याचे सामर्थ्यास । सद्गुरुमनी जहाला हर्ष ।
सुरवरांनी पुष्पवृष्टीस । केले तेव्हा ।।२४।।
पुष्पांचा झाला खच फार । क्षेत्र रेणागिरीवर ।
प्रसन्न झाले गुरुवर । तये ठायी ।।२५।।



शिष्याने आपणापरी केले । गुरु शिष्य एक झाले ।
अद्वैत साम्राज्य स्थापिले । चोहीकडे ।।२६।।
मरुळसिद्धे पूर्व दक्षिण । भागी परमार्थ वाढविला पूर्ण ।
लाखो लोक घेती दर्शन । धन्य धन्य ।।२७।।
मरुळसिद्धकरस्थळातूनी । प्रगटले श्रीकाडसिद्ध मुनी ।
मरुळसिद्धांचे पासोनी । कृपाप्रसाद जहाला ।।२८।।
प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार । धन्य सद्गुरू श्रीकाडसिद्धेश्वर ।
तयाते आज्ञापिले परमार्थ विस्तार । करावया ।।२९।।
तैसेची सिद्ध एकोमय । गुरुबंधु काडसिद्धराय ।
श्रीमरुळसिद्ध सद्गुरूराय । लाधले ज्यां ।।३०।।
जगा दावाया तरणोपाय । अवतरले द्वापारी एकोमय ।
वश केली शिवमाय । योगबले ।।३१।।
जगा सांगावे आत्मज्ञान । बहुता दिले समाधान ।
मरुळसिद्धकृपा पूर्ण । ज्यांचे वरी ।।३२।।
रिद्धी सिद्धी आड येता । म्हणती सिद्धाते सर्वथा ।
क्षण एक विसावा आता । घ्यावा सुखे ।।३३।।
आम्ही होऊ तुमच्या कामारी । करू पादसेवादी चाकरी ।
मनोरथ पूर्ण तरी । करा आजी ।।३४।।
रिद्धी सिद्धी मारूनी लाथा । सिद्ध चालले निज पंथा ।
म्हणती येथे न थांबता । आम्हा गेले पाहिजे ।।३५।।
तुम्हापाशी मागोनी काय । आम्हा वृथाची शीण होय ।
ऐसे म्हणोनी ॐ नमः शिवाय । घोष केला ।।३६।।
जय जय आल्लख निरंजन । आनंदे जयजयकार करून ।
योगबले निरंजन । होऊनी ठेले ।।३७।।
धन्य धन्य साक्षात्कारी । सिद्ध पुरुष अवतारी ।
योगिराज दिगंतरी । ख्याती झाली ।।३८।।
मरुळसिद्ध आज्ञे जगा । लावियेले भक्तिमार्गा ।
ज्यांचे पद पवित्र गंगा । धन्य धन्य एकोमय ।।३९।।

पश्चिम दिशेसी पीठावरी । विराजित झाले श्रीएकोमय निर्धारी ।
सेवा केली आज्ञेपरी । मरुळप्रभूंची ।।४०।।
एकोमय सिद्धांचे शिष्य । पंडिताराध्येय सर्वेश ।
साधोनिया एकांतवास । साधन केले ।।४१।।
एकोमये कृपेसी केले । आपणापरी करोनी ठेविले ।
परमार्थ विस्तारा आज्ञापिले । कलियुगी ।।४२।।
साक्षात् परमेश्वर अवतार । श्रीपंडिताराध्येय सिद्ध थोर ।
उत्तरदिशेसी केला प्रचार । राजयोग ।।४३।।
द्वैतमताचे करोनी खंडण । पाखंड धुळीस मिळवून ।
अद्वैतमत प्रस्थापन । केले असे ।।४४।।
पंडिताराध्येय समर्थ । वाढविला परमार्थ ।
शिवस्वरूप यथार्थ । दिसती भक्ता ।।४५।।
धन्य सिद्ध पंडिताराध्येय । धन्य सिद्ध एकोमय ।
गुरुशिष्य एकमय । होऊनी ठेले ।।४६।।
धन्य श्रीमरुळसिद्ध माऊली । जगत्कार्या धावोनी आली ।
सर्व कार्यपूर्णता केली । गुरुकृपे ।।४७।।
पंच तत्त्वे पाचात मिळाली । शिवनामी वृत्ति रंगली ।
शिवरूप काया झाली । धन्य धन्य ।।४८।।
रेणागिरीसी वसती केली । बरवी मूर्ती हे शोभली ।
श्रीगरुचरणी घेतली । अखंड विश्रांती ।।४९।।
पुण्यपावना दर्शन होय । जगदाकार गुरुमाय ।
पुण्यरूप केला ठाय । गुलबर्गा ।।५०।।
श्रीमरुळसिद्ध चरित्र कथन । गुरुकृपेचे हे सुमन ।
श्रीमरुळसिद्धपदी अर्पण । श्रद्धेने करी *दासराम* ।।५१।।

***

## (३)

## श्रीकाडसिद्ध

श्रीगणेशाय नमः ।।
जय जयाजी रेवणसिद्धा । शंभुस्वरूप प्रसिद्धा ।
बुद्धी देई मज अबुद्धा । वर्णावया गुणकीर्ती ।।१।।
धन्य सद्गुरू मरुळसिद्ध । धन्य शिष्य श्रीकाडसिद्ध ।
गुरुलिंगजंगमा ब्रह्मानंद । दावियेला ।।२।।
काडसिद्ध महान योगी । शिवस्वरूप झाले सर्वांगी ।
आत्मज्ञान जेथे पूर्णांगी । वास करी ।।३।।
साधन केले रात्रंदिस । पाहोनी निर्जन प्रदेशास ।
बैसावे तेथे साधनास । एकांतवासी ।।४।।
एकांतवासी बहू सुख । नको मायेचा संपर्क ।
अरण्यात साधिला जगन्नायक । विचारवंते ।।५।।
जव ते साधन करिती । व्याघ्र गाई एकत्र होती ।
फणिवर आनंदे डोलती । सुवास दरवळे तेधवा ।।६।।
आत्मरूपाचा पडे प्रकाश । सुरवर पहाती आनंदास ।
पार नाही त्या भाग्यास । वर्णवेना ।।७।।
डोंगराच्या कडी कपाटी । बोलाव्या साधनाच्या गोष्टी ।
भक्तजना जगजेठी । दावाया प्रगट करावा ।।८।।
राहिले कित्येक दिवस । येवोनिया करवीर क्षेत्रास ।
सिद्धगिरी केला वास । गुहेमाजी ।।९।।
असुरांचा केला नाश । दाविले सामर्थ्य शक्तीस ।
जगामध्ये हा सर्वेश । भरला कसा ।।१०।।

सांगावे जगा आत्मज्ञान । नास्तिकाने केला प्रश्न ।
दगडात आहे काय भगवान । म्हणोनिया ।।११।।
दगडात असेल चैतन्य । तरी दगड चालो दे आपण ।
तेव्हा बोलिले करोनी स्मरण । काडसिद्ध ।।१२।।
रेवणसिद्धांचे करिता स्मरण । दगड चालू लागला आपण ।
नास्तिक जन आले शरण । निरहंकारे ।।१३।।
माया जहाली शरण । पूर्वी श्रीरेवणसिद्धाते लागून ।
ऐसे हृद्गद जाणिले जाण । काडसिद्धे ।।१४।।
मायेसी बोधुनी आत्मज्ञान । काडसिद्धे अनुग्रह केला येता शरण ।
तिचे घेवोनी बलिदान । किनरी केली ।।१५।।
मायेची केली किनरी । त्यांचा अधिकार भारी ।
स्वरूपाचे साक्षात्कारी । अद्वैत जे ते ।।१६।।
शिवनाम गात असता । किनरी वाजवावी सर्वथा ।
काय कैसे आहे तत्त्वता । मायेलागी विचारले ।।१७।।
तव माया काय बोले । दूर होते ते जवळी आले ।
तुमचे छातीवरी नाचू लागले । काय सांगो ।।१८।।
काडसिद्धे किनरी फेकिली । मायेवरी मात केली ।
जगता वाट चोखाळिली । राजयोगाची ।।१९।।
काडसिद्धे पदे केली । सुरस अनुभवाची फळे मांडिली ।
ब्रह्मतन्मयता प्राप्त झाली । भाविकासी ।।२०।।
सुरवर आनंदले । धन्य धन्य म्हणीतले ।
भक्तजनासी मुक्त केले । नाना परी ।।२१।।
गुरुका बेटा सवाई । तैसेची घडले येथेही ।
केवढी दाविली नवलाई । जगालागी ।।२२।।
शिवस्वरूप काया झाली । सिद्धगिरी वसती केली ।
सिद्धभूमी पवित्र झाली । सिद्धयोगे ।।२३।।



सिद्धांचे श्रीगुरुलिंगजंगम शिष्य । तया केले आपणापरीस ।
कलियुगी जगदोद्धारास । आज्ञापिले ।।२४।।
काडसिद्ध भरले चराचरी । काय सांगू नवलपरी ।
धन्य भक्तकाज कैवारी । प्रगट होती ।।२५।।
देह पंचभूती विराला । शिवरूपी प्रभू नटला ।
भक्तकाजा उभा ठेला । सिद्धगिरी ।।२६।।
धन्य काडसिद्ध स्थान । होय नवनाथ आगमन ।
लागती चरणा संतजन । भक्तराज ।।२७।।
पुण्यपुरुषा होय दर्शन । ऐसे येथीचे महिमान ।
काडसिद्ध धन्य धन्य । होऊनी ठेले ।।२८।।
श्रीकाडसिद्ध चरित्रकथन । गुरुकृपेचे सुमन ।
श्रीकाडसिद्धपादारविंदी जाण । अर्पी *दासराम* मूढमती ।।२९।।

***

## (४)

## प.पू.श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर

श्रीगणेशाय नमः ।।
धन्य धन्य सद्गुरू रेवणा । तू मूळ पीठीचा राणा ।
वदवी आता गुणगाना । माझे मुखे ।।१।।
काडसिद्धे सच्छिष्यावरी । कलियुगामाझारी ।
अनुग्रह केला निर्धारी । श्रीगुरुलिंगजंगमा ।।२।।
धन्य सद्गुरु गुरुलिंगजंगम । नारायणराव तयांचे नाम ।
वसतीस्थान निंबरगी ग्राम । धन्य धन्य ।।३।।
तुकाराम अवतार । ख्याती दिगंतरी थोर ।
काय चरित्र पामर । वर्णेल हा ।।४।।
भगवद्भक्ती जेथे अपार । धन्य भीमाण्णा मिसलकर ।
त्यांचे पोटी देवावतार । प्रगट झाला ।।५।।
गुरुलिंगजंगमांची आई । धन्य धन्य अंबाबाई ।
महान पतिव्रता पाही । साक्षात्कारी ।।६।।
पंच पंच उषःकालास । ज्ञानरवी भूमंडलास ।
बालयोगी आला जन्मास । हे देखोनी वाटे आश्चर्य ।।७।।
लिंगायत धर्मास अनुसरून । पाचवीस लिंगधारण ।
काडसिद्धे केले जाण । जंगमवेष धरोनिया ।।८।।
धर्म रक्षावयासाठी । अवतार घेतला सृष्टी ।
जयाते वश जगजेठी । असे झाला ।।९।।
अंतरी देवाचे भक्तिप्रेम । अंगी विरक्ती परम ।
मुखे गात शिवनाम । सर्व काळ ।।१०।।



पंढरपुर क्षेत्री गेले । मायबापा ओळखिले ।
तयालागी आळविले । रात्रदिन ।।११।।
पाहोनिया भोळा भाव । प्रगट झाला पंढरीराव ।
निर्धार देखोनी अपूर्व । अंतरीचा ।।१२।।
देखोनी भक्तासी दृष्टी । अति प्रेमे मारिली मिठी ।
बोलिला काही गुजगोष्टी । साधुसंगे ।।१३।।
आता सिद्धगिरी जाई । जगद्-वंद्य होशील पाही ।
चिंता नको करू काही । नारायणा ।।१४।।
स्वये बोले जगज्जीवन । धर्म रक्षाया कारण ।
अवतार घेतला आपण । नारायणा ।।१५।।
गुरुलिंगजंगमांनी । आज्ञा होता ततक्षणी ।
पांडुरंगाते वंदोनी । घेतली प्रचीत ।।१६।।
सिद्धगिरीते पातले । तो काडसिद्ध प्रगटले ।
गुहेमाजी घेवोनी नेले । सद्भक्तासी ।।१७।।
शिळेतूनी आत गेले । तेथे पूर्ण उपदेशिले ।
आपणापरी करोनी ठेविले । निजभक्ता ।।१८।।
सिद्धकृपा जहालियावरी । तेथोनी निघाली स्वारी ।
नाम गात निंबरगीमाझारी । पातलीसे ।।१९।।
तेथे साधनाचा विसर पडला । गुरु जंगमरूपे आला ।
सच्छिष्याघरी तुष्ट झाला । प्रेमळ भोजने दोनदा ।।२०।।
गुरुलिंगजंगमा जाण । पूर्ण दिले आशिर्वचन ।
सांगितलेले साधन । करी ऐसे बोलिले ।।२१।।
काडसिद्ध गुप्त झाले । त्यांचे वचनापरी भले ।
छत्तीस वर्षे साधन केले । संसारी परमार्थ साधिला ।।२२।।
मेंढरे शेतात चराया सोडून । प्रभुचरणी अनन्य होऊन ।
सतत करावे साधन । काय सांगो ।।२३।।

प्रभुचरणी सर्वस्व अर्पिले । रेवणसिद्धे वरदान दिले ।
मोठे निधान जोडले । सिद्धराजे ।।२४।।
गुरुलिंगजंगमा पांडुरंगांनी । गळ्यात हार घातला प्रगटोनी ।
पंढरी क्षेत्री दर्शनालागूनी । गेले जेव्हा सिद्धराय ।।२५।।
देवे पळकाट्याचे भारे आणिले । भक्तकाज कौतुक केले ।
धन्य धन्य धन्य भले । गुरुभक्त ।।२६।।
आता करी जगदोद्धार । आज्ञा बोलिले श्रीकाडसिद्धेश्वर ।
गुरुलिंगजंगम नाम साचार । प्रगट झाले ।।२७।।
धन्य श्रीगुरुलिंगजंगमा । तुझा देवादिकाही न कळे महिमा ।
दया शांती आणि क्षमा । पूर्ण अंगी ।।२८।।
एका बाईने तीव्र निखारे । वक्षस्थळी टाकिले सारे ।
परी शांतची राहिले बा रे । श्रीगुरुलिंगजंगम ।।२९।।
अग्नी जहाला शीतळ । सारथी जहाला गोपाळ ।
जिव्हा रंगली रसाळ । शिवनामे ।।३०।।
पांडुरंग वाटाड्या झाला । काय वर्णू गुरुलिंगजंगम लीला ।
त्यांचे हाती देव जेविला । प्रगटला चंद्रमौळी ।।३१।।
देव बोले गुरुलिंगजंगमासी । जैसा बोले नामदेवासी ।
मृत्युमुखातूनी रामचंद्रासी । सोडविले ।।३२।।
काडसिद्ध गुरूपरी । थोर कीर्ती जहाली खरी ।
नामस्मरणी जिव्हा बरी । रंगोनी गेली ।।३३।।
मुखात कैसा लाल प्रकाश । पडतो करिता साधनास ।
नामी रंगणेचे वर्म अक्कास । दाखविले ।।३४।।
धन्य धन्य लक्ष्मीअक्का । आत्मयाचा प्रकाश देखा ।
दाविला सद्गुरुराये निका । साक्षात्कार ।।३५।।
प्रभु शंकराचे हातोनी । जेऊ घातले श्रीलक्ष्मीअक्कालागोनी ।
अवतरली धन्य जनी । मुक्ताबाई ।।३६।।



रघुनाथप्रिया पुण्याची प्रचीती । दावोनी दाविली आत्मस्थिती ।
काय वर्णावी महती । भगवंताची ।।३७।।
आजानुबाहू ब्रह्मचारी । वीतरागी साक्षात्कारी ।
गुरुकृपा संपादोनी खरी । देव झाले ।।३८।।
बहुत केले साधनासी । गुरु आज्ञे निश्चयेसी ।
समाधान दिधले जगासी । साधुराजे ।।३९।।
निंबरगीसी डोंगराळ घाटामाझारी । कडा तुटलेला भयंकर निर्धारी ।
तेथे दोन पुरुष खोलीवरी । साधनासी करावे ।।४०।।
टिचेयेवढ्या जागेवरी । साधन करावे अहोरात्री ।
बैसोनिया चवड्यावरी । काय सांगो ।।४१।।
पशू श्वापदे जमती भारी । भीती नसेची निर्धारी ।
सिद्ध पुरुष अधिकारी । महात्यागी ।।४२।।
वडिल असोनी लाखोपती । नाही धरिली आशा चित्ती ।
दिगंतरी झाली कीर्ती । वाचासिद्ध ।।४३।।
अद्वय सुखासी जे गेले । पशूंचे द्वैतपण हरले ।
साधुमहाराजांचे चरणी लागले । व्याघ्रादिक ।।४४।।
ढाण्या वाघ होता भला । जो अत्यंत खळबळलेला ।
क्षुधित धावोनिया आला । साधूंचे पाशी ।।४५।।
साधुमहाराज बैसलेले । अर्धोन्मीलित नेत्र मिटले ।
अद्वय ब्रह्मची होऊनी ठेले । रघुनाथप्रिय ।।४६।।
वाघ डुरकावित आला । परी मोठा चमत्कार झाला ।
साधूते पहाता तटस्थ झाला । नम्र होऊनी ।।४७।।
दृष्टीसी दृष्टी भिडल्यावरी । चमत्कार झाला भारी ।
मस्तक ठेविले चरणावरी । महाराजांच्या ।।४८।।
अद्वैतसिद्धी जहालियावरी । काय ते न करतील अधिकारी ।
म्हणोनिया भिकारी । झालो त्यांचा ।।४९।।

वाघासारख्या पशूचे । झाले सार्थक ते साचे ।
जाळे तुटले जन्ममृत्यूचे । एकाएकी ।।५०।।
वाघाचे मस्तकी ठेविता हस्त । डोलू लागला ब्रह्मानंदात ।
तया पावली आत्मस्थित । धन्य धन्य ।।५१।।
गुरुलिंगजंगमे कृपा केली । अघटित करणी जगा दाविली ।
सर्व निरवानिरवी केली । मूळधामी जाण्यासी ।।५१-अ।।
भाऊसाहेब उमदीकर । महान् अधिकारी सच्छिष्य थोर ।
मुमुक्षू जना दाविला आचार । गुरु आज्ञे ।।५२।।
निर्गुण बालपणी वाव । मानिती परी शुद्ध भाव ।
पूजीत होते सगुण देव । मनोभावे ।।५३।।
रघुनाथप्रिय साधु देव । त्यानी दाविला निर्गुण अनुभव ।
मस्तकी हस्त ठेऊनी अपूर्व । नवलाव केला ।।५४।।
लोक बहुत छळती । वैकुंठपंथा लागले म्हणती ।
गुरूने चेटूक केले वदती । दुःशब्दे ।।५५।।
परी शांतची होते जे मानसी । समाधान बाणले निश्चयेसी ।
निंदा स्तुती न घेती मानसी । राजयोगी ।।५६।।
अरण्यात साधन करिती । भुजंग सर्पादी निकट खेळती ।
कित्येके अंगावरी चढती । काय सांगो ।।५७।।
परी भीती नाही मनी । काळा लाथाडिले ज्यानी ।
सामर्थ्य जाणो शके न कोणी । अघटित ।।५८।।
महानागाने करावी साऊली । प्रखर उन्हाचिये वेळी ।
ऐसी गोष्ट कित्येके देखिली । साधनकाली ।।५९।।
सर्प वृश्चिक अंगी खेळती । परी न ढळे ज्यांची वृत्ती ।
काय वर्णावी भगवद्भक्ती । योगसिद्धी ।।६०।।
एकदा तरी ऐसे झाले । जव ते साधना बैसले ।
भोंग्याने मांडीते पोखरिले । काय सांगो ।।६१।।



परी न सोडिले साधन । नाही हालविले आसन ।
रक्तबंबाळ झाली जाण । मांडी जरी ।।६२।।
ऐसी ज्यांची झाली तयारी । महापुरुष साक्षात्कारी ।
परमार्थ विस्तार केला भारी । भूतली या ।।६३।।
श्रीगुरुलिंगजंगमांचे देवालय । हिंचगेरीसी बांधिले पाहे ।
नित्य नेमे चालविलीहे । उपासना ।।६४।।
रामचंद्रावमहाराज गुरुबंधू । सद्गुरू रघुनाथप्रियसाधु ।
एकरूपे परमानंदू । होवोनी ठेले ।।६५।।
साधुमहाराजांचे रामचंद्र सच्छिष्य । तया केले आपणापरीस ।
गुरुआज्ञे करोनी कृपेस । धन्य धन्य ।।६६।।
गुरुभगिनी लक्ष्मी थोर । काशीहोनी गंगौघ अपार ।
ध्यान करिता सत्वर । चिमड क्षेत्री प्रगटविला ।।६७।।
गुप्त गंगा सद्गुरुस्थानी । कैसी आहे ते दाविले जाणी ।
शुभ्रोदक विहिरीमधोनी । वाहू लागे ।।६८।।
सर्वाते घडविले मज्जन । केले संदेह निरसन ।
काशी चिमड नाही दोन । ऐसे दाविले ।।६९।।
चिंचेचिया बरोबरी । नुसती खावोनी भाकरी ।
ज्यांनी चार तपे निर्धारी । साधन केले ।।७०।।
रामचंद्रांची निष्ठा थोर । ऐशा लक्ष्मीअक्कांचे वर ।
गुरुभक्त धुरंधर । होवोनी ठेले ।।७१।।
सद्गुरूते भिवोनी असत । मर्यादा राखोनी वागत ।
धन्य धन्य निष्ठावंत । सिद्ध पुरुष ।।७२।।
श्रीएकनाथांचा अवतार । धन्य सद्गुरु रामचंद्र ।
गुरुलिंगजंगम सद्गुरूवर । बोलिले प्रेमे ।।७३।।
महाविष्णू चक्रपाणी । रामचंद्रमहाराज मूर्ती नयनी ।
सच्छिष्य हनुमंतरायालागोनी । प्रगट दिसली ।।७४।।

पूर्वावताराची पटली खूण । जे स्वयेची झाले भगवान ।
शरण आले नास्तिक जन । साक्षात्कारे ।।७५।।
नोकरीही लाथाडिली । गुरुसेवे तत्परता भली ।
तीन तपे साधनी झिजविली । काया ज्यांनी ।।७६।।
साधुमहाराजे देह ठेविल्यावरी । त्यांचे देवालय चिमडक्षेत्री ।
गुरुलिंगजंगमांचे आज्ञेपरी । श्रीरामराये बांधिले ।।७७।।
गुरुलिंगजंगम वोळले । रामराया परमार्थ पुंजीते दिधले ।
पूर्ण आशिर्वाद बोलिले । सिद्धराज ।।७८।।
रामभाऊमहाराज भले । श्रीशंकराते प्रगट केले ।
तेजोस्वरूप दाखविले । हरिभक्ता ।।७९।।
गुरुलिंगजंगमे कृपा केली । अघटित करणी जगा दाविली ।
सर्व निरवानिरवी केली । मूळधामी जाण्यासी ।।८०।।
शिवस्मरणे शिवरूप । होऊनी विझला ज्ञानदीप ।
मागे परंपरेचा ठेऊनी अधिप । रामचंद्र ।।८१।।
काडसिद्धप्रभूंची लीला । वर्णवेना बोबड बोला ।
जगी व्यापोनी उरला । सिद्धगिरी ।।८२।।
अजूनी होतसे दर्शन । जैसे श्रीगुरुलिंगजंगमा झाले जाण ।
जो कोणी असेल पुण्यवान । त्यासी दर्शन होतसे ।।८३।।
सिद्धगिरी कडक स्थान । जावो न देती तेथे ओळ्याने ।
एक गाभाऱ्यात गेलियाने । वेडा झाला ।।८४।।
साक्षात्कार होती अजूनी । काय वर्णावी प्रभूची करणी ।
एकदा काही मुलानी । अनुभव घेतला ।।८५।।
निघाली काडसिद्ध दर्शना । वाटेत रात्रीचा समय जाणा ।
काहीच दिसेना कुणा । ऐसे झाले ।।८६।।
मुले लागली रडाया । दर्शन देई प्रभुराया ।
ना घर ना तव ठाया । गेलो आम्ही ।।८७।।



तो काडसिद्ध प्रगट झाले । तेज दाटोनिया गेले ।
पायात खडावा शोभले । स्वामींचिया ।।८८।।
हातात कमंडलू स्मरणी । जटाजूट शोभले मुनी ।
पहाता तयालागी सर्वानी । नमस्कारिले ।।८९।।
मुले बोलिली महाराज । तुम्हीच काडसिद्ध प्रभुराज ।
असावे ऐसा समज । मनी झाला ।।९०।।
देऊळाची वाट पाही । आम्हा सापडत नाही ।
म्हणोनी आम्ही सर्वही । उभे ठेलो ।।९१।।
हे पहा देऊळ आले । मार्ग दावोनी काडसिद्ध बोलिले ।
सर्वांसी देऊळी आणिले । निमिषमात्रे ।।९२।।
तेच क्षणी अदृश्य झाले । सर्वानी सर्वत्र पाहिले ।
परी नाही ते दिसले । सिद्ध पुरुष ।।९३।।
गोपालनाथे अनुष्ठान । करिता जहाले दर्शन ।
ऐसे आहे महिमान । सद्गुरूंचे ।।९४।।
जैसा जैसा ज्याचा भाव । तैसा त्यासी होय देव ।
ऐसा आहे येथीचा प्रभाव । संत जनहो ।।९५।।
काडसिद्धांचे कृपाकरे । मुप्पीनस्वामी शिवची बरे ।
नामघोष जयजयकारे । होऊनी ठेले ।।९६।।
काडसिद्धांचे प्रेम भारी । असे श्रीमुप्पीनस्वामीवरी ।
कीर्ती गाजे दिगंतरी । धन्य धन्य ।।९७।।
मीरासाहेबाची निष्ठा पाहून । तयाही दिले प्रभूने दर्शन ।
काडसिद्ध आशिर्वचन । बोलुनी गेले ।।९८।।
मीरासाहेबाते समाधान । आत्मसाक्षात्कार झाले पूर्ण ।
काय बोलिले वचन । प्रभूलागी ।।९९।।
तुझे उच्छिष्ट खाईन । तुझी सेवा करोनी राहीन ।
श्वानापरी राहीन पडोन । तुझे द्वारी ।।१००।।

जया दिले दत्तात्रेयानी दर्शन । ऐसे मीरासाहेब धन्य ।
दास होवोनी ठेले जाण । प्रभुघरचे ।।१०१।।
श्रीमहादेव सांगती पार्वतीला । श्रीरेवणसिद्ध चरित्रलीला ।
काय वर्णावा सोहळा । भक्तिप्रेमा ।।१०२।।
श्रीमरुळप्रभू काडसिद्ध चरित्र । तेही बोधिले साचार ।
धन्य स्कंद पुराण थोर । ग्रंथराज ।।१०३।।
धन्य धन्य सिद्धांतसारी । गाईली कीर्ती नानापरी ।
तेची कृपाप्रसादे निर्धारी । थोडक्यात वर्णिले ।।१०४।।
श्रीगुरुलिंगजंगम चरित्र । श्रीहनुमंतराये लिहिले समग्र ।
त्यांचे शेष उच्छिष्ट सार । प्रसादे गाईले संतहो ।।१०५।।
श्रीरेवणसिद्ध मरुळप्रभू काडसिद्ध पीठ । निरंजन दीप प्रकाशे चोखट ।
घेवोनी नामामृत निघोट । नमन करू साष्टांगे ।।१०६।।
धन्य धन्य श्रीकाडसिद्धेश्वर । प्रत्यक्ष जे परमेश्वर ।
परमार्थवृक्ष वाढला अपार । त्यांचे कृपे ।।१०७।।
काडसिद्धांनी बीज पेरिले । गुरुलिंगजंगमांनी वाढविले ।
हरिभक्तांनी फळ चाखिले । अमृताचे ।।१०८।।
धन्य निंबरगी क्षेत्र स्थान । होय मनाचे उन्मन ।
जेथे पूर्ण समाधान । लाभे भक्ता ।।१०९।।
गुरुशिष्यांचे धरोनी चरण । साष्टांग घालू लोटांगण ।
करू गुरुजनाते वंदन । क्षण एक ।।११०।।
श्रीगुरुलिंगजंगमचरित्रकथन । गुरुकृपेचे हे सुमन ।
श्रीगुरुलिंगजंगमपदी जाण । तनुमने अर्पी *दासराम* ।।१११।।

***

## (५)

## प.पू.श्रीभीमाण्णामहाराज निंबरगीकर

धन्य भीमाण्णा सद्गुरू । संतश्रेष्ठ सर्व थोरू ।
तया आदरे नमस्कारू । करू गाऊ चरित्र ।।१।।
जया विठ्ठल वोळला । ज्यांचे सवे जेवियेला ।
भोजनेची तुष्ट झाला । केले भोजन सत्यत्वे ।।२।।
देवे गळा हार घातिला । तुरकाट्याचा भारा वाहिला ।
एके समयी वाटाड्या झाला । भावा भुलला भगवान ।।३।।
नामरंगी रंगुनी गेले । काडसिद्ध सद्गुरू भले ।
संतसभेत शोभले । सरदार विठ्ठलाचे ।।४।।
ऐसे भगवान संत । नारायण सद्गुरुनाथ ।
भाऊसाहेबमहाराज समर्थ । पितृदेव लाभले ।।५।।
धन्य गुरुलिंगजंगम । ऐसे ज्यांचे प्रसिद्ध नाम ।
ज्यांचे पिताजी परम । ऐसे धन्य भीमाण्णा ।।६।।
बहु जन्माची पुण्याई । ऐसी जोडिली सद्गुरूमाई ।
सत्पुरुषांचे उदरी पाही । जन्म झाला म्हणोनी ।।७।।
पितृदेव ज्या वोळले । सद्गुरुराज धन्य भले ।
पूर्ण वरदान मिळाले । पूर्णानंदी मेळविले ।।८।।
घडता साधन अगाध । वागविता मनी बोध ।
चाखविला ब्रह्मानंद । गुरुलिंगजंगमांनी ।।९।।
अहो रघुनाथप्रिय । ब्रह्मचारी स्वामिराय ।
आजानुबाहू लोकप्रिय । सिद्धराय जे झाले ।।१०।।

भीमाण्णांचे मना आले । म्हणुनी समर्थ भेटी आले ।
मन पालटुनी टाकिले । वोळले त्या सच्छिष्या ।।११।।
साधनाची अघटित करणी । केली रघुनाथप्रियांनी ।
गुरुकृपा संपादोनी । परमार्थ वाढविला ।।१२।।
केले खडतर साधन । झाले स्वयंसिद्ध पूर्ण ।
गुरुआज्ञे बहुत जन । भक्तिमार्गा लाविले ।।१३।।
धन्य भीमाण्णामहाराज । देखती जे महातेज ।
सगुण स्वरूप सहज । अखंड नाचे ज्यापुढे ।।१४।।
भगवंते आलिंगिले । आपुलाची म्हणितले ।
कोडकौतुक पुरविले । हरपले तन मन ।।१५।।
कोणेपरी या वर्णावे । आनंदले सद्गुरुराव ।
सुख दुःख नव्हे । पूर्ण कृपा जहाली ।।१६।।
मानामान नाही मनी । बैराग्याची पूर्ण खाणी ।
परमात्मचिंतनी । आत्मरूपी रंगले ।।१७।।
गुरुलिंगजंगमांनी । आज्ञापिले त्यालागोनी ।
वाढवाया जनी । श्रेष्ठ ऐसा परमार्थ ।।१८।।
अंगी सामर्थ्य पूर्ण । चालुनी आला पुढे मान ।
परी नाही मन । त्यांचे गुंतले ते ठायी ।।१९।।
माझा नाही अधिकार । करीन सुखरूप संसार ।
ओझे नाही झेपणार । परमार्थ पिपाचे ।।२०।।
ऐसे विनयाचे उत्तर । पूर्ण असुनी अधिकार ।
महाराजांना नम्र । होऊनी उत्तर केलेसे ।।२१।।
नाही मानामान चित्ती । प्रपंचाची गुंतागुंती ।
काय महत्तम कीर्ती । असे त्यांची संतजनी ।।२२।।
रामभाऊमहाराज अधिकारी । गुरुकृपा त्यांचेवरी ।
बोलविले सत्वरी । निंबरगीसी तयांना ।।२३।।
परमार्थ राज्यधर । रामचंद्राते साचार ।
करिती सद्गुरुवर । गुरुलिंगजंगम ।।२४।।



नारळ घातिला पदरात । पूर्ण दिला परमार्थ ।
सकल वंशाप्रत । महाराजांनी तेधवा ।।२५।।
लक्ष्मीअक्का माऊली । परम मुक्ती अवतरली ।
तिचेसाठी केली । अघटित करणी ।।२६।।
अक्कालागी महाराजांनी । सांगितले बोलावोनी ।
भीमाण्णालागोनी । माझी आज्ञा सांगावी ।।२७।।
दाजीराया उपदेश । द्यावा बहुमोल सुरस ।
पुरा कराया अवशेष । पुनः जन्मा तो आला ।।२८।।
भजन पूजन साधुनी बळे । जिंकियेले कळिकाळ ।
अभंग म्हणोनी केवळ । देह ठेविला सज्जनहो ।।२९।।
धन्य निंबरगी पावन । क्षेत्र वैकुंठ भुवन ।
समाधीचे स्थान । धन्य महासिद्धाचे ।।३०।।
धन्य भीमाण्णा सद्गुरू । परम सिद्ध जगी थोरू ।
गुरुभक्तीचे आगरु । सर्वातोनी अलिप्त ।।३१।।
महाराजांचे आज्ञेवरूनी । केला आग्रह अक्कांनी ।
दाजीसाहेबालागोनी । उपदेशिले बरवे हो ।।३२।।
रामराये जगदोद्धार । करण्यालागी तीन वार ।
बोधले साचार । रामदास समर्था ।।३३।।
तेची येथे झाली परी । गुरु आज्ञा झाली भारी ।
पूर्ण असोनी अधिकारी । सेवामयी मन ज्यांचे ।।३४।।
रामभाऊमहाराजांचे पुत्र । दाजीसाहेब श्रेष्ठ थोर ।
त्यांचे पायावर । घातलेसे सत्यत्वे ।।३५।।
तयालागी उपदेशिले । गुरू आज्ञेसी पाळिले ।
येर कोणी नुपदेशिले । धन्य धन्य संत ते ।।३६।।
*दासराम* हा किंकर । गाई तयांचे चरित्र ।
जहाले पवित्र । देह मन त्यायोगे ।।३७।।

***

(६)

## प.पू.श्रीउद्धवरावजी यरगट्टीकरमहाराज

जयजयाजी श्रीउद्धवा । धन्य धन्य महानुभावा ।
वंद्य पुरुषा देवाधिदेवा । श्रीगुरुरावा तुज नमो ।।१।।
तुम्ही चिमडपंथी वरिष्ठ । संत सांप्रदायी श्रेष्ठ ।
श्रीगुरुपायी एकनिष्ठ । स्पष्ट स्पष्ट त्रिवाचा ।।२।।
बहुत संत जगती झाले । परी ते दृष्टीसी न च पडले ।
जाणतयासी भेटले । जाणते पुरुष ।।३।।
भुकेलिया अन्नची गवसे । तहानेलिया पाणीच दिसे ।
काही शोध शोधका भासे । दृष्टी -- ।।४।।
जे का चित्ती ठसावे पूर्ण । तैसेची लागे नेटके ध्यान ।
तेणेची परी होय मन । इच्छा परिपूर्ण ये रीती ।।५।।
जो का गोडीचे खाणार । तयासी देवची देणार ।
प्रयत्ने साध्य गवसणार । हातीचे हाती ।।६।।
जो का पूर्ण नादलुब्ध । त्याचे कानी पडसाद ।
जयालागी जैसा छंद । त्या आनंद तैसाची ।।७।।
मुंगी गुळाविण धावे । तियेलागी साखर पावे ।
तैसे तृषार्त मुमुक्षूसी दैवे । पावती सिद्ध ।।८।।
तयेपरी जयासी दर्शन । ते ते पावले समाधान ।
अनुभव घेती भक्तजन । सांप्रदायिक ।।९।।
जाणत्यासी समाधान । अनुभव ऐसा पूर्ण ।
जयालागी एषणा जाण । नसे कीर्तीची कदापि ।।१०।।



आपण व्हावे प्रकाशमान । जया चित्ती नुपजे कारण ।
कीर्ती धावे आपण । त्याचेची मागे ।।११।।
जया नसे मानापमान । सदा निगर्वी समाधान ।
सर्व ब्रह्म हे ठेवण । मनाचिये ।।१२।।
हरिनामी वृत्ती धाली । सकळ इंद्रिये विश्राम पावली ।
सदा संतोषे दाटली । नेत्रपाती ।।१३।।
इंद्रिये विसरली भान । मनासी नुरले मनपण ।
विषयांचे विषयपण । हारपोनी गेले ।।१४।।
सहजासन सहजवृत्ती । सहज नाम सहज चित्ती ।
सहज समाधी सहज तृप्ती । सहज दृष्टी साधलीसे ।।१५।।
धन्य धन्य ते उद्धवमूर्ती । पाहोनी संतोष वोळंगताती ।
त्रैलोक्याचे अधिपती । स्वानंदरूप ।।१६।।
आजानुबाहू भव्य पुरुष । दिसे शांतरूप दृष्टीस ।
साधासुधा असे वेष । सुप्रसन्न वदन सदा ।।१७।।
दृष्टीस तेज दैदीप्यमान । अंगकांती प्रकाशमान ।
अर्धोन्मीलित लोचन । मौनवृत्ती ।।१८।।
नारायणराव श्रेष्ठ बंधू । अधिकारी परम प्रसिद्धू ।
धन्य धन्य परमानंदू । महाभक्त ।।१९।।
पूर्णब्रह्म रामचंद्र । सतेज सायुज्य अवतार ।
स्वरूप सुंदर अरुवार । साक्षात्कार दावीतसे ।।२०।।
चिमडासी राहिले येऊन । सकळा दिले समाधान ।
जे जे लोलिंगले भक्तजन । त्यांचा उद्धार केलासे ।।२१।।
श्रीहनुमंत कोटणीस । हे जयांचे परम शिष्य ।
तया केले आपणापरीस । थोर अधिकार जयांचा ।।२२।।
ऐसे धन्य श्रीरामनंद्र । तयांचे जे सत्पुत्र ।
तयासी पूर्ण अधिकार । गुरुकृपे नारायणा ।।२३।।
धन्य धन्य ते नारायण । चिमडपीठी शोभायमान ।
अनुग्रह जया पूर्ण । रामराये केलासे ।।२४।।

चिमडपीठाचे अधिप । ते हे परमार्थवंशाचे प्रदीप ।
पूर्ण ओपिले स्वरूप । साधने जेथे ।।२५।।
साधुराज वोळले पाहे । तया साधने सुखची लाहे ।
संसारची ब्रह्म होये । सुखरूप ।।२६।।
नारायणमहाराज सांगती कीर्तनी । प्रपंच परमार्थ नाही दोनी ।
सर्वी भरला चक्रपाणी । उमज घ्यावा गुरुकृपे ।।२७।।
ऐसी थोर ज्यांची संस्कृती । ते वर्तती कोणे रीती ।
साधी रहाणी उल्हासवृत्ती । मने मोठे सर्वची ।।२८।।
श्रीमंत गरीब दोन । हे मानेना ज्यांचे मन ।
संकल्प विकल्प निमाले गहन । आत्मरूपी ।।२९।।
सर्वा भूती समभाव । सानंद स्वच्छंद देवाधिदेव ।
त्याचा केवढा नवलाव । एकभाव सर्वत्री ।।३०।।
तेथेची जडले ज्यांचे मन । म्हणोनी नाव त्या उन्मन ।
आपपरु मीतूपण । नोहेची जेथे ।।३१।।
सर्व देवाचे देवची करी । सर्व देवोची नाही परी ।
म्हणोनी नुरली आनपरी । विश्वसंसारी हे संत ।।३२।।
बहुत करती अन्नदान । सर्वांतरात्मा तोषवी पूर्ण ।
त्रिविध तापे तप्त जन । पायी लागती आत्मसुखा ।।३३।।
सर्वावरी करावी पूर्ण कृपा । पंथ दाविती सहज सोपा ।
मेळ साधिती नामरूपा । पूर्ण स्वरूपा प्रगटविती ।।३४।।
ऐसा जयांचा अधिकार । धन्य नारायण उदार ।
कृपाछत्र ज्यांचेवर । सद्‌गुरूंचे ।।३५।।
धन्य लक्ष्मी अक्का माऊली । मुक्ताई जे प्रगट झाली ।
चिमडमठी येवोनी राहिली । रामचंद्रांचे इच्छेपरी ।।३६।।
रामरायांच्या गुरुभगिनी । महाधिकारी संतजनी ।
त्यांनी घेतले साधन करोनी । निजकृपे ।।३७।।
नारायणी कृपा प्रेम । डोळिया दाविले सर्व ब्रह्म ।
आपण शुद्ध आत्माराम । रूपी धाल्या ।।३८।।



ऐसा अधिकार जाणून । उद्धवराये धरिले चरण ।
बंधू आलिया शरण । महाराज पहाती त्याकडे ।।३९।।
कोमल जयांचे अंतःकरण । महाराज सद्‌गदित होऊन ।
सप्रेमे देवोनी आलिंगन । कुरवाळिले लेकराते ।।४०।।
नारायणाते म्हणे उद्धव । ऐसा काही सांगा उपाव ।
की जेणे देवाधिदेव । भेटे स्वये ।।४१।।
ऐसे पुसिता लाडिकपणे । कृपा केली नारायणे ।
आत्मरूपाचिया पेणे । उघड केले ।।४२।।
उघड दाविले ब्रह्म डोळा । बोधिली साधनाची कळा ।
हृदयी भक्तीचा जिव्हाळा । प्रगट केला ।।४३।।
भक्तीने अंतर भरोन । प्रेमाश्रूंनी भरले लोचन ।
अंग झाले कंपायमान । मनोन्मन जहालेसे ।।४४।।
पूर्ण झाली चित्तशुद्‌धि । लागली तेथेची समाधि ।
सहज साक्षात्कारसिद्‌धि । स्वरूपाची ।।४५।।
महाराज पुसती उद्धवालागून । काय पाहिजे सांगा आपण ।
निष्काम जेणे अंतःकरण । समाधान ते तुज दिले ।।४६।।
समाधान ते साधन । साधन ते समाधान ।
जे का ब्रह्म सनातन । पूर्ण शुद्ध ।।४७।।
काय वर्णावा तो महिमा । संतोष जहाला साधुरामा ।
गुरुमहिमा आगमानिगमा । वर्णवेना सहसाही ।।४८।।
उद्धवा जहाले समाधान । सदा करिती साधन ।
सेवा साधिली रातंदिन । सद्‌गुरूची ।।४९।।
साधे वसन अंगी ल्यावे । साधेची भोजन करावे ।
गुरुभजनी रंगावे । नित्यानंदे ।।५०।।
काही असले आणि नसले । समाधान नाही ढळले ।
काम क्रोध ज्यांचे जळले । अंतरीचे ।।५१।।

पूर्ण जहाले देहातीत । देहावरी नाही प्रीत ।
वेदशास्त्रासी संमत । ऐसी नीत जयाची ।।५२।।
नीतिमत्ता उत्तम बहुत । साधनाचे कष्ट करीत ।
अंतरिया जहाले तृप्त । सहज संतोषे ।।५३।।
प्रपंची या नाही लक्ष । दृष्टी देखिले अलक्ष्य ।
पुष्कळानी हे प्रत्यक्ष । पाहिलेची ।।५४।।
भाषण करावे अति मित । दृष्टी असावी अर्धोन्मीलित ।
अंतरी प्रेमळ बहुत । कोठे आसक्त नसावे ।।५५।।
कमलपत्र गंगोदकी । असोनी उदका स्पर्शेना की ।
तैसेची अलिप्त राहिले की । सुखदुःख समान ज्या ।।५६।।
सर्वा भूती नारायण । ऐसे मानोनी व्हावे लीन ।
आत्मस्वरूपी विलीन । मन करावे सर्वस्वे ।।५७।।
स्वस्त्रीवाचूनी । नातळावी आन कामिनी ।
परद्रव्य विटाळ मनी । आणोची नये ।।५८।।
मूर्ती गंभीर परी शांत । कोणी पहाता संतोष पावत ।
हास्यमुखे अवलोकित । प्रेमदृष्टी ।।५९।।
तहानभूक हारपली । वृत्ती साधने निमाली ।
मिताहारे ठेविली । काया ज्यांनी ।।६०।।
निद्रेलागी केले अधीन । साधनी नाही आळस शीण ।
साधनेची समाधान । सायुज्यता ।।६१।।
गेले सायुज्यपदासी । सोने मृत्तिका समान ज्यासी ।
पूर्ण पावले साक्षात्कारासी । जहाले अधिकारी गुरुकृपे ।।६२।।
एकदा महाराज गावा गेले । मठात उद्धवा ठेविले ।
लक्ष असो दे बोलिले । गावी जाता ।।६३।।
बरेच लोक देवदर्शन । आले घ्यावया कारण ।
जाता दर्शन घेवोन । ठेविले द्रव्य देवापुढे ।।६४।।



उद्धवाते नमन करून । लोक गावी गेले आपण ।
महाराज आले गावाहून । थोडे दिनी ।।६५।।
लक्ष ठेव ऐसे बोलिले । ते गुरुवचन प्रतिपाळिले ।
लक्ष ठेवोनी राहिले । मठाकडे ।।६६।।
नाही हलविले आसन । ऐसे गुरुवचन प्रमाण ।
परी स्पर्शिले नाही आपण । त्या द्रव्यासी ।।६७।।
महाराज आलिया मठासी । उठोनी नमस्कारिले त्यासी ।
कुशल सांगोनी वृत्तांतासी । बोलियेले ।।६८।।
नित्य भजन पूजन । केले वचनाप्रमाण ।
लोकी ठेविले कांचन । ते साधुराये रक्षिले ।।६९।।
साधुमहाराजापाशी ठेविले । ते आपण घ्यावे वहिले ।
तेव्हा महाराज बोलिले । बाजूस ठेविले का नाही ।।७०।।
तेव्हा बोलिले उद्धव । ऐका महाराज सर्व ।
रक्षाया असता देवदेव । काय चिंता मजलागी ।।७१।।
मालकापाशी धन ठेविले । सेवका काय कारण वहिले ।
आपुले कृपे समाधान झाले । नाशवंत गेले मनीचे या ।।७२।।
ऐकोनी उद्धवाचे वचन । महाराज पावले समाधान ।
उद्धवे अर्पिले तन मन । सर्व धनही महाराजा ।।७३।।
उद्धवे सर्वस्व समर्पिले । नारायणपदी लोलिंगले ।
तेणे सर्व गूज प्राप्त झाले । परमार्थाचे ।।७४।।
कित्येक जन येती शरण । म्हणती अनुग्रह करावा आपण ।
परी हे आपणा मोठेपण । नको ऐसे म्हणावे ।।७५।।
कोणा उपदेश नाही दिला । लीन होवोनी जगी ठेला ।
आपुल्या आचारे जगाला । मार्ग दाविला भक्तीचा ।।७६।।
गुरुभक्तीचा आदर्श । लोकी देखिला प्रत्यक्ष ।
देव डोलविला सर्वेश । साधनयोगे ।।७७।।

सर्व संसार सद्‌गुरुपदी । प्रेमे वाहिला आनंदी ।
धन्य उद्‌धव ब्रह्मानंदी । निमग्न झाले ।।७८।।
करोनी परिपूर्ण साधन । तोषिविले नारायण ।
प्रपंच गुरुपायी अर्पून । विश्वकुटुंबी जहाले जे ।।७९।।
जया नाही धन मान । धन्य धन्य ते संतजन ।
कोणी त्यांचे महिमान । वर्णन करावे ।।८०।।
माईसाहेब गुरुमाऊली । आचारविचारे तोषविली ।
कृपा पूर्ण संपादिली । सेवाबळे ।।८१।।
देखोनिया साधन कष्ट । अक्का माऊली संतुष्ट ।
म्हणती धन्य धन्य तू श्रेष्ठ । संतामाजी जहालासी ।।८२।।
ईश्वरी इच्छेने अवतार । भूतली जहाला साचार ।
किती गावे त्यांचे चरित्र । वाचे वानिता अपुरेची ।।८३।।
कानफाट्या गोसावी आला । अक्का माऊली बोले बोल ।
गोरक्षनाथची पातला । चिमडमठी ।।८४।।
अक्कांचिया वचनावरून । सहज कळले महिमान ।
धन्य धन्य भक्तजन । जया दर्शन सिद्‌धांचे ।।८५।।
भक्तकथामृतपान । कवतुके साधण्या समाधान ।
पहाण्या आपणासी आपण । गोरखनाथ अवतरले ।।८६।।
पूर्वावतारी त्रास बहुत । लोक मागेची लागत ।
ते निरसावया येथ । राहिले अलिप्त सर्वदा ।।८७।।
त्यांचे वेळी चिमड मठात । साक्षात्कार बहुत होत ।
धन्य धन्य गुरुभक्त । सज्जन ते ।।८८।।
थोडेची दिन भूतली ठेले । स्वरूपी मिळाले ऐसे वाटले ।
साधुमहाराजा प्रार्थिले । स्वरूपी मिळवावे म्हणोनी ।।८९।।
साधुमहाराज सुप्रसन्न । म्हणती तातडीचे काय कारण ।
उद्‌धव म्हणती आपण । सर्व कार्य जहालेसे ।।९०।।



अवतारकार्य जहालिया जाण । काय करावे राहून ।
एकाकारे अभिन्न । नांदू सुखे सर्वस्वे ।।९१।।
ऐसे विनवोनी आपण । साधुरायांचे धरिले चरण ।
साधुराये वरदान । पूर्ण दिले ।।९२।।
आजारीपणाचे निमित्त । आत्मरूपी विरण्याचा हेत ।
स्वरूपी रूपाकार होत । सांगोनिया सर्वांसी ।।९३।।
शके अठराशे चोपन्नासी । मार्गशीर्ष शुद्‌ध षष्ठीसी ।
पूर्ण मिळाले आत्मरूपासी । आत्मयोगे ।।९४।।
शोकग्रस्त अंत झाला । मठात हलकल्लोळ जहाला ।
माईसाहेबांचे दुःखाला । पारची नाही ।।९५।।
परी सर्व दुःख गिळोनी । मनी या विवेक करोनी ।
और्ध्वदेहिक उरकोनी । घेतले पा ।।९६।।
अधिकारी साधुपुरुष । म्हणोनी बांधिले समाधीस ।
घेतलिया दर्शनास । सुख वाटे ।।९७।।
त्यांची कृपा जहालिया जाण । राजयोग साधन ।
साधुसंतांचे वचन । अंतरी प्रगटे ।।९८।।
म्हणोनी तया हेची विनंती । नाम उपजवा चित्ती ।
सहज साधनाची रीती । दावा बालका प्रेमभरे ।।९९।।
तुमची कृपा होईल जर । तरी सर्व घडे साचार ।
साक्षात्कार सर्वेश्वर । सहज येई ।।१००।।
धन्य उद्‌धव नारायण । धन्य हनुमंत श्रीराम आपण ।
धन्य धन्य सिद्‌धजन । साधुराय ।।१०१।।
धन्य लक्ष्मी अक्का माऊली । निगमवल्ली प्रगट केली ।
होता कृपेची साऊली । देव जोडे ।।१०२।।
करोनी सिद्‌धजना वंदन । उद्‌धवरायांचे चरित्र आपण ।
*दासराम* करी अर्पण । उद्‌धवाते प्रेमभरे ।।१०३।।

***

## (७)

## प.पू.श्रीमामामहाराज केळकर

रामकृष्ण हरी गोविंद । तेचि मूर्तिमंत गोविंद ।
हाचि मनी माझ्या आनंद । जन्मापासूनी ।।१।।
माझा योगचि अपूर्व । म्हणोनि तुम्ही पितृदेव ।
येता घेवोनि आलो ठेव । अध्यात्माचि ।।२।।
हनुमंतप्रभुच्या दारासी । रामबाळ आनंदेशी ।
मौक्तिकाचा चुरा हाताशी । जाताचि आला ।।३।।
माता इंदिरा भाग्यवंत । पतिव्रता निष्ठावंत ।
तिजला अनुग्रह प्राप्त । हनुमत्प्रभूचा ।।४।।
शिरी आला सद्गुरुहस्त । बाल राम असे गर्भात ।
तो निजगर्भ अनाहत । कानी पडला ।।५।।
मम मातेचे मामा । असती कुरुंदवाड ग्रामा ।
तेथ परमार्थाचि पौर्णिमा । उजळली ।।६।।
माझे जन्माचे पूर्वी । बहीण गेली पुण्य पर्वी ।
जिचे पायी आघवी । संपत्ति होती ।।७।।
मम माता करी रुदन । तिला दुःख झाले दारुण ।
समाचारे समाधान । होईना तिचे ।।८।।
महादेव मामावरी । मळणगांवकर कृपा करी ।
गाठी बांधोनि शिदोरी । औरवाडासी पातले ।।९।।



वजीरबाबा महानुभाव । तेथे राहती सदैव ।
धरोनिया सद्भाव । चरणा नमिले ।।१०।।
सांगती आपुली व्यथा । इंदिरा मातेचि कथा ।
प्रसन्नता चित्ता । बाबांच्या आली ।।११।।
तेधवा बाबांनी खारीक । मामांच्या हाती दिली बारीक ।
म्हणती हा प्रसाद एक । मातेसी द्यावा ।।१२।।
भक्षण करता येईल फळ । सांगतो हे प्रांजळ ।
पोटी पुत्र लडिवाळ । असे माऊलीच्या ।।१३।।
तो विष्णुभक्त होईल । हर्ष शोक जाईल ।
कधी न पस्तावेल । आयुवरी ।।१४।।
माझे मामा सद्गद । झाला बहु आमोद ।
पावेनिया स्वानंद । खारीक दिली ।।१५।।
पुढे जन्मला दासराम । हनुमत् सद्गुरुकृपा परम ।
श्रीगुरुलिंगजंगम । वोळले स्वये ।।१६।।
अंताजीपंत आजोबा । त्यांनी आळविले शिवसांबा ।
कुरुंदवाडी पातले ते शोभा । दुणावली ।।१७।।
श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकर । गणेशोत्सव करिती सुंदर ।
हनुमत् सद्गुरु पातले सत्वर । हरिकीर्तना ।।१८।।
होती शके १८४२ गणेश चतुर्थी । आनंदले मंगलमूर्ती ।
सर्वांचिया चित्ती । समाधान ।।१९।।
हनुमत्सद्गुरू कीर्तन । तेथे प्रगटले गजानन ।
मनी इच्छिले ते पूर्ण । झाले असे ।।२०।।
श्रीमंतांनी धरिले मनी । तेचि दाविले करोनि ।
श्रीमंत लागले चरणी । हनुमंतांच्या ।।२१।।
तो अंताजीपंत आले । धरिली हनुमंत पाउले ।
आणि सद्गद विचारिले । विनम्र भावे ।।२२।।

आपली कृपा परिपूर्ण । नातू लाभला आम्हालागून ।
तया द्यावे आशीर्वचन । करूनि कृपा ।।२३।।
हनुमत्प्रभु आले घरी । प्रकाश उजळला भीतरी ।
तया भाग्याची सरी । वर्णवेना ।।२४।।
तयांचे हसरे डोळे । ज्यांनी ज्यांनी पाहिले ।
त्यांचे अंतरी ठसावले । ब्रह्मतेज ।।२५।।
होवोनिया सस्मित वदन । बालका मांडीवरी घेऊन ।
मस्तकी हस्त ठेवून । दृष्टीसी दृष्टी दिधलीसे ।।२६।।
प्रेमे बालका कुरवाळून । म्हणती हा बालपणापासून ।
करू लागेल हरीकीर्तन । वेदान्त सांगेल ।।२७।।
जे असे माझे अंतरी । ही प्रभु रामाची कृपा खरी ।
उमटली बाळाचे अंतरी । काय सांगो ।।२८।।
म्हणोनि या बालकाचे नाम । अंताजीपंत ठेवा राम ।
ऐसे बोलून सप्रेम । सांगितले ।।२९।।
झाला असे भक्तिसोहळा । गुरुपूजेचा थाट केला ।
अद्‌भुत ही लीला । नारायण प्रभूचि ।।३०।।
तेथोनिच फिरले सूत्र । हनुमंत सद्‌गुरु झाले स्वतंत्र ।
मग तेथे परतंत्र । राहिले कोठे ।।३१।।
भरलेली रुपयांची परात । रामप्रभू हनुमंताप्रत ।
देवोनि स्वप्नी म्हणती खैरात । करी परमार्थाचि ।।३२।।
राम ते श्रीराम समर्थ । हनुमंत साक्षात् हनुमंत ।
म्हणोनि वाढला परमार्थ । सांगलीसी ।।३३।।
शके अठराशे चव्वेचाळीस । माघ वद्य तृतीयेस ।
पाहोनी शुभ रविवारास । पर्वणी घडली ।।३४।।
गोविंद पितयांचे मनीचे जाणोन । हनुमंतजी आले धावून ।
नानबा पुंडलीक शामराव घेवूनि । बरोबरी ।।३५।।



परमानंद उसळला । भोजनाचा थाट केला ।
जो घडला सोहळा । अनुपम ।।३६।।
हात जोडोनि अंताजीपंत । गहिवरोन अकस्मात् ।
म्हणती प्रसन्नचित्त । श्लोक ऐका ।।३७।।
जनी रामसेवा मनी रामसेवा ।
तया रामनामी जयाला विसावा ।
हनुमंत हे नाम साजे जयाला ।
नमस्कार साष्टांग माझा तयाला ।।
मागुती जोडोनिया कर । होवोनिया विनम्र ।
गोविंदजी म्हणती सादर । सुश्लोक हा ।।३८।।
सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेचि आता ।।
हनुमत्सुगुरु जगन्नायक । तेचि निके सद्‌गुरुनायक ।
प्रेमे ऐकिली भाक । प्रेमळाचि ।।३९।।
प्रसन्न होवोनि सद्‌गुरुवर । श्लोकेचि दिले प्रत्युत्तर ।
तो श्लोक ह्रदयांतर । व्यापिलासे गोविंदी ।।४०।।
बुडो ही धरा की लया विश्व जावो ।
पडो काल हस्ते शिरी वज्रघावो ।
विसंबू नको सर्वथा नाममाळा ।
मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा ।।
भोजन थाटे झालियावरी । सद्‌गुरूंचि पाऊले शिरी ।
वंदिली सर्वांनी परोपरी । सहर्षेचि ।।४१।।
रामजी बाजूसी उभा राहून । प्रेमे पाहतसे न्याहाळून ।
आनंद मावेना पूर्ण । बोलता नये ।।४२।।

दंगा करू नको कांही । ऐसे सांगते तया आई ।
हे साचले हृदयी । दासरामाच्या ।।४३।।
आईने विरजले दही । काय सांगावी नवलाई ।
संतोषली सद्‌गुरुमाई । हनुमंत ।।४४।।
दासरामे नमस्कारिता । कर ठेविला त्याचे माथा ।
ऐसी ही अद्‌भुत सत्ता । हनुमंताची ।।४५।।
हनुमंत सद्‌गुरू घरी चालले । जाता जाता सहजे पुसिले ।
शाळा सुटते कोणे वेळे । तेवढे सांगा ।।४६।।
गोविंद म्हणती पांचास । सद्‌गुरु सांगती सोल्हास ।
पाचाची वेळ तुम्हास । चांगली बहु ।।४७।।
सद्‌गुरु संतजन निघाले । सर्वांचे डोळे पाणावले ।
न परतती पाऊले । कोणाचीही ।।४८।।
घरी जाऊनी कौतुक केले । हनुमंतप्रभूंनी भले ।
तो सकळासी वाटले । कांही तरी बोलती ।।४९।।
दही विरजोनी आणणेस । हनुमंत सांगती अंताजीपंतास ।
घेवोनी जाता विशेष । घडले असे ।।५०।।
लोक चेष्टा करीत । अंताजीपंत निवांत ।
सांगताती हनुमंत । त्यांचे पंगती ।।५१।।
घाला दही भातावरी । ऐकोनि सत्वरी ।
दही वाढले भातावरी । अंताजींनी ।।५२।।
लोक झाले चकित । आले केळकरांच्या घरात ।
इंदिरा मातेसी पुसत । दही कैसे विरजले ।।५३।।
प्रेमापोटी असती बोलले । इंदिरामातेने सांगितले ।
दही प्रेमे विरजले । दुसरे काय ।।५४।।
येवढेसे दही खादले । आणि अद्वैतसाम्राज्य दिधले ।
ऐसे कोठे घडले । आजवरी ।।५५।।



सुदाम्याची आठवण । होत येथे मजलागून ।
मूठभरी पोहे खाऊन । कृष्णनाथ तोषला ।।५६।।
तया सुदाम्यालागून । श्रीकृष्णे आनंदून ।
दिले राजवैभव जाण । सुदामनगरी ।।५७।।
तेथे दिली राज्याची सनद । येथे दिली कीर्तनाची सनद ।
पांडुरंगमहाराज सद्‌गद । वर्णिताती ।।५८।।
शके अठराशे पंचेचाळीस । पौष वद्य षष्ठीस ।
सायंकाळी पाचास । स्वानंदनिवासी हनुमंत ।।५९।।
स्वानंदसुखनिवासी । झाले हनुमंत पूर्णत्वेसी ।
दीप प्रज्वळिला दीपेसी । दीपाकार ।।६०।।
शके अठराशे पंचेचाळीस । माघ वद्य तृतीया पर्वास ।
शुक्रवारी मध्यरात्रीस । हनुमत्सद्‌गुरु प्रगटले ।।६१।।
गोविंदजी दासबोध । वाचीत होते सानंद ।
तो घडले अगाध । गुरुकृपे ।।६२।।
नित्यकीर्तनाची आज्ञा दिधली । कृपाहस्त ठेवोनी भाळी ।
ते तंतोतंत पाळिली । गोविंदजींनी ।।६३।।
स्वरूपाकार होईपर्यंत । कीर्तन चालले अविरत ।
त्रिकाळ साधनासहित । नित्यनेमे ।।६४।।
कीर्तनासाठी कीर्तन । देवासाठी निमग्न ।
ऐसे बोलती आपण । गुरुदेव रानडे ।।६५।।
दादासाहेब चंदुरकर । सांगती मज वारंवार ।
गुरुदेवे सांगितले साचार । हजार वेळा ।।६६।।
याचे वाटते महत्त्व । हे तो नसे कवित्व ।
म्हणोनि हे जाणीव । सर्वकाळ अंतरी ।।६७।।

रामभाऊ सहस्त्रबुद्धे यांनी । परिसली चंदूरकरांची वाणी ।
तो तयालागुनी । वाटले अपूर्व ।।६८।।
पिताजी प्रसिद्धिपराङमुख । मौनेचि असती सम्यक ।
प्रश्ना उत्तर देती चोख । थोडक्यात ।।६९।।
स्वये कांही न बोलती । कोणी विचारल्या सांगती ।
साधन साधती । रात्रंदिवस ।।७०।।
पडवीसमोर दगडावर । वस्त्र न घेता पाठीवर ।
साधना बैसती रात्ररात्र । हे सकळांनी पाहिले ।।७१।।
तगारे विष्णु काशिनाथ । यांना श्रीहनुमंत सांगत ।
गोविंदजी सदोदित । साधन करिती ।।७२।।
याची खात्री होण्या साचार । तगारे येती वारंवार ।
चकित होवोनि सत्वर । गोविंदजींना वंदिती ।।७३।।
दीपलक्ष्मी विशेषांकांत । ऐसा हा वृत्तांत ।
डॉक्टर तगारे देत । आनंदेसी ।।७४।।
हनुमत्कृपेकरून । माझे बालपणापासून ।
चालिले जे साधन । ते न्यून की खरे ।।७५।।
म्हणोनिया एकवेळ । पिताजींना आदरे पुसिले ।
तव ते म्हणाले । प्रेमभरे ।।७६।।
आपण दोघे जावून । विचारू बाबूरावजीलागून ।
ते गुरुपुत्र महान । म्हणोनी ।।७७।।
बाबूरावजींना विचारिले । बैसोनिया दाखविले ।
तव ते म्हणाले । ऐसेचि चालू दे ।।७८।।
म्हणोनि तात्या दादा मामा । तयांचा दासरामा प्रेमा ।
नारायणे महिमा । दाविला असे ।।७९।।



मामांचे नित्यकीर्तन । बालपणापासून ।
साथ करीतसे धणी । दासराम ।।८०।।
पिताजी मामा ब्रह्मरूप । नित्य दिसती निर्विकल्प ।
त्यांना जे पाहती सविकल्प । निर्विकल्प होताती ।।८१।।
माझा जन्म झालियावर । मामांची प्रतिज्ञा भयंकर ।
भीष्मप्रतिज्ञा उग्र । तयांची वाटे ।।८२।।
त्यांनी स्वीकारले वानप्रस्थ । आणि नाही वाढविले प्रस्थ ।
आपण राहिले स्वस्थ । काय बोलो ।।८३।।
माझी नोकरी झाली थोडी । परी न गेलो देशोधडी ।
माझी सदाचि उडी । मामांच्या कीर्तनी ।।८४।।
अंताजीपंतांनी साथ दिली । त्रयोदश वर्षे भली ।
आणि शिवस्वरूप झाली । त्यांची काया ।।८५।।
श्रीलक्ष्मण दिक्षीत । अंताजीपंतांना पार्थिव देत ।
ती पार्थिवपूजा शेवटपर्यंत । चालविली तयांनी ।।८६।।
राम करी कीर्तन । आणि साथही करी प्रेमे भरून ।
गुरुलिंगजंगमे बोधवचन । प्रगटोनि दिधलेसे ।।८७।।
इंदिरा गोविंद दोघे भले । मातापिता मज लाभले ।
अनेक संताचे दर्शन घडले । म्हणोनिया ।।८८।।
भाग्ये आलो तुमचे पोटा । झालो ब्रह्मांडाहूनि मोठा ।
ऐसे वचन संतांचे सुभटा । आठविले ।।८९।।
येणाजाणाराचे अगत्य । मामा करिती सदोदित ।
विनम्र भावे मस्तक नत । सर्वांपुढे ।।९०।।
तया विनम्रपणाचे नाटक । करता न ये निश्चित देख ।
ते वेगळेपण अलौकिक । मज वाटे ।।९१।।

ना द्वैष ना मत्सर । कधी न कोणाचा तिरस्कार ।
स्वप्नीही कोणावर । न रागावती ।।९२।।
हे कडू हे आंबट । गोड हे तिखट ।
भोजनात किती मीठ । ऐसे न वदती ।।९३।।
आज स्वयंपाक रुचकर झाला । आज उशीर का केला ।
कधी न बोलती बोला । चुकोनिया ।।९४।।
स्वरूपाकार झालियावरी । दिसती ज्यांना साक्षात्कारी ।
हरिकीर्तन गजरी । रंगलेले ।।९५।।
ब्रह्मदेव आला येथ । म्हणे जाऊ सत्यलोकाप्रत ।
त्यांना मामा सांगत । होऊ दे कीर्तन ।।९६।।
ऐसी ही कीर्तननिष्ठा । नाही प्राणाची प्रतिष्ठा ।
अद्वय मार्ग चोखटा । दाविला जगा ।।९७।।
गोविंद गोविंद । मना लागो हाची छंद ।
आवडे सुखद । तुकोबांचा अभंग ।।९८।।
निंबरगी गुरुलिंगजंगम । हनुमंत मामा परम ।
तयांचे पदी दासराम । असो दे सदा ।।९९।।
"इये शरीराची माती । मेळवीन तिये क्षिती ।
जेथे चरण गती श्रीगुरूचे" । ऐसी श्रीज्ञानेश्वर माउली ।
ज्ञानेश्वरीये बोलिली । ती ओवी यथार्थ केली ।
श्रीमामांनी ।।१००।।
हनुमत्समाधि मंदिर । कृष्णाकाठी सुंदर ।
तयामागे औदुंबर । वृक्ष असे ।।१०१।।
तेथ श्रीमामांच्या अस्थि । अंतरी धरोनि भक्ती ।
गंगाधरराव प्रतिष्ठिती । औदुंबरापारी ।।१०२।।
तो वृक्ष देखता मनोहर । चित्त चाकाटे चतुर ।
मामा दिसती निरंतर । मज तेथे ।।१०३।।



श्रीमामांची अमृतवाणी । जे आली माझे श्रवणी ।
देहभान हरपोनि । गेले तेथ ।।१०४।।
मी तो केव्हाचि गेलो असे । मामांचे कीर्तन चालले असे ।
माझे अस्तित्वचि नसे । ऐसे गूज ।।१०५।।
अमृतवाणी ग्रंथ । झाला प्रसिद्ध जगात ।
तयाची स्थळ प्रत । श्रीधर करी ।।१०६।।
तयाते अभंग सांगता । मामा आहेत हे चित्ता ।
त्या संगतीची अपूर्वता । शब्दी न ये ।।१०७।।
गोविंद गोविंद गोविंद । सदा गर्जतो स्वांनद ।
आणि वंदितो पदारविंद । श्रीमामांचे ।।१०८।।

***

(८)

## प.पू.श्रीरघुनाथमहाराज खटावकर

श्रीगणेशाय नमः ।।
जय जयाजी श्रीरघुनाथा । तुवा वंदितो सुमने आता ।
वदवावे मम वाचे सर्वथा । चरित्र आपुले ।।१।।
साधु देव नाही दोन । सिद्धपदी तव अधिष्ठान ।
काय वर्णावे परम गुण । एक्या मुखे ।।२।।
खटावपंथ जो वरिष्ठ । भक्तिमार्ग दाविला श्रेष्ठ ।
देव उघड केला स्पष्ट । धन्य धन्य ।।३।।
भाविकासी दाविला देव । जगा दाविला नवलाव ।
काय वर्णावा तव प्रभाव । आद्य पुरुषा ।।४।।
रघुनाथ महाराज । प्रगट केले आत्मतेज ।
माया ब्रह्माचे दाविले गूज । परोपरी ।।५।।
योगसिद्धि झाली पूर्ण । सहजासनी विराजमान ।
महामाया ओलांडून । गेले पुढे ।।६।।
दासबोध ग्रंथ धरिला प्रमाण । श्रीसमर्थांचे मानिले वचन ।
बहुता दिले समाधान । गुरु आज्ञे ।।७।।
जे शिवनामी रंगुनी गेले । शिवस्वरूपी रमोनी जडले ।
तयांचे सामर्थ्य चाले । सर्वां ठायी ।।८।।
एकदा विसोबा ब्राह्मण । ज्याचे नास्तिकत्व पूर्ण ।
ज्याने कधीही देवदर्शन । घेतले नव्हते ।।९।।
गंगेसी जो म्हणे पाणी । भाव नाही ज्याचे मनी ।
मूर्तीसी पाषाण वदनी । वदला जो ।।१०।।



परी तयाचे थोर पूर्व सुकृत । कैसे होते बळिवंत ।
मार्गी चालता वाटेत । ऐको आले त्या पुराण ।।११।।
तयाचे पालटले मन । एकाएकी आश्चर्य पूर्ण ।
आत बैसला जाऊन । श्रवणासी ।।१२।।
रघुनाथमहाराजांचे प्रवचन । दासबोधावरील गहन ।
ऐकता मनाचे उन्मन । जहाले त्याचे ।।१३।।
ब्रह्म सत्य माया वोखटी । ऐसी अक्षरे मिनली पोटी ।
अंतःकरणी अर्थकोटी । उद्भवली ।।१४।।
नास्तिकाचे वळले मन । ह्रदयी बिंबले आत्मज्ञान ।
आत्मतेजे अंतर भरून । गेले त्याचे ।।१५।।
प्राप्त जहाली सहज कळा । अंतरी उठला भक्ति उमाळा ।
तेणे त्याची जीवन कळा । प्रफुल्ल झाली ।।१६।।
उठोनी महाराजांचे चरण । धरोनी केले साष्टांग वंदन ।
अखंड चालिले अनुसंधान । आत्मानात्मविचारणा ।।१७।।
महाराजांची कृपा होता । कासयासी करणे चिंता ।
आपेआप सार्थकता । गुरुभक्तासी ।।१८।।
पुढे महाराजा विचारून । निघाला काशीक्षेत्रालागून ।
मध्यंतरी भयभीत होऊन । पडलासे ।।१९।।
वाटेत चोरांनी अडविले । चीजवस्त हिरावुनी घेतले ।
त्याचे प्राणावरी उठले । अकस्मात ।।२०।।
होता बिचारा भोळा ब्राह्मण । तेथे त्याचा वाली कोण ।
भाविकपणा ठसला पूर्ण । ज्याचे चित्ती ।।२१।।
रघुनाथमहाराजगुरूंचे चिंतन । करिता प्रगट झाले आपण ।
करावया सोडवण । विसोबाची ।।२२।।
रघुनाथराये करिता स्मरण । प्रगट झाले भगवान ।
तया देखोनिया मन । भीती पावले चोरांचे ।।२३।।

अंगी रोमांच उठले । सर्व पश्चात्ताप पावले ।
दीनपणे शरण आले । रघुनाथराया ।।२४।।
रघुनाथराये कृपा केली । चोरांची वृत्ति मावळली ।
चोरीपासुनी निवृत्त झाली । वृत्ती त्यांची ।।२५।।
दुर्जनाचे झाले सज्जन । ऐसे सत्संगाचे महिमान ।
ज्यांना जहाले दर्शन । भगवंताचे ।।२६।।
इतुके जहालियावरी । महाराज अदृश्य झाले सत्वरी ।
पुढे जावोनी काशीक्षेत्री । सकळ जन परतले ।।२७।।
एकदा रघुनाथमहाराज । दासबोध ग्रंथाचे गूज ।
सांगत बैसले सहज । भाविकांसी ।।२८।।
नवल घडला चमत्कार । प्रचीतीसी आणिला साक्षात्कार ।
भगवद्दर्शनाचा प्रकार । मुमुक्षुजनां दाविला ।।२९।।
सर्वेश भगवान शंकर । तये पुराणी प्रगटले साचार ।
तेज दाटले अपार । चोहीकडे ।।३०।।
देखता हे प्रत्यक्ष प्रमाण । चकित झाले सर्व जन ।
महाराजांचे धरोनि चरण । बरवे पुसिले तयासी ।।३१।।
कैसा हा प्रकाश दैदीप्यमान । आमुचे नेत्र गेले मिटोन ।
काय केलिया होईल दर्शन । भगवंताचे ।।३२।।
तव सांगती सकळाते । अनुसंधानी रहाता चित्ते ।
गुरुकृपे सकळ घडते । यथासांग ।।३३।।
ऐसा ज्यांचा अधिकार । किती वर्णन करावे थोर ।
अबोल बोलाचा प्रकार । बोलता नये ।।३४।।
तयांचे शिष्य भीमानंद । तया दाविला स्वरूपानंद ।
आपुल्यापरी स्वतःसिद्ध । केले त्यासी ।।३५।।
तैसेची शिष्य रामानंद । महाधिकारी परम सिद्ध ।
तोडुनि गुरुशिष्यभेद । केला अभेद रघुनाथे ।।३६।।



दोघांते आज्ञापिले साचार । करावया परमार्थ विस्तार ।
आपण आत्मरूपाकार । होऊनी ठेले ।।३७।।
खटावात पावले समाधी । सर्व सांडोनी उपाधी ।
अभेदाची पूर्ण सिद्धी । जहालीसे ।।३८।।
ज्यांचे योगे परम पावन । खटाव ग्राम गेले होऊन ।
त्यांचे जेवढे वर्णन । करावे तेवढे थोडेची ।।३९।।
श्रीरघुनाथमहाराजचरित्र कथन । श्रीहनुमंतकृपेचे हे सुमन ।
रघुनाथमहाराजपदी अर्पण । सूचित करी *दासराम* ।।४०।।

***

(९)

## प.पू. श्रीभीमानंदमहाराज खटावकर

श्रीगणेयाश नमः ।।
वंदन असो श्रीरघुनाथा । सर्वा ठायी आपुली सत्ता ।
बोलवा मम वाचे आता । श्रीभीमानंद चरित्र ।।१।।
संतसिद्धांची जहालिया कृपा । परमात्मा होय सहज सोपा ।
संतचरित्रे वर्णिता खेपा । घाली घरी भक्ताच्या ।।२।।
वशिल्याने भगवद्दर्शन । सुगम होय हो म्हणोन ।
विनंति करितो सुप्रसन्न । व्हावे आता ।।३।।
हरिभक्तासी हे परवडी । लागल्या संतचरित्र गोडी ।
भगवान धावतो तातडी । भक्तभेटीसी ।।४।।
श्रीहनुमंत सद्गुरुराज । लटक लावियेली सहज ।
संतपदाची आवड मज । लावोनी गेले ।।५।।
म्हणोनि विनंती करितो चरणा । स्फुरण देवोनी अज्ञाना ।
ज्ञानामृत प्रेम पान्हा । द्यावा भक्ता ।।६।।
विनंती करिता आशिर्वाद । मिळता झाला मना आनंद ।
संतचरितामृत कंद । सेवू आता ।।७।।
रघुनाथरायांचे शिष्य प्रसिद्ध । धन्य धन्य भीमानंद ।
ज्यांनी नित्य ब्रह्मानंद । सेवियेला गुरुकृपे ।।८।।
अखंड चालिले अनुसंधान । जीव शिव ऐक्यता पावून ।
सद्गुरूंची कृपा पूर्ण । संपादिली ।।९।।
जगदोद्धारा आज्ञा झाली । ते गुरु आज्ञा पूर्णत्वे पाळिली ।
भक्तिमार्गा जनता लाविली । कीर्ती वाढविली अमूप ।।१०।।
सद्गुरूंची केली कीर्ती । नाही आशा धरिली चित्ती ।
काय वर्णावी महती । भीमानंदांची ।।११।।
करोनि सर्व मतांचे खंडण । आपुला सांप्रदाय प्रधान ।
असोनी अत्यंत गहन । कैसा जगाते दाविला ।।१२।।
मोठे मोठे विद्वज्जन । तेथे जहाले शरण ।
अनुभवाची प्रमाण खूण । जगा दाविली ।।१३।।
एक विद्वान पंडित शरण । आला भीमानंदा लागून ।
प्राप्त होण्या समाधान । शाश्वत ।।१४।।
सर्व शास्त्राभ्यास करोनी । सुख नाही लाधले मनी ।
जे कदा न लाधे त्रिभुवनी । बहु यत्ने ।।१५।।
भीमानंदांची कृपा दृष्टी । लाधता लाधला जगजेठी ।
सुखसिंधू लाधता पोटी । महत्सुख जहालेसे ।।१६।।
एक होता दत्तभक्त । त्याने विचार केला मनात ।
जरी हे असतील संत । तरी मनीचे जाणतील ।।१७।।
मी तयासी गेलिया शरण । दत्तभक्ती सांगतील पूर्ण ।
जेणे होईल दर्शन । दत्तात्रयांचे ।।१८।।
ऐसे म्हणोनी गेला शरण । बोलिला महाराजालागून ।
त्रिविध तापे गेलो पोळून । गुरुराया ।।१९।।
मजवरी कृपा करावी । ऐसी इच्छा धरोनी जीवी ।
शरण बुद्धी जहाली बरवी । तव पदी ।।२०।।
दत्तभक्ती करिताना । जनी पहा जनार्दना ।
ठेवोनिया अनुसंधाना । प्रेमभरे ।।२१।।
दत्तभक्तीचे स्वरूप बोधिले । बंध खोलुनी मुक्त केले ।
येणे रीती वाढविले । भक्तिपंथा ।।२२।।
करावया जगदोद्धार । जहाला योगी पुरुषाचा अवतार ।
कार्य केले अपरंपार । रघुनाथप्रभूंचे ।।२३।।
कैसी साधावी परम भक्ती । जगा दाविली हे स्थिती ।
कलियुगी थोर प्रचीती । दावोनी गेले ।।२४।।
देहालागी कंटाळिले । गुरुचरणी विसावले ।
गुरुस्वरूपाकार झाले । भाविकांते सांगोनिया ।।२५।।
श्रीभीमानंदचरित्र कथन । गुरुकृपेचे हे सुमन ।
श्रीहनुमंतकृपे अर्पण । प्रेमभरे करी *दासराम* ।।२६।।

***

## (१०)

## प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर

श्रीगणेशाय नमः ।।
धन्य धन्य रघुनाथराया । जे तुवा हरली भवमाया ।
ते तुझे वर्णन कासया । पुरेल पा ।।१।।
वदवी संत चरित्र गोड । जेणे पुरती सकल कोड ।
क्रोध काम हंकार रोड । होय जेणे ।।२।।
मिळता आशिर्वाद दाटला आनंद । मनीचा नुरला द्वैतभेद ।
सरला अनिर्बंध खेद । जीवाचा हा ।।३।।
धन्य रघुनाथ सिद्ध । धन्य शिष्य भीमानंद ।
गुरुबंधू रामानंद । धन्य धन्य ।।४।।
रामानंद स्वये ब्रह्म । होऊनी जहाले निष्काम ।
वदनी रंगले पूर्ण नाम । नादरूप ।।५।।
अखंड करावे चिंतन । आत्मानात्मविवेचन ।
पूर्ण वेगळे प्रपंचापासून । विदेह स्थिती ।।६।।
गारुडी करती चमत्कार । त्याकरता नसती संतावतार ।
जगा दावाया परमेश्वर । अवतरती ।।७।।
आत्मानात्मविचार खोल । तोही सांगती सकळ ।
जेणे योगे घननीळ । प्रचीतीसी ये ।।८।।
संताहातूनी चमत्कार । सहज घडती अपार ।
तयाकरिता पृथ्वीवर । न येती ते ।।९।।
शालेय विद्या थोडी झाली । अध्यात्मविद्या पूर्ण बाणली ।
गुरुकृपा संपादिली । पूर्णत्वेसी ।।१०।।



सद्गुरूचे आज्ञे जगा । लाविले भक्तिमार्गा जगा ।
सर्वत्र बोधामृतगंगा-। पान केले ।।११।।
दासबोध सांगावा जेव्हा । सुवास दरवळे सर्वत्र तेव्हा ।
अपूर्व रंगभरे तेधवा । काय सांगो ।।१२।।
गुरु डोले ज्या पुराणी । त्यासी कोण वदे वाणी ।
आत्मरूप बिंबे नयनी । लखलखीत ।।१३।।
होऊनी उफराटी दृष्टी । झाली चिन्मय पदी भेटी ।
अमृतरसे तृप्ती पोटी । पूर्ण झाली ।।१४।।
यवनजनाशी वाद करून । सत्यासत्य निवाडा करून ।
कित्येक कट्टे मुसलमान । रामभक्त केले हो ।।१५।।
अंगी जाज्वल्य धर्माभिमान । स्वधर्मनिष्ठापरायण ।
जो बोलिला धर्म कृष्ण । ऐसा धर्म जाणिलासे ।।१६।।
सर्व ग्रंथांचे अर्थ सांगत । बोलावी त्यासी खुणेची मात ।
देऊनी सुलभ दृष्टांत । पटवावे जगासी ।।१७।।
त्यांचे पुराण ऐकोनी । प्रपंची पराङ्मुख झाला कोणी ।
परस्त्रीसंग व्यसनातोनी । निवर्तला ।।१८।।
मद्यपानादिक व्यसने । लंपट होता दुर्बळ मने ।
महाराजांचे पुराण श्रवणे । पश्चातापी झालासे ।।१९।।
त्याचे मन निघाले सर्वातोनी । लक्ष लागले गुरुचरणी ।
वृत्ति जडली नामगानी । सत्संगे ।।२०।।
ऐसा नवल प्रभाव । त्याचा न कळेचि ठाव ।
थोर नवलाव अपूर्व । सत्पुरुषांचा ।।२१।।
महाराजांचे बोधामृतश्रवण । जहालिया एक कसाई यवन ।
लीनपणे झाला शरण । पाषाणहृदयी ।।२२।।
खरा चोखट निजधर्म त्यासी । कळता शरण झाला पदासी ।
शरम वाटली तयासी । आपणची ।।२३।।

याहोनी चमत्कार आन । सांगावा तो आता कवण ।
महाराजांचे महिमान । कोणे परी वर्णावे ।।२४।।
त्याचे नुरले कसाईपण । प्राप्त झाले त्या आत्मज्ञान ।
प्राप्त कर्म दिले त्यागून । न लिंपे मन कदापि ।।२५।।
कित्येकांची सुटली व्यसने । सार्थक झाले दासबोध-मनने ।
त्यांची अवखळ मने । हाती आली ।।२६।।
सर्व मतांचे करोनी खंडण । अभंगी बोलिले सत्य वचन ।
भीमानंद रघुनाथगुरूंचे प्रमाण । सत्य केले ।।२७।।
अभंग केले अत्यंत रसाळ । जे वाचिताचि तात्काळ ।
अंतर होतसे सोज्वळ । पुण्यशील ।।२८।।
श्रीहनुमंत प्रभुराज । सद्‌गुरू तात्यासाहेबमहाराज ।
प्रेम करीत महाराज । त्यांचे पायी ।।२९।।
त्यांचे पायी निष्ठावंत । श्रीरामानंदमहाराज समर्थ ।
त्यांची कीर्ती वाखाणीत । प्रेमभरे ।।३०।।
पिताजी गोविंदरायांचे वरी । प्रेम करावे अत्यंत निर्धारी ।
त्यांची वाखाणणी भारी । जनतेपुढे करावी ।।३१।।
सद्‌गुरु हनुमंत आज्ञेने । गोविंदराय नित्य करिती कीर्तन ।
ऐसी त्यांची निष्ठा पाहून । रामानंदा प्रेम वाटे ।।३२।।
गोविंदरायांचे कीर्तनी स्तुती । रामानंदमहाराज करिती ।
आत्मानंदे प्रेम चित्ती । वाटले त्या ।।३३।।
गोविंदराय गेलिया पुराणश्रवणा । त्यांना द्यावा मोठेपणा ।
सांगा म्हणावे पुराणा । भक्तिप्रेमे ।।३४।।
गोविंदरायांनी करावे उत्तर । माझा नाही अधिकार ।
काय सांगू मी पामर । ग्रंथीचा अर्थ ।।३५।।
मग महाराजांनी अर्थ सांगावा । अर्थ सांगता रंग भरावा ।
जेणे योगे देहभावा । विसर पडावा ।।३६।।



'दासरामा कीर्तन करी' । म्हणोनी सांगावे साचारी ।
मज आवडते भारी । रामानंदांनी म्हणावे ।।३७।।
बाबाण्णा सोनारांचे घरी । सांगली ग्रामी आले की निर्धारी ।
निरोप पाठवावा सत्वरी । दासरामा कीर्तनासी ।।३८।।
बाल म्हणोनी करावे कौतुक । दासरामाचे निःशंक ।
विसर पडेचि देख । त्या गोष्टीचा ।।३९।।
प्रल्हाद म्हणोनि मारावी हाक । आशिर्वाद द्यावा कल्याणकारक ।
हरिकृपा होईल निःशंक । सर्वांसमक्ष बोलावे ।।४०।।
ऐसे सत्पुरुषांचे वचन । मनी ठेविले साठवून ।
सत्य व्हावे आशिर्वचन । हा विश्वास मानसी ।।४१।।
रामानंद डोलता कीर्तनी । समाधान व्हावे मनी ।
'कीर्तन ऐका याचे' म्हणोनी । आज्ञापिले त्यांनी सर्वासी ।।४२।।
कोणे रीती त्यांचे ऋण । फेडू शकेल हा जीव सान ।
प्रेममूर्ती दयाघन । रामानंद ।।४३।।
त्यांचे गावोनी चरित्र । होऊ आपण पवित्र ।
जेणे योगे शुद्ध वक्त्र । सहजेची होईल ।।४४।।
श्रीरामानंदांचे धरोनी चरण । स्मरणे पावू समाधान ।
संतसत्पुरुषांचे वचन । हृदयी पाळू ।।४५।।
नामदेवे पांडुरंगा डोलविले । श्रीसद्‌गुरु हनुमंतराये नवल केले ।
शिवस्वरूप प्रगटविले । हरिकीर्तनी ।।४६।।
तेज दाटले अपार । नवल दाविला चमत्कार ।
रामानंदांनी केला प्रकार । तैशापरी ।।४७।।
सर्व कार्य जहालियावर । मूळ धामा जाणेचा विचार ।
कळवोनी सर्वांते साचार । भजन केले ।।४८।।
करोनिया प्रभुस्मरण । पंच तत्त्वे पाचात मिळून ।
शिवस्वरूप ठेले होऊन । गुरूपुढे ।।४९।।

ज्यांचे योगे खटाव ग्राम । जहाले क्षेत्रचि परम ।
भक्तिमार्गी ज्यांचे नाम । अढळ झाले ।।५०।।
ऐशा या गुरूभक्तांचे ठायी । हजारो जनता लागे पायी ।
महोत्सव होती पाही । प्रतिवर्षी ।।५१।।
खटाव पीठ धन्य धन्य । जेथे उजळे परमार्थ चैतन्य ।
नमन करू होऊनी अनन्य । तयालागी ।।५२।।
गुरुभक्ताते करोनी वंदन । सेवू आत्मा आनंदघन ।
करू संतपरंपरा वंदन । क्षण एक ।।५३।।
श्रीरेवणसिद्धांचा प्रसाद । श्रीसद्गुरू हनुमंतरायांचा आशिर्वाद ।
दयावंत रामानंद । म्हणोनी चरित्र घडो आले ।।५४।।
रघुनाथमहाराज भीमानंद । कृपासागर प्रसिद्ध ।
त्यांनी वदविला अबुद्ध । काय सांगो ।।५५।।
श्रीरामानंद चरित्र कथन । श्रीहनुमंतकृपेचे हे सुमन ।
श्रीरामानंदपदकमली अर्पण । करी *दासराम* मूढमती ।।५६।।

***

(११)

## कै.मनोहर विनायक मंगळवेढेकर

भला सन्मित्र मनोहर । जहाला मंगळवेढेकर ।
जेणे आपुले कुळगोत्र । उद्धरिले ।।१।।
सज्जन संभावित विनायकराव । थोर पत्नीचा सद्भाव ।
त्यांचे पोटी भाऊराव । जन्मा आला ।।२।।
भाऊरावांची चांगवृत्ति । मनी भाविक ईश्वरभक्ति ।
अंगी असे सात्त्विक शांती । काय सांगू ।।३।।
स्वतःस नाही कोणचा हव्यास । करिती परमार्थाचा अभ्यास ।
भाग्योदयाचा शेष । निकट आला ।।४।।
एकदा आईने कपडे शिवले । उत्तम थाटाचे चांगले ।
आपुलिया मनापरी भले । मौल्यवान ।।५।।
तेधवा पाहोनी कपड्यास । ते बोलिले आईस ।
हे तू केलेसि कशास । मज कारणे ।।६।।
याचे नाही मजसी कारण । साधेचि असावे आपण ।
हे होतिल बाळासाहेबा लागून । मम बंधूसी ।।७।।
थोडक्यात जे उत्तम घडे । ते करणे मज आवडे ।
बहिरंग मज नावडे । काही केल्या ।।८।।
आवड नसे अलंकारी । अंगी घातले जरी भारी ।
काढोनि ठेवावे निर्धारी । शुद्ध मने ।।९।।

ज्यांचे मन पूर्ण तयार । सद्गुण ते अलंकार ।
सुबोधे घ्यावया अपार । इच्छिती जे ।।१०।।
बाल असल्यापासून । दानधर्माकारण ।
चित्तवृत्ति प्रवृत्त जाण । पूर्वजन्मीची ।।११।।
गाईसी धान्य घालावे विपुल । पाणी पाजावे निर्मळ ।
सर्वाघटी घननीळ । भाव ऐसा ।।१२।।
आई रागे भरली जरी । समजूत करावी उपरी ।
तियेसी देव मानुनि सत्वरी । नमन करावे ।।१३।।
कोणी भिक्षेकरी द्वारी । येता तयाते निर्धारी ।
सुपे सुपे धान्य सत्वरी । घालावे की ।।१४।।
लहानपणी ऐसी वृत्ति । वडिलाते भिवोनी असती ।
नम्रता वसे जया चित्ती । सर्व काल ।।१५।।
अंतर असे बहु सात्त्विक । ग्रंथ वाचावे धार्मिक ।
अभंग म्हणावे निःशंक । श्रीतुकारामांचे ।।१६।।
अभ्यासाकरिता घरची मंडळी । जरी का रागे भरली ।
तरी उत्तर कदाकाळी । न द्यावे की ।।१७।।
एका भिकाऱ्यासी बहु अन्न । घातले भाऊरावाने ।
आई बोलिली त्या लागोन । ते दिनी ।।१८।।
इतुके देवोनि कसे चालेल । हे तुला केव्हा कळेल ।
इतुके बोलता बोल । बोलिले पुढे ।।१९।।
संध्याकाळी मी उपाशी राहीन । तया भिकाऱ्याचा संतोष देखोन ।
मला झाले समाधान । माझे आई ।।२०।।
मॅट्रिक झाला नापास । उद्वेग झाला बहु त्यास ।
वडिल रागे भरणार खास । वाटले की ।।२१।।
काही नको मज आता । आठवीन भगवंता ।
तोचि आपुला करोनि पुरता । मुक्तिमंदिरी जाईन ।।२२।।



हे सर्व असे नश्वर । भगवत्रूप सत्य सार ।
संत समागमी अपार । सुख लाधे ।।२३।।
वेदांत विचार ठसला । कोणी जोडीदार मिळाला ।
तपाचा निश्चय दृढ झाला । मनामाजी ।।२४।।
स्वामी होण्याची इच्छा फार । म्हणोनि मुंज करा लौकर ।
आठवे वर्षी बोलिला साचार । सुपुत्र हा ।।२५।।
असो सांगावयाचे कारण । मनी पर्यटनाचा विचार करून ।
श्रीसज्जनगडी जावोन । ठाकला की ।।२६।।
तेथे भगवे पांघरून । लंगोटी परिधान करून ।
कपाळी तेजस भस्म लावोन । बैसला की ।।२७।।
तव झाले श्रीसमर्थ दर्शन । आशीर्वाद दिला त्यालागून ।
संत समागमे धन्य । होशील म्हणाले ।।२८।।
थोडेचि दिन आहे अवधी । त्यात पूर्ण परमार्थ साधी ।
संतसंगे येशील पदी । स्वानंदाच्या ।।२९।।
पुढे तेथे बैसला ध्यानस्थ । संध्याकाळ होता प्राप्त ।
स्वजन आले शोध करित । तये ठाई ।।३०।।
त्यांनी शोधोनी काढिले । घरी घेवोनिया आले ।
सर्वजण आनंदले । तये वेळी ।।३१।।
अंगी असे शक्ति बहुत । लोखंडी सळी गळ्याने वाकवीत ।
असे योगाभ्यासी रत । बहु दिवस ।।३२।।
पुढे शिक्षणाचे साठी । कांही करिता वाटाघाटी ।
सांगलीस यावे हे शेवटी । ठरले की ।।३३।।
बिनिवाले वैद्यांचे घरी । प्रथम राहिले निर्धारी ।
आईबाप मंडळी परी । त्यांचे करिता आली की ।।३४।।
पुढे वझे यांचे वाड्यात । येवोनि राहिले त्वरित ।
रामा सवे संगत । शाळेमाजी झालीसे ।।३५।।

रामाचे जे असे चित्ती । त्याची भाऊरावा प्रीती ।
ऐसी येता प्रचीती । संगती झाली ।।३६।।
रामालागी राजयोग साधन । शंका घेतली विचारोन ।
पाहिले त्यांनी पडताळून । तये क्षणी ।।३७।।
पूर्वजन्मीची सांगता । करावया सार्थकता ।
आले असती तत्त्वता । समर्थ वचनाप्रमाणे ।।३८।।
श्रीहनुमंत सद्गुरु आज्ञे प्रमाण । रामाचे वडिल गोविंदराय आपण ।
नित्य नियमे करिती हरिकीर्तन । परी ते पंढरीसी गेले होते ।।३९।।
पंढरी क्षेत्री कीर्तन । नित्य नियमाचे असे जाण ।
परी स्वगृही कीर्तन । रामचि करी ते वेळी ।।४०।।
रामाचिया कीर्तना भाविकपणे । भाऊराव नियमाने ।
अत्यादरे भक्तिप्रेमाने । येत होता श्रवणासी ।।४१।।
तेथोनी थोडे दिवसांनी । गोविंदराय पंढरीहूनि ।
पांडुरंगाचा प्रसाद घेवोनी । आले पा ।।४२।।
गोविंदरायांना मामा म्हणोन । राम म्हणे तया प्रमाणे ।
भाऊराव त्यांना म्हणे । येई प्रेमे कीर्तनासी ।।४३।।
प्रथम दिनी कीर्तना भीतरी । चमत्कार झाला भारी ।
स्वरूपदर्शन सत्वरी । झाले त्या ।।४४।।
तेव्हा राहिला पाय धरूनी । ते सोडेचिना सत्य जाणी ।
मग उठविल्यावरी त्या लागोनी । चरण सोडिले मामांचे ।।४५।।
या कारणे पूर्ण भक्ति । जडली असे निश्चिती ।
साक्षात्कार प्रचित स्थिती । भाऊराव बोलिला ।।४६।।
तेथेचि त्याचे सार्थक झाले । थोडेचि दिन कीर्तन ऐकिले ।
आनंद पावले भाव बळे । इये जन्मी ।।४७।।
आता जहाले सार्थक । मामांनी दिली प्रचीती रोख ।
पावीन मी उत्तम लोक । भाऊराव म्हणाले ।।४८।।



पुढे ते आजारी पडले । प्रभुचरणी मी आहे बोलिले ।
औषध उपचार बहु झाले । उपेगा ना आले ते ।।४९।।
आजारीपणातही साचार । मामांचा नाही पडला विसर ।
सकळा आश्चर्य वाटले थोर । नवल हे ।।५०।।
नामस्मरणे समाधाने । देह ठेविला तयाने ।
सकळासी विव्हळपणे । सोडुनि गेला ।।५१।।
मातेसी काय दुःख झाले । ते सांगण्या पैल वहिले ।
आप्त इष्ट हळाळले । तया करितां ।।५२।।
दहनभूमीसी गेल्यावरी । विनायकरावांना आली घेरी ।
क्षणमात्रेचि नवल परी । दिसो आली ।।५३।।
गंगाजळ शुभ्र पाणी । निश्चळ दिसले तया लागोनि ।
भाऊराव पद्मासनी । जटा सोडूनि बैसलासे ।।५४।।
संध्येचे सामान पुढे होते । रुद्राक्ष माळा कंठी जेथे ।
नामस्मरणी रमोनि चित्ते । शोभिवंत दिसो आला ।।५५।।
अण्णासाहेबा लागोनि । मागुनि कथिले विनायकरावांनी ।
सांगता नेत्र प्रेमाश्रूंनी । भिजोनि गेले ।।५६।।
सख्खे मामा भाऊरावाचे । अत्यंत दुःखे भेटोनि कैचे ।
आपुले गावी गेले साचे । नारायणराव ।।५७।।
ऐसा मृतात्मा भाऊरावो । तया देव शांति देवो ।
अखंड आपुले ठाई ठेवो । हेचि मागणे भगवंता ।।५८।।
भाऊरावाचे गुण कथन । येथे समाप्त करून ।
जनता जर्नादना जाण । अर्पितसे *राम* हा ।।५९।।
।।श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।।

***

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०
२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ..१९५२
३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८
४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)...........१९६९
५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१
६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२
७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३
८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र................(सन दिलेला नाही)
९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४
१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५
११) सिद्धस्तुती........................................................१९७७
१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.........................१९७९
१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................१९८३
१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र..............................(सन नाही)
१५) गुरुपाठ...........................................................१९८४
१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४
१७) श्रीरामपाठामृत....................................................१९८४
१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र...................................१९८४
१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र.............................१९८७
२०) नित्यपाठामृत......................................................१९८७
२१) संजीवनपाठ.......................................................१९८७
२२) श्रीदासरामवचनामृत...............................................१९८७



## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति......................................१९८८
२४) श्रीगोविंददर्शन...................................................१९८८
२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत....................१९८८
२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८
२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण......................१९८९
२८) श्रीगुरुमहिमा.....................................................१९९१
२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ.................................१९९७
३०) श्रीरामदासबोध...................................................१९९७
३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९
३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)..२००२
३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२
३४) आरती संग्रह......................................................२००२
३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२
३६) हरिपाठ संकीर्तन..................................................२००७
३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना...................................२०१०
३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह.................................२०१०
३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.................................२०१०
४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०१०
४१) ग्रंथत्रयी.........................................................२०११
४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०११
४३) सद्बोध दशक.....................................................२०११
४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध ....................................२०११

## साधकोपयोगी ग्रंथ

१) श्रीनिंबरगीकरमहाराज (चरित्र)
२) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का (चरित्र)
३) चिमडमहाराज (चरित्र)
४) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र
५) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र
६) माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र
७) श्रीदासराममहाराज चरितामृत
८) श्रीदासराममहाराज यांचे नित्यपाठ चरित्र
९) श्रीदासराममहाराज यांचे सहस्रनामस्तोत्र
१०) हनुमद्-गुरु-चरित्र-बोध-सार
११) गोविंद - चरित - मानस (चरित्र)
१२) मामामहाराज केळकर (चरित्र)
१३) अमृतवाणी
१४) श्रीदासराम-गौरव-ग्रंथ
१५) श्रीदासराम वचनामृत
१६) श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह
१७) श्रीगुरुलिंगगीता



१८) श्रीगुरुलिंग-गीतम्
१९) श्रीदासराम-गीतम्
२०) शंकराचार्यकृत आत्मानात्मविवेक
२१) शंकराचार्यकृत तत्त्वोपदेश
२२) शंकराचार्यकृत शतश्लोकी
२३) भगवद्गीता (संपूर्ण मराठीतून)
२४) भगवद्गीता (लेखसंग्रह)
२५) भगवद्गीता (निवडक श्लोकांवरील लेख)
२६) भगवद्गीता : तीन पदे
२७) सद्बोध-दशक (श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रासह)
२८) गुरुराजकथित ज्ञान व बोध
२९) श्रीदासरामकृत ग्रंथत्रयी
३०) पाठांतरसुलभ भगवद्गीता
३१) दासबोधातील तत्त्वज्ञान
३२) अभंग दरबार
३३) सन्मार्गदीप
३४) नारायणीय शिष्य प्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या
३५) श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्र (संतकृपा प्रकाशन)

***

## प्रा. डॉ. के. वा. आपटे
अल्प परिचय

१) संपूर्ण नाव :- केशव वामन आपटे
२) जन्मस्थळ :- सांगली.
३) जन्मतारीख :- ९ सप्टेंबर १९२९
४) शिक्षण :- मराठी शाळा नं.२, पी.एम.हायस्कूल(सध्याचे जी.ए.हायस्कूल), विलिंग्डन कॉलेज, सांगली.
५) अनुग्रह :- १९४२ साली श्रीदासराममहाराजांचा अनुग्रह प्राप्त.
६) परीक्षा, पारितोषिके इत्यादि :-
अ) पी. एम. हायस्कूल मध्ये : करंदीकर शिष्यवृत्ति
आ) मॅट्रिक (मुंबई विद्यापीठ),डिस्टिंक्शन,अकबरनवीस संस्कृत शिष्यवृत्ति
इ) विलिंग्डन कॉलेज मध्ये : अभ्यंकर शिष्यवृत्ति, मुजुमदार शिष्यवृत्ति, बंडो गोविंद शिष्यवृत्ति, पी. डी. गुप्ते पारितोषिक
ई) इंटर आर्टस् (पुणे विद्यापीठ), लोकमान्य टिळक संस्कृत शिष्यवृत्ति.
उ) बी.ए. (संस्कृत ऑनर्स), प्रथम वर्ग (पुणे विद्यापीठ)
ऊ) एम.ए. (पुणे विद्यापीठ), प्रथम वर्ग, बी. डी. नातू वेदांत पारितोषिक.
ए) पी.एच.डी. (मुंबई विद्यापीठ)
७) अध्यापन :-
अ) कीर्ति कॉलेज (मुंबई) व विलिंग्डन कॉलेज (सांगली) या मध्ये पदवीपूर्व ते पदवी वर्गापर्यंत संस्कृत व अर्धमागधी यांचे अध्यापन.
आ) मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांचे तर्फे पदव्युत्तर वर्गांना संस्कृत व अर्धमागधी यांचे अध्यापन
इ) एम्.फिल्. व पी.एच.डी. साठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाची मान्यता.
८) निबंधासाठी पारितोषिके :-
अ) भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मसाक्षात्काराचे मार्ग या निबंधासाठी बनारस हिंदु विद्यापीठाचे बूच मेटॅफिजिक्स प्राईज्
आ)'मूळ गीता व तिचा वक्ता ' या निबंधासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे पारितोषिक.



९) प्रकल्प :-
मध्यवर्ती भारत सरकारकडून शिक्षण विभागातर्फे 'शास्त्रचूडामणि' योजनेखाली प्रकल्पासाठी स्कॉलर म्हणून १९९०-९२ सालासाठी निवड. प्रकल्पासाठी शंकराचार्यकृत 'आत्मानात्मविवेक' हा ग्रंथ.
१०) पदे :-
अ) आजीव सदस्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे
आ) विलिंग्डन कॉलेजात संस्कृत विभागप्रमुख, वसतिगृह प्रमुख, उपप्रचार्य.
इ) मुंबई व शिवाजी विद्यापीठात संस्कृत अध्ययन मंडळाचा सदस्य.
११) देणग्या :-
अ) शैक्षणिक, समाजोपयोगी, व धार्मिक संस्थांना आर्थिक देणग्या.
आ) कीर्ति कॉलेज व विलिंग्डन कॉलेज ग्रंथालयांना पुस्तकांच्या देणग्या.
१२) पुरस्कार :-
अ) सौ. शालिनी विष्णुपंत पाठक स्मृति प्रतिष्ठान (नागपूर)
आ) सांगली जिल्हा नगर वाचनालय यांचा संत साहित्यावरील लेखनासाठी 'संत रामदास स्वामी' पुरस्कार (२००३)
इ) प्रतिष्ठा प्रतिष्ठान (सांगली) पुरस्कार.
ई) मातृमंदिर विश्वस्त संस्था (निगडी-पुणे) यांचे २ पुरस्कार (२००८,२००९)
उ) करवीरपीठाच्या शंकराचार्यांच्या हस्ते 'शास्त्रभूषण' पुरस्कार (औदुंबर)(२०१०)
ऊ) कादंबरीकार ना.ह.आपटे ग्रंथ पुरस्कार,कोरेगांव (२००६)
१३) लेखन :-
अ) संस्कृत, इंग्रजी हिंदी व मराठी या चार भाषांत लेखन.
आ) लेखनाचे विषय :- उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता, शंकराचार्यांचे ग्रंथ, रामानुजकृत श्रीभाष्य १.१.१, मध्वाचार्यांचे खंडनत्रय, सांख्यकारिका, जैन व बौद्ध दर्शन, पंचदशी, रामरक्षा इत्यादी स्तोत्रे, रामायणे:- वाल्मीकि, अद्भुत, आनंद व अध्यात्म, कालिदासाची नाटके व काव्य, प्राकृत भाषा व मराठी भाषा, संस्कृत व प्राकृत व्याकरण, अध्यात्म/परमार्थ, ज्ञानेश्वरांचे अभंग व अनुभवामृत, समर्थ रामदास स्वामींचा दासबोध, संकीर्ण.
इ) पन्नासपेक्षा अधिक नियतकालिकांतून लेखन प्रसिद्ध.

१४) संदर्भ ग्रंथांत नोंदी :-

दिव्य ज्योति (संस्कृत), लर्नेड इंडिया व रेफरन्स इंडिया (इंग्रजी), आणि मराठी सारस्वत (मराठी) या संदर्भ ग्रंथात संक्षिप्त नोंदी.

**※ प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे प्रकाशित ग्रंथ :-**

१) संस्कृत भाषेत :-

१) श्रीगुरुलिंगगीतम् (१९९०) २) श्रीदासरामगीतम् (१९९१)
३) श्रीदासराममहाराजस्य अष्टोत्तरशतनामस्तोत्रम्
४) श्रीदासराममहाराजस्य सहस्रनामस्तोत्रम् (२०१०)
५) गुरुतृतीयाकथासारम् ६)श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम् (२०१०)

२) व्याकरण ग्रंथ :-

१) हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण (१९६३)
२) त्रिविक्रमकृत प्राकृत शब्दानुशासन (१९७३)
३) वररुचिकृत प्राकृत व्याकरण (१९८७)
४) हेमचंद्रकृत प्राकृत व्याकरण (हिंदी) (१९९६)

३) भाषांतरित :-

१) कालिदासकृत विक्रमोर्वशीय नाटक (१९५९)
२) नासदीय सूक्त (१९८८)
३) भगवद्गीता : तत्त्वविवेचिनी टीका (२०००)
४) प्रेमदर्शन (नारद विरचित भक्तिसूत्र) (२००४)
५) अध्यात्म रामायण (२००४)
(३ ते ५ हे ग्रंथ डॉ. गो. रा. कुलकर्णी यांचे सह)

४) केवळ संपादित : -

१) श्रीदासरामवचनामृत (१९८७)
२) रेणुका माहात्म्य (प्रकाशन सन दिलेला नाही)
३) श्रीज्ञानेश्वर स्तोत्र आणि अन्य लघु ग्रंथ (१९९७)
४) श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (२००८)

५)शंकराचार्यांचे ग्रंथ (प्रस्तावना, भाषांतर, स्पष्टीकरण यासह) :-

१) ब्रह्मसूत्र -शांकरभाष्य चतुःसूत्री (१९७३) २) आत्मानात्मविवेक (२००२)
३) तत्त्वोपदेश (२००३) ४) शतश्लोकी (२००९)



६)जैनदर्शन :-

१) न्यायावतार (२००१) २) नयकर्णिका (२००२)

७)संकलन व संपादन : -

१) भगवती रेणुका देवी (२०१०) २) श्रीराम निकेतन (२०११)
३) श्रीराम निकेतनातील आराधना (२०११)

८) स्वतंत्र :-

१) श्रीगुरु तृतीया कथा (१९६७) २) चिमड संप्रदाय (२००५)
३) दासबोधातील तत्त्वज्ञान (२००७)

९)प्रस्तावनेसहित संपादित :-

१) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (२००२) २)आरतीसंग्रह (२००२)
३) चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ (२००२)
४) परमार्थ प्रश्नोत्तरी (पहिली व दुसरी आवृत्ति २००२, तिसरी आवृत्ती २०१०)
५) भजनतरंग (२००६) ६) श्रीदासराम गाथा - पुरवणी (२००९)
७) श्रीदासराममहाराज आत्मचरित्र (२०१०)
८) श्रीदासराममहाराज श्लोकरचना (२०१०)
९) आत्माराम (दासरामकृत अर्थासह) (२०१०) १०) उत्तरगीता (२०११)

१०) संत चरित्रे :-

१) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा (१९७९)
२) श्रीदासराम विहंगम जीवन दर्शन (गौरव ग्रंथात) (१९८०)
३) निंबरगीकरमहाराज (१९८३) ४) चिमडमहाराज (१९८४)
५) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का (१९८६)
६) श्रीदासरामजीवन (श्रीदासराम गौरव गीत मध्ये) (१९९९)
७) श्रीदासराममहाराज चरित्रामृत (२००३)
८) श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र (आवृत्ति पहिली २००७, आवृत्ति दुसरी २००८,आवृत्ति तिसरी २०११)
९) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र (२००९)
१०) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र (२०१०)
११) माईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र (२०११)

११) भगवद्गीता :-

१) गीतेतील तीन पदे (१९९०) २)पाठांतर सुलभ भगवद्गीता (२००३)

३) श्रीमद् भगवद्गीता (प्रस्तावना भाषांतर व टीका यासह) (२००४)

४) भगवद्गीता (लेखसंग्रह) (२००७)

५) भगवद्गीता (निवडक श्लोकांवरील लेख) (२००८)

१२) प्रस्तावना आणि अर्थासह :-

१) सद्बोध दशक (२०११) २) श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (२०११)

**✻ नियतकालिकांत प्रकाशित झालेले ग्रंथ :-**

अ) शंकराचार्यांचे ग्रंथ :-

१) एकश्लोकी २) पंचीकरण ३) वाक्यवृत्ति ४)विज्ञाननौका

५) लघुवाक्यवृत्ति ६) ब्रह्मज्ञानावलीमाला ७) निर्वाणषट्क

८) गुरु-अष्टक ९) कौपीनपंचक १०) अद्वैतपंचरत्न

११) स्वात्मप्रकाशिका १२) स्वात्मनिरूपण १३) दशश्लोकी

१४) ब्रह्मानुचिंतन १५) अद्वैतानुभूति

१६) स्वरूपानुसंधान-अष्टक १७) वाक्यसुधा १८) मायापंचक

१९) महागणेशपंचरत्न २०) आत्मबोध २१) साधनपंचक

२२) प्रौढानुभूति २३) तत्त्वबोध. २४) भवानी-अष्टक

२५) अनात्मश्रीविगर्हण २६) शिवपंचाक्षर स्तोत्र

२७) मनीषापंचक २८) अपरोक्षानुभूति २९) श्रीगणेशभुजंगस्तोत्र

३०) प्रश्नोत्तररत्नमालिका

आ) उपनिषदे :-

१) कलिसंतरण २) नारायण ३) कृष्ण ४)आत्मोपनिषत्

५) अमृतबिंदु ६) सर्वोपनिषत् ७) ब्रह्मबिंदु ८) निरालंब

९) हेरंब १०) कैवल्य.

इ) संकीर्ण :-

१) रामानुजाचार्यकृत श्रीभाष्य १.१.१.

२) मध्वाचार्यकृत खंडनत्रय



३) गौडपादभाष्यासह सांख्यकारिका ४) चूडामणिचरितामृत

५) रामरक्षा ६) रामगीता ७) श्रीगणेशप्रात:स्मरणस्तोत्र

८) आत्माराम (प्रकाशन चालू आहे)

ई) इंग्रजी भाषेत :-

१) आत्मानात्मविवेक २) शारीरक उपनिषद्

३) ब्रह्मबिंदु उपनिषद् ४) कैवल्य उपनिषद् ५) हंसगीता

६) भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मसाक्षात्काराचे मार्ग

७) मूळगीता व तिचा वक्ता

**✻ अप्रकाशित ग्रंथ :-**

१) ब्रह्मसूत्रातील बौद्ध व जैन मतांचे खंडन (इंग्रजीत)

२) विस्तृत अर्धमागधी व्याकरण

३) शंकराचार्यकृत सर्ववेदांतसिद्धांतसारसंग्रह

४) शंकराचार्यकृत विवेकचूडामणि

५) हेमचंद्रकृत प्राकृत व्याकरण (मराठीत)

✻✻✻

## श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।३।।

– श्रीदासराममहाराज

---

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत (ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |

# अनुक्रमणिका


संपादकीय एक
आशीर्वाद पाच
गौरव सात


## गद्य विभाग


१) प.पू.श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी (निंबरगीकर) १
२) प.पू. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर ८
३) प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस :
(अ) प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्राख्यान २६
(ब) प.पू. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे स्वभाव चरित्र अर्थात आधुनिक एकनाथ ३९
(क) भगवान् श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस ५०
४) प.पू. श्री अनंत गंगाधर केळकर ६५
५) प.पू. श्रीचांगदेवमहाराज ७०
६) प.पू.श्रीराधाबाई अक्का ७५
७) प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर ११०
८) प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर १३२
९) प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर १३५
१०) ह. भ. प. बापूसाहेब चांदवलेमहाराज १४०
११) प.पू. श्रीगंगाधरसिंग दीक्षित १४४


## पद्य विभाग


१) रेवणसिद्ध १६३
२) मरुळसिद्ध १७१
३) काडसिद्ध १७५
४) श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर १७८
५) प.पू.श्रीभीमाण्णामहाराज निंबरगीकर १८७
६) प.पू.श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर १९०
७) प.पू.श्रीमामामहाराज केळकर १९८
८) प.पू.श्रीरघुनाथमहाराज खटावकर २०८
९) प.पू.श्रीभीमानंदमहाराज खटावकर २१२
१०) प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर २१४
११) कै.मनोहर विनायक मंगळवेढेकर २१९


***


श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा २२४
साधकोपयोगी ग्रंथ २२६


***


श्रीमामामहाराजांची आरती २३४
श्रीदासराममहाराजांची आरती २३४


***

## श्रीदासराममहाराजलिखित

# लघुचरित्रे

### गद्य विभाग

१) प.पू.श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी (निंबरगीकर)
२) प.पू. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर
३) प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस :
(अ) प.पू.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्राख्यान
(ब) प.पू. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे स्वभाव चरित्र अर्थात आधुनिक एकनाथ
(क) भगवान् श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस
४) प.पू. श्री अनंत गंगाधर केळकर
५) प.पू. श्रीचांगदेवमहाराज
६) प.पू.श्रीराधाबाई अक्का
७) प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर
८) प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर
९) प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर
१०) ह. भ. प. बापूसाहेब चांदवलेमहाराज
११) प.पू. श्रीगंगाधरसिंग दीक्षित

## श्रीदासराममहाराजलिखित

# लघुचरित्रे

### पद्य विभाग

१) रेवणसिद्ध
२) मरुळसिद्ध
३) काडसिद्ध
४) श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर
५) प.पू.श्रीभीमाण्णामहाराज निंबरगीकर
६) प.पू.श्रीउद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर
७) प.पू.श्रीमामामहाराज केळकर
८) प.पू.श्रीरघुनाथमहाराज खटावकर
९) प.पू.श्रीभीमानंदमहाराज खटावकर
१०) प.पू.श्रीरामानंदमहाराज खटावकर
११) कै.मनोहर विनायक मंगळवेढेकर